वायसरॉयच्या कार्यकारी परिषदेवर (Labour Member, 1942–46) असताना जलधोरणावर भर.
मोठ्या बहुउद्देशीय प्रकल्पांची संकल्पना—उदा. Damodar Valley Corporation (1948) सारख्या प्रकल्पांना दिशा.
उद्दिष्ट: सिंचन, पूरनियंत्रण, वीज निर्मिती—कृषी उत्पादनवाढीसाठी पायाभूत सुविधा.
५) शेतकऱ्यांसाठी संस्थात्मक कर्ज व बाजाररचना
सावकारीपासून मुक्तता, सहकारी संस्थांना चालना.
शासकीय नियोजनातून कर्ज, साठवण, विपणन सुविधा मजबूत करणे.
६) नियोजनबद्ध अर्थव्यवस्था
कृषी क्षेत्राचे शास्त्रीय नियोजन, पायाभूत सुविधा व तांत्रिक शिक्षणावर भर.
आर्थिक लोकशाही साध्य करण्यासाठी कृषी सुधारणा अपरिहार्य.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषीविषयक धोरणात्मक विचारांचा थेट/अप्रत्यक्ष लाभ शेतकरी गटांना झाला.
१) भूमिहीन शेतमजूर
जमिनीचे राष्ट्रीयीकरण व भूमिसुधारणा यांवरील भरामुळे भूमिहीनांना जमीनहक्क मिळवून देण्याची दिशा मिळाली. त्यामुळे त्यांना मालकी, सुरक्षितता व उत्पन्नाचा स्थिर स्रोत मिळण्याची संधी निर्माण झाली.
२) लघु व सीमांत शेतकरी
तुकडीकरण रोखणे, सामूहिक/सहकारी शेतीला प्रोत्साहन आणि संस्थात्मक कर्जव्यवस्था यांमुळे लहान शेतकऱ्यांची उत्पादकता व सौदाशक्ती वाढण्यास मदत झाली.
३) दलित व वंचित घटक
सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर भूमिसुधारणा आणि संसाधनांवरील समान हक्क यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या वंचित घटकांना कृषी क्षेत्रात संधी उपलब्ध होण्याचा मार्ग खुला झाला.
४) कर्जबाजारी शेतकरी
सावकारी पद्धतीपासून मुक्तता आणि सहकारी संस्थांच्या माध्यमातून कर्जपुरवठा यांमुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक जाच कमी करण्याची दिशा मिळाली.
५) सिंचनाविना शेती करणारे शेतकरी
जलसंपदा व बहुउद्देशीय प्रकल्पांच्या संकल्पनेमुळे सिंचनसुविधा वाढल्या, ज्याचा लाभ कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांना झाला.
६) अतिरिक्त मजूर असलेली कुटुंबे
औद्योगिकीकरणावर भर दिल्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा ताण कमी होऊन ग्रामीण युवकांना पर्यायी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

**निष्कर्ष**

१) कृषी सुधारणा ही सामाजिक न्यायाची किल्ली आहे
शेतीतील समता आणि भूमिसुधारणा केल्याशिवाय समाजातील विषमता कमी होऊ शकत नाही.
२) जमीन ही केवळ खाजगी मालमत्ता नसून राष्ट्रीय संपत्ती आहे
जमिनीचा उपयोग समाजहितासाठी आणि समन्यायी पद्धतीने झाला पाहिजे.
३) लघु व सीमांत शेतकऱ्यांचे सक्षमीकरण आवश्यक
तुकडीकरण, कर्जबाजारीपणा आणि कमी उत्पादनक्षमता यावर उपाय म्हणून सामूहिक/सहकारी शेती व शासकीय हस्तक्षेप गरजेचा आहे.
४)औद्योगिकीकरणाशिवाय कृषी विकास अपूर्ण
शेतीवरील लोकसंख्येचा ताण कमी करण्यासाठी उद्योगविकास आवश्यक आहे.
५) राज्याची सक्रिय भूमिका अपरिहार्य

नियोजन, सिंचन, कर्ज, बाजाररचना आणि तांत्रिक शिक्षण यासाठी शासनाचा हस्तक्षेप आवश्यक आहे.

६) आर्थिक लोकशाही ही राजकीय लोकशाहीची पूर्वअट

राजकीय हक्कांसोबत आर्थिक समता साध्य झाली तरच खरी लोकशाही टिकू शकते.

**कृषी पर्यटनाला होणारा फायदा — विश्लेषण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार हे समता, नियोजन, औद्योगिकीकरण आणि राज्याच्या सक्रिय भूमिकेवर आधारलेले होते. हे तत्त्वज्ञान आजच्या कृषी पर्यटन (Agro-tourism) विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

१) भूमिसुधारणा व समतेचा दृष्टिकोन → सर्वसमावेशक कृषी पर्यटन

जमिनीचे समन्यायी वाटप आणि भूमिहीनांना संधी देण्याच्या विचारामुळे ग्रामीण समाजातील वंचित घटकही कृषी पर्यटन उपक्रमात सहभागी होऊ शकतात. त्यामुळे पर्यटनाचा लाभ फक्त मोठ्या शेतकऱ्यांपुरता मर्यादित राहत नाही.

२) सामूहिक/सहकारी शेती → समूह आधारित पर्यटन प्रकल्प

सहकारी पद्धतीने शेती केल्यास अनेक शेतकरी एकत्र येऊन कृषी पर्यटन केंद्र उभारू शकतात.

उदा. निवास, स्थानिक खाद्यपदार्थ, शेती अनुभव, हस्तकला प्रदर्शन हे सामूहिक स्वरूपात राबवता येते.

३) औद्योगिकीकरण व पर्यायी रोजगार → पूरक उत्पन्न

आंबेडकरांनी औद्योगिकीकरणावर भर दिला. याच धर्तीवर ग्रामीण युवकांना पर्यटन व्यवस्थापन, प्रक्रिया उद्योग, हस्तकला, दुग्धव्यवसाय यांत रोजगार मिळू शकतो. कृषी पर्यटन हे शेतीसोबत पूरक व्यवसाय ठरू शकते.

४) राज्याचा हस्तक्षेप व नियोजन → शासकीय पाठबळ

आंबेडकरांनी राज्याच्या नियोजनावर भर दिला. आज शासनाच्या योजना, अनुदान, प्रशिक्षण, पायाभूत सुविधा यांमुळे कृषी पर्यटनाला चालना मिळते. योग्य धोरणात्मक नियोजन केल्यास ग्रामीण भागाचा शाश्वत विकास होतो.

५) सिंचन व पायाभूत सुविधा विकास → आकर्षक ग्रामीण वातावरण

जलसंपदा व पायाभूत सुविधांवर दिलेला भर आज हिरवीगार, विकसित शेती निर्माण करतो. हेच वातावरण कृषी पर्यटनासाठी आकर्षण ठरते.

६) सामाजिक न्यायाचा आधार → स्थानिक संस्कृतीचे जतन

कृषी पर्यटनाद्वारे दलित, आदिवासी व वंचित समाजाच्या लोककला, परंपरा, खाद्यसंस्कृती यांना व्यासपीठ मिळू शकते. त्यामुळे आर्थिक सक्षमीकरणासोबत सांस्कृतिक जतनही होते.

**संदर्भसूची**

**(Bibliography)**

१)B. R. Ambedkar (1918).
Small Holdings in India and Their Remedies.
Journal of the Indian Economic Society.

➢ भारतीय शेतीतील तुकडीकरण व उत्पादनक्षमता विषयक मूलभूत लेख.

२)B. R. Ambedkar (1947). States and Minorities: What Are Their Rights and How to Secure Them in the Constitution of Free India.

➢ जमीन राष्ट्रीयीकरण व राज्य समाजवादाची मांडणी.

३)B. R. Ambedkar (1945). Pakistan or the Partition of India. Thacker & Co., Bombay.

➢ आर्थिक रचना, औद्योगिकीकरण व कृषी संदर्भातील विश्लेषण.

४)Government of Maharashtra (1979–2003). Dr. Babasaheb Ambedkar: Writings and Speeches (BAWS), Volumes 1–17. Education Department,

५) Government of Maharashtra.

➢ आंबेडकरांच्या सर्वसमावेशक लेखनसंग्रहातील कृषी, अर्थकारण व धोरणविषयक लेख.

Damodar Valley Corporation (1948). DVC Act, 1948 and Project Reports.

➢ जलसंपदा व बहुउद्देशीय प्रकल्प धोरण.

६)The Evolution of Provincial Finance in British India (1925). P. S. King & Son, London.

➢ आर्थिक नियोजन व वित्तीय रचना.

७)Omvedt, Gail (1994). Dalits and the Democratic Revolution. Sage Publications.

➢ आंबेडकरांचे सामाजिक व आर्थिक विचारांचे विश्लेषण.

८)Jadhav, Narendra (2013).

Ambedkar: Awakening India's Social Conscience. Konark Publishers.
➢ आंबेडकरांच्या आर्थिक व कृषीविषयक दृष्टिकोनाचे स्पष्टीकरण.
९)Government of India (1951). First Five Year Plan. Planning Commission, New Delhi.
➢ स्वातंत्र्योत्तर कृषी धोरणे व नियोजनाची पार्श्वभूमी.
१०)Deshpande, R. S. (2002). Indian Agricultural Development: Issues and Perspectives.Academic Foundation, New Delhi.
➢ भारतीय कृषी विकासाचे शैक्षणिक विश्लेषण.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C

ISSN : 2278-9308
February 2026

# कोरकू आदिवासी महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे व समस्याचे विश्लेषणात्मक अध्ययन : विशेष संदर्भ मेळघाट क्षेत्र (कालखेड 2010-2025)

**प्रा. डॉ. अंजली वाठ**
मार्गदर्शक तक्षशिला महाविद्यालय अमरावती
**कु. श्रद्धा सार्वे**
संशोधक - (Asst. Teacher. Z.P.) 7798537344

**२) कार्यात्मक व्याखा.**

प्रस्तुत संशोधन समस्याचे शिर्षकामधील चलाची कार्यात्मक व्याखा खालीलप्रमाणे आहे.

- **मेळघाट -**

सातपूडा पर्वताच्या कुशीत वसलेला भाग

- **सामाजिक व आर्थिक स्थिती-**

आदिवासी समाजातील महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती

- **कोरकू -**

मेळघाटमध्ये चिखलदरा व धारणी तालुक्यामध्ये वास्तव्य करणारा समाज

**३) प्रस्तावना —**

भारतीय स्त्री- जीवनाचा इतिहास वेदकाळापासून सुरू होता. वेदकाळातील स्त्री- जीवन अतिशय मानाचे व उच्च दर्जाचे होते. आर्यानी उषेसारख्या - देवतेची स्तुती केली होती हे आपलाल्या वेदकाळातील अनेक सूक्तावरून दिसून येते. अर्धनारी नटेश्वराशी कल्पनाही यातुनच निघालेली आहे. वेदकाळातील स्त्रीया मानाने जीवन जगत होत्या. पुरुषांप्रमाणे त्यानांही स्वतंत्र बौद्धीक आणि आध्यत्मीक जीवन लाभलेले होते.

विविध आदिवासी समाजात स्त्रियांच्या दर्जासंबधी सुशिक्षितांमध्ये एकमत आढळून येत नाही आदिवासी समाजात स्त्रोला अत्यंत कनिष्ठ दर्जा दिला जातो असे काहीचे मत आहे तर या उलट स्त्री- घरची स्वामीनी समजुन तिला नेहमी पुरुषासारखी समानतेची वागणूक दिली जाते असे पण काही मत आहे, काही विशीष्ट कारण मुळे मत-भिन्नता असु शकते.

अमेरिकेतील प्रसिद्ध सामाजिक मानसशास्त्रस 'रॉबर्ट' लोवी 'यांनी आदिम समाजातील स्त्रीया दर्जा उरवितांना

- प्रत्यक्ष वागणूक
- कायदेशीर दर्जा
- सार्वजनिक कामाची संधी
- कामाचे स्वरूप व व्याप्ती

वरील चार गोष्टी विचारात घ्यावा असे सुचविले - आहे. यापैकी प्रत्येक बाब स्वतंत्र स्वरूपाची असून एकीचा दुसऱ्याशी कार्यकारण भावाचा संबंध असत नाही असे लोवी यांनी दाखवून दिले.

कोरकु आदिवासी अमरावती जिल्ह्यातील मेळघाट मध्यप्रदेश मधील खंडवा, छत्तीसगड या राज्यात आढळून येतो. मेळघाटातील स्त्रीयांचा शैक्षणिक दृष्ट्या अभ्यासपूर्ण विवेचन करताना काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात की या कोरक स्त्रीया स्वतःला सामाजिक बंधनात गुरफटून ठेवतात त्याचा समाजाने आखून दिलेली पुवाचार चौकटीत त्यांचे संपूर्ण आयुष्य घालवितात. कोरकु आदिवासी महिला त्यांच्या कुंटूंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जिवापाड मेहनत करतात विशेष म्हणजे स्त्री एक नाजूक अशी व्यक्ती आहे.

अशी आपली सर्वसाधारण धारणा असते पण या स्त्रियांमध्ये आपल्या कुंटुंबांचे उदरनिर्वाह करण्याची जिद्द आहे. शरीरा-बरोबर मनाने सुद्धा खंबीर दिसून येतात मेळघाटातील स्त्रीया त्यांचे जीवन जगत असता संपूर्ण जबाबदारी आपला कुंटूबाची पेलत असताना त्यांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. त्यांचा समस्याचा अभ्यास

करणे आवश्यक आहे. समस्याचे आकलन व त्यावरील उपाय अभ्यासणे गरजेचे आहे. या संपूर्ण समाजशास्त्रीय विवेचन लक्ष्मत घेऊन आदिवासी मेळघाटातील स्त्रियांचा सर्वसमावेशक अभ्यास व त्यांचा समस्यांची कारणे यांचा शोध घेऊन त्यावर काय उपाययोजना करता येईल यांचा संपूर्ण अभ्यास यामध्ये करण्यात येणार आहे.

**४) उद्दीष्टे :**

प्रस्तुत, संशोधनात मेळघाट क्षेत्रातील कोरकू आदिवासी महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थीतींचा व समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात येणार आहे

स्त्रियांच्या समस्येचे वास्तव स्वरूप पडताळून पाहण्या- करीता खालील उद्दीष्टे डोळयासमोर ठेवलेली आहे.

1. मेळघाटातील कोरक आदिवासी महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा तपासणे.
2. कोरक आदिवासी महिलांना त्यांचा समाजात निर्णय प्रक्रीयेत असलेल्या सहभागाविषयी तपासणे.
3. कोरकु आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती व दर्जा जाणून घेणे.
4. कोरकू आदिवासी महिलांचा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तपासणे
5. कोरक महिलांचा त्याचा घरातील कर्त्या पुरुषाच्या व्यसनाधिनतेमुळे झालेला परिणाम अभ्यासणे.
6. सांस्कृतीकरणाच्या माध्यमातून मेळघाटातील आदिवासी इतर समाजाच्या कोणत्या बाबी विशेष करून करतात हे अभ्यासणे.
1. धार्मिक कार्यात व संस्कृती जोपासण्यात आदिवासी महिलांची आवड जाणून घेणे.

**५) संशोधन पद्धती**

आदिवासी महिलांची समस्या जाणुन घेण्या- करीता त्यांचा मुलाखती घेतल्या जाईल, संपूर्ण मेळघाट क्षेत्रातील क्षियांच्या लोकसंख्येतून 10% नमुना घेतला जाईल साधा यादृच्छिक नमुना पद्धतीनुसार घेतला जाईल. तथ्य संकलन करताना मुलाखत पध्दत, प्रश्नावली, व्यष्टी अध्यन पद्धत प्रत्यक्ष निरीक्षण पद्धत, सर्वेक्षण इत्यादी वरून संशोधन पूर्ण होण्याकरीता त्या समस्यावर निष्कर्ष काढले जातात.

**६) संशोधनाचे गृहीतके..:**

1. मेळघाटातील कोरकु आदिवासी महिलांचा आर्थिक दर्जा खालावलेला आहे असे निर्देशनास आले.
2. मेळघाटातील कोरकू आदिवासी त्या महिलांना निर्णय प्रक्रियेला महत्त्वाचे स्थान आहे.
3. कोरकु आदिवासी महिलांना शिक्षणाविषयीची ओठ व जागरुकता दिसून आली. आणि परंतु शैक्षणिक दर्जा खालावलेला आहे.
4. दैनदिन जीवनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना आढळुन आले.
5. व्यसनाधिनतेचा परिणाम कोरकु महिलांच्या जीवनावर झालेला आढळून आला.
6. मेळघाटातील आदिवासी महिलांवर सभोवताली असलेल्या इतर समाजाचा विशेष प्रभाव दिसुन आला.
7. धार्मिक कार्यात व संस्कृती जोपासण्यात आदिवासी महिलांचा पुढाकार दिसुन आला

**७) सांख्यीकीय विश्लेषण**

अमरावती जिल्हयातील (मेळघाट उपविभाग) आदिवासी लोकसंख्येचे अध्ययन केले असता असे दिसुन आले .इ.स. 2011 च्या जनगणनेनुसार अमरावती जिल्ह्याची एकूण लोकसंख्या । 2887826 इतकी असून या जिल्हयात एकुण आदिवासी जमातीमध्ये कोरकू आदिवासीचे प्रमाण हे सर्वाधीक आहे. मेळघाट उपविभागा- मध्ये अमरावती जिल्ह्यातील धारणी, चिखलदरा या दोन तालुक्याचा समावेश होत असुन त्याचे क्षेत्रफळ 4012 चौ. किमी आहे. चिखलदरा तालुक्यातील एकुण गावाची संख्या 197 असून 170 गावे वस्ती असलेली तर 27 गावे ओसाड आहेत. ग्रामपंचायती संख्या 53 आहे. धारणी तालुक्यातील एकुण गावाची संख्या 153 असून वस्ती असलेल्या गावाची संख्या 148 आहे तर 05 गावे ओसाड आहेत व ग्रामपंचायतीची संख्या 63 आहे.(मेळघाटातील आदिवासी लोकसंख्या 2022 नुसार)

| अ.क्र | तालुका | एकुण गावे | आदिवासी खेडे | आदिवासी भागाचे क्षेत्रफळ | एकुण संख्या | आदिवसी लोकसंख्या | शे.प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | चिखलदरा | 197 | 197 | 2476 चौ.किमी | 118815 | 115526 | 78.32% |
| 2 | धारणी | 153 | 156 | 1896 चौ.किमी | 184665 | 171443 | 92.84% |

वरील सारणीवरून लक्षात येते की, मेळघाटातील धारणी चिखलदरा तालुका 75% कोरक समाजाने व्यापलेला आहे.

**निष्कर्ष :**

पूर्व साहीत्यात्या आढावा, घेतलास असे दिसुन येते की, मेळघाटातील आदिवासी कोरक महिलांना त्यांचा मुलभुत हक्काची अजुनही जाणीव नाही असे दिसुन येते. स्त्री-पुरुष समानता जरी समाजात आरूढ असेल पण कोरकू स्त्री अजुनही त्यांचा त्याच जून्या रूढी परंपराच्या ओझ्याखाली दबलेली आहे.

प्रस्तुत संशोधनातून कोरक आदिवासी महिलांच्या समस्या, त्यांची कारणे व त्यावरील उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या संशोधनामुळे आदिवासी कोरकु महिलांना कौटुंबिक जबाबदारी पार पाडून स्वत:च स्वतंत्र अस्तीत्व निर्माण करण्याची एक नवी उमेद तयार होईल शिक्षणामूळे आपल्या पाल्यांना नवीन येणाऱ्या संधीच लाभ

ISSN : 2278-9308
February 2026

घेण्याबद्दलची सक्रीयता वाढीस लागेल, परिणाम ती स्वतः एक सकारात्मक बदल करून एक कर्तुत्ववान स्त्री म्हणुन समाजात व कुटुंबात वावरेल.

**संदर्भ सूची:**

1. आगलावे प्रदीप (2007): " सामाजिक संशोधन पर्दा शास्त्र व तंत्रे श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.:
2. क-हाडे बी. एम. (2018): "शास्त्रीय संशोधन पद्धती पिंपळापुरे अन्ड कंपनी प्रकाशन
3. डॉ. कुमार एम (2009): आदिवासी संस्कृती एवं राजनिती" विश्वभारती पब्लीकेशन, नवी दिल्ली
4. देवगावकर एस. जी. (1990): ' KORKU TRIBALS अशोक कुमार, प्रकाशन दिल्ली.
5. कुमार दिपक (2022) : शोध आलेख : अपनी मात सामाजिक-आर्थिक व्यवस्था
6. डॉ. गायकवाड विजय (2022): आदिवासीचे शिक्षणातील समावेशन आणि वर्जितता, हरीती पब्लीकेशन पूर्ण.
7. लांजेवार ज्योती (2005): " भारतीय समाज आणि स्त्री सुगावा प्रकाशन.
8. महाजन, वंदना (2013) : स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन अथर्व पब्लीकेशन
9. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ (1991): " भारतीय समाजरचना पिपलपूरे प्रकाशन, नागपूर.
10. डॉ. संगवे विलास (1978): " आदिवासींचे सामाजीक जीवन पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C

ISSN : 2278-9308

February 2026

# “राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात NEP-2020धोरणामुळे झालेला बदल: एक अध्ययन”

**पुनम माणिकराव ढोरे**
संशोधक विद्यार्थी
दाते कॉलेज, यवतमाळ

**डॉ. सचिन जयस्वाल**
मार्गदर्शक
दाते कॉलेज, यवतमाळ

**सारांश:(Abstract)**

प्रस्तुत संशोधनामध्ये NEP-2020 नंतर राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात झालेल्या रचनात्मक, संकल्पनात्मक, प्रात्यक्षिक व पद्धतशीर बदलांचा अभ्यास करण्यात आला आहे. बहुविषयकता, कौशल्याधारित शिक्षण, संशोधनाभिमुखता, डिजिटल साधनांचा वापर आणि चार वर्षांचा पदवी कार्यक्रम यांसारख्या घटकांचा राज्यशास्त्र अध्यापनावर झालेला परिणाम चिकित्सक दृष्टिकोनातून विश्लेषित करण्यात आला आहे. अध्ययनातून असे दिसून येते की, अभ्यासक्रम अधिक लवचिक, रोजगाराभिमुख व संशोधनकेंद्री झाला असला तरी अंमलबजावणीत काही संरचनात्मक व तांत्रिक आव्हाने आहेत.जसे ग्रामीण भागामध्ये डिजिटल साधनांची असुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता ई. अभ्यासानंतर संबंधित समस्यावर उपाययोजना मांडून भविष्यातील अपेक्षित बदल स्वीकारण्याकरिता व्यवस्था मजबुतीकरणावर भर देण्यात आला.




**प्रस्तावना:**

ज्ञानाच्या बाबतीत जगामध्येवेगानेबदल होत आहेत. बिग डेटा, मशीन लर्निंग,कृत्रिम बुद्धिमता यासारख्याविज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांमध्ये वेगाने बदल होत आहे. त्यामुळे माणसाएवजी मशीनची मागणी वाढत आहे. त्यामुळे रोजगाराच्या स्वरूप व परीस्थितीमध्ये बदल होत आहे.सामाजिक समस्या बहुशाखीय शिक्षणाची गरज अधोरेखित करतात. अशा वेळेस मानव्यशास्त्र व कलेची मागणी वाढणार त्यामुळे शैक्षणिक धोरणात बदल करणे हे काळाची गरज असल्यामुळेभारतामध्ये उच्च शिक्षण व्यवस्थेच्या सर्वांगीण सुधारणेसाठी NEP-2020 लागू करण्यात आले. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP)भारतातील शिक्षणाच्या विकासासाठी रोडमॅपची रूपरेषा देते. हे ज्ञानावर आधारित समाज निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, जे सध्या आणि भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सुसज्ज आहे. NEPचा उद्देश दर्जेदार शिक्षणाची समान उपलब्धता प्रदान करून, नवोपक्रमाला प्रोत्साहन देऊन आणि समग्र विकासाला प्रोत्साहन देऊन शिक्षण प्रणालीमध्ये परिवर्तन करणे आहे. हे धोरण शिकाऊ केंद्रीत दृष्टिकोनाची आवश्यकता यावर भर देते जेसमालोचनात्मक विचारसरणी, सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्यावर लक्ष केंद्रित करते. तेआंतरविद्याशाखीय शिक्षण, बहुभाषिकता आणि व्यावसायिक शिक्षणाचे मुख्य प्रवाहातील अभ्यासक्रमात एकात्मता वाढविण्याचा देखील प्रयत्न करते.

या धोरणामुळे अभ्यासक्रमाची रचना, मूल्यमापन प्रणाली, अध्यापन पद्धती व संशोधन संस्कृतीत महत्त्वपूर्ण बदल घडले. राज्यशास्त्र हा विषय सामाजिक, राजकीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींशी निगडित असल्याने त्याच्या अभ्यासक्रमात समकालीन बदल आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर सदर अध्ययन सादर केले आहे.

**कीवर्ड्स:**

NEP-2020, आंतरविद्याशाखीय शिक्षण, बहुभाषिकता, व्यवसाय केंद्रित, प्राचीन शिक्षण पध्दती,कौशल्याधारित, संशोधन संस्कृती ई.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) NEP-2020 मुळे राज्यशास्त्र अभ्यासक्रमात झालेल्या रचनात्मक बदलांचा अभ्यास करणे.
२) बहुविषयक व कौशल्याधारित घटकांचा परिणाम तपासणे.
३) संशोधनाभिमुख शिक्षणाच्या वाढत्या प्रवाहाचे विश्लेषण करणे.
४) बदलांचे सकारात्मक व नकारात्मक पैलू मांडणे.

**संशोधन प्रश्न:**

१) राज्यशास्त्र अभ्यासक्रमात कोणते मूलभूत बदल झाले?
२) बहुविषयक अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासावर काय परिणाम झाला?
३) संशोधन व प्रकल्पाधारित शिक्षण कितपत प्रभावी ठरले आहे?

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनामध्ये NEP-2020 नंतर राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात झालेल्या रचनात्मक, संकल्पनात्मक, प्रात्यक्षिक व पद्धतशीर बदलांचा अभ्यास करण्यात आला आहे. बहुविषयकता, कौशल्याधारित शिक्षण, संशोधनाभिमुखता, डिजिटल साधनांचा वापर आणि चार वर्षांचा पदवी कार्यक्रम यांसारख्या घटकांचा राज्यशास्त्र अध्यापनावर झालेला परिणाम चिकित्सक दृष्टिकोनातून विश्लेषित करण्यात आला आहे.राज्यशास्त्र हा विषय सामाजिक, राजकीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींशी निगडित असल्याने अभ्यासक्रमात समकालीन बदल आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर सदर अध्ययन करतांना आहे.वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला. प्राथमिक तथ्य संकलन तसेच दुय्यम तथ्य संकलनामध्ये आधी झालेली संशोधने, लेख, NEP 2020 संदर्भातील शासकीय दस्तऐवज, UGCमार्गदर्शक तत्त्वे, विविध विद्यापीठांचे सुधारित अभ्यासक्रम, तसेच शिक्षणतज्ज्ञांचे लेख यांचा अभ्यास करण्यात आला. बहुविषयकता, कौशल्याधारित शिक्षण व संशोधन संस्कृती या संकल्पनांवर आधारीत आधीच्या संशोधनाचा आधार घेतला आहे.प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, माहिती पुस्तिका, शोध प्रबंध तसेच संकेतस्थळ या साधनांचा उपयोग करण्यात आला.

**NEP-2020धोरणामुळे राज्यशास्त्र अभ्यासक्रमातील प्रमुख बदल:**

(१) रचनात्मक बदल:

चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम (FYUGP)

NEP-2020नुसार भारतातील पदवी (UG)शिक्षण ३ एवजी ४ वर्षाचे सुध्दा करता येते. याला Four-Year Undergraduate Programme (FYUGP)असं म्हटलं जातं. पारंपारिक 3-year BA/BSc/BCOMपेक्षा एक वर्ष अधिक अभ्यास ठेवण्यात आले आहे.

(२) बहुविषयकता:(Multidisciplinary)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांना एकाविद्याशाखेचे किंवा विषयाचे ज्ञान घेत असतानाच त्या विद्यार्थ्यांमध्ये जर इतर विषयाबद्दल रुची किंवा आवड असेल तर त्यांना त्या विषयाचे ज्ञानसुद्धा मिळविता येते. त्यामुळे राज्यशास्त्र या विषयाचे ज्ञान घेत असतानाच वाणिज्य, विज्ञान, संगीत इत्यादी विषयाचे सुद्धा ज्ञान घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या धोरणांतर्गत होतो. व विषयांची निवडजो मुख्य विषय आहे तो Majorम्हणून घेऊन इतर विद्याशाखेचेआवडीचे विषय Minor म्हणून घेता येतात. हा अभ्यासक्रम बहुविषयीक (Multidisciplinary)स्वरूपाचा असून विद्यार्थ्यांना मुख्य विषयासोबत इतर विषयही शिकता येतात. मुख्यतः अभ्यास, कौशल्य, संशोधन आणि मूल्य-आधारित शिक्षणावर भर आहे.

३) Multiple Entry-Exitव्यवस्था:

NEP-2020अंतर्गत Multiple Entry-Exitही संकल्पना उच्च शिक्षण व्यवस्थेत लवचिकता आणि विद्यार्थी केंद्रीत दृष्टिकोन आणण्यासाठी मांडण्यात आली आहे.विद्यार्थी तीन किंवा चार वर्षाचे पदवीचे शिक्षण घेत असताना

काही कारणास्तव जर पदवीते पूर्ण करू शकले नाहीत तर मध्येच त्यांना बाहेर पडण्याची(Exit) आणि नंतर पुन्हा प्रवेश घेण्याची(Re-Entry) मुभा देणारी लवचिक शैक्षणिक रचना या धोरणामध्ये करण्यात आलेली आहे.

यामध्ये विद्यार्थी एक वर्ष पूर्ण होऊन बाहेर पडल्यास त्यांना प्रमाणपत्र(Certificate), दोन वर्ष पूर्ण होऊन बाहेर पडल्यास पदविका (Diploma), तीन वर्ष पूर्ण होऊन बाहेर पडल्यास पदवी(Degree) आणि चार वर्षाचा पूर्ण अभ्यासक्रम केल्यानंतर संशोधनासह पदवी(Bachelor's Degree with Research)अशा प्रकारची व्यवस्था या धोरणामध्ये केलेली आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या ड्रॉप-आउटचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

४) Academic Bank of Credits (ABC)संकल्पना:

MEME प्रणाली Academic Bank of Credits (ABC)शी जोडलेली आहे.प्रत्येक विषयाला काही Creditsदिले जातात.विद्यार्थ्यांनी मिळवलेले क्रेडिट्स ABCखात्यात जमा होतात.विद्यार्थी 7 वर्षांच्या आत पुन्हा प्रवेश घेऊन उर्वरित क्रेडिट्स पूर्ण करू शकतो.त्यामुळे "Year Loss" ही संकल्पना कमी होते.

५) संशोधनाभिमुखता:

राज्यशास्त्रामध्ये पारंगत पदवी प्राप्त करताना विद्यार्थ्यांना संशोधन पद्धती हा विषय अनिवार्य केला आहे. तसेच प्रोजेक्ट रिपोर्ट हा प्रात्यक्षिक विषय सुद्धा अनिवार्य केलेला असल्यामुळे संशोधनाच्या संदर्भामध्ये विद्यार्थ्यांना ज्ञान मिळत असल्यामुळे पीएचडीसाठी त्यांचा पाया मजबूत होतो.

६) डिजिटल व तांत्रिक समावेश:

ई-लर्निंग, ऑनलाइन व्याख्याने, डिजिटल डेटाबेसचा वापर, ICTआधारित मूल्यमापनइत्यादी डिजिटल साधनांचा उपयोग करून विद्यार्थ्यांना शिकविणले जाते.

**सकारात्मक परिणाम:**

१) विद्यार्थ्यांची विश्लेषणात्मक व समीक्षात्मक विचारसरणी विकसित होण्यास मदत.
२) संशोधन व प्रकल्पाधारित शिक्षणामुळे प्रत्यक्ष अनुभव.
३) जागतिक स्तराशी सुसंगत अभ्यासक्रम

**नकारात्मक परिणाम:**

१) ग्रामीण भागात डिजिटल साधनांची कमतरता.
२) शिक्षक प्रशिक्षणाची आवश्यकता.
३) अभ्यासक्रम बदलांची एकसमान अंमलबजावणी नसणे.

**सारांश:**

NEP 2020 मुळे राज्यशास्त्र अभ्यासक्रम अधिक व्यापक, लवचिक व संशोधनाभिमुख झाला आहे. बहुविषयकता व कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळाली आहे. तथापि, पायाभूत सुविधा व प्रशिक्षित मनुष्यबळ यांचा अभाव ही अंमलबजावणीतील प्रमुख अडचण आहे. योग्य नियोजन व संसाधन उपलब्धता असल्यास हे धोरण राज्यशास्त्र शिक्षणात दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवू शकते.

**संदर्भग्रंथ सूची**

१) https://url-shortener.me/EGD4
२) https://url-shortener.me/EGM1
३) https://url-shortener.me/EGU5
४) https://url-shortener.me/EGU8

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा विविध शैक्षणिक शाखांच्या अभ्यासक्रमावर आणि बदलत्या प्रभावांवर होणारा परिणाम : एक संशोधनात्मक अभ्यास

**कु. मंगला रामकृष्ण नागे**
रिसर्च स्कॉलर –(स.शि.)

**सारांश (Abstract) -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) हे भारतीय शिक्षण व्यवस्थेतील परिवर्तनवादी पाऊल मानले जाते. पारंपरिक, परीक्षा-केंद्रित शिक्षणपद्धतीऐवजी लवचिक, बहुविषयक आणि कौशल्याधारित शिक्षणरचना विकसित करण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, भाषा शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, कला तसेच व्यावसायिक शिक्षण या विविध शैक्षणिक शाखांच्या अभ्यासक्रमावर NEP 2020 मुळे होणाऱ्या परिणामांचा गुणात्मक व विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. अधिकृत धोरण दस्तऐवज, शैक्षणिक लेख आणि दुय्यम स्रोतांच्या आधारे संकल्पनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. निष्कर्षानुसार, अभ्यासक्रम अधिक क्षमता-केंद्रित, बहुभाषिक, तंत्रज्ञान-संलग्न आणि रोजगाराभिमुख बनत असल्याचे दिसून येते. तथापि, अंमलबजावणीतील संरचनात्मक अडचणी, शिक्षक प्रशिक्षणाची आवश्यकता आणि डिजिटल असमानता ही महत्त्वाची आव्हाने कायम आहेत. योग्य नियोजन व प्रभावी अंमलबजावणीद्वारे हे धोरण भारतीय शिक्षण व्यवस्थेला अधिक समावेशक, गुणवत्तापूर्ण आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवू शकते.

**कीवर्ड्स (Keywords)**
राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, अभ्यासक्रम सुधारणा, बहुविषयक शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, भारतीय शिक्षण व्यवस्था

## 1. प्रस्तावना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारताच्या शिक्षण इतिहासातील महत्त्वपूर्ण धोरणात्मक परिवर्तन आहे. बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक संदर्भात शिक्षण अधिक लवचिक, बहुविषयक आणि कौशल्याधारित करण्याची गरज अधोरेखित झाली होती. या पार्श्वभूमीवर NEP 2020 ने शिक्षणव्यवस्थेची रचना, अध्यापन पद्धती, मूल्यमापन प्रक्रिया आणि अभ्यासक्रमाचे स्वरूप यामध्ये व्यापक बदल सुचवले आहेत. प्रस्तुत लेखामध्ये विविध शैक्षणिक शाखांवरील अभ्यासक्रमीय बदलांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

## 2. संशोधनाची उद्दिष्टे

(1) NEP 2020 मधील अभ्यासक्रमीय तरतुदींचा अभ्यास करणे. (2) विविध शाखांवरील परिणामांचा तुलनात्मक आढावा घेणे. (3) सामाजिक व आर्थिक प्रभावांचे विश्लेषण करणे. (4) अंमलबजावणीतील आव्हाने ओळखणे.

## 3. संशोधन पद्धती (Methodology)

या संशोधनासाठी गुणात्मक वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 या अधिकृत दस्तऐवजाचा अभ्यास, शैक्षणिक जर्नल लेख, धोरण विश्लेषण अहवाल आणि शैक्षणिक तज्ज्ञांच्या मतांचा आधार घेण्यात आला आहे. उपलब्ध साहित्याचे विषयानुरूप वर्गीकरण करून विश्लेषण करण्यात आले आहे. हे संशोधन संकल्पनात्मक स्वरूपाचे असून त्यामध्ये प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षणाचा समावेश नाही.

## 4. शालेय शिक्षणातील बदल

5+3+3+4 रचनेमुळे बालकांच्या विकासानुसार अभ्यासक्रम आखण्याची संधी निर्माण झाली आहे. पूर्वप्राथमिक ते माध्यमिक स्तरापर्यंत संज्ञानात्मक विकास, भाषिक कौशल्ये आणि तर्कशक्ती यांवर भर देण्यात आला आहे. अभ्यासक्रमातील माहितीचे ओझे कमी करून समज-आधारित शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले आहे. सतत व सर्वांगीण मूल्यमापनामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते.

## 5. भाषा शिक्षणावर परिणाम

मातृभाषा व स्थानिक भाषांमध्ये शिक्षण देण्याचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांच्या आकलनक्षमतेस पोषक आहे. मराठीसह इतर भारतीय भाषांच्या अभ्यासक्रमात सर्जनशील लेखन, वाचनसंस्कृती आणि अभिव्यक्ती कौशल्ये वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. बहुभाषिकतेमुळे सांस्कृतिक समन्वय वाढतो.

**6. उच्च शिक्षणातील सुधारणा**

बहुविषयक शिक्षण, मल्टिपल एंट्री-एक्झिट प्रणाली आणि अकादमिक बँक ऑफ क्रेडिट्स या संकल्पनांमुळे उच्च शिक्षण अधिक लवचिक झाले आहे. विद्यार्थ्यांना विविध विषयांचा समन्वय साधण्याची संधी उपलब्ध झाली आहे. संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान स्थापनेची तरतूद करण्यात आली आहे.

**7. विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षण**

कोडिंग, डेटा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवोपक्रम यांसारख्या घटकांचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात येत आहे. प्रयोगशीलता आणि समस्या-निराकरण कौशल्यांना प्राधान्य दिले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांची तांत्रिक सक्षमता वाढते.

**8. व्यावसायिक शिक्षण**

इयत्ता सहावीपासून व्यावसायिक शिक्षणाची ओळख करून देण्याचा प्रस्ताव आहे. उद्योगसंलग्न इंटर्नशिप आणि कौशल्य प्रशिक्षणामुळे रोजगाराभिमुखता वाढते. शिक्षण आणि रोजगार यामधील दरी कमी करण्याचा प्रयत्न दिसून येतो.

**9. सामाजिक परिणाम**

समावेशक शिक्षण, लिंग समानता आणि वंचित घटकांना संधी देण्यावर भर देण्यात आला आहे. स्थानिक गरजांनुसार अभ्यासक्रम रचनेमुळे सामाजिक सुसंगती वाढते.

**10. आर्थिक परिणाम**

कौशल्याधारित शिक्षणामुळे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार होऊन राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. उद्योजकता आणि नवकल्पनांना प्रोत्साहन मिळते.

**11. अंमलबजावणीतील आव्हाने**

शिक्षक प्रशिक्षण, डिजिटल सुविधा, निधी उपलब्धता आणि प्रशासकीय समन्वय ही प्रमुख आव्हाने आहेत. ग्रामीण भागातील डिजिटल असमानता विशेषतः लक्षवेधी आहे.

**12. निष्कर्ष**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे शिक्षण अधिक लवचिक, समावेशक आणि कौशल्याधारित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अभ्यासक्रमीय बदलांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची संधी निर्माण झाली आहे. प्रभावी अंमलबजावणीद्वारे हे धोरण भारतीय शिक्षण व्यवस्थेला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवू शकते.

**References (APA Style)**

Government of India. (2020). National Education Policy 2020. Ministry of Education.
Sharma, R. (2022). Curriculum reforms under NEP 2020. Indian Journal of Education, 8(1), 23–34.
Kumar, K. (2021). Educational transformation in India. Journal of Educational Studies, 15(2), 45–58

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# भाषेच्या माध्यमातून मराठी साहित्याची जागतिक ओळख

**सौ रेखा ताराचंद कंठाळे**
संशोधक विद्यार्थी
सहाय्यक शिक्षिका
लोकनायक बापूजी अणे विद्यालय यवतमाळ

**प्रा.डॉ.राजेश चवरे**
मार्गदर्शक
कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
मारेगाव

**प्रस्तावना :**

भाषा ही कोणत्याही समाजाच्या संस्कृतीची परंपरेची आणि विचारांची आधारभूत रचना असते. मराठी भाषा ही भारतीय भाषांमध्ये एक सशक्त समृद्ध आणि वैशिष्ट्यपूर्ण अभिव्यक्ती क्षम भाषा आहे. मराठी साहित्य हे समाजातील वास्तव मानवी मूल्ये आणि संस्कृतीचे दर्शन घडविणारे आहे आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषेच्या माध्यमातून साहित्याची ओळख मर्यादित न राहता जागतिक पातळीवर पोहोचत आहे. मराठी भाषा ही भारतीय उपखंडातील प्रमुख प्रादेशिक भाषांपैकी एक भाषा असून तिचा इतिहास साहित्यिक वारसा आणि सामाजिक प्रभाव अत्यंत समृद्ध आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञान प्रधान युगात भाषेच्या माध्यमातून साहित्याचा प्रसार देश विदेशात सहज शक्य झाला आहे. त्यामुळे, मराठी भाषेच्या माध्यमातून मराठी साहित्याला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणे ही काळाची गरज आहे.

**भाषा ही समाजाच्या संस्कृतीची व विचारांची वाहक असते :**

भाषाही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाच्या संस्कृतीचे परंपरेचे आणि विचार प्रवाहाचे जिवंत प्रतिबिंब असते प्रत्येक समाजाची भाषा त्यांच्या इतिहासाशी परंपरांशी आणि जीवनशैलीशी घट्टपणे जोडलेली असते. समाजाची जगण्याची पद्धत मूल्यविचार कला, श्रद्धा आणि परंपरा जोपासणे म्हणजेच संस्कृती होय. या सर्वांचा प्रसार भाषेच्या माध्यमातूनच होत असतो. उदाहरणार्थ-मराठी भाषेत नमस्कार, कृपया, आभार, यासारखे शब्द समाजातील संस्कारशीलतेचे व आधाराचे दर्शन घडवतात.

मानवी समाजाचे विचार व्यक्त करण्याचे विचारांना आकार देण्याचे प्रमुख साधन म्हणजे भाषा होय. समाजात निर्माण होणारे नवे विचार तंत्रज्ञान साहित्य आणि विज्ञान यांचा प्रसार भाषेमुळेच शक्य आहे. उदाहरणार्थ- ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून तत्त्वज्ञान सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचवले आणि म्हणूनच भाषाही समाजाच्या संस्कृतीची व विचारांची खरी वाहक आहे. ती समाजाच्या इतिहासाचा जीवन मूल्यांचा आणि भाव विश्वाचा ठेवा जपते. संस्कृतीचे जतन, विचारांचा प्रसार आणि नव्या पिढ्यांशी संवाद हे सर्व भाषेमुळेच शक्य होते आणि म्हणूनच भाषाही समाजाच्या अस्तित्वाचे आणि प्रगतीचे सर्वात महत्त्वाचे साधन आहे.

**मराठी साहित्याची पार्श्वभूमी :**

मराठी भाषा ही भारतीय आर्य भाषा समूहातील एक प्रमुख भाषा आहे. तिचा विकास सुमारे 1000 वर्षांचा आहे. समाज संस्कृती आणि विचार यांच्या बदलत्या प्रवाहात मराठी साहित्याने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. हाच ऐतिहासिक आणि सांस्कृतिक प्रवास भाषेच्या माध्यमातून मराठी साहित्याची जागतिक ओळख दर्शविते.

मराठी भाषेची मुळे संस्कृत आणि प्राकृत भाषांमध्ये आहे. नवव्या आणि अकराव्या शतका दरम्यान अपभ्रंश रूपातून मराठीचा उदय झाला. महाराष्ट्रातील लोकजीवन धर्म समाज रचना आणि राजकीय घडामोडी यांनी मराठीला एक संस्कारित रूप दिले.

भक्ती आंदोलन संत परंपरा आणि लोककलेच्या माध्यमातून ही भाषा जनतेच्या मनाशी जोडली गेली. मराठी साहित्याचा प्रारंभच संत साहित्यातून झाला असे म्हणायला काही हरकत नाही. कारण, हा काळ संतांचा काळ होता. या काळात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, संत जनाबाई, संत चोखामेळा या सर्व संतांनी लोकभाषेतून अध्यात्मिक आणि सामाजिक विचार मांडले. या काळात भक्ती समाज सुधारणा आणि समता बंधुता यांचा संदेश दिला गेला. या रचनांमुळे मराठी साहित्याला जनसामान्यांपर्यंत पोहोचण्याचे सामर्थ्य मिळाले तसेच मुद्रण यंत्र आणि शिक्षण प्रसारामुळे साहित्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल.

तसेच, विसावे शतक ते आज पर्यंतचा कालखंड या काळात कुसुमाग्रज वि. स. खांडेकर, ग.दि. माडगूळकर, श. ना. नवरे आणि ग्रेस यांनी आधुनिकतेचे विविध आयाम साकारले. खरे म्हणजे, या काळात मराठी साहित्याने जागतिक विचारसरणीशी संवाद साधण्यास सुरुवात केली.

मराठी साहित्याची पार्श्वभूमी ही सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाची कहाणी आहे. या पार्श्वभूमीमुळेच मराठी साहित्याला विश्व मानवी दृष्टिकोन प्राप्त झाला आहे. भाषेच्या माध्यमातून आणि भाषांतराच्या साह्याने हे साहित्य आज जागतिक संवादाचा भाग बनले आहे.

**भाषेचे माध्यम म्हणून योगदान :**

भाषेच्या अनुवादाद्वारे मराठी साहित्याचा जगभर प्रसार होत आहे. इंग्रजी, हिंदी, फ्रेंच जर्मन, स्पॅनिश इत्यादी भाषांमध्ये अनेक मराठी कादंबऱ्या आणि कवितांचे भाषांतरे झाले आहे. उदाहरणार्थ पु. ल. देशपांडे यांचे व्यक्ती आणि वल्ली हे पुस्तक इंग्रजी व हिंदी भाषेत अनुवादित झाले आहे. तसेच वि. स. खांडेकर यांची ययाती अनेक भाषेत अनुवादित होऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत आली आहे. ज्ञानेश्वरीचे अनेक भाषांमध्ये भाषांतरे झाले असून ते जागतिक आध्यात्मिक साहित्य म्हणून ओळखले जाते.

**माध्यमे आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव :**

21 व्या शतकात माहिती व तंत्रज्ञान हे मानवी जीवनाचे केंद्र बनले आहे. संवादाच्या सर्व पातळ्यांवर शिक्षण, मनोरंजन, संशोधन आणि साहित्य तंत्रज्ञानाने अमुलाग्र बदल घडून आणले आहेत. भाषेच्या माध्यमातून मराठी साहित्य जगभर पोहोचविण्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे आधुनिक माध्यमे आणि डिजिटल तंत्रज्ञान होय.

पूर्वी साहित्य प्रसारित करण्याचे माध्यम मर्यादित होते. पुस्तके, मासिके आणि वाचन मंडळे हेच माध्यम होते. परंतु, आज इंटरनेट मोबाईल, सोशल मीडिया आणि ई-पब्लिशिंगमुळे साहित्याचे प्रसारण जगभर काही क्षणात होऊ शकते. मराठी लेखक, कवी, वाचक यांच्यातील संवाद थेट आणि जागतिक झाला आहे.

मराठी कादंबऱ्या, कथा, कविता आज ई-पुस्तकांच्या स्वरूपात ॲमेझॉन, किनले, गुगलबुक्स यावर उपलब्ध आहेत. श्रवण आवडणाऱ्या वाचकांसाठी ऑडिओ बुक्सच्या माध्यमातून मराठी साहित्य ऐकण्याची संस्कृती विकसित झाली आहे. तसेच, फेसबुक, इंस्टाग्राम, एक्स ट्विटर आणि ब्लॉक स्पॉट यासारख्या माध्यमांवर नवे लेखक सक्रिय झाले आहेत. डिजिटल मराठी कविता, ऑनलाइन कथा मंच आणि youtube वरील साहित्याच्या नव्या पिढीला मराठीशी जोडले. या माध्यमांमुळे मराठी भाषेचा वापर केवळ संभाषणा पुरता न राहता सर्जनशील अभिव्यक्तीचे साधन बनला आहे. अनेक संशोधन पत्रिका आणि ऑनलाइन साहित्यिक मंच आता मराठी भाषेत उपलब्ध आहेत. यामुळे, सर्वांना जागतिक स्तरावर मराठी साहित्यावर चर्चा करण्याची संधी मिळते.

आज मशीन ट्रान्सलेशनच्या सहाय्याने मराठी साहित्य विविध भाषांमध्ये भाषांतरित होत आहे. यामुळे, मराठी साहित्य ग्लोबल वाचकांसाठी उपलब्ध होत आहे. डिजिटल माध्यमांमुळे मराठी लेखकांना आंतरराष्ट्रीय वाचक वर्ग मिळाला आहे. ऑनलाइन साहित्य महोत्सव व वेबिनार पोडकास्ट आणि डिजिटल चर्चासत्रांमुळे मराठी साहित्य जागतिक व्यासपीठावर पोहोचले आहे.

**भाषांतर आणि सांस्कृतिक संवाद :**

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती एका समाजाच्या संस्कृतीचा, विचारांचा आणि मूल्यांचा आरसा असते. मराठी भाषा तिच्या समृद्ध साहित्य परंपरेमुळे भारतात एक स्वतंत्र स्थान मराठी भाषेने मिळवून दिलेले आहे. परंतु, या साहित्याची जागतिक ओळख निर्माण व्हावी यासाठी भाषांतरे आणि सांस्कृतिक संवाद ही दोन साधने अत्यावश्यक ठरतात.

भाषांतर हे विविध भाषिक समाजामध्ये विचारांची देवाणघेवाण घडवून आणते जेव्हा मराठी साहित्य इंग्रजी, हिंदी, फ्रेंच, जर्मन किंवा इतर जागतिक भाषांमध्ये भाषांतरित होते तेव्हा तो केवळ शब्दातील बदल नसतो तर मराठी समाजाच्या संस्कृती, परंपरा आणि जीवनदृष्टीचे जगभर प्रसारण घडते. उदाहरणार्थ पु.ल. देशपांडे श वा नवरे भा. रा. तांबे व कवी ग्रेस यांच्या साहित्याचे इंग्रजी भाषांतरे झाल्यामुळे त्यांच्या कल्पना आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचल्या. शांता शेळके यांच्या कवितांमधील स्त्री अनुभव किंवा वि. दा. करंदीकर यांचा तत्त्वचिंतन पर कविता जागतिक स्त्रीवाद आणि अस्तित्ववादाशी संवाद साधतात.

भाषांतरातील सांस्कृतिक संवादाविषयी सांगायचे झाल्यास भाषांतर हे केवळ भाषिक रूपांतर नसून संस्कृतीमधील संवाद आहे. एका संस्कृतीतील म्हणी, प्रतिमा, लोकसंस्कृती आणि जीवनशैली दुसऱ्या भाषेत मांडताना सांस्कृतिक अर्थांतर आवश्यक ठरते. भाषांतर करणाऱ्याला दोन्ही संस्कृतीचे गहन ज्ञान असणे गरजेचे आहे. मराठीतील भाव, संवेदना जपणे फार महत्त्वाचे असते. त्यामुळे वाचक फक्त मराठी कथा वाचत नाही तर मराठी जीवन पद्धतीचा अनुभव घेतो. भाषांतरामुळे मराठी साहित्य ग्लोबल लिटरेचरचा भाग बनले आहे. अनेक मराठी साहित्यिकांचे ग्रंथ आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवांमध्ये सादर होत आहेत. डिजिटल युगात ऑनलाइन प्लॅटफॉर्म्समुळे मराठी साहित्याचे इंग्रजी व इतर भाषातील ई-बुक्स उपलब्ध झाले आहे. यामुळे, महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख लोकल टू ग्लोबल असा प्रवास करीत आहे. भाषांतरे करताना काही अडचणी जरी येत असल्या तरी सर्जनशील भाषांतर आणि भाषिक प्रयोगशीलता यामुळे या अडचणींवर मात करता येते.

मराठी साहित्याची जागतिक ओळख निर्माण व्हावी तर भाषांतरे हेच सर्वात प्रभावी माध्यम आहे. भाषांतराद्वारे मराठी संस्कृतीचे सौंदर्य, सामाजिक विचार आणि मानवी मूल्ये जगभर पोहोचतात हेच खरे सांस्कृतिक संवादाचे उद्दिष्ट आहे. माध्यमे आणि तंत्रज्ञानामुळे मराठी साहित्यांचा प्रसार मर्यादित चौकटीतून बाहेर पडून जागतिक संवादाचा भाग

बनला आहे. भाषेच्या माध्यमातून मराठी संस्कृती आणि साहित्य आता लोकल टू ग्लोबल या प्रवासात अग्रस्थानी आहे तंत्रज्ञानाचा सुयोग्य आणि सर्जनशील वापर केल्यास मराठी भाषेला जागतिक दर्जा मिळविणे नक्कीच शक्य आहे.

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची इतिहासाची आणि समाजाच्या भावविश्वाची वाहक असते. मराठी भाषा तिच्या समृद्ध साहित्य परंपरेमुळे भारतीय भाषांमध्ये विशेष स्थान राखून आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ या सर्व संत कवींनी मराठी भाषेला अध्यात्मिक गहराई दिली तर आधुनिक काळात पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज, शांता शेळके, वि. स. खांडेकर अशा अनेक लेखकांना मराठी भाषेच्या अभिव्यक्तीला नवे आयाम दिले.

मराठी साहित्याने लोकजीवन, सामाजिक वास्तव, मानवी नातेसंबंध आणि संवेदना यांचे चित्रण करत लोकल अनुभवांना ग्लोबल संदर्भातील आहे. हेच साहित्य जेव्हा भाषांतराच्या माध्यमातून इतर भाषांमध्ये पोहोचते तेव्हा ते मराठी समाजाच्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे, भाषांतर हे केवळ शब्दातील रूपांतर नसून संस्कृतीचा संवाद आणि परस्पर समजुतीचा पूल ठरतो.

आधुनिक युगात माध्यमे आणि तंत्रज्ञानाने मराठी साहित्याचा प्रसार अधिक सुलभ आणि व्यापक केला आहे. डिजिटल माध्यमातून मराठी भाषा सीमारेषा ओलांडून जागतिक वाचकांपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे, साहित्याचे स्वरूप केवळ प्रादेशिक न राहता जागतिक संवादाचे माध्यम बनले आहे.

तथापि, या प्रवासात काही आव्हानेही असले तरी भाषांतरातील सांस्कृतिक सूक्ष्मता टिकवणे, डिजिटल माध्यमातून गुणवत्तेचे भाव ठेवणे आणि भाषेच्या शुद्धतेचे संरक्षण करणे या आव्हानांवर मात करत मराठी साहित्याने स्वतःचे जागतिक अस्तित्व सिद्ध केले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) डॉ.रा.ची. ढेरे - मराठी संस्कृतीचा अभ्यास.
२) डॉ.अरुणा ढेरे - मराठी साहित्य आणि लोकसंस्कृती.
३) डॉ.सदानंद मोरे - संस्कृती भाषा आणि साहित्य.
४) प्रा. डॉ. माधव बोरकर - भाषा संस्कृती आणि ओळख.
५) डॉ. श्रीधर टिळक - अनुवाद : एक संवाद माध्यम.
६) डॉ. अच्युत गोडबोले - मराठी आणि तंत्रज्ञान.

# उच्च शिक्षणातील भारतीय स्त्रियांचा सहभाग आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.

**नम्रता एन.तानोडे**
**संशोधक विद्यार्थिनी**
**(श्री.नारायणराव राणा महाविद्यालय बडनेरा)**

---

शिक्षण हा मानवी जीवनाचा आधारभूत अंग आहे. शिक्षण घेतल्याने मानवी जीवन हे समृद्ध बनते शिक्षणाने केवळ ज्ञान प्राप्त होत नाही तर हे एक माध्यम आहे ज्या माध्यमाव्दारे समाजामध्ये सामाजिक ,आर्थिक,राजकीय, परिवर्तन घडवून आणल्या जाऊ शकतात. समाजाचा प्रमुख घटक मनुष्य प्राणी आहे आणि हा स्त्री आणि पुरुष या दोन्ही रूपामध्ये समप्रमाणात कार्यरत असतो. समाजाला संचालित करण्याकरिता या दोन्ही घटकांची आवश्यकता असते आणि हे दोन्ही घटक शिक्षित असले तर एक समृद्ध समाज एक समृद्ध राष्ट्र निर्मितीला मोठा हातभार लागतो. जेव्हा आपण आधुनिक भारताच्या प्रगतीची चर्चा करतो तेव्हा त्याची पाय मुळे इतिहासामध्ये आपल्याला सापडतात.अश्मयुग काळापासून ते डिजिटल युग पर्यंत मनुष्य हा रोजच्या दैनंदिन जीवनात काही ना काही शिकत आलेला आहे आणि त्यातूनच त्याने आपली प्रगती घडवून आणलेली आपल्याला दिसून येते, यामध्ये शेतीच्या शोधापासून ते चंद्रावर जाण्यापर्यंतचा महिलांचा प्रवासा कौतुकास्पद आहेत. आज उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये महिलांचा सहभाग बघता हा त्यांचा प्रवास इतका सहज आणि सोपा नाही या प्रवासामध्ये त्यांना अनेक खडतर मार्गातून जावे लागले इतिहासामध्ये डोकावून बघताना लक्षात येते की प्राचीन काळामध्ये हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या स्त्रियां शिक्षित होत्या आणि अखिल महिला समाजाचे नेतृत्व करीत होत्या मात्र हळूहळू त्यामध्ये परिवर्तन होत गेले. उत्तर वैदिक काळात तर शिक्षण पद्धती अधिकच जटील बनत गेली त्यामध्ये शुद्र आणि स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले शिक्षणाचा अधिकार केवळ उच्चवर्गीय पुरुषांनाच होता. मात्र भारतामध्ये जेव्हा इंग्रजांनी आपली सत्ता स्थापन केली आणि त्यांनी इथे निर्माण केलेल्या शिक्षण पद्धतीने जे परिवर्तन घडवून आले त्याच परिवर्तनाचे रूप म्हणजे आजच्या आधुनिक भारतातील मुक्तपणे वावरणारी स्त्री होय.

**उद्दिष्टे :-**

1) भारतीय उच्च शिक्षणामध्ये स्त्रियांच्या सहभागा विषयी ऐतिहासिक माहिती जाणून घेणे.

2) उच्च शिक्षणामध्ये स्त्रियांचा सहभाग जाणून घेणे.

3) स्त्री शिक्षणाबाबत राष्ट्रीय नीती आयोगाने केलेल्या तरतुदी विषयी माहिती घेणे.

सिंधू सभ्यता ही मातृप्रदान सभ्यता होती इथे स्त्रियांना विशेष स्थान दिले जात होते. स्त्री शिक्षणाचे पाय मुळे भारतीय सभ्यतेमध्ये खोलवर रुजलेली दिसून येतात प्राचीन भारताचा अभ्यास केला

असता येथे अनेक विदूषी आणि उच्चशिक्षित स्त्रियां समाजात होत्या ज्या समाजाला दिशा देणारे काम करीत होत्या.वैदिक परंपरेमध्ये मुलांप्रमाणे मुलींनाही उपनयन संस्काराचा अधिकार देण्यात आला होता. त्यामुळे मुली सुद्धा आश्रमात जाऊन ब्रह्मचर्य पालन करून विद्यार्जन अध्ययन करीत होत्या क्षत्रिय स्त्रिया या धनुर्विदयेचे शिक्षण घेत असत असा उल्लेख शतपत ब्राह्मण ग्रंथामध्ये मध्ये मिळतो. ऋषी वशिष्ठ यांची विदुषी पत्नी अरुंधती ही गुरुकुलामध्ये संगीत तसेच पर्यावरण रक्षणाचे धडे विद्यार्थ्यांना देत होती. वैदिक काळामध्ये स्त्री शिक्षणाचे दोन रूप बघावयास मिळतात त्यामध्ये साध्यवधू आणि ब्रह्मवादिनी असे दोन प्रकार होते. साध्यवादी वधू या त्या मुली होत्या एक सदगृहिणी बनण्याकरिता आवश्यक असणारे सगळे शिक्षण घेत असत. वेद अध्ययना व्यतिरिक्त त्यांना गीत,संगीत, नृत्य, चित्रकला, शिल्पकला, तसेच शस्त्रविद्या,व चौसष्ठ कलांचे शिक्षण दिले जात असे. तर ब्रह्मवादिनी स्त्रिया या आजन्म ब्रह्मचार्‌य पालन करून ज्ञानार्जन करीत होत्या उपनिषदामध्ये उल्लेखित असलेल्या ब्रह्मवादिनी स्त्रियां या आजही इतिहासात अजरामर आहेत. ज्यामध्ये गार्गी,मैत्रयी, घोषा विश्ववारा, अपाला, अदिती, शची,लोपमुद्रा, सर्पराज्ञी, वाक, श्रद्धा, मेधा, सूर्या, विदुषी अरुंधती, भामती ,यासारख्या वेदज्ञान पारंगत तसेच न्याय व दर्शन यासारख्या अनेक विद्यांमध्ये पारंगत असलेल्या स्त्रियांचा समावेश आहे . उत्तर वैदिककाळात स्त्रि शिक्षणाचे प्रमाण कमी होत असले तरी उपरोक्त स्त्रियांनी आपल्या ज्ञानाने साधनेने भारतीय समाजाला रचनात्मक आकार देण्याचा प्रयत्न केला. तसेच भारतीय शिक्षादर्शन, विज्ञान, अध्यात्म, साहित्य, आणि समाज सुधारणेच्या क्षेत्रामध्ये सुद्धा महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

उत्तर वैदिक काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला होता सामाजिक बंधने आणि रूढी परंपरावादी विचाराने महिलांना ज्ञानार्जन सीमित करण्यात आले होते. मात्र आधुनिक भारतामध्ये स्त्री शिक्षणाची क्रांती क्रांतीज्योत सावित्रीबाई फुले आणि ज्योतिराव फुले दाम्पत्य यासारख्या व त्यांच्या सहयोगी फातिमा शेख यासारख्या सामाजिक सुधारकांनी केलेली दिसून येते. ज्योतिबा फुले यांनी 1848 मध्ये स्त्रियांसाठी शाळा स्थापन केली त्या शाळेमध्ये सावित्रीबाई फुले तसेच फातिमा शेख यांनी स्त्रियांना शिक्षित करण्याचे कार्य केलेले दिसून येते. त्यांच्या या कार्यापासून प्रेरणा घेऊन आणि अनेकांनी शाळेमध्ये शिक्षण घेऊन आधुनिक भारतामध्ये सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. स्वतंत्र भारताचा विचार केला तर शिक्षण क्षेत्रात धोरणात्मक बदल करून विश्वविद्यालय स्थापन करून महिलांना शिक्षणाकरिता मार्ग मोकळे करण्यात आले सुरुवातीच्या काळामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अल्प होते मात्र हळूहळू यामध्ये वाढ होत गेली.

एकविसाव्या शतकात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणात मुलींचा सहभाग वाढत असताना आता उच्च शिक्षणातही हेच सकारात्मक चित्र दिसत आहे.ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशनच्या (AISHE) २०२१-२०२२ या अहवाला मध्ये गेल्या आठ वर्षांत मुलांपेक्षा मुलींनी उच्च

शिक्षणासाठी अधिक नोंदणी केली आहे असे नमूद केले.मुलींचीची नोंदणी पाच वर्षांत १८.७% ने वाढली आहे. ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशनच्या अहवालानुसार उच्च शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९१ लाखाने वाढली आहे. या मध्ये ५५ टक्के मुलींचे प्रमाण आहे. ताज्या सर्वेक्षण अहवालानुसार एकूण ४.३३ कोटी नोंदणीपैकी ४८ % म्हणजेच २.०७ कोटी महिला आहेत. वर्ष २०१४-१५ मध्ये, एकूण ३.४२ कोटी नोंदणीपैकी महिलांची टक्केवारी ४६ टक्के होती.अहवालानुसार २०१४-१५ पासून महिलांच्या नोंदणीत सातत्याने वाढ होत आहे.मुलींची नोंदणी पाच वर्षांत १८.७% ने वाढली आहे. २०२०-२१ मध्ये २.०१ कोटी आणि २०१७-१८ मध्ये १.७४ कोटींवरून २०२१-२२ मध्ये २.०७ कोटी आहे.२०१४-१५ पासून एकूण नोंदणीमध्ये (९१ लाख) मुलींचा सहभाग ५५% आहे. मुलांच्या तुलनेत मुलींच्या नोंदणीत अधिक वाढ झाली आहे.पदवी, पदव्युत्तर, एमफिल आणि पीएचडी स्तरावर नोंदणी केलेल्या एकूण ५७.१८ लाख विद्यार्थ्यांपैकी सुमारे ५२.१ टक्के मुली आहेत. पदवी स्तरावर एकूण नोंदणी केलेल्या विद्यार्थिनींपैकी सुमारे ५१ टक्के विद्यार्थिनी विज्ञान शाखेतील आहेत. २०२०-२१ या वर्षात ५५.४८ लाख विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलात्यापैकी 53.1% विद्यार्थिनी होत्या.विज्ञान शाखेतील पीजी स्तरावर, नोंदणी केलेल्या ७.५२ लाख विद्यार्थ्यांपैकी ६१.२% महिला आहेत. विज्ञानातील पीएचडी प्रोग्राममध्ये नोंदणी केलेल्या ४५,३२४ विद्यार्थ्यांपैकी निम्म्याहून अधिक (६२%) मुली आहेत, तर केवळ ३९% मुले आहेत.

भारतीय शिक्षण व्यवस्थे मधील पुढील नांदी म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे डॉ.के. कस्तुरीरंकेनच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करून त्या समितीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसोदा कॅबिनेटला प्रस्तुत केला या मसुद्यामध्ये भारतीय मूल्य परंपरा आणि आधुनिकता याचा समन्वय करून एक व्यापक अहवाल देण्यात आला होता. शिक्षण व्यवस्थेला समाजाच्या प्रत्येक वर्गापर्यंत पोहोचवणे आणि तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण वाढीवर लक्ष केंद्रित करणे हा या कमिटीचा मुख्य उद्देश होता. 29 जुलै 2020 रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने या शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 याचे प्रमुख पाच आधारस्तंभ आहेत जे या धोरणाला अधिक दूरदर्शी बनवतात हे स्तंभ शिक्षणाला प्रत्येक स्तरावर गुणवत्ता समावेशिता आणि सशक्तिकरण करते. हे पाच स्तंभ म्हणजे प्रत्येकापर्यंत शिक्षणाची पोहोच, समानता, गुणवत्ता,सर्वांना परवडणारी, जबाबदेही, आणि उत्तरदायित्व पूर्ण शिक्षा प्रणाली अशी आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० याचे मुख्य उद्देश १)गुणवत्ता पूर्ण शिक्षण निश्चित करणे 2) शिक्षणामध्ये समानता आणि सर्वसमावेशिता 3)समग्र आणि बहुयामी विकास ४) 21व्या शतकात कौशल्य विकास करणे ५)भारतीय संस्कृती आणि मूल्यांचे रक्षण करणे, ६) शिक्षणाचे वैश्विकरण ७)संशोधन आणि नवीन प्रयोगांना प्रोत्साहन देणे ९)शिक्षणामध्ये लवचिकपणा आणणे १०)डिजिटल आणि तांत्रिक शिक्षणाला प्रोत्साहन देणे ११)शिक्षक प्रशिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणावर भर १२)ग्रॉस एनरोलमेंट रेशो का वाढवणे

इत्यादी. वरील उद्देशांना अनुसरून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शिक्षणाला सर्वसमावेशी कौशल्यावर आधारित आणि 21व्या शतकाच्या आवश्यकतेनुसार तसेच विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा आणि आवडीचा विचार करून त्याला अधिक गुणवत्ता पूर्ण शिक्षण कसे देता येईल अशा पद्धतीने तयार करण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मुलींच्या शिक्षणा वर देखील भर देण्यात आला आहे.स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि लिंग समानता आणण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या.ज्यामध्ये प्रमुख्याने लिंग समावेश निधीचा (Gender Inclusion Fund) समावेश होतो. निधी आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या मुली आणि ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षण मिळावे याकरिता तयार करण्यात आला आहे. ६ वि ते १२ च्या विद्यार्थ्यांची मधेच शाळा सोडून जाण्याचे प्रमाण कमी व्हावे या साठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय निवासी शाळेचा विस्तार करण्यात आला आहे.STEM शिक्षणावर भर देण्यात आला म्हणजेच विज्ञान,तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या विषयांकडे सहभाग वाढविण्य करिता प्रोत्साहन दिले गेले.शिक्षकांचे लिंग संवेदनशील प्रशिक्षण दिले जाईल ज्या माध्यमातून शिक्षका कडून भेद- भेद न करता सर्वसमावेशक ज्ञान देण्याचे कार्य होईल. मुलीना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासठी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास अंतर्गत व्यावसायिक आणि कौशल्य पूर्ण शिक्षणावर भर देण्यात आला.सुरक्षित आणि समावेशक वातावरण अंतर्गत शाळेमध्ये स्वतंत्र प्रसाधन गृह आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्था लैंगिक संवेदनशीलता वाढविण्यावर भर दिला गेला आहे. उपरोक्त तरतुदींचा उद्देश मुलीना उच्च शिक्षणापर्यंत टिकून ठेवणे आणी त्यांचू गळती कमी करणे आहे.

**मूल्यमापन:-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने शैक्षणिक क्षेत्रात समावेशिता आणि लैंगिक समानतेवर अधिक भर दिलेला दिसून येतो या धोरणांतर्गत स्त्रियांच्या शिक्षणाकरिता विशेष छात्रवृत्ती तसेच नेतृत्व प्रशिक्षण आणि कौशल्य विकास हे कार्यक्रम लागू करण्यात आले आहेत. विश्व अनुदान आयोग व्दारा स्त्रियांच्या सक्षमिकीकरणा करिता विविध कार्यक्रमांवर निधी वाढविण्यात आला आहे.ज्यातून संशोधन तसेच प्रकाशन क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या माध्यमातून स्त्रियांना उच्च प्रशासनिक पदापर्यंत पोहोचविणे व तसे वातावरण निर्मिती करणे यावर अधिक भर देण्यात आला आहे ज्या व्दारे उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये महिलांना विविध संधी उपलब्ध होत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने आखून दिलेले कार्यक्रम आणि धोरण प्रभावीपणे ज्या -ज्या शैक्षणिक संस्थानांनी लागू केले तिथे महिला संशोधक तसेच महिला शिक्षिका संशोधकच्या माध्यमातून विविध शोध पत्र , नवीन परियोजना व उद्योगशीलता या क्षेत्रात उल्लेखनीय वृद्धी पाहायला मिळते आहे.ऑनलाइन शिक्षण मोबाईल लर्निंग च्या माध्यमातून शिक्षण दूरवरच्या क्षेत्रात राहणाऱ्या मुलींपर्यंत पोहोचण्यात येत आहे. महाराष्ट्र ,तमिळनाडू, केरळ सारख्या

राज्यांमध्ये महिला सशक्तिकरणा करिता विशेष प्रशिक्षण कार्यक्रम मेंटोरशिप नेटवर्क आणि अनुसंधान अनुदान योजनांच्या माध्यमातून महिलांना उच्च शिक्षणाकडे वळवण्याकरिता महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व यूजीसी ने अनेक सकारात्मक गोष्टींकडे लक्ष देऊन एक दिशा निर्धारित केली आहे ज्यातून अनेक क्षेत्रांमध्ये महिलांची सहभागीता स्थापन झालेली आहे. भारतीय उच्च शिक्षणामध्ये महिलांचा सहभाग आणि योगदान गतिशील पद्धतीने समोर जाताना दिसून येतो जो समाजामध्ये लैंगिक समानता,सामाजिक न्याय तसेच आर्थिक विकास अश्या विविध माध्यमांव्दारे स्थापित झालेला दिसून येतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या माध्यमातून महिला विविध क्षेत्रात कार्यरत होत आहेत देश विकसित होत आहे. अशा महिला भारताला सशक्त आणि समृद्ध बनविण्यामध्ये आपले योगदान देताना दिसून येतात. विकसित भारताचा पाया हा महिलांच्या सशक्तिकरणातूनच संभव असल्याने महिलांना शैक्षणिक दृष्ट्या, आर्थिक दृष्ट्या मजबूत बनविणे हाच आपल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा हेतू आहे. विविध क्षेत्रांमध्ये आकड्यांच्या स्वरूपात दिसून येणारे महिलांचे योगदान हे एक वास्तविक प्रेरणा देणारे स्त्रोत असून हा स्त्रोत आपल्याला सांगतो की तेव्हाच परिवर्तन संभव आहे जेंव्हा आपण योग्य दिशा आणि तंत्रज्ञानाचा वापर करून सामाजिक जागरूकता घडवून आणू आणि हे तेंव्हा शक्य आहे जेव्हा महिलांचा जास्तीत जास्त सहभाग उच्च शिक्षणामध्ये असेल आणि त्या प्रत्येक क्षेत्रामध्ये उच्च पदावर आसनस्थ नसतं असतील.

**संदर्भ –**

१) Mukharji R.K., Ancient Indian Education ,Gyan Publishing House

२) शर्मा आर ,शर्मा आर.के.,भारतीय शिक्षणाचा इतिहास,प्रकाशक अटलांटिक पब्लिशर्स

३) महाजन,व्ही.डी.,प्राचीन भारत का इतिहास,एस चंद पब्लिकेशन

४) 'राष्ट्रीय शिक्षा निती २०२० भारत सरकार शिक्षा मंत्रालय' https:,www.education. gov.in (18march 2026)

५) पांडेय,आर.,प्राचीन भारत में स्त्री शिक्षा और विदुषियों का योगदान,www.newsexpress.com.( 18 march 2026 )

६) National Education Police 2020,www.ncert.nic.in.( 18 march 2026)

# वाशिम जिल्ह्यातील राजवाड्याचे सांस्कृतिक महत्त्व एक विश्लेषण.

**रोहित महादेव विद्यागर**
संशोधक विद्यार्थी
**प्रा. डॉ. रवींद्र पुंडलीक झनके**
मार्गदर्शक सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख स्व भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय साखरखेडा ता.सिंदखेड राजा जिल्हा. बुलढाणा.

**सारांश (Abstract)**

वाशिम जिल्ह्यातील राजवाडे केवळ ऐतिहासिक वास्तू नाहीत, तर त्या परिसराच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक जीवनाशी घनिष्ठपणे जोडलेल्या आहेत. या राजवाड्यांमध्ये प्राचीन काळातील स्थापत्यकला, शाही जीवनशैली, धार्मिक श्रद्धा, आणि स्थानिक परंपरांचे समृद्ध दर्शन दिसते. त्यांचे आकार, शिल्पकला, नक्षीकाम आणि वास्तुशिल्पीय सजावट त्या काळातील राजवटीचे, सामाजिक रीतिरिवाजांचे आणि कलात्मक कौशल्याचे साक्षीदार आहेत. वाशिम जिल्ह्यातील प्रमुख राजवाड्यांचा अभ्यास करून त्यांचे ऐतिहासिक, स्थापत्यकला, सांस्कृतिक महत्त्व, सामाजिक योगदान आणि स्थानिक समुदायावर होणारे परिणाम यांचे सविस्तर विश्लेषण करतो. या अभ्यासाद्वारे राजवाड्यांमुळे स्थानिक समाजातील सांस्कृतिक जीवनाची जाणीव, परंपरांचे जतन, कला आणि संगीत यांचा प्रसार, तसेच आर्थिक विकास कसा घडतो हे समजते.

या राजवाड्यातील स्थानिक उत्सव, जत्रा, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम आणि पर्यटनाशी संबंधित घटकांचा अभ्यास केला आहे, ज्यामुळे राजवाड्यांचा सामाजिक व आर्थिक प्रभाव स्पष्ट होतो. संरक्षणाची गरज, राजवाड्यांच्या दीर्घकाळ टिकवणुकीसाठी उपाययोजना, डिजिटल माध्यमातून सांस्कृतिक वारसा जपण्याचे मार्ग आणि स्थानिक समुदायाच्या सहभागाचे महत्त्व यावरही सविस्तर विचार केला आहे.या अभ्यासातून स्पष्ट होते की, वाशिम जिल्ह्यातील राजवाडे केवळ वास्तू नसून, एक सामाजिक-सांस्कृतिक प्रणाली आणि आर्थिक स्त्रोत देखील आहेत, जे स्थानिक जीवनशैली, परंपरा, कला आणि पर्यटन यांचे केंद्र म्हणून कार्यरत आहेत. या पेपरमध्ये दिलेल्या निरीक्षणांमुळे राजवाड्यांच्या संवर्धनाचे महत्व, स्थानिक समुदायाचे योगदान आणि त्यांचा भविष्यातील सांस्कृतिक वारसावर होणारा प्रभाव स्पष्टपणे अधोरेखित होतो.

**प्रस्तावना (Introduction)**

वाशिम जिल्हा, महाराष्ट्राच्या उतार भागात वसलेला असून, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत समृद्ध आहे. हा भाग प्राचीन काळापासून विविध राजवंशांचे अधिपत्य क्षेत्र राहिला असून, त्याचा इतिहास राजवाड्यांमधून स्पष्टपणे दिसतो. वाशिम जिल्ह्यातील राजवाडे केवळ भौतिक वास्तू नसून त्या परिसरातील सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक जीवनाचा अभिन्न घटक आहेत.या राजवाड्यांमध्ये शाही वास्तुकलेचा अद्वितीय नमुना, शिल्पकला, नक्षीकाम, बागायती आणि गवाक्षांची कलात्मक सजावट दिसून येते. प्रत्येक राजवाडा त्या काळातील शाही जीवनशैली, परंपरा आणि सामाजिक व्यवस्थेचे द्योतक आहे. राजवाड्यांमध्ये केवळ राजकीय किंवा आर्थिक इतिहासच नाही तर त्यांचा सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक आयुष्यात मोठा वाटा आहे. उदाहरणार्थ, काही राजवाडे धार्मिक उत्सव, जत्रा आणि लोककला यांचे केंद्र राहिलेले आहेत, तर काही राजवाडे समाजातील लोकांना एकत्र आणणारे सामाजिक केंद्र म्हणून ओळखले जातात.

राजवाड्यांचे सांस्कृतिक महत्त्व विविध पैलूंमध्ये दिसून येते. शाही वास्तुकलेतील कलात्मकता, भित्तिचित्रे, गवाक्ष, स्तंभ आणि नक्षीकाम हे केवळ स्थापत्यकलेच्या दृष्ट्या महत्त्वाचे नाहीत, तर स्थानिक कलाकारांना प्रेरणा देणारे व परंपरेला चालना देणारे घटक आहेत. राजवाड्यांमध्ये आयोजित उत्सव, संगीत, नृत्य आणि कला कार्यक्रम स्थानिक सांस्कृतिक जीवनात एक महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे या राजवाड्यांमुळे स्थानिक लोकसंस्कृती टिकते आणि पुढील पिढीसाठी स्थानिक कलांचा अभ्यास शक्य होतो.

सामाजिक दृष्ट्या राजवाडे स्थानिक समुदायाचे एकात्मिक केंद्र आहेत. येथे आयोजित सामाजिक उपक्रम, उत्सव आणि सभा समाजातील विविध वर्गांना एकत्र आणतात. राजवाड्यांच्या उपस्थितीत स्थानिक परंपरा, धार्मिक विधी आणि शाही प्रथा जतन होतात. त्यामुळे राजवाडे फक्त ऐतिहासिक स्मारक नसून सामाजिक संवादाचे, शिक्षणाचे आणि सांस्कृतिक आदानप्रदानाचे केंद्र म्हणून कार्य करतात.आर्थिक दृष्ट्या पाहता, वाशिम जिल्ह्यातील राजवाडे पर्यटन, हस्तकला, स्थानिक व्यवसाय आणि रोजगार निर्मिती या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देतात. राजवाड्यांमुळे पर्यटन वाढते, स्थानिक हस्तकला आणि सांस्कृतिक कार्यक्रम प्रोत्साहन पावतात, तसेच स्थानिक बाजारपेठा व उद्योग विकसित होतात.

त्यामुळे राजवाड्यांचा स्थानिक जीवनशैली, सामाजिक आर्थिक विकास आणि सांस्कृतिक वारसा यावर बहुआयामी प्रभाव आहे.

या पेपरमध्ये वाशिम जिल्ह्यातील प्रमुख राजवाड्यांचा ऐतिहासिक, स्थापत्यकला, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्वाचा अभ्यास केला आहे. तसेच, स्थानिक समुदायावर त्यांचा परिणाम, सांस्कृतिक आणि आर्थिक योगदान, तसेच संरक्षण व संवर्धनाचे उपाय यावर सविस्तर विचार केला आहे. या अभ्यासातून स्पष्ट होते की, वाशिम जिल्ह्यातील राजवाडे फक्त वास्तू नाहीत, तर स्थानिक जीवनशैली, परंपरा, कला, पर्यटन आणि सामाजिक व्यवहार यांचे अविभाज्य केंद्र आहेत.विस्तृत अध्ययनातून असे दिसून आले की, संरक्षण आणि संवर्धनाची तातडीची गरज आहे, अन्यथा इतिहास, कला आणि सांस्कृतिक वारसा नष्ट होण्याची शक्यता आहे. यामुळे स्थानिक प्रशासन, सरकारी संस्था, समाजसेवी संस्था आणि स्थानिक नागरिकांनी मिळून या राजवाड्यांच्या जतनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**साहित्य परीक्षण (Literature Review)**

राजवाड्यांचा अभ्यास अनेक इतिहासकार, वास्तुविशारद, समाजशास्त्रज्ञ आणि संस्कृती अभ्यासकांनी केला आहे. या अभ्यासातून स्पष्ट होते की राजवाडे फक्त भौतिक वास्तू नसून, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाचे केंद्र आहेत.

१) **आंबेडकर, बी.आर. (1945):** यांनी त्यांच्या ग्रंथात (What Congress and Gandhi have done to the Untouchables) राजवाड्यांच्या सामाजिक कार्यातील भूमिका विश्लेषित केली आहे. त्यांच्या मते, राजवाडे स्थानिक समाजासाठी शिक्षण, आरोग्य व सामाजिक सहकार्याचे केंद्र म्हणून काम करतात. विशेषतः वाशिमसारख्या ग्रामीण भागातील राजवाड्यांमुळे सामाजिक समावेश आणि समुदायाची एकात्मता वाढते. अंबेडकर यांनी नमूद केले आहे की, राजवाड्यांमुळे स्थानिक समाजात संस्कृती, परंपरा आणि सामाजीक मूल्यांची जाणीव टिकवली जाते.

२) **मजुमदार, डी. एन. (1958):** यांनी "Races and Cultures of India" या ग्रंथात विविध जाती, वंशपरंपरा आणि त्यांच्याशी संबंधित राजवाड्यांचा आर्थिक आणि सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट केले आहे. त्यांनी दाखवले आहे की, राजवाडे फक्त राजकीय किंवा भौतिक स्थापत्याचे केंद्र नाहीत, तर त्या परिसरातील आर्थिक व्यवस्थेचा भाग आहेत. उदाहरणार्थ, राजवाड्यांभोवती बाजारपेठा, हस्तकला उद्योग आणि स्थानिक व्यापार वाढलेला आढळतो. तसेच, त्यांचे स्थापत्य व कलात्मक सजावट स्थानिक कलागुणांचे प्रेरणास्थान म्हणून कार्यरत आहे.

३) **घुर्वे, जी. एस. (1963):** यांनी महाराष्ट्रातील राजवाड्यांचा सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ अभ्यासला आहे. त्यांच्या मते, राजवाडे स्थानिक संस्कृतीचे, परंपरांचे आणि धार्मिक जीवनाचे केंद्र आहेत. ते दाखवतात की राजवाड्यांमुळे समाजातील विविध गटांना एकत्र आणले जाते, धार्मिक विधी, उत्सव आणि परंपरांचे पालन होते. घुर्वे यांच्या अभ्यासात लक्षात येते की राजवाडे सांस्कृतिक आदानप्रदानाचे, शैक्षणिक व कलात्मक उपक्रमांचे केंद्र म्हणून कार्य करतात.

* राजवाडे केवळ स्थापत्यकलेचे नमुने नाहीत, तर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाचे केंद्र आहेत.
* राजवाड्यांमुळे स्थानिक समाजातील कला, संगीत, नृत्य, उत्सव आणि परंपरा जपल्या जातात.
* आर्थिक दृष्ट्या राजवाडे पर्यटन, हस्तकला व स्थानिक व्यवसाय यास चालना देतात.

या संशोधनात वाशिम जिल्ह्यातील राजवाड्यांचा सखोल, ठोस आणि व्यापक अभ्यास केला आहे. वाशिममध्ये अनेक ऐतिहासिक राजवाडे आहेत, परंतु त्यांचा सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक महत्त्वाचा अभ्यास महत्वाचा आहे.

**उद्दिष्टे (Objectives)**

१) वाशिम जिल्ह्यातील प्रमुख राजवाड्यांचा ऐतिहासिक आणि स्थापत्यकला दृष्ट्या अभ्यास करणे.
२) राजवाड्यांचे सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक महत्त्व समजून घेणे.
३) स्थानिक समुदायावर या राजवाड्यांचा प्रभाव आणि त्यांचे योगदान शोधणे.
४) संवर्धन व सांस्कृतिक वारसा जपण्याचे उपाय सुचवणे.

**गृहीतकृत्य (Hypotheses)**

१) वाशिम जिल्ह्यातील राजवाडे स्थानिक सांस्कृतिक जीवनात महत्त्वपूर्ण योगदान देतात.
२) राजवाड्यांचे संरक्षण आणि संवर्धन न केल्यास सांस्कृतिक वारसा नष्ट होण्याची शक्यता आहे.
३) राजवाड्यांचा स्थानिक समुदायावर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिणाम सकारात्मक आहे.

**महत्त्व (Significance of Study)**

वाशिमच्या राजवाड्यांचा अध्ययन केले असता त्यांचे महत्व लक्षात येते.
१) स्थापत्यकलेचे आधुनिक संदर्भ समजून घेता येतात.
२) स्थानिक लोकसंस्कृतीचे जतन करण्याचे उपाय सुचवता येतात.
३) पर्यटन व सांस्कृतिक विकासास चालना मिळते.
पुढील पिढ्यांसाठी सांस्कृतिक वारसा जपण्याचे मार्ग स्पष्ट होतात

**परिणाम (Findings / Results)**

वाशिम जिल्ह्यातील राजवाड्यांच्या स्थापत्यकलेत खालील वैशिष्ट्ये आढळली:

१) लोकशाही वास्तुकलेचा प्रभाव, शिल्पकला आणि गॅलरींची सजावट.
२) राजवाड्यांमधील उत्सव व धार्मिक समारंभ स्थानिक संस्कृतीशी जुळलेले.
३) काही राजवाडे आजही सामाजिक व शैक्षणिक कार्यात सक्रिय आहेत.
४) पर्यटन व स्थानिक व्यवसायांवर राजवाड्यांचा सकारात्मक परिणाम.
५) संरक्षणाचा अभाव आणि काळाचा परिणाम अनेक राजवाड्यांवर दिसून येतो.

**चर्चा (Discussion)**

वाशिम जिल्ह्यातील राजवाडे हे फक्त भौतिक वास्तू नाहीत, तर स्थानिक जीवनाचे केंद्र आहेत. त्यांचा प्रभाव सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक स्तरांवर स्पष्ट दिसतो. राजवाड्यांमध्ये अनेक शतकांपासून चालत आलेल्या परंपरा, उत्सव, कला, संगीत आणि समाजजीवनाची गुंतवणूक आहे.

**१) सांस्कृतिक प्रभाव (Cultural Impact)**

वाशिम जिल्ह्यातील राजवाड्यांमध्ये सांस्कृतिक परंपरा जपली गेली आहे.

लोककला व हस्तकला: पाटील राजवाडा, वाशिम येथे अजूनही शिल्पकला, नक्षीकाम व भित्तिचित्र पाहायला मिळतात. स्थानिक कारागिर या कलांना पुढे नेण्यासाठी नियमित प्रशिक्षण घेतात.

संगीत व नृत्य: राजवाड्यांमध्ये पारंपरिक संगीत व नृत्याचे कार्यक्रम भरतात. उदाहरणार्थ, भाटे राजवाड्यात दरवर्षी "संगीत महोत्सव" पारंपरिक वाद्यांसह आयोजित केला जातो, ज्यामध्ये स्थानिक व कुशल कलाकार सहभागी होतात.

उत्सव व परंपरा: राजवाडे जत्रा, वार्षिक उत्सव व धार्मिक समारंभांचे केंद्र आहेत. सिंह राजवाडा, धनोरी येथे दरवर्षी 'नवरात्र उत्सव' पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. या उत्सवांमुळे स्थानिक संस्कृती जपली जाते.

सांस्कृतिक शिक्षण: काही राजवाडे वाचनालय, संगीत आणि कला प्रशिक्षण केंद्र म्हणून वापरले जातात. या माध्यमातून युवा पिढी स्थानिक कला व सांस्कृतिक परंपरा शिकते.

सांस्कृतिक प्रभावामुळे स्थानिक कलाकारांना संधी मिळते, तर सामान्य लोकांमध्ये परंपरेचे महत्त्व समजते.

**२) सामाजिक प्रभाव (Social Impact)**

राजवाडे स्थानिक समाजात एकात्मता, संस्कार आणि सामाजिक सहभाग वाढवतात.

समुदायातील एकात्मता: राजवाड्यांमध्ये उत्सव, विवाहसमारंभ आणि सामाजिक सभा होतात, ज्यामुळे समाजातील लोक एकत्र येतात.

परंपरेचे जतन: राजवाडे स्थानिक परंपरा, धार्मिक विधी आणि शाही प्रथा जपण्याचे ठिकाण आहेत. उदाहरणार्थ, पाटील राजवाड्यातील वार्षिक पूजा पारंपरिक पद्धतीने आजही सुरू आहे.

सामाजिक उपक्रम: काही राजवाडे स्थानिक शिक्षण, आरोग्य शिबिरे किंवा सामाजिक मदत कार्यासाठी वापरले जातात.

संवादाचे माध्यम: राजवाडे स्थानिक व्यक्तींमध्ये विचारांची देवाणघेवाण आणि निर्णय प्रक्रियेसाठी मंच म्हणून काम करतात.

सामाजिक दृष्ट्या राजवाडे फक्त वास्तू नाहीत, तर जीवनशैली, संस्कार व सामाजिक बांधणीचे केंद्र आहेत.

**३) आर्थिक प्रभाव (Economic Impact)**

राजवाडे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतात.

पर्यटन व रोजगार: राजवाड्यांमुळे पर्यटन वाढते. उदाहरणार्थ, पाटील आणि भाटे राजवाड्यांमध्ये स्थानिक हॉटेल्स, मार्गदर्शन, वाहतूक आणि खाद्यव्यवसाय विकसित झाले आहेत.

हस्तकला आणि व्यवसाय: राजवाड्यांमध्ये आयोजित उत्सवांमुळे शिल्पकला, वस्त्रकला, लोकसंगीत आणि नृत्य व्यवसाय वृद्धिंगत होतो.

स्थानीय बाजारपेठा: राजवाड्यांमध्ये कार्यक्रम व उत्सवामुळे स्थानिक उत्पादनांचा मागणी वाढते.

आर्थिक विकास: पर्यटन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे गावातील सार्वजनिक सुविधा (रस्ते, वाहतूक, बँक, बाजारपेठ) विकसित होतात.

एकंदर, राजवाडे स्थानिक समाजाचे सांस्कृतिक आणि आर्थिक केंद्र आहेत.

**४) संरक्षणाची गरज (Need for Conservation)**

वाशिम जिल्ह्यातील काही राजवाडे दीर्घकाळ नदेखभाल झाल्यामुळे नासधूस झाले आहेत.

भिंती, छत, शिल्पकला व रंगकाम नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

हवामान, वायू प्रदूषण, वाळवंटाळ व पाण्याची नासाडी ही मुख्य कारणे आहेत.

*** संरक्षणाचे उपाय:**

१) सरकारी व स्थानिक संस्थांच्या सहाय्याने नियमित दुरुस्ती.
२) सांस्कृतिक कार्यक्रम, जत्रा व शैक्षणिक उपक्रमांसाठी राजवाड्यांचा उपयोग.
३) डिजिटल माध्यमाद्वारे आभासी संग्रह तयार करणे, ज्यामुळे इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचतो.
४) पर्यटक व स्थानिकांसाठी माहिती फलक, मार्गदर्शन व सुरक्षा उपाय.
५) संरक्षण केल्यास सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक पैलू टिकतात, तसेच स्थानिक वारसा पुढील पिढीसाठी जतन होतो.

**१.विश्लेषणात्मक निरीक्षण (Analytical Observation)**

राजवाड्यांचा सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक पैलूंवर परस्पर संबंध आहे.
सांस्कृतिक उत्सवांमुळे सामाजिक एकात्मता वाढते, तर पर्यटनामुळे आर्थिक लाभ होतो.
संरक्षण न केल्यास सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक पैलूवर नकारात्मक परिणाम होतो.
प्रत्येक राजवाडा स्थानिक इतिहास, स्थापत्यकला, कला आणि समाजजीवनाचे द्योतक आहे.

**उपाय (Recommendations / Measures)**

१) राजवाड्यांचे नियमित देखभाल व संरक्षण करणे.
२) सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन व स्थानिक समुदायाचा सहभाग वाढविणे.
३) शैक्षणिक अभ्यासक्रमात राजवाड्यांचा समावेश करणे.
४) पर्यटन विकासास प्रोत्साहन, पण सांस्कृतिक संवेदनशीलता राखणे.
५) डिजिटल **माध्यमांचा** वापर करून राजवाड्यांचे आभासी संग्रह तयार करणे.

*** निष्कर्ष (Conclusion)**

वाशिम जिल्ह्यातील राजवाडे केवळ ऐतिहासिक वास्तू नसून, ते स्थानिक जीवनाचे सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक केंद्र मानले जातात. या अभ्यासातून स्पष्ट झाले की राजवाड्यांचा स्थानिक समाजावर मोठा परिणाम आहे. राजवाडे स्थानिक कला, संगीत, नृत्य, उत्सव आणि परंपरा जपण्याचे केंद्र आहेत, ज्यामुळे स्थानिक संस्कृती आणि परंपरा पुढील पिढीसाठी टिकतात. स्थानिक लोकांना सांस्कृतिक कार्यक्रम आणि उत्सवांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते, त्यामुळे समाजातील एकात्मता आणि परंपरांचा आदर वाढतो.

शहरीकरण व आधुनिक जीवनशैलीच्या तुलनेत, राजवाड्यांमध्ये जपलेल्या परंपरा आणि सांस्कृतिक कार्यक्रम लोकांमध्ये सामाजिक सहकार्य आणि सामुदायिक भावना निर्माण करतात. पर्यटन आणि हस्तकला उद्योगांमुळे राजवाडे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतात. पर्यटनामुळे गावातील व्यवसाय वाढतात, रोजगार संधी निर्माण होतात आणि स्थानिक हस्तकला आणि कलांवर लक्ष वेधले जाते. त्यामुळे राजवाडे केवळ ऐतिहासिक स्मारक नसून, सांस्कृतिक व आर्थिक विकासाचेही केंद्र आहेत.

अभ्यासातून असेही दिसून आले की, अनेक राजवाडे दीर्घकाळ नदेखभाल आणि हवामान, वाळवंटाळ व पाण्यामुळे खराब झाले आहेत. संरचनात्मक नुकसान आणि शिल्पकलेचा नाश हा गंभीर मुद्दा आहे. त्यामुळे या राजवाड्यांचे संरक्षण आणि संवर्धन अत्यंत गरजेचे आहे. स्थानिक प्रशासन, सरकारी संस्था आणि समाजसेवी संस्था यांच्यासह स्थानिक लोकांचा सहभाग आवश्यक आहे, जेणेकरून या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांचा योग्य वापर होऊ शकेल.

एकंदर पाहता, वाशिम जिल्ह्यातील राजवाडे स्थानिक जीवनशैली, परंपरा, कला, पर्यटन आणि समाजजीवनाशी घनिष्ठपणे जोडलेले आहेत. योग्य संरक्षण, संवर्धन आणि जागरूकता निर्माण केल्यास हे राजवाडे पुढील पिढ्यांसाठी सांस्कृतिक वारसा टिकवू शकतात. तसेच, स्थानिक समाजाची ओळख जपली जाते, कला आणि संस्कृतीला चालना मिळते आणि पर्यटन व स्थानिक व्यवसायांच्या माध्यमातून आर्थिक विकास साधता येतो. त्यामुळे वाशिम जिल्ह्यातील राजवाडे फक्त इतिहासाचे स्मारक नाहीत, तर आजच्या आणि उद्याच्या समाजाचे जीवनदायी घटक आहेत.

*** संदर्भ सूची (References /BibliographyList)**

१) आंबेडकर, बी. आर. व्हाट काँग्रेस अँड गांधी हे अनटचबल्ससाठी केले. थँकर अँड कंपनी, मुंबई, 1945. (Pp. 1–94).
२) डेंगले, एन., सोहोनी, पी., सहस्रबुद्धे, सी., & सागर, एम. (संपादक). आर्किटेक्चर इन महाराष्ट्र: ट्रॅडिशन अँड जर्नी मुंबई: 2024. (खंड १, pp. 1–419; खंड २, pp. 1–441).
३) महाराष्ट्र शासन – राज्यशास्त्र विभाग. अकोला जिल्हा जाझिरा – ठिकाणे: वाशिम. मुंबई: महाराष्ट्र शासन, 1977. (Pp. 1–80.).
४) घुर्वे, जी. एस. द स्केड्यूल्ड ट्राइब्स.पॉपुलर प्रकाशन मुंबई, 1963.(Pp. 10-404) .
५) जोशी, मनिष आर. महाराष्ट्राची ऐतिहासिक वास्तुकला. साहित्य प्रकाश, पुणे, 2010. (Pp. 1–278).

६) मजूमदार, डी. एन. रेसेस अँड कल्चर्स ऑफ इंडिया. युनिव्हर्सल पब्लिशर्स, लखनऊ, 1951. (Pp. 50–215).
७) महाराष्ट्र राज्य गझेटियर्स (1977– मराठी आवृत्ती). अकोला जि जाझिरा– ऐतिहासिक व सांस्कृतिक विभाग. मुंबई: महाराष्ट्र शासन, 1977. (Pp. 5–75).
८) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ. विदर्भातील पर्यटन व वारसा: वाशिम. एमटीडीसी पब्लिकेशन्स, मुंबई, 2019. (Pp. 12–48).
९) पाटील, एस. व्ही. विदर्भातील ऐतिहासिक स्मारक. नागपूर: विदर्भ हिस्टॉरिकल सोसायटी, 2015. (Pp. 55–102).
१०) शिंदे, आर. पी. वाशिम जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा. पुणे: साहित्य प्रकाश, 2012. (Pp. 10–120).
११) सुर्यवंशी, ए. के. महाराष्ट्रातील राजवटीची वास्तुकला आणि स्थानिक समुदाय. मुंबई: अकॅडेमिक प्रेस, 2018. (Pp. 32–98).

# उच्च शिक्षण आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण

**वैभव अनंता धोटे**
संशोधक विद्यार्थी श्री वसंतराव नाईक कला व अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरूळपीर जि. वाशिम
मो.क्र. 8888332055, ई मेल. mhset23@gmail.com

**गोषवारा**

सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या जगात भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यामध्ये एकूण अंदाजे ४९% स्त्रियाची लोकसंख्या आहेत. महिला सक्षमीकरण ही आज मानसिक पातळीवर महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची आणि त्यांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनविण्याची प्रक्रिया आहे. परंतु जगातील इतर देशांपेक्षा भारतीय महिलांच्या सद्यस्थितीचे विश्लेषण केले तर समाधानकारक नाही. भारतीय महिलांना यशासाठी सर्व प्रकारच्या अडथळयांना तोंड द्यावे लागते. सामान्यतः निरक्षरता, घरगुती हिंसाचार, प्रेरणा आणि समर्थनाचा अभाव इत्यादी. देशाच्या सुसंवादी विकासासाठी महिलांनी खांद्याला खांदा लावून पुढे येणे अत्यंत आवश्यक आहे आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी उच्चशिक्षण महत्त्वाची भूमिका बजावेल.

**बीज शब्दः** महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, शिक्षण, समाज, अधिकार, महिला आर्थिक सक्षमीकरणासाठीशासकीय प्रयत्न

**प्रस्तावनाः**

प्रत्येक भारतीय नागरिकाला काही मूलभूत अधिकार दिलेले आहेत. परंतु मूलभूत हक्क बद्दल जागरूकता कमी आहे. जर आपण समाजातील मूलभूत हक्क बद्दल जागृक्तेच्या घटकांची नोंद केली तर महिला या यादीत अव्वल असतील. आजही स्त्री मध्ये एवढी शक्ती असतानाही देशातील अनेक भागांमध्ये तिला अशिक्षित, असक्षम आणि हिन भावनेने पाहिले जाते, स्त्रियांना कमी लेखणे, समाजात दुय्यम स्थान देणे असे प्रकार घडतात. त्यासाठी महिला सक्षमीकरणाची गरज भासू लागली. महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी शिक्षण हे एकमेव साधन आहे. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे नाही. एक राष्ट्र म्हणून आपण सुपर बनण्याचे स्वप्न पाहतो. पण या समाजाचा प्रमुख घटक असलेला महिला, साक्षरच नाही तर आपण महासत्ता होण्याची अपेक्षा करू शकत नाही. म्हणून, स्त्री शिक्षणाचे महत्त्व समजून घेणे आवशक आहे.

एका राष्ट्राच्या विकासात महिलांचे महत्व आणि अधिकार संपूर्ण समाजाला कळावे यासाठी जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन आणि मातृ दिवस यासारखे स्त्रियांचे दिवस साजरा करून त्यांना महिला सक्षम करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. आपल्या देशात समाजातील स्त्रियांचे अधिकार आणि मूल्य मारून टाकणाऱ्या कुप्रथा जसे हुंडा, अशिक्षा, लैंगिक अत्याचार, असमानता, स्त्रीभ्रूणहत्या आणि घरेलू हिंसा इत्यादींना बंदी घालण्यात आली आहे.

**उद्दिष्टेः**

शोधनिबंधाची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत-

१. महिलांच्या जीवनातील उच्च शिक्षणाची प्रासंगिकता जाणून घेणे.
२. महिला सक्षमीकरणाच्या गरजेचे विश्लेषण करणे.
३. महिला सक्षमीकरणाचा प्रभाव तपासणे.

**संशोधन पद्धती:**

हा शोधनिबंध मुळात वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे. विश्लेषण करण्यासाठी वापरलेला डेटा पूर्णपणे दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ:**

महिला आर्थिक सक्षमीकरण ही एक प्रक्रिया आहे ज्यामध्ये स्त्रिया आधी नाकारल्या गेलेल्या परिस्थितीत काय असू शकतात, आणि काय साध्य करू शकतात हे स्पष्ट करतात. निर्णय प्रक्रियेच्या बाहेर असलेल्या स्त्रियांना स्वीकारणे आणि परवानगी देणे. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांचे आत्म-प्रशंसा, स्वतःचे निर्णय घेण्याची त्यांची क्षमता आणि स्वत: साठी आणि इतरांसाठी सामाजिक बदलांवर प्रभाव टाकण्याची पात्रता म्हणून केली जाऊ शकते. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक विकासासाठी स्वत:चे निर्णय घेण्यास सक्षम बनवणे. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण स्वावलंबी आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होणे. महिला सक्षमीकरण सामाजिक, आर्थिक, जगामध्ये सुधारणा करण्यासाठी हाती घेतलेल्या उपक्रमांना महिला सक्षमीकरण म्हणता येते. उच्च शिक्षणाचा अर्थ: उच्च शिक्षण म्हणजे पद्धतशीर ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्यांचा एकत्रित समूह जो सैद्धांतिक आणि व्यावहारिक प्रकारच्या प्रशिक्षणाद्वारे सोडवल्या जाणाऱ्या समस्या, आधुनिक उपलब्धींचा सर्जनशीलपणे वापर करणे आणि विकसित करणे होय. 'उच्च शिक्षण' हा शब्द विज्ञान, तंत्रज्ञान आणि संस्कृती या उच्च कुशल तज्ञांच्या प्रशिक्षणासाठी देखील लागू केला जातो. अर्थशास्त्र,

विज्ञान, तंत्रज्ञान आणि संस्कृतीच्या विविध प्रकारच्या उच्च शाळांमध्ये, जे व्यक्तींना शिक्षण देतात, ज्यांनी माध्यमिक सामान्य - शिक्षण शाळा किंवा माध्यमिक विशेष शिक्षण संस्था यशस्वीरित्या पूर्ण करतात त्याला उच्च शिक्षण म्हणतात.

**महिला सक्षमीकरणाचे प्रकार**

**1.सामाजिक:**

महिलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सामाजिक सक्षमीकरण होणे आवशक आहे. सामाजिक सक्षमीकरनातून स्त्रियांचे सामाजिक संबंध सुधारते आणि त्यांची परिस्थिती मैत्रीपूर्ण बनवून त्यांना घराबाहेर अधिक प्रेरणा मिळते. समाजातील महिलाविषयीचे मत आणि वस्तुस्थितीवर प्रकाश टाकून महिला वंदनीय आणि आदरणीय होऊ शकतात. महिलांच्या सामाजिक सक्षमीकरनाशिवाय वंश, राष्ट्रीयता, धर्म किंवा लैंगिक प्रवृत्ती या शोषणातून महिला मुक्त होऊ शकत नाही.

**2.शैक्षणिकः**

शिक्षण हा विकास आणि वाढीचा एक महत्त्वाचा भाग आहे, महिलांच्या शिक्षणातून महिला सक्षमीकरण होण्यास मदत होते. शिक्षण आणि प्रशिक्षनातून महिलांना आपले हक्क, अधिकार याची जाणीव करून घेता येते. आणि लहान मुलांना त्यांची स्वातंत्र्ये आणि कर्तव्ये काय आहेत याचे धडे देऊ शकतात. इतकंच नाही तर शिक्षण आणि प्रशिक्षनातून माहिती मिळाल्यामुळे निर्भयता आणि आत्मविश्वास वाढू शकतो आणि तरुणींना स्वतंत्र बनवता येऊ शकतं. शिक्षण हे सामाजिक, राजकीय, विचार आणि जागरूकता यांची प्रगती होण्यास मदत देते आणि धर्मांधता, पक्षपातीपणा, धारणा, इत्यादींच्या विकासास प्रतिबंध करू शकते.

**3.आर्थिकः**

लोकं म्हणतात की पैशाने आनंद विकत घेता येत नाही, तरीही, कठीण परिस्थिती चा सामना केला जाऊ शकतो. गरीब, भूमिहीन, नाकारलेला किंवा छळलेला असल्यामुळे महिलांचे सक्षमिकरण होऊ शकत नाही. गरीब, भूमिहीन, नाकारले गेलेले किंवा छळामुळे मोठ्या आर्थिक बिकट स्थितीत असलेल्या महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रामध्ये वाव मिळत नाही. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरनातून स्त्रियांना भौतिक, मानवी, शैक्षणिक आणि आर्थिक स्वयंपुर्नता प्राप्त होईल. आणि त्यातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होते.

**4.राजकीयः**

महिलांच्या विरोधातील प्रस्थापित दृष्टीकोन बदलविण्यासाठी विधानसभेत विविध मुद्द्यांवर आवाज उठविणे महत्त्वपूर्ण ठरू शकते आणि हा आवाज महिलाच उठऊ शकतात. स्त्रियांचा राजकीय समावेश नाकारलेल्या, छळलेल्या समजातून मुक्त होण्यासाठी महिलांचे राजकीय सक्षमीकरण होणे आवशक आहे. महिलांच्या राजकीय सक्षमीकरनातून कमकुवत व्यक्तींमध्ये शक्ती आणि अधिकाराच्या विकेंद्रीकरण होण्यास मदत होते. कौटुंबिक आणि सांस्कृतिक प्रगती बरोबरच सरकार आणि संघटनांच्या माध्यमातून विविध प्रश्नाची सोडवणूक होते.

**5.मानसिक :**

सामाजिक सक्षमीकरणासह मानसिक सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. मानसिक सक्षमीकरणामुळे पारंपारिक आणि पुरुष - केंद्रित बंधनातून मुक्त होता येते आणि स्त्रियांना सार्वजनिक क्षेत्रात सामान्यतः अपेक्षित नसलेल्या गोष्टींपासून मुक्त करते. स्त्रियांना त्यांचा आत्म-सन्मान समजण्यास मदत करू शकते.

**महिला सक्षमीकरणाची गरज :**

महीला सक्षमीकरणामुळे महिलांची स्वतःची निर्णय घेण्याची शक्ती वाढते, योग्य निर्णय घेण्यासाठी माहिती होते, सामूहिक निर्णय घेताना ठामपणे वागण्याची क्षमता, बदल करण्याच्या क्षमतेवर सकारात्मक विचार करणे, वैयक्तिक किंवा सामूहिक शक्ती सुधारण्यासाठी कौशल्ये शिकण्याची क्षमता, लोकशाही मार्गाने इतरांच्या धारणा बदलण्याची क्षमता, कधीही न संपणारे आणि स्वत:हून सुरू केलेले बदल, स्वतःची सकारात्मक प्रतिमा वाढवणे आणि कलंकावर मात करणे इत्यादी बदल घडून येण्यास मदत होते.

महिला आर्थिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून महिलांची आत्म- मूल्याची भावना, निवड करण्याचा आणि ठरवण्याचा त्यांचा अधिकार, संधी आणि संसाधनांमध्ये प्रवेश करण्याचा त्यांचा अधिकार, घरामध्ये आणि घराबाहेर त्यांच्या स्वतःच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार, आणि आर्थिक सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी सामाजिक बदलाच्या दिशेने प्रभाव टाकण्याची त्यांची क्षमता वाढण्यास मदत होते.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च शिक्षण आणि महिला सक्षमीकरण यांच्यातील संबंध उच्च शिक्षणामुळे महिलांचा दर्जा निश्चितच उंचावतो, मग ती कुटुंबाच्या उत्पन्नात योगदान देत असो वा नसो. ती पुरुषांसह बरोबरीने असू शकते. आपल्या देशातील बहुसंख्य स्त्रिया अशिक्षित आहेत त्यामुळे त्या दडपल्या जातात. महिला स्व:ताच्या पायावर उभे राहणे महत्वाचे आहे. उच्च शिक्षण महिलांच्या जीवनात अभूतपूर्व बदल घडवून आणू शकते ज्यामुळे दीर्घकाळापर्यंत सामाजिक परिवर्तन घडून येते. त्यासाठी महिलांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, कुटुंब आणि समाजात त्यांचा दर्जा वाढवणे,

त्यांच्या हक्कांबद्दल जागरुकता आणणे, त्यांचा स्वाभिमान वाढवणे, त्यांची स्व-कार्यक्षमता वाढवणे, त्यांचे अवलंबित्व कमी करणे, त्यांच्या मुलांचे उत्तम संगोपन, त्यांची गतिशीलता वाढवणे, करिअरच्या संधी उघडणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:**

1.महिला आर्थिक सक्षमीकरणासाठीकेवळ साक्षरता हा अंतिम उपाय नाही तर महिलांनी उच्च शिक्षित असले पाहिजे त्यांचे हक्क आणि कर्तव्ये जाणून घेण्यासाठी उच्च शिक्षित होणे महत्वाचे आहे.

2.महिलांना गरजेनुसार त्यांचे हक्क वापरता आले पाहिजेत.

3.भारतातील महिला आता शिक्षण, क्रीडा, राजकारण, माध्यम, कला व संस्कृती, सेवा क्षेत्र, विज्ञान आणि तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रात पूर्ण सहभाग घेत आहेत.

4.महिलांची क्षमता विकसित करण्यासाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि तांत्रिक प्रशिक्षणाद्वारे तंत्रज्ञान हस्तांतरणाच्या बाबतीत गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

5.बेरोजगार महिलांना भरतकाम, शिवणकाम, शेती, शेतीची लागवड, मासेमारी अशा विविध क्षेत्रात प्रशिक्षण दिले पाहिजे जेणेकरून तिने व्यवसाय सुरु केले पाहिजे.

6.महिला स्वतःचा रोजगार आणि स्वत: ला अधिक मजबूत बनविले पाहिजे. यासाठी महिला सक्षमीकरण अत्यंत महत्वाचे आहे, यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे. सोबतच जुन्या शिक्षण पद्धतीत बदल करून नवनवीन गोष्टी अभ्यासक्रमात सामील करायला हव्यात.

7.आज भारत शासनाद्वारे महिलांच्या सशक्तीकरणासाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. महिला व बाल विकास कल्याण मंत्रालय भारत सरकार द्वारे महिलां सशक्तीकरणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

8. बेटी बचाव बेटी पढाव योजना, महिला हेल्पलाइन योजना, उज्वला योजना, सपोर्ट टू ट्रेनिंग अंड एम्पलोयमेंन्ट प्रोग्रम फोर वुमन, महिला शक्ती केंद्र आणि पंचायती मध्ये महिलांसाठी आरक्षण इत्यादी काही प्रमुख महिला सशक्तिकरण योजना भारत शासनाद्वारे राबविण्यात येत आहे.

**समारोप**

आज भारताची जलद होणारी आर्थिक प्रगती पाहता लक्षात येते की येत्या काही वर्षांमध्ये भारत महिला सक्षमीकरणाचे ध्येय साध्य करेल. शासनाने व देशातील जनतेने महिला सक्षमीकरणाची आवश्यकता समजून घ्यायला हवी व याविषयी जास्तीत जास्त लोकांना ते जागृती निर्माण करायला हवी. जर सर्व गोष्टी व्यवस्थित पार पडल्या तर येत्या काही वर्षातच भारतातील महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करताना दिसतील.

**संदर्भ:**

1.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शिक्षण मंत्रालय भारत सरकार.
2.https://edukedar.com/women-empowerment/
3.Mamoon, D. (2006). Women's Empowerment through Education. SDPI Research and News Bulletin. Vol. 13, No.2 & 3
4.Verma, J. (2006). Gender, Girls and Women Education, New Delhi
5.Murari Lal & Sons 10. Gulati, S. (2006). Women Education in 21st Century, Jaipur: ABD Publishers.

# मध्ययुगीन भारतातील शिक्षणव्यवस्थेचा आढावा

**कु.रेखा कमल धुर्वे**
Emails:- rekhadhurve999@gmail.com

**प्रस्तावना: -**

असं म्हटलं जाते की दर १२ मैलावर भाषा बदलते पण जर दर १२ वर्षानी सत्ता बदलली तर? आपल्या भारतातील प्रशासनाचा इतिहास पाहीला की असे लक्षात येते की जसजसे प्रशासक भारतात बदलत गेले तसतसे भारताच्या सामाजिक, शैक्षणिक,आर्थिक व राजकीय क्षेत्रात बदल झालेत. उदा. आपण जर प्राचीन काळातील शिक्षणाविषयी विचार केल्यास आपणास असे आढळते की सुरूवातीला कोणत्याही प्रकारची शिक्षण व्यवस्था नव्हती. जंगलात राहत असतांना मानवाने अनुभवाद्वारे ज्ञान मिळवले. पण जसजशी मानवाची प्रगती होत गेली त्याप्रमाणे मानवाने पाठांतर, चिंतन, मनन करून इतरांना ज्ञान द्यायला सुरूवात केली.त्यानंतर ८ व्या शतकापासून मुस्लिमांचे आक्रमण भारतावर व्हायला सुरूवात झाली. १२०६ मध्ये गुलीम घराण्यातील शासक कुतुबुद्दिन ऐबक याने सत्ता स्थापन केल्यावर त्याने व इतर मुस्लिम शासकांनी भारतातील सामाजिक, शैक्षणिक,राजकीय व आर्थिक घडामोडीमध्ये योगदान दिले.यामध्ये आपण शैक्षणिक योगदानाचा अभ्यास करू.मुस्लिमांनी मोहम्मद पैगंबराचे तत्वज्ञान शिक्षण पद्धतीत स्विकारलेम्हणून त्या शिक्षण पद्धतीस मुस्लिम शिक्षण पद्धती किंवा मध्ययुगीन शिक्षण पद्धती असे म्हणतात.

या काळात शिक्षणाच्या स्वरूपात अनेक परिवर्तन झालेत. ज्या देशात आजपर्यंत शिक्षणात वैद्यिक ऋचा आणि बौद्धसूत्राचे अध्ययन-अध्यापन होत होते त्या देशात 'मकतब' आणि 'मदरसा' मधून कुरआन तसेच इस्लामी धर्मग्रंथाचे वाचन-पठण सुरू झाले. संस्कृत आणि प्राकृत भाषेचा प्रभाव हळू हळू क्षीण होत गेला. आणि फारशी ही राज्यभाषा असल्याने लोक फारशीच्या अध्ययनाकडे वळू लागले. फारशी भाषेची जाण ज्यांना आहे त्यांना शासन दरबारी चांगल्या पदावर नोकऱ्या मिळू लागल्या. पुढे संस्कृत आणि फारशी यांच्या आदान प्रदानातून उर्दू भाषेचा जन्म झालो.

***संशोधनाची उद्दिष्टे: -**

१. मध्ययुगीन भारतातील शिक्षण व्यवस्थेची माहीती समाजापर्यत पोहचवणे.
२. मध्ययुगीन काळातील शिक्षण पद्धतीचे तत्वज्ञान समाजापर्यत पोहचवणे.
३. मध्ययुगीन काळात झालेल्या शैक्षणिक बदलांचा अभ्यास करता करणे.

***संशोधनाची गृहीतक: -**

१.मध्ययुगीन भारतातील शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास केल्यास समाजाला या काळातील शिक्षण पद्धतीची माहीती मिळेल.
२. मध्ययुगीन काळातील शैक्षणिक बदलांचा अभ्यास करता येईल.
३.मध्ययुगीन काळातील शिक्षण पद्धतीतील तत्वज्ञानाचा अभ्यास करता येईल.

समाजाच्या विकासामध्ये शिक्षणाचे योगदान हे अमुल्य आहे. आज आपण मध्ययुगीन काळातील अनेक बाबींचा अभ्यास करतो. उदा. प्रशासन, चित्रकला, स्थापत्य, साहित्य इ. हे केवळ शिक्षणामुळे शक्य झाले म्हणून आपणास मध्ययुगीन काळातील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. "मध्ययुगीन भारतातील शिक्षण व्यवस्थेचा आढावा" आपणास खालील प्रमाणे घेता येईल.

***मुस्लिम शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये**

प्रत्येकाने जन्म व मृत्यूनंतरचे जग या बाबतीत बरोबर काय आहे, चूक काय आहे यातील फरक जाणून घ्यावा व जी बरोबर वर्तणूक आहे ती निवडावी म्हणजे बुद्धि त्यास चुकीच्या मार्गावर नेणार नाही असे न केल्यास अल्लाच्या संतापास पात्र होईल.मुस्लिम शिक्षण हे मूलतः धार्मिक शिक्षण असून त्याचा उद्देश पवित्र कुराणात मानवाचा जो परमेश्वरांशी संबंध स्पष्ट केला आहे ते जाणणे असा होता.

***मुस्लिम शिक्षण पद्धतीचे तत्वज्ञान:-**

१. 'ला ईलाह ईलिल्लाह मुहमद दुर्र रसुल्लाह' हा मूलमंत्र होय (या जगात अल्लावाचून दुसरा कोणी पुज्यनिय नसून मुहमद रसूल त्याचे संदेशवाहक आहेत.)
२. ईश्वराने मोहम्मदद्वारे पैगाम (संदेश) पोहचविला आहे.
३. इस्लामि तत्त्वज्ञानाचे 'इमान' (श्रद्धा) व 'अमल' (आचरण) असे दोन भाग आहेत. 'इमान' या सहा बाबींचा समावेश होतो. अल्लाह, देवदूत, देव प्रणित ग्रंथ, देवाचे प्रेषित, अंतिम निवाड्याचा दिवस, ईश्वराचे आदेश नबीने (परम ज्ञानाची घोषणा करणारा) / ईशवराने / अल्लाने घोषित केलेल्या सत्याची स्थिती म्हणजे ईमान होय.

***मक्तब-(प्राथमिक शिक्षण):**

प्राथमिक शिक्षण 'मक्तब'मध्ये दिले जात असे 'मक्तब' हा शब्द अरबी भाषेतील 'कुतूब' या शब्दापासून तयार झाला असून त्या 'कुतूब' शब्दाचा अर्थ'त्याने लिहीले' असा होतो म्हणून जेथे लिहिले शिकविले जाते त्या ठिकाणास 'मक्तब' असे म्हणतात 'मक्तब' ही प्राथमिक शिक्षणाची शाळाच होय. सर्व मुसलमान बालकांनी 'मक्तब' मध्ये शिक्षण घेतले पाहिजे अशी अपेक्षा केली जात असे.

**प्रवेश:-** वैदिक कालखंडात प्राथमिक शिक्षणात प्रवेश मिळविण्यासाठी 'उपनयन' (मुंज) हा संस्कार करावा लागे त्याचप्रमाणे मुस्लिम शिक्षण पद्धतीत प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ म्हणून 'बिसमिल्लाह' रस्म (विधी) संपादन करावा लागे त्यानंतरच बालकाला 'मक्तब' मध्ये प्रवेश दिला जाई.

**वय:** बालकाचे वय चार वर्षे, चार महिने, चार दिवस इतके असले पाहिजे नंतरच त्याला 'मक्तब' मध्ये प्रवेश मिळत असे.

**वस्त्र:** या विधीत बालकाला नवीन वस्त्र परीधान करावे लागे. या वेळी त्याचे सर्व नातेवाईक गोळा होत. बालकाला मित्रांसह गादीवर बसविले जाई व समोर कुरआन ठेवत असत.

उच्चारण: कुरआनातील आयतास मौलवी वाचून तसे उच्चारण करावयास बालकास सांगत.

**शिक्षणाचा (प्राथमिक) अभ्यासक्रम:**

वेगवेगळ्या 'मक्तब' मध्ये वेगवेगळे अभ्यासक्रम होते. सुरवातीला लेखन, वाचन, अंकगणित शिकविले जाई, विद्यार्थ्यांना सरावानंतर कागदावर लिहावे लागे शारीरिक शिक्षणात हुतूतू सारखे खेळ होते. अक्षरांचा आकार व उच्चार याला महत्त्व असे. कुरआन मधील कलमे व काही वचने, शब्द शिकविले जात.

ज्योतिष्य, शरिरविज्ञान, तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, इतिहास, विज्ञान या सारख्या विषयांचा क्रमबद्ध अध्यापनासाठी उपयोग होत असे. फारशी भाषेचा व्याकरणाचा प्रारंभ देखील 'मक्तब' मध्येच होत असे. नैतिक शिक्षणात शेखसद्दीचे गुलीस्ताँ व बोस्तान याचा अभ्यास स्पष्टीकरणासह करवून घेतला जाई, उर्दु या अतिरिक्त विषयाचे अध्ययनही होत असे. शेती, युनानी औषधीचा परिचय, पत्रलेखन, युसूफ-जुलेखा, लैला-मजनू, सिकन्दरनामा, मुस्लिम फकिराच्या गोष्टी, हिब्जचे पाठांतर अशा अनेक बाबींचा समोवश अभ्यासक्रमात होता.

**अध्यापन पद्धती:**

**मौखिक:** तोडी उच्चार करावयाचे व ते बालकांनी ऐकावयाचे.

**पाठांतर पद्धती:** पहिला पाठ पूर्ण करावयाचा नंतर दुसरा पाठ पाठांतरासाठी घ्यायचा. पहिला पाठ पूर्ण झाल्याशिवाय मौलवी दुसरा पाठ देत नसत.

**लेखन:** लेखन सरावातून अध्ययन केलेले, पाठांतर केलेले फारशी भाषेत लिहून काढावयाचे. सुंदर हस्ताक्षरास महत्व होते यासाठी दिवसातील चार तास दिले जात. बोरूने लिहले जाई.

**शिक्षणाची केंद्रे.**

***खानगाहे:-**

या प्राथमिक शिक्षणाच्या केंद्रात फक्त मुसलमान मुलांनाच प्रवेश होता. या केद्रांचा आकार भार समाजात घडून होणाऱ्या मदतीने चालत असे.

***दरगाह:**

हे 'खानगाहे' या संस्थेला समांतर असे प्राथमिक शिक्षणाचे ठिकाण होते. फरक एवढाच की श्रीमंत, दानशूर व्यक्तींच्या आश्रयाने या चालत त्याची देखभाल दानशूर व्यक्तीच करीत

***कुराण-शाळा**

या शाळांचा उद्देश 'कुरआन' शिकणे एवढाच होता या शाळा दरगाह, मशिद यात भरविल्या जात वाचन, स्मरणावर भर असे. कधी कधी वाचनावर आधारित अर्थही विचारला जात असे. यात लेखन, गणित यांचे ज्ञान दिले जात नसे.

***मदरसा (उच्च शिक्षण):-**

मुस्लिम शिक्षण पद्धतीत मदरसा मध्ये उच्च शिक्षण दिले जात असे 'दरस' या शब्दापासून मदरसा हा शब्द तयार झाला असून 'दरसा' याचा अर्थ भाषण देणे असा होतो

**प्रवेश:-**

मक्तब मधील शिक्षण पूर्ण केल्यानंतर मदरसामध्ये प्रवेश मिळत असे ही प्रवेशाची अट सोडल्यास कोणताही प्रवेश विधी (मक्तब सारखा) होत नसे

**शिक्षणाचा कालावधी:** १२ वर्षाचा होता.

**शिक्षक नेमणूक:**

सरकारी मदसांमध्ये शिक्षकांची नेमणूक शासनाद्वारे केली जात असे तर खाजगी मदरसांमध्ये विश्वस्त मंडळ, अथवा एखादी जाणकार व्यक्ती किंवा श्रीमंत व्यक्ती शिक्षकाची नेमणूक करीत असे

**निवासस्थान:-**

मदरसांना लागूनच विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था केली जात असे.

**शिक्षणाचे माध्यमः**

फारशी, अरबी भाषा हे शिक्षणाचे माध्यम होते. परंतु मातृभाषेत शिक्षण देण्याची प्रथा औरंगजेबाच्या काळात सुरू झाली.

***लौकिक अभ्यासक्रमः**

अरबी साहित्य, कृषी, व्याकरण, कायदा, गणित, भूगोल, इतिहास, तत्वज्ञान, नितीशास्त्र, ज्योतिष, अर्थशास्त्र युनानी चिकित्सा (वैद्यक शास्त्र) फारशी साहित्य.

***व्यवसाय शिक्षण:-**

विणकाम, अभियांत्रिकी, कृषी, प्रशासन इ.धातूने बनविलेल्या वस्तुचा वापर, लोकर साफ करणे इ. व्यवसायांचा समावेश.शिवणकाम, स्वयंपाक सर्व व्यवसाय शिक्षणात शिक्षणाच्या व्यवसायाला महत्व होते. कारण हा व्यवसाय 'ज्ञान' व नैतिक सवयी शिकवितो.

**शिक्षणाच्यासंस्था**

**फारशी शाळा:-**

शासन कर्त्यांची भाषा फारशी असल्याने हिंदू व मुस्लिम व्यक्तीला भाषेचे ज्ञान असणे आवश्यक होते. या गरजेतून या शाळांची निर्मिती झाल्याचे दिसते. या शाळांचा दर्जा उच्च होता. स्मरण, पाठांतर, लेखन यावर भर होता.

**अरबी शाळा:**

ह्या शाळांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असे त्याना शिक्षणाचा दर्जा तर होताच परंतु अभ्यास क्रमाचे स्वरूप व्यापक होते. अलंकार शास्त्र (Rhetoric) कायदा, ज्योतिष, निसर्ग तत्त्वज्ञान, अध्यात्मविद्या (Metaphysics), मुस्लिम तत्त्वज्ञान यांचे अध्यापन अरबी शाळामधून होत असे मदरसामधील अभ्यासक्रम व मध्ययुगातील युरोपिय विद्यापीठातील अभ्यासक्रम यात बरेचसे साम्य दिसून येते मुस्लिम शिक्षणाचा मोठा प्रभाव पश्चिमेवर बराच काळ पडला होता परंतू भारतात तेवढा प्रभाव पडला नाही.

***स्त्री शिक्षण:-**

मोहम्मद यांच्या म्हणण्यानुसार 'स्त्री' आणि 'पुरुष' या दोघानाही ज्ञान मिळविण्याचा अधिकार आहे. त्यामुळेच मुस्लिम काळात काही अंशी स्त्रियांच्या शिक्षणाची सोय होती.

लहान वयातमुली मक्तबमध्ये शिक्षण घेण्यासाठी जात. त्यांचे नियमित शाळेत येण्याचे प्रमाणकमी असे. त्या गटागटाने शाळेत येत असत.शिक्षणात फक्त लेखन, वाचन शिकवले जात असे. त्यांच्यासाठी वेगळा असा अभ्यासक्रम नव्हता.शहरातील मुलींना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होत असे परंतु ग्रामीण भागात याबाबत उदासिनता होती.खाजगीरितीने स्त्रियांना शिक्षण दिले जाई त्यात गृहशास्त्र आणि धार्मिक शिक्षण यांचा समावेश होता.

मुस्लिम राज्यकर्त्यांचा अनुत्साह, स्त्री शिक्षणाबाबत इच्छा शक्तीचा अभाव, पडदा पद्धती, ग्रामीण भागात शिक्षणाचा फारसा प्रभाव नव्हता या कारणास्तव स्त्री शिक्षणाच्या सोयी मुस्लिम काळात शिक्षण उपलब्ध होऊ शकलेनाही. त्यामुळे अनेक स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या, मागासलेल्या होत्या.

***मुस्लिम शिक्षण पद्धतीचे फायदे :-**

१) मुस्लिम शिक्षण सर्वासाठी खुले होते. त्यामुळे लहान-थोर, गरीब-श्रीमत याच्या आचार विचारांचा परिचय झाला.
२) उर्दूच्या रूपाने हिंदू-मुस्लिम देवीघेवीचे एक साधन मिळाले, त्यामुळे हिंदू-मुस्लिम ऐक्य वाढले.
३)विद्वान व सत्य शोधनास वाहिलेली मंडळी तयार झाली.
४) सांस्कृतिक शिक्षण व तांत्रिक शिक्षण यांची सांगड घातली गेल्याने ऐहिक व परलौकिक जीवनाची तयारी झाली.

***मुस्लिम शिक्षण पद्धतीतील दोष**

१)या शिक्षणाचा भर धार्मिकतेवर अधिक असल्यामुळे धर्माधता वाढली.
२)सर्वांसाठी शिक्षण खुले असले तरी त्याचा फायदा उच्चवर्णीय व मध्यम वर्गीय घेत हिंदूना फारसा फायदा मिळत नसे.
३)शिक्षांचा भार वाढला, त्यामुळे विद्यार्थी दिशाहीन झालेत.
४) उच्च शिक्षणाचे माध्यम अरबी व फारशी भाषा असे. अरबी यावयास खुप कालावधी लागे. उर्दु हे शिक्षणाचे माध्यम फार उशिरा बनले.

**निष्कर्ष: -**

मध्ययुगीन काळात शिक्षण हे प्रामुख्याने धर्मावर आधारित होते. हिंदू शिक्षणामध्ये वेद, व्याकरण आणि अध्यात्म, तर मुस्लिम शासकांच्या काळात 'मकतब' (प्राथमिक) आणि 'मदरसा' (उच्च शक्षण) द्वारे इस्लामिक शिक्षण व पर्शियन भाषेला प्रोत्साहन दिले गेले.

धार्मिक शिक्षणासोबतच गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र (Medicine) आणि काही प्रमाणात तांत्रिक कौशल्यांचे (उदा. शस्त्रक्रिया) शिक्षण दिले जात असे, परंतु विज्ञानाचा विकास या काळात संथ झाला.अनेक मुस्लिम शासकांनी मदरसांना आर्थिक मदत (Grant) दिली आणि ग्रंथालये स्थापन केली. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध होते, तरीही आधुनिक वर्गाची संकल्पना नव्हती.प्राचीन काळाप्रमाणेच, मध्ययुगातही उच्च शिक्षण सर्वांसाठी खुले नव्हते. ते प्रामुख्याने ब्राह्मण आणि उच्चवर्णीय किंवा उच्चभ्रू वर्गापुरते मर्यादित होते.या काळात स्त्रियांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले होते आणि ते औपचारिक शिक्षण व्यवस्थेचा मुख्य भाग नव्हते.पुस्तकांची कमतरता असल्याने, शिक्षक विद्यार्थ्यांना मौखिक पद्धतीने शिकवत असत (स्मरणशक्तीवर भर). 'पाटी' वर लिहिण्याचा सराव प्राथमिक शिक्षणात केला जात.

**संदर्भग्रंथ:-**

१. अग्रवालजे. सी.: Development of Education System in India. शिप्रा पब्लिकेशन दिल्ली
२. कुंभार नागोराव : शैक्षणिक समस्या व उपाय . प्रबोधन प्रकाशन लातूर
३. Dr.majunath s. History of Education Policy in India. Published on e-Pathshal, shodhganga.
४. घोरमाडे डॉ. के. यु. , घोरमाडे डॉ. कलाकृष्ण : भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास आणि शालेय व्यवहाराचे अधिष्ठान. विद्या प्रकाशन नागपूर.
५. शिक्षणाचा इतिहास

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# भारतीय संविधान आणि धर्मनिरपेक्षता

**श्री अमर मनोहर केने**
संशोधक विद्यार्थी
**डॉ.ज्योती दी. ठाकरे**
मार्गदर्शक :- ( राज्यशास्त्र विभाग )
संशोधन केंद्र :- स्व. मदन गोपाल मुंदडा (अशोक) कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदुर रेल्वे

**प्रस्तावना :-**

भारत हा अनेक धर्मांचा मिळून बनलेला देश आहे. भारतीय राज्यघटनेत सुरुवातीला धर्म निरपेक्षता या शब्दाचा कुठेही उल्लेख नव्हता, तसेच भारताला स्पष्टपणे धर्मनिरपेक्ष राज्य घोषित केलेले नव्हते. असे असले तरी राज्यघटनेत अशी काही व्यवस्था करण्यात आली आहे की, त्यामुळे भारतीय संविधानाला धर्म निरपेक्ष राज्याचे स्वरूप प्राप्त झालेले आहेत. १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द जोडण्यात आले. भारताला धर्मनिरपेक्ष राज्य घोषित करण्यात आले. तसेच धर्मनिरपेक्षतेवर भर देण्यात आला. धर्मनिरपेक्षतेचा आदर्श साध्य करण्यासाठी राज्यघटनेच्या प्रस्तावनेत सर्व नागरिकांना धर्मश्रद्धा आणि उपासना स्वातंत्र्य दिलेले आहे. राज्यघटनेच्या कलम १७ अन्वये अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. कलम १५ नुसार कोणतेही व्यक्तीला त्याच्या धर्मानुसार सार्वजनिक पदावर नियुक्त करताना धर्माच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. कलम २५ नुसार विवेकाचे स्वातंत्र्य जेणेकरून कोणत्याही धर्माचे पालन केले जाऊ शकते. प्रत्येक समुदायाला धार्मिक आणि समुदाय धर्मदाय हेतूसाठी संस्था स्थापन करण्याचा आणि चालवण्याचा अधिकार आहे. कलम २७ नुसार कोणतीही विशिष्ट धर्माचा प्रचार आणि प्रसार साठी कर वसूल करण्यास मनाई करते. कलम २८ हमी देते की सरकारी अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला एकत्र बांधून ठेवण्याचे काम संविधानाच्या माध्यमातून प्रयत्न केलेला दिसून येतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१ ) भारतीय संविधानाने जे धर्मनिरपेक्षतेचे तत्व दिलेले आहे. त्या तत्त्वाचे पालन राज्य करत आहेत याचा अभ्यास करणे.
२) धर्मनिरपेक्ष तत्त्वानुसार प्रत्येक धर्माच्या नागरिकाला समान दर्जा प्राप्त झाला आहे, की नाही याचा अभ्यास करणे.
३) सार्वजनिक पदावर नियुक्ती करताना योग्यतेचा आधार घेतला जातो काय याचा अभ्यास करणे.
४) काळानुरूप भारतीय संविधानाच्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांमध्ये झालेला बदल अभ्यास करणे.

**मुख्य शब्द :-**

भारतीय संविधान व धर्मनिरपेक्षता

**संशोधन पद्धती :-**

सदर संशोधन पेपर दुय्यम माहिती स्त्रोतावर आधारित आहे विविध पुस्तके विविध संशोधन पत्रे मासिके याचा उपयोग माहिती संकलित करण्यासाठी करण्यात आलेला आहे.

**संशोधन पूर्व साहित्याचा आढावा :-**

धर्मनिरपेक्षता ही संज्ञा ४२ व्या घटनादुरुस्तीने १९७६ साली सरनाम्यामध्ये समाविष्ट केली गेली. याचा अर्थ असा की भारतीय राज्यसंस्थेचा असा कोणताही धर्म नसेल, धर्म व राजकारण यांची सरमिसळ केली जाणार नाही व धर्म ही बाब केवळ खाजनी जीवनापुरती मर्यादित असेल, अर्थात राज्याद्वारे सर्व लोकांना सत सदसदविवेकाचे तसेच स्वतःच्या निवडीनुसार धर्माचा प्रचार, प्रसार व आचरण करण्याचे स्वातंत्र्य असेल. राज्यघटनेच्या स्वरुपाबद्दल जेव्हा घटनासमितीत चर्चा झाली त्यावेळेस 'धर्मनिरपेक्षता' हे विशेषण सरनाम्यात नमूद् करण्यात यावे अशी काही सदस्यांची मागणी होती. प्रा. के. टी. शहा यांनी 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवादी' ही दोन्ही विशेषणे भारतीय संघराज्याला लावावीत अशी दुरुस्तीच सुचविली होती. डॉ. आंबेडकरांनी प्रा. राहा यांच्या दुरुस्तीला विरोध करताना असे सांगितले की, "प्रजासत्ताकाला अशी विशेषणे लावणे म्हणजे लोकशाही नष्ट करण्यासारखे आहे. एका विशिष्ट मतप्रणालीचेच लोक भविष्यकाळात सत्तेवर येतील असे नाही, तेव्हा त्यांचा अधिकार मर्यादित करणारी अशी विशेषणे कशाला ?" प्रा. शहा यांची दुरुस्ती घटनासमितीत नामंजूर झाली. पुढे आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी ४२ व्या घटना दुरुस्तीने 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' अशी विशेषणे घटनेच्या सरनाम्यात समाविष्ट केली. मात्र या ४२ व्या घटनादुरुस्तीत 'धर्मनिरपेक्षता शब्दाची व्याख्या करण्यात आली नव्हती. ४५ व्या घटनादुरुस्ती विधेयका-द्वारे धर्मनिरपेक्ष आणि

समाजवादी या शब्दाची व्याख्या देण्याचा प्रयत्न केला. परंतु या विधेयकाला राज्यसभेचा पाठिंबा मिळाला नाही. प्रस्तावित. घटनादुरुस्तीने धर्मनिरपेक्ष या संज्ञेची व्याख्या 'सर्व धर्माविषयी समानआदर असणारे' अशी केली होती. सर्व धर्माविषयी समान आदर या व्याख्येने धर्मातीत राज्याची सर्व वैशिष्ट्ये प्रगट होत नाहीत. जे राज्य घटनात्मकदृष्ट्या कोणत्याही धर्माशी बांधील नाही आणि त्यात हस्तक्षेपही करीत नाही; व्यक्तीला आणि समाजाला धार्मिक स्वातंत्र्याची हमी देते व व्यक्तीचा धर्म कोणताही असो तिच्याशी नागरिक म्हपान इतर सर्वांप्रमाणेच व्यवहार करते तेच धर्मनिरपेक्ष राज्य होय. धर्मनिरपेक्षता या शब्दाने व्यक्त होणारी संकल्पना एक नैतिक व्यवस्था आहे. स्वातंत्र्य आणि समता या मुल्यांवर आधारलेली, धर्माला त्यात लुडबूड न कर, देणारी व ऐहिक जीवनाला महत्व देणारी अशी ती व्यवस्था आहे. शब्दकोशानुसार 'धर्मनिरपेक्षता' या शब्दाचा अर्थ "राजकीय, नागरी किंवा सामाजिक व्यवहारांत धर्म, धर्मविचार किंवा धार्मिक कल्पना यांना दूर ठेवणे." असा होतो. लोक अनेकदा या शब्दाचा अर्थ अधर्म, निधर्मीपणा, नास्तिकता, किंवा धर्मविरोध असे लावतात. परंतु हे अर्थ चुकीचे होय. मुळात धर्म श्रेष्ठ की राजा श्रेष्ठ, धर्म श्रेष्ठ की राज्य श्रेष्ठ हा वाद विकोपाला जात असतानाच एकोणिसाव्या शतकाच्या मध्यांतराला सेक्यूलर म्हणजे धर्मनिरपेक्षता या शब्दाचा जन्म झाला. हा खल अमेरिका व युरोपात रिगिला पोहोचला होता. त्याच कालखंडात ब्रिटिश लेखक-विचारवंत 'जॉर्ज जेकब होलीओक' यांनी पहिल्यांदा धर्मनिरपेक्षता ही संकल्पना मांडली. व धर्मनिरपेक्षता अस्तित्वात येण्यासाठी पुढील चार गोष्टींचे असणे आवश्यक आहे असे सांगितले.

**अ) धर्म तटस्थता :-** धर्माप्रती ना आपल्याला विरोध, निरस्कार ठेवायचा आहे ना प्रेम, स्नेह, आपुलकी ठेवायची आहे. स्वर्ग, नरक, मोक्ष, ईश्वर आहे की नाही हह्याचे आपल्याला काहीही करायचे नाही तर धार्मिक तटस्थ राहायचे आहे.

**ब) इहलोकवाद :-** आपण वास्तव्य करतो या इहलोकावर (This World) विश्वास ठेवणे. स्वर्ग, नरक, परलोक (That World), ईश्वर, मोक्ष आहे की नाही हे माहित नाही. आणि आपण कितीही प्रयत्न केले तरी हे जाणून घेऊ शकत नाही. परलोक आहे की नाही हे माहित नाही आणि ज्याबद्दल आपण जीवंतपणी जाणून घेवू शकत नाही तिथे आपली ऊर्जा कशाला खर्च करायची. म्हणून आहोत त्या इहलोकावर विश्वास ठेवून याच्या विकासासाठी प्रयत्न करायचा.

**क) विज्ञानावर विश्वास :-** या जगात जेवढे काही संकट आहेत त्यांच्या उपायाचा मार्ग विज्ञानात आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे कोवीड-19. कोरोना विषाणूने संपूर्ण जगाला विळखा घातला होता. या छोट्याशा विषाणूपासून आपला बचाव करण्यासाठी ना कोणता धर्म येऊ शकला ना कोणी धार्मिक व्यक्ती. सर्वांना वाट होती ती म्हणजे वैक्सीन ची. म्हणून होलीओक म्हणतो की, मनुष्याच्या मुक्तीचा मार्ग धर्म नसून विज्ञान आहे.

**ड) धर्मनिरपेक्ष नैतिकता :-** पूर्वी लोक धार्मिक आणि नैतिकतेला एकमेकांत मिसळून द्यायचे, परंतू धार्मिक आणि नैतिकता हह्या दोन वेगवेगळया संज्ञा आहेत. कोणी धार्मिक आहे म्हणून तो व्यक्ती नैतिक आहे आणि कोणी अधार्मिक आहे म्हणून अनैतिक आहेत असे होत नाही तर धार्मिक व्यक्तीही अनैतिक असू शकतो आणि अधार्मिक व्यक्तीही नैतिक असू शकतो. याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे भगतसिंग, भगतसिंग नास्तिक होते परंतू नैतिक होते. त्यामुळे होलीओक म्हणतो प्रत्येक व्यक्तीने नैतिक व्हावे, धार्मिक व्हायची अनिवार्यता नाही.

**संविधान, कायदे आणि धर्मनिरपेक्षता:-**

भारतीय संविधानात संविधानाच्या प्रस्तावनेव्यतिरिक्त 'धर्मनिरपेक्षता' या शब्दाचा उल्लेख इतरत्र कुठेही आढळत नाही. परंतु भारतीय संविधानाच्या अनेक कलमांतून आणि काही प्रमुख कायद्यांतून धर्मनिरपेक्षतेचा भाव मात्र व्यक्त होतो तो पुढीलप्रमाणे -

कलम १४- राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्या-पुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही.

कलम १५- धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई.

कलम २३- जेव्हा पण सरकार देशसेवेसाठी आव्हान करेल तेव्हा धर्म वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणांवरुन भेदभाव करणार नाही.

कलम २५, २६, २७ व १८ यामध्ये धर्मस्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. कलम २५ नुसार सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हकदार आहेत. तर कलम २६ नुसार सार्वजनिक सुव्यवस्था, नितिमत्ता व आरोग्य यांच्या अधीनतेने प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास, धार्मिक व धर्मादायी प्रयोजनांकरिता संस्थांची स्थापना करुन त्या स्वखर्चाने चालविण्याचा, धार्मिक बाबींमध्ये आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा हक्क असेल.

कलम २९ - भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची वेगळी भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा हक्क असेल.

कलम ३० - धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

कलम ४४- राज्य देशातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी संहिता लागू करण्याचा प्रयत्न करेल.
कलम ५१ क - हे कलम मुलभूत कर्तव्याचे आहेत. कलम ५१ क (५) नुसार धर्म-भाषा-प्रदेश-वर्ग वगैरे भेद विसरुन अखिल भारतीय जनतेत एकोपा व भ्रातृभाव वाढीस लावणे; कलम ५१ क (६) नुसार आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.
कलम ३२५ - कोणतीही व्यक्ती धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही कारणावरून मतदार यादीत समाविष्ट होण्यास अपाय अपात्र ठरणार नाही.

लोक प्रतिनिधित्व अधिनियम (RPA) १९५१ कलम १२३(३):- कोणताही उमेदवार निवडणूक काळात धर्म, जात, वंश याच्या आधारावर मत देणे अथवा न देण्याचे आव्हान करणार नाही. असे केल्यास व ते न्यायालयात सिद्ध झाल्यास संबंधित व्यक्तीचे म्हणजे उमेदवाराचे निर्वाचन रद्द होईल. इंडियन पिनल कोड (IPC), क्रिमिनल प्रोसीजर कोड (CPC), इंडियन एव्हिडन्स ॲक्ट (IEA) हे सर्व कायदे सर्व धर्मियांसाठी सारखेच आहेत. यात धार्मिक भेद्भाव नाही. वरील सर्व संविधानातील कलमा आणि कायदे धर्मनिरपेक्षतेचा भाव व्यक्त करुन मा नागरिकांना शाश्वती प्रदान करते व कोणत्याही धर्माच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही.

**निष्कर्ष :-**

शेवटी असे म्हणता येईल की जातीयवाद हा स्वतःमध्ये एक शाप आहे. परंतु जेव्हा त्याचा वापर सत्तेच्या राजकारणाचे शस्त्र म्हणून केला जातो तेव्हा तो एकतर विघटित होतो किंवा फॅसिस्ट राज्याला जन्म देतो. त्यामुळे राजकारण्यांना व्होटबँकेची आसक्ती सोडावी लागणार आहे. धार्मिक नेत्यांना केवळ त्यांच्या अनुयायांच्या नैतिक आणि आध्यात्मिक प्रगतीवर लक्ष केंद्रित करावे लागते, जातीय हिंसाचार आणि लुटालूट कठोरपणे ठेचून काढावी लागेल. गडबडीत सुरक्षा दलांनी भेदभाव न करता त्यांचे कर्तव्य बजावावे यासाठी व्यवस्था करावी लागेल. मूलभूत अधिकारांमध्ये काम करण्याच्या अधिकाराचा समावेश करून प्रत्येक सक्षम व्यक्तीसाठी रोजगाराची तरतूद करावी लागेल. राष्ट्रीय एकता परिषदे परिषदेला आग लागल्यास पाणी गोळा करण्यासाठी यंत्र म्हणून वापरण्याऐवजी जातीयवाद, प्रादेशिकता आणि जातीयवादाच्या राष्ट्रीय दंगलींचे अचूक निदान आणि अचूक उपचार करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ म्हणून वापरावे लागेल, संकुचित हितसंबंधांना हृदयावर आणि मनावर अधिराज्य गाजवण्यापासून रोखण्यासाठी, प्रथम भारताचा संदेश द्यावा लागेल. भारताला आधुनिक आणि प्रगतीशील राष्ट्र बनवण्याचा संकल्प पुराणमतवाद आणि जातीयवादाच्या विरोधात सतत संघर्ष करण्याची मागणी करतो.

भारतात धर्माच्या नावाखाली पसरलेल्या या अराजकापासून देशाला वाचवण्यासाठी केंद्रीय कायदा मंत्रालयाला सर्वसमावेशक मसुदा तयार करावा लागणार आहे. कारण पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी विविध परिषदांमध्ये याची गरज भास्वली आहे. धर्मनिरपेक्षतेवर विश्वास न ठेवणाऱ्या राजकीय पक्षांना राजकीय मुख्य प्रवाहातून वगळणे, अशा राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करणे. भारतीय राज्यघटनेतील नमूद केलेल्या तरतुदींच्या आधारे, राजकीय पक्षांनी पूर्ण निष्ठेने, निहित स्वार्थ सोडून, जनहित डोळ्यासमोर ठेवून काम केले आणि आपण सर्व भारतीय हिंदू, मुस्लीम, सुवर्ण, दलित या विचारांच्या वर उठून भारतीय झालो, तर भारतीय संविधानाला आणि धर्मनिरपेक्षतेला कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होऊ शकत नाही, संविधान निर्मात्यांनी ज्या पद्धतीने राज्यघटनेचे स्वरूप ठरवले आहे. त्या आधारे भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे असे म्हणता येईल.

**संदर्भसूची :-**

1. जर्नल ऑफ कॉन्स्टिट्यूशनल ॲंड संसदीय अभ्यास खंड ४७ जुलै-डिसेंबर,२०१३, पृष्ठ,क्र. ३२५
2. नेहरू जवाहरलाल, (१९९४) लेटर टू पी.सी.सी प्रेसिडेंट न्यू दिल्ली. पृष्ठ,क्र. २०
3. बसू दुर्गा दास, भारत आणि संविधान एक परिचय, प्रेस्टीन्स हॉल, न्यू दिल्ली. पृष्ठ,क्र. २६
4. कोठारी रजनी, भारतातील राजकारण अनुवाद. पृष्ठ,क्र. २२७
5. जैन पुखराज आणि डॉ. फडिया बि.एल, भारतीय शासन आणि राजकारण साहित्य भवन प्रकाशन २००९. पृष्ठ,क्र.३८५
6. https://legislative.gov.in/constitution-of-india/

# पर्यावरण विज्ञान आणि शाश्वत विकासाच्या अभ्यासक्रमातील बदलते प्रवाह

**कु.अस्मिता संजय ढवस**
संशोधक विद्यार्थिनी राज्यशास्त्र (नेट,सेट) कला कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मारेगांव
पिन कोड : 445303 ,Email Id : asmitadhawas29@gmail.com

**सारांश**

आज जगात हवामान बदल झाल्यामुळे मानवाला बहुविध पर्यावरणीय समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. कधी अवेळी पाऊस येतो आणि पिकांचे नुकसान करून जातो, तर कधी पावसाची वाट पाहून पाहून शेतकरी थकतो, परंतु ऋतू येऊनही पाऊस पडत नाही. यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होते. उष्णतेमध्ये वाढ झाल्याने मानवी आरोग्याचे संतुलन बिघडते. यामुळे प्रत्येक देशापुढे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय अशा अनेक प्रकारच्या गंभीर समस्या निर्माण होतात. याकरिता "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020" मध्ये आजच्या उपयोगात आणता येईल अशा व्यावहारिक विषयांचा समावेश करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांना दिलेल्या शिक्षणाचा आधार केवळ सिद्धांतिक न राहता तो व्यवहारामध्ये आणता येईल आणि त्याचा फायदा तत्कालीन समाजाला, अर्थव्यवस्थेला आणि पर्यावरणाला होईल. अशाप्रकारे विकासाच्या शाश्वत मार्गावर राहून सर्वांना न्यायपूर्ण वातावरणाची निर्मिती करण्यात येईल. पर्यावरण आणि शाश्वत विकासाच्या अभ्यासक्रमात आता 'ज्ञान हे नुसते सिद्धांतावर आधारित न देता ते कृतीतून द्यावे', 'कृतीतून समाजाच्या उन्नतीसाठी शाश्वत आणि चीरकालीन मार्गांचा वापर करावा', 'विद्यार्थ्यांमधील आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा विकास व्हावा', 'आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जास्तीत जास्त विकास साधता यावा', यावर भर दिला गेलेला आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या जगाचे जबाबदार नागरिक बनावे यासाठीचे धडे आज शिक्षणातून दिले जात आहे.

**प्रस्तावना**

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालचा परिसर. या परिसरातील जैव संस्था, नैसर्गिक वातावरण, मानवी जीवन, या सर्व घटकांचा अभ्यास म्हणजे पर्यावरणाचा अभ्यास होय. पर्यावरणाचा संबंध हा मानवनिर्मित जग तसेच नैसर्गिक जग या दोहोंशी येतो. यामुळे पर्यावरण विज्ञान हे एक 'आंतरविद्याशाखीय स्वरूपाचे शास्त्र' म्हणून उदयास आले आहे. याचा संबंध मानव्यविद्या (सामाजिक) शास्त्रे तसेच नैसर्गिक शास्त्रे या दोन्ही मध्ये होत असतो. त्यामुळे या दोघांमध्ये समन्वय साधण्याचे कार्य हे पर्यावरण शास्त्राचे असते. शाश्वत विकास आणि पर्यावरण विज्ञानाचा संबंध हा जवळचा आहे. शाश्वत विकास म्हणजे पर्यावरणाचा समतोल राखून पर्यावरणाच्या चक्रामध्ये कुठलाही मानवी हस्तक्षेप न करता सर्वांगीण मानवी विकास साधने होय. पर्यावरणातील घटकांच्या अतिवापरामुळे पर्यावरणाचे संतुलन मानवाने पूर्णपणे बिघडविलेले आहे. त्याचे परिणाम मनुष्याला विविध रूपामध्ये भोगायला मिळत आहे. जंगलतोड, मासेमारी, शिकार, टेकड्यांना सपाट करून जमीन वापरात आणणे, सर्वत्र झालेले काँक्रिटीकरण, विकासाच्या नावावर जंगलामधून रस्ते बांधणे तेथील झाडांची कटाई करणे, घर बांधणी, फर्निचर यासाठी चालवलेली निर्वणीकरणाची जी पैज जगभर सुरू झालेली आहे, त्यातून जैवविविधतेचा ऱ्हास होत चालला आहे, मानव वन्यजीव संघर्ष वाढला आहे, पर्यावरणातील ऋतुचक्र पूर्णपणे बदलू लागले आहे, यासाठी शाश्वत विकासाचे धडे आजच्या विद्यार्थ्यांना देऊन त्यातून विकास साधण्याकरिता प्रोत्साहित करणे ही आजच्या काळाची गरज आहे. ' नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -2020' हे यासाठी फार महत्त्वाचे ठरले आहे कारण याद्वारे संविधानिक तसेच व्यावहारिक दोन्ही शाखांना महत्व देण्यात आले असून दोघांच्या सुवर्ण मध्यातून पर्यावरणाचा विकास साधण्याचे सूत्र यातून आपल्याला मिळते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. भविष्यातील भयावह पर्यावरणीय समस्यांच्या निराकरणाविषयी माहिती सादर करणे.
2. शाश्वत विकासाच्या मार्गातून पर्यावरणाच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करून पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे पर्याय शोधणे.
3. पर्यावरणाच्या आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा विकास साधने आणि नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक पर्यावरणाचा विकास शाश्वत मार्गातून घडवून आणणे.

**संशोधनाची गृहीतके**

1. पर्यावरण विज्ञान हा विषय केवळ नैसर्गिक शास्त्रांपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक शास्त्रांमध्येही त्याचा समावेश केला गेला आहे.

2. विद्यार्थी पर्यावरणाचे शिक्षण हे केवळ पुस्तकातून न घेता प्रत्यक्ष क्षेत्रभेट, पर्यावरण प्रकल्प, स्थानिक समुदायांवर आधारित विविध उपक्रमांद्वारे व्यावहारिकपणे सहभाग घेऊ लागला आहे.

3. पर्यावरण विकासाच्या अभ्यासात शाश्वत विकास उद्दिष्टांना केंद्रस्थानी ठेवल्या गेले आहे. वस्तूची "निर्मिती-वापर-पुनर्वापर" या प्रक्रियेवर आधारित पर्यावरण पूरक व शाश्वत उद्दिष्टांना लक्ष ठेवून नवीन वस्तूंची निर्मिती केल्या जात आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्ततु शोधनिबंधात "पर्यावरण विज्ञान आणि शाश्वत विकासाच्या अभ्यासक्रमातील बदलते प्रवाह", याचा शोध घेत असताना संपूर्ण माहिती ही दुय्यममाहिती स्त्रोतांद्वारे घेण्यात आलेली आहे. संबंधित शोधनिबंधाच्या लिखानाकरिता वर्तमानपत्र, पुस्तके, शासनाचे अहवाल, इंटरनेट वरील विविध साईट्स, मासिके यांच्या माध्यमातून संपूर्ण वर्णन करण्यात आलेले आहे .या सर्व संदर्भाच्या आधारे "पर्यावरण विज्ञान आणि शाश्वत विकासाच्या अभ्यासक्रमातील बदलते प्रवाह" , या शोधनिबंधाचे लिखाण पूर्ण करण्यात आलेले आहे.

**स्पष्टीकरण**

आपण अशा जगामध्ये पदार्पण करीत आहोत, ज्यामध्ये पर्यावरणाला सुद्धा आपल्या इच्छेप्रमाणे बदलत आहोत. मानवनिर्मित वातावरण निर्माण करून केवळ तात्पुरत्या सुख आणि सुविधांच्या मागे लागलो आहोत. दूरदृष्टीने विचार करता यामुळे आपण आपल्या अंत्याकडे आपण वळू लागलो आहोत. उदाहरणार्थ उन्हाळ्यामध्ये उष्णतेपासून सुरक्षा व्हावी म्हणून आपण ए.सी. लावतो. परंतु त्यातून निघणारे क्लोरोफ्यूरो कार्बन हे पर्यावरणाला नुकसान करणारे असून त्यामुळे ओझोन थराच्या विरळ होण्यामध्ये या कार्बनची भूमिका महत्त्वाची आहे. याकडे आपण सर्वांनी दुर्लक्ष केलेले आहे. आज प्रत्येक घरामध्ये ए.सी. , फ्रिज दिसून येतो आणि या दोन्ही मधून क्लोरोफ्यूरो कार्बन उत्सर्जित केले जाते. आज मोटार गाड्यांची संख्या फार वाढली आहे. प्रत्येक घरी जेवढ्या व्यक्ती राहतील; तेवढ्या मोटार गाड्या, मोटरसायकली दिसून येतात. यातून निघणारा धूळ हा पर्यावरणामध्ये प्रदूषण निर्माण करतो. जगात सर्वत्र अनेक प्रकारच्या खाणींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे; यामुळे भूगर्भातील हालचाली मोठ्या प्रमाणात घडून येत आहे. कारखाने दवाखाने उद्योग यातून निघणारे ध्वनी वायू जल प्रदूषण हे मानवी जीवनाला घातक आहे. तसेच ते पर्यावरणालाही संपुष्टात आणणारे आहे. मानवाला जर आपल्या चिरकालीन आणि सर्वांगीण विकास घडवून आणायचा असेल तर पर्यावरणाला कुठलीही हानी न पोहोचविता पर्यावरण स्नेही, पर्यावरण पूरक, मार्गांचा अवलंब करावाच लागेल. अन्यथा या सृष्टीवर मानवप्राणी संपुष्टात आल्याशिवाय राहणार नाही.

या सर्व परिणामांचा विचार करून शाळा, महाविद्यालयीन स्तरावर या समस्येची माहिती देणे. या समस्येच्या निराकरणासाठी विविध उपाय योजना, उपक्रम, कार्यक्रम, आखून सर्वांगीण विकासाकरता प्रयत्न करण्यात येत आहे. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 'मध्ये यासाठी विशेष भर दिलेला आहे. शालेय स्तरावर यासाठी 'परिसर अभ्यास' हा विषय पूर्वीपासून शिकविला जात आहे. या समस्येच्या परिणामांचा विचार करता, महाविद्यालयीन स्तरावर पर्यावरण शास्त्र हा विषय सर्व शास्त्रांमध्ये शिकविला जाऊ लागला आहे. पर्यावरण शास्त्र हे एक नैसर्गिक तसेच सामाजिक शास्त्र या दोन्ही मध्ये अभ्यासाला दिसून येते. कारण पर्यावरण या शब्दाची व्याप्ती फार मोठी आहे. मानवनिर्मित पर्यावरण आणि नैसर्गिक पर्यावरण या दोन्हींचा प्रभाव एकमेकांवर होतो. त्यामुळे या विषयाचे महत्त्व वाढलेले आहे. पर्यावरण विज्ञान आणि शाश्वत विकास हा केवळ सैद्धांतिक नसून तो व्यापक विषय आहे. यामध्ये कृत्यात्मक शिक्षण देऊन तो विषय शिकविला, त्याचे कारण, परिणामांचा विचार करून तो पटवून दिला तर या समस्येपासून नक्कीच एक दिवस समाधान मिळेल. यासाठी उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा वापर करीत असताना तो भविष्यातील पिढ्यांचा विचार करून वापरणे क्रमप्राप्त ठरते. पर्यावरण विज्ञान आणि शाश्वत विकासाच्या अभ्यासक्रमामध्ये जी सुधारणा करण्यात आलेली आहे, जे नवीन बदल करण्यात आलेले आहेत, त्याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**पर्यावरण विज्ञान आणि शाश्वत विकासाच्या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये**

पर्यावरण विज्ञान आणि शाश्वत विकासाच्या अभ्यासक्रमात प्रत्यक्ष कृती द्वारे शिक्षण देणे, विद्यार्थ्यांचा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन विकसित करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, हवामान बदल, कार्बन न्यूट्रिलिटी, चक्रीय अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास उद्दिष्टांवर आधारित समस्यांची सोडवणूक करणे यावर भर दिला जात आहे.

**अ. प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण**

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्थळाला भेट देणे, मुलाखती घेणे, गटचर्चा आयोजित करणे, एखादा प्रकल्प त्यांच्या स्वतःच्या निरीक्षणामध्ये राबवून त्यांच्या स्वक्षमतांच्या आधारे निष्कर्ष काढायला लावणे, इत्यादी गोष्टींमुळे विद्यार्थ्यांची जिज्ञासा वृत्ती विकसित होत असते. विद्यार्थ्यांना "झाडे लावा, झाडे जगवा", यासारखे प्रोजेक्ट देणे कुंडीतील बागकाम, दत्तक झाड, कचरा व्यवस्थापन, कंपोस्ट खत बनवणे, टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू बनवणे, पाणी वाचवा मोहीम राबवणे, प्लास्टिक मुक्त मोहीम राबवणे, निसर्ग भेटी, निरीक्षण इत्यादी गोष्टींचा अवलंब केला

जाऊ लागला आहे. विद्यार्थ्यांना यासारखे कृती, प्रयोग, प्रकल्प देऊन त्यांच्यातील संशोधन वृत्तीला प्रेरणा देऊन विविध प्रकारे पर्यावरण संगोपन आणि शाश्वत विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**ब. आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन**

विद्यार्थी एकाच वेळी विविध शास्त्रांचा अभ्यास आपल्या शालेय तसेच महाविद्यालयीन जीवनात करीत असतात. त्यामुळे विविध विषयांचा एकमेकांशी संबंध जोडून एक आंतरविद्याशाखीय दृष्टी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात या अभ्यासक्रमाला यश आले आहे. मिळवलेल्या ध्यानाचा पुरेपूर वापर करून विद्यार्थ्यांना ते ज्ञान प्रत्यक्षात वापर करण्यासाठी प्रेरित करणे, त्यांना मार्गदर्शन करणे, समस्यांची सोडवणुकीचे मार्ग सुचवणे अशा प्रकारे प्रयत्न केल्या जात आहे. या नवीन अभ्यासक्रमामध्ये एकाच वेळी विद्यार्थी नैसर्गिक शास्त्र तसेच सामाजिक शास्त्र या दोन्ही विषयांचा अभ्यास करू लागले आहे. नैसर्गिक शास्त्रांमधील वैज्ञानिक शास्त्रशुद्ध नियमांचा वापर सामाजिक शास्त्रांमध्ये होऊ लागला आहे. नियमांची माहिती घेऊन ते प्रत्यक्षात लागू करण्याविषयीचे शिक्षण यामुळे मिळू लागले आहे.

**क. आधुनिक तंत्रज्ञानाचा**विकास

आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास करणे आणि नैसर्गिक रित्या शुद्ध अशा नवनवीन उपक्रमांचा विकास करण्याची संधी यामुळे मिळू लागली आहे. उदाहरणार्थ सी.एन.जी. वर आधारित मोटारींमुळे पर्यावरणाचे नुकसान होत नाही. शून्य कार्बन हे संकल्पना या ठिकाणी लागू होते. मानवाच्या विकासालाही यामुळे चालना मिळाली आहे आणि पर्यावरणाचेही नुकसान होत नाही. ज्ञानावर आधारित नवनवीन पद्धतींचा विकास आणि संशोधन यांना महत्त्व देण्यात येत आहे. नूतनीकरणीय ऊर्जा तंत्रज्ञानाचा वापर करणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, हरित हायड्रोजन, स्मार्ट ग्रीड, कचरा व्यवस्थापन, शेतीसाठी ड्रोन तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, व्हर्टिकल फार्मिंग, इत्यादींच्या वापरावर भर दिला जात आहे.

**ड. हवामान बदल**

हवामान बदल ही एक गंभीर समस्या जगापुढे निर्माण झाली आहे. शेती,आरोग्य यावर हवामान बदलामुळे फार विपरीत परिणाम पडू लागले आहे. या परिणामांपासून वाचण्याकरिता आज आपण समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून काही कर्तव्य पार पाडणे फार आवश्यक आहे. हवामान बदलाच्या समस्येपासून सोडवणुकीसाठी सौर ऊर्जेचा वापर करणे, वृक्षारोपण करणे, हरित तंत्रज्ञानाचा वापर करणे फार गरजेचे आहे.

**ई. चक्रीय अर्थव्यवस्था**

चक्रीय अर्थव्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्थेचा विकास करीत असताना पर्यावरणाला नुकसान होणार नाही याकडे लक्ष देणे होय. अर्थव्यवस्थेचा विकास हा शाश्वत वस्तूचा वापर करून करणे. पुनर्वापराची प्रक्रिया राबवणे. प्रदूषण कमी करणे. नैसर्गिक संसाधनावरील अवलंबित्व कमी करून शाश्वत मार्गाने विकास करणे. गरजांना कमी करून भविष्यातील पिढ्यांचा विचार करून संसाधनाचा योग्य वापर करणे. चक्रीय अर्थव्यवस्था ही अशा प्रकारे उपलब्ध नैसर्गिक संसाधनांच्या अतिवापरामुळे होणाऱ्या समस्यांपासून सोडवणूक करण्यासाठी एक नवीन प्रणाली उपयोगात आणण्याविषयीचे विचार प्रस्तुत करते.

**फ. शाश्वत विकास उद्दिष्टे - केंद्रस्थान**

आजचा विकास आणि समृद्धी ही जीवाश्म इंधने, धातू, फास्फेट खते, दुर्मिळ वायू, इत्यादी प्रकारच्या मर्यादित खनिज संसाधनावर आधारित आहे. जीवाश्म इंधने, खनिज इत्यादी संसाधने ही मर्यादित स्वरूपाची आहेत. त्यामुळे ती अतिवापरामुळे एक दिवस संपुष्टात येणारी आहे. याकरिता शाश्वत विकास हा त्या संसाधनाच्या एका अमर्यादित साठ्याकडे लक्ष केंद्रित करतो जे घटक पूर्वीपासून सृष्टी मध्ये उपलब्ध आहेत आणि त्यांचा वापर करून सुद्धा त्याला पुन्हा निर्माण करता येईल . अशा संसाधनाच्या निर्मितीवर आणि पुनर्वापरावर लक्ष केंद्रित केले जाते. शाश्वत विकास लक्ष्य ही आजच्या तसेच येणाऱ्या पिढ्यांचा विचार करून एका चीरकालीन स्त्रोताच्या वापरावर भर देत आहे. ज्याचा वापर मनुष्याने कितीही केला तरी ते संपणार नाही. उदाहरणार्थ हरित इंधनाचा वापर करणे, सौर ऊर्जेचा वापर करणे. सौर ऊर्जा हे कधीही न संपणारे असे अमर्यादित स्त्रोत आहे.

**ग. हरित कौशल्य**

'पर्यावरणाला हानी न पोहोचविता निसर्गाचे रक्षण करणाऱ्या कामासाठी आवश्यक असणारे कौशल्य म्हणजे हरित कौशल्य होय'. ही कौशल्य केवळ पर्यावरणाशी संबंधित नोकऱ्यासाठीच नव्हे तर सर्वांगीण विकासाकरिता सर्वच क्षेत्रांमध्ये लागू करण्यासाठी महत्त्वाची ठरतात. तंत्रज्ञान क्षेत्र, उत्पादन क्षेत्र, सेवा क्षेत्र या सर्व क्षेत्रांपर्यंत शाश्वत विकास उद्दिष्टाप्रमाणे पर्यावरणाच्या विकासासाठी प्रयत्नांची अंमलबजावणी होणार नाही तोपर्यंत शाश्वत विकास आणि पर्यावरण विकास अस्तित्वात येऊ शकणार नाही.अशाप्रकारे अशाप्रकारे पर्यावरण विज्ञान आणि शाश्वत विकासाच्या अभ्यासक्रमातील बदलत्या प्रवाहामध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार बदल करण्यात आले आहे. यामुळे पर्यावरणाचे शिक्षण सिद्धांतिकते कडून व्यावहारिक दृष्टिकोनाकडे असे मार्गक्रमण करण्यात आले आहे.

**उपाय योजना**

क. हरितगृह वायूचे प्रमाण कमी करून अक्षय ऊर्जेचा वापर वाढवणे.
ख. वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन करून पर्यावरण पूरक तंत्रज्ञानाचा वापर करणे.
ग. राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्यांचे संरक्षण करणे, त्यामुळे वन्य प्राण्यांचे जीवन सुरक्षित राहील.
घ. संसाधनाचा संतुलित वापर करून वस्तूच्या पुनर्वापरासाठी प्रोत्साहन देणे.

**निष्कर्ष**

हा संशोधन पेपर सादर करण्याचा उद्देश म्हणजे शाश्वत विकासातून पर्यावरणाच्या विकास करणे हा आहे. पृथ्वीच्या संरक्षणासाठी शाश्वत मार्गाद्वारे विकास करणे, आज काळाची गरज बनली आहे. कारण पर्यावरणाच्या अतिरेकी वापरामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे. आज जगभर उष्णतेची लाट, थंडीची लाट, चक्रीवादळ, मुसळधार पाऊस, वीज कोसळणे, पूर, भूस्खलन, यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. दिवसेंदिवस ही समस्या सातत्याने वाढतच आहे. यासाठी फक्त एकच मार्गाने विकास करणे हे सुरक्षिततेचे लक्षण दिसून येते, ते म्हणजे शाश्वत विकासाच्या मार्गातून होय. पर्यावरणाच्या अतिरेकी वापरातून केलेल्या विकास हा मानवाचे जीवन धोक्यात घालणारा विकास ठरू शकतो. यासाठी मानवी जीवन आणि पर्यावरण यांचा मेळ घालून दोघंच्या सर्वांगीण विकासाकरिता शाश्वत विकासाच्या मार्गाने विकास साधने फार महत्त्वाचे बनले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

. www.google .Com
. www.cwejournql.org
. Open.maricopa.ed
. www.sciencedirect.com
. शाश्वत विकास आणि पर्यावरण शिक्षणासाठीचे शिक्षण :
B:Ed. - II PAPER- 204-06) | PRIN.DR. SANDHYA BHANGALE (ATTARDE), PRIN.DR. BHALCHANDRA B. BHAVE.
. पर्यावरण पर्यावरण : विज्ञान के एल तिवारी, एस के जाधव, 0th एडिशन, किंडल संस्करण.
. पर्यावरण संरक्षण : अव्यग्र प्रताप सिंग, विपिन व्ही कांबळे, पोएटिक एसेन्स पब्लिकेशन.

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अमरावती विभागाच्या ग्रामीण विकासातील योगदान

**नितीन मोतीराम ढगे**
संशोधक
जगदंब महाविदयालय अचलपूर, शहर

**प्रा. डॉ. मुकुंद रामदास दातीर**
मार्गदर्शक
जगदंब महाविदयालय अचलपूर, शहर

**गोषवारा-**

अमरावती विभागात MG-NREGA योजनेअंतर्गत अनेक कामे सुरु आहेत. कामाच्या माध्यमातुन अमरावती विभागातील ग्रामीण लोकासाठी शिक्षण, आरोग्य, महिला सबलीकरण, शेतकरी/ शेतमजुरांच्या उत्पन्नात वाढ, विविध प्रशिक्षण या मध्ये प्रगती होत आहे. MG-NREGA योजनेअंतर्गत लोकांसमोर असना-या समस्या दुर करण्यासाठी कोण कोणती कामे हाती घेण्यात येतात.MG-NREGA अंतर्गत कामे करण्याची पध्दत कशी आहे. अमरावती विभागातील या योजनेअंतर्गत जॉबकार्ड मजुराची उत्पन्न क्षमता वाढविण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या जातात. स्थानिक लोकांना रोजगार प्राप्त व्हावा यासाठी कोणते प्रशिक्षण दिले जाते. MG-NREGA योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या कामामुळे अमरावती ग्रामीण भागातील लोकांचे जिवनमान उंचवण्यास कोणता परिणाम झाला आहे. अमरावती ग्रामीण भागाच्या विकासात MG-NREGA चे काय योगदान आहे. लोकांच्या समोर असणा-या समस्या सोडविण्यासाठी MG-NREGA प्रभावी ठरत आहे काय. व त्याचा परिणाम अमरावती ग्रामीण विभागावर काय झाला हया बाबी अभ्यासण्यासाठी अमरावती ग्रामीण भागातील MG-NREGA चे योगदान हा विषय निवडला आहे.

"महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अमरावती विभागाच्या ग्रामीण विकातील योगदान" (२०१० ते २०२०) या शोध प्रबंधात श्री नितीन एम ढगे संशोधक विद्यार्थी जगदंब महाविद्यालय अचलपूर शहर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशमि, यवतमाळ या पाच जिल्हातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे स्वरुप व कार्यपध्दती, जॉब कार्ड धारक मजूर, स्त्री शेतमजुराची आर्थिक स्थिती, रोजगार हमी योजनेत स्त्री श्रमिकांना उपलब्ध रोजगार व सोयी, मनुष्य दिन निर्मीती, प्रस्तुत प्रकरणात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वयय - प्राप्ती म्हणजे अकुशल कुशल खर्च कशा प्रकारे केला जातो शासन सतरावर त्यांची प्रक्रीया कशी पार पाडल्या जाते व त्या माध्यमातून प्राप्ती म्हणजे मत्ता निर्मिती कशी होते यांचा अभ्यास करणार आहोत.

रोजगार हमी योजनेतील निधी खर्च व त्याचे रोजगारावरील परिणाम, स्त्री सबलीकरण व शासन स्तरावरील योजना, या अनेक घटकांचा सखोल अभ्यास केलेला आहे, सदर संशोधन समाजचिंतक, अभ्यासक, धोरणकर्ते यांच्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.

**प्रस्तावना -**

देशाच्या ग्रामीण विकासात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागात अकुशल मजुरांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. तसेच अनेक मत्तांची निर्मिती सुध्दा होत आहे. आज संपूर्ण राज्यात मनरेगाच्या माध्यमातुन ग्रामीण भागातील अकुशल मजूरांना काम मिळत आहे. तसेच अनेक सार्वजनिक आणि वैयक्तिक स्वरुपाच्या कामातून ग्रामीण विकास साधला जात आहे. कुटुंबांना रोजगार उपलब्ध करुन मनुष्यदिन रोजगार निर्मिती होत आहे. त्यामधून ग्रामीण विकासाचीकामे पूर्ण करण्यात येत आहेत मोठया प्रमाणात कामे प्रगतीपथावर आहेत. अशा रितीने आज ही योजना ग्रामीण विकासात महत्वाची भूमिका बजावत आहे.

देशात ग्रामीण मजूरांना अकुशल रोजगाराची हमी 1977 पासून अधिनियमान्वये देणारे महाराष्ट्र एकमेव राज्य आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये गेल्या चार दशकापासून रोजगार हमी योजना राबविण्यात येत आहे. रोजगार हमी योजनेची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे तात्कालीन विधानपरिषद सभापती वि.स. पागे यांनी मांडली; त्यांनी दुष्काळी ग्रामीण भागातील अकुशल मजूरांना रोजगार उपलब्ध करुन देणारी एक योजना सांगली जिल्हयातील विसापूर या गावात सुरु केली; या योजनेचा व्याप दिवसेंदिवस वाढत गेला. पुढे 1977 मध्ये या योजनेचे रुपांतर रोजगार हमी अधिनियमात झाले. महाराष्ट्रातील रोजगार हमी अधिनियम (1977) नुसार (1) ग्रामीण भागातील अकुशल व्यक्तींकरीता रोजगार हमी योजना आणि (2) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम (1977), या दोन योजना सुरू करण्यात आल्या होत्या कलम 12 (इ) नुसार वैयक्तिक लाभाच्या या दोन्ही योजनांना राज्यशासनाच्या निधीमधून अर्थसहाय्य केले जात होते.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये रोजगारनिर्मिती व ग्रामीण विकासाची कामे करण्यासाठी ही योजना फारच यशस्वी ठरली. या योजनेची यशस्विता पाहून केंद्र शासनाने सन 2005 मध्ये संपूर्ण देशात रोजगार हमी अधिनियम' लागू केला. दिनांक 2 फेब्रुवारी 2006 पासून देशाच्या 200 जिल्हयात याची अंमलबजावणी सुरू झाली. त्यामध्ये महाराष्ट्रातील 12 जिल्ह्यांचाही समावेश होता. सध्या हा अधिनियम महात्मा गांधी रोजगार हमी अधिनियम (मनरेगा)' MGNREGA Mahatma Gandhi National Rural Employment Gurantee Act या नावाने ओळखला जातो. मनरेगा अधिनियमातील कलम 28 नुसार ज्या राज्यात पूर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजुर आहे त्यांना त्यांचा अधिनियम राबविण्याची मुभा दिली गेली. त्यानुसार महाराष्ट्र राज्याने पूर्वीचाच अधिनियम सुरु ठेवण्याचा पर्याय स्वीकारला. महाराष्ट्र राज्याने दोन्ही अधिनियमातील चांगल्या आणि आवश्यक बाबी एकत्र करुन महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) 2005' या नावाने एक नवीन योजना सुरू केली. याबाबतची माहिती शासन निर्णय क्रमांक रोहयो-2005/प्र.क्र.104/रोहयो-10, दिनांक 23 डिसेंबर, 2005 मध्ये दिलेली आहे. या योजनेअंतर्गत केंद्रिय योजनेत अनुज्ञेय नसलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनेवरील खर्च राज्य रोजगार हमी योजनेतून करावा लागणार आहे.

महाराष्ट्रात मग्रारोहयो (2005) तीन टप्यात राबविण्यात आली. पहिल्या टप्यात 12 जिल्ह्यांची निवड करण्यात येऊन 2 फेब्रुवारी 2006 रोजी ही योजना सुरु झाली. यामध्ये (1) धुळे, (2) नंदुरबार, (3) अहमदनगर, (4)औरंगाबाद, (5) नांदेड, (6) हिंगोली, (7) अमरावती, (8) यवतमाळ, (9) भंडारा, (10) गोंदिया, (11) चंद्रपुर, (12) गडचिरोली या अकुशल काम मागणी जास्त असलेल्या जिल्ह्यांचा समावेश होता. दुसऱ्या टप्यात 2 एप्रिल 2007 पासून (1) ठाणे, (2) उस्मानाबाद, (3) बुलढाणा, (4) वाशिम, (5) अकोला, (6) वर्धा या सहा जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. उर्वरीत जिल्हे व 'क' वर्ग नगरपरिषदा यांचा समावेश करून ही योजना दिनांक 1 एप्रिल 2008 पासून संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे.

**वैशष्टिये-**

वर्ष 1977 मध्ये महाराष्ट्र सरकार द्वारे अकुशल कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देश्याने रोजगार अधिनियम लागू करण्यात आला.

1. या योजनेच्या माध्यमातून एका वर्षात अकुशल कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला कमीत कमी 100 दिवसांचा रोजगार प्रदान केला जातो.
2. असे सर्व नागरिक जे शारीरिकदृष्ट्या श्रम करण्यास सक्षम आहेत, त्यांना या योजनेचा लाभ दिला जातो.
3. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगार नागरिकांना रोजगार प्रदान केला जातो.
4. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकार द्वारे मंजुरी दर निश्चित करण्यात केला जातो. केंद्र सरकार द्वारे वर्ष 2008 मध्ये ही योजना संपूर्ण देशात लागू करण्यात आली.
5. देशभरात या योजनेला महात्मा गांधी रोजगार गारंटी अधिनियम या नावाने ओळखले जाते.

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमात राज्याच्या रोहयोमध्ये अंतर्भूत नसलेल्या काही नवीन बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. उदा.

1 सर्व इच्छुक कुटुंबांना रोजगार पत्रिका फोटोसहित लॅमिनेटेड (जॉब कार्ड) ओळखपत्रे देणे.
2 कामाची निवड, नियोजन व अंमलबजावणी यामध्ये ग्रामपंचायतीचा संपूर्ण सहभाग असणे.
3 एकुण नियोजनाच्या किमान 50% कामे ग्रामपंचायतीमार्फत राबविणे.
4 संपूर्ण पारदर्शकता.
5 सामाजिक अंकेक्षण करणे.

**मनरेगा योजना म्हणजे काय ?** MGNREGA चे पूर्ण रुप आहे - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा. MGNREGA ही भारत सरकारद्वारे लागू केलेली रोजगार हमी योजना आहे, जी 7 सप्टेंबर 2005 रोजी विधानसभेत मंजूर झाली. त्यानंतर 2 फेब्रुवारी 2006 रोजी 200 जिल्ह्यांमध्ये याची सुरुवात झाली. सुरुवातीला याला राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (NREGA) असे म्हटले जात होते 2 ऑक्टोबर 2009 रोजी महात्मा गांधी यांचे जयंतीचे औचीत्य साधून त्याचे नामकरण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा असे करण्यात आले.

आज आपण पाहिलं तर, ग्रामीण भारतात गरीब लोकांचा हवा तसा आर्थिक विकास झालेला नाही. त्यांच्या हातांना काम नसल्याने परिणामी रोजगाराच्या शोधात त्यांच्या नशिबी कायम भटकंतीच आली आहे. खेडी ओस पडून त्यांचा भार शहरी भागावर पडला. मात्र, शहरातही रोजगारांचा प्रश्न कायमच आहे. ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्याकरीता ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांच्याकडे रोजगार असायला हवा. तरच त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल होऊ शकेल. या दृष्टीकोनातून भारत सरकारने प्रत्येकाच्या हाताला रोजगार देण्यासाठी एक महत्वाकांक्षी निर्णय घेतला. मनरेगा ही जगातील एकमेव योजना आहे जी 100 दिवसांच्या रोजगाराची हमी देते. या योजनेसाठी केंद्र सरकारने 2010-11 या आर्थिक वर्षात 40,100 कोटी रुपयांची तरतूद केली होती. देशातील

गरीब व बेरोजगार कुटुंबे आपल्या उदरनिर्वाहासाठी या योजनेचा लाभ घेत आहेत. अशा कमकुवत उत्पन्न गटातील लोकांना त्यांच्याच ग्रामपंचायतीत रोजगार दिला जातो, त्यामुळे स्थलांतराचा प्रश्नही बऱ्याच अंशी टळला आहे.

ग्रामीण भागातील गरिबांच्या हातात पैसा पोचण्यासाठी आपली मनरेगा - रोजगार हमी योजना अत्यंत उपयुक्त आहे. रोजगार हमी, नरेगाच्या कामावर आपण पाहतो की छोटे, सिमांत शेतकरी ज्यांच्याकडे शेत जमिन कमी आहे आणि ते कारडवाहु शेती करतात हे मजुर म्हणुन काम करायला येतात. या शेतकरी कुटुंबांच्या शेतीला पाण्याची उपलब्धता, शेतीची सुधारणा (सपाटीकरण, बांधबांदिस्ती वगैरे) मनरेगाच्या कामातुन मिळु शकते; फळबाग, जनावरांसाठी गोठा, गांडुळ खत निर्मीती अश्या उपक्रमातुन कमाईची साधने मिळु शकतात. एका बाजुला नरेगाच्या कामातुन मजुरीचे उत्पंन्न आणि त्याबरोबर कोरडवाहु शेतीची सुधारणा होउन उपजिवीकेची संसाधने वाढु शकतात. नरेगाच्या निधीचा विनियोग जास्तीत जास्त नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि कृषी निगडीत कामांमध्ये करून, त्याची गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी करून समृध्दीचा मार्ग पत्करावा जेणेकरुन आपला अमरावती विभाग, महाराष्ट्र आणि पर्यायाने भारत देश श्रीमंत देशांच्या फळीत जाऊन ऊभा राहील.

**संशोधनाकरीता वापरलेली संशोधन पध्दती-**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने दैवनमुना निवड पध्दतीचा उपयोग केला आहे. हे संशोधन प्राथमिक व दुय्यम समंकावर आधारीत आहे. प्राथमिक समंक प्राप्त करण्यासाठी अमरावती विभागातील अकोला अमरावती बुलढाणा वाशिम यवतमाळ या 5 जिल्हामधील प्रति जिल्हा 10 ग्राम पंचायती मधुन लाभार्थी निवड अध्यनासाठी केली आहे. त्याच प्रमाणे व्दितीय समंकासाठी भारत सरकारचे विविध अहवाल, महाराष्ट्रा शासन, जिल्हा अहवाल, संशोधन ग्रंध, वर्तमान पत्रे, मासिके व अप्रकाशीत माहितीचा वापर केला आहे. संग्रहीत सामुग्रीचे सारणीयन व वर्गीकरण केले आहे. सांख्यकीय तंत्राचा वापर करुन निष्कर्ष काढले आहेत. व त्याअनुषंगाने शिफारशी सुचविल्या आहेत.

**उद्दिष्टे -**

1.अमरावती ग्रामीण भागातील विविध समस्यांचे अध्ययन करणे.
2.अमरावती ग्रामीण भागातील MG-NREGA च्या कामाचा आढावा घेणे.
3.अमरावती ग्रामीण भागातील MG-NREGA सुरु कामाचे अध्यायन करणे.
4.अमरावती ग्रामीण भागातील MG-NREGA च्या आर्थिक व सामाजिक कार्याचे अध्ययन करणे.
5.MG-NREGA च्या कार्यामुळे अमरावती ग्रामीण विभागातील जॉबकार्ड धारक मजुर, शेतमजुर विविध योजनेचे लाभार्थि यांच्या जीवनमानात व राहणीमानात घडुन आलेल्याय बदलांचा अभ्यास करणे.
6. सरकारी योजनेची माहिती व फायदे ग्रामीण जनतेपर्यत पोहचविण्यांत MG-NREGA किती प्रमाणात यशस्वी झाली आहे हे अभ्यासणे.

**गृहिते-**

1. अमरावती ग्रामीण भागांमध्ये MG-NREGA च्या कामाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे.
2. अमरावती ग्रामीण भागांमध्ये MG-NREGA च्या कामामुळे आर्थिक व सामाजिक विकासामध्ये भर पडत आहे
3. MG-NREGA च्या कामांना अमरावती ग्रामीण विभागातील जॉबकार्ड धारक मजुर, शेतमजुर विविध योजनेचे लाभार्थी सकारात्मक प्रतिसाद देत आहेत.
4. जॉबकार्ड धारक मजुर, शेतमजुराच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी MG-NREGA विविध उपक्रम राबवित आहे.
5. MG-NREGA अंतर्गत ग्रामीण भागातील लोकांच्या विकासासाठी आखण्यात येणा-या योजनामध्ये आर्थिक बाबीची कमतरता आहे.

**व्यापती -** अमरावती विभाग अमरावती अकोला बुलढाणा वाशिम आणि यवतमाळ

**मर्यादा/ कालखंड -**2010-2011 ते 2019-2020 ची आकडेवारी

अमरावती विभाग म्हणजे अमरावती अकोला बुलढाणा वाशिम आणि यवतमाळ या पाच जिल्हयांनी मिळून तयार झालेला विभाग आहे. ज्याला व-हाड किंवा पश्चिम विदर्भ असे सुध्दा म्हटले जाते प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी अध्ययनक्षेत्र म्हणून निवडलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अमरावती विभागाच्या ग्रामीण विकासातील योगदानाचे अध्ययन केले आहे

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अमरावती ग्रामीण विभागात सुरु व सुरु होऊन पूर्ण झालेल्या कामाचे व्यय - प्राप्ती विश्लेषण**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अकुशल काम करण्यास इच्छूक असणा-या प्रत्येक कुटूंबातील पौढ व्यक्तीला योजनेंतर्गत 100 दिवस प्रति कुटूंब रोजगाराची हमी देण्यात आली असून, त्या माध्यमातून स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे हे या योजनेचे मूळ उद्दीष्ट आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी /

शेतमजुरांना या योजनेच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे, तसेच पंचायत राज संस्थाचे बळकटीकरण करण्यावर भर देण्यात आलेला आहे.

शासन या योजनेच्या माध्यमातून जो खर्च / व्यय करतो तो ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर योजनेचे लाभार्थी व पर्यायाने संपूर्ण गांव ग्राम पंचायतीच्या विकासाकरीता करीत असतो. हा झालेला खर्चाच्या माध्यतातून ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर योजनेचे लाभार्थी व पर्यायाने संपूर्ण गांव ग्राम पंचायतीच्या उत्पनात /प्राप्तीत वाढ होते त्यामुळे गांवाचा विकासाला चालना मिळते प्रस्तुत प्रकरणात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत व्यय - प्राप्ती म्हणजे अकुशल कुशल खर्च कशा प्रकारे केला जातो शासन स्तरावर त्यांची प्रक्रीया कशी पार पाडल्या जाते व त्या माध्यमातून प्राप्ती म्हणजे मत्ता निर्मिती कशी होते यांचा अभ्यास करणार आहोत.

**आलेख क्रमांक 6.11**

**अमरावती विभागातील पूर्ण कामाची संख्या**

**(2010-2011 ते 2019-2020)**

सारणी व आलेख क्रमांक 6.11 मध्ये अमरावती विभागात पूर्ण झालेल्या कामाची आकडेवारी दिलेली आहे. त्या मध्ये 2010-2011 ते 2019-2020 या वर्षामधील आकडेवारी नमुद केलेली आहे. या कालावधीत अमरावती विभागात एकूण 413453 कामे सुरु होऊन पूर्ण झाली आहेत. त्यापैकी अमरावती विभागातील अकोला 53995, (13.06%), अमरावती 140613 (34.01%), बुलढाणा 57649 (13.94%) वाशिम 34554 (8.36%), यवतमाळ 126642 (30.63%) या पाच जिल्हात कामे सुरु होऊन पूर्ण झाली आहेत. अमरावती विभागातील अमरावती जिल्हात सर्वात जास्त कामे सुरु होऊन पूर्ण झाली आहेत याचाच अर्थ अमरावती विभागातील अमरावती जिल्हात सर्वा जास्त कामे सरु करुन पूर्ण करण्यात आली व त्यावर खर्च /व्यय करुन मत्ता निर्मिती /प्राप्ती झाली आहे. तर सर्वात कमी कामे वाशिम जिल्हात झाली आहेत 2010-2011 ते 2019-2020 या कालखंडामध्ये टक्केवारीचे प्रमाण कमी जास्त असले तरी दरवर्षी पूर्ण करण्यात आलेल्या कामाच्या संख्येमध्ये वाढ होतांना दिसून येते.

**आलेख क्रमांक 6.12.**

**अमरावती विभागातील अपूर्ण / सुरु कामाची संख्या**

**(2010-2011 ते 2019-2020)**

सारणी व आलेख क्रमांक 6.12 मध्ये अमरावती विभागात अपूर्ण / सुरु असलेल्या कामाची आकडेवारी दिलेली आहे. त्या मध्ये 2010-2011 ते 2019-2020 या वर्षामधील आकडेवारी नमुद केलेली आहे. या कालावधीत अमरावती विभागात एकूण 4124 कामे अदयापही अपूर्ण / सुरु आहेत. त्यापैकी अमरावती विभागातील अकोला 2166, (52.52%), अमरावती 945 (22.91%), बुलढाणा 234 (5.67%) वाशिम 407 (9.87%), यवतमाळ 372 (9.02%) या पाच जिल्हात कामे अदयापही अपूर्ण / सुरु आहेत. अमरावती विभागातील अकोला जिल्हात सर्वात जास्त कामे अपूर्ण / सुरु आहे आहेत याचाच अर्थ अमरावती विभागातील पाच जिल्हाचे तुलनात्मक अध्ययन केले असता अकोला जिल्हात कामे सरु करुन त्या प्रमाणात पूर्ण करण्यात आली नाहीत व त्यावर खर्च /व्यय करुन मत्ता निर्मिती /प्राप्ती झाली नाही. तर सर्वात कमी अपूर्ण / सुरु कामे कामे बुलढाणा जिल्हात आहेत याचाच अर्थ अमरावती विभागातील बुलढाणा जिल्हात ज्या प्रमाणात कामे सुरु करण्यात आली त्या प्रमाणात पूर्ण झाली आहेत. व त्यावर खर्च /व्यय करुन मत्ता निर्मिती /प्राप्ती झाली आहे. 2010-2011 ते 2019-2020 या कालखंडामध्ये टक्केवारीचे प्रमाण कमी जास्त असले तरी दरवर्षी अपूर्ण / सरु कामाच्या संख्येमध्ये वाढ होतांना दिसून येते. परंतु ज्या प्रमाणात कामे सुरु झाली आहेत त्या प्रमाणात अपूर्ण / सुरु कामे पूर्ण होतांना दिसुन येतात.

**आलेख क्रमांक 6.13**

**अमरावती विभागातील पूर्ण झालेल्या कामावरील खर्च**

**(2010-2011 ते 2019-2020)**

**(आकडे लक्ष रुपयात)**

सारणी व आलेख क्रमांक 6.13 मध्ये अमरावती विभागात सुरु होऊन पूर्ण झालेल्या कामावरील खर्चाची आकडेवारी दिलेली आहे. सर्व (आकडे लक्ष रुपयात) आहेत. त्या मध्ये 2010-2011 ते 2019-2020 या वर्षामधील आकडेवारी नमुद केलेली आहे. या कालावधीत अमरावती विभागात सर्व प्रकारच्या पूर्ण कामावर एकूण खर्च 331867.81 झाला आहे. त्यापैकी अमरावती विभागातील अकोला 31850, (9.60%),अमरावती 136461 (41.12%), बुलढाणा 35141.07 (10.59%) वाशिम 39334.44 (11.85%), यवतमाळ 89081.29 (26.84%) या पाच जिल्हात सर्व प्रकारच्या कामावर खर्च झाला आहे. अमरावती विभागातील अमरावती जिल्हात सुरु होऊन पूर्ण झालेल्या कामावर सर्वात जास्त खर्च झाला आहे.आहेत याचाच अर्थ अमरावती विभागातील अमरावती जिल्हात खर्च /व्यय करुन मत्ता

निर्मिती /प्राप्ती झाली आहे. तर सर्वात कमी खर्च अकोला जिल्हात झाला आहे. 2010-2011 ते 2019-2020 या कालखंडामध्ये टक्केवारीचे प्रमाण कमी जास्त असले तरी दरवर्षी पूर्ण कामावरील खर्चामध्ये वाढ होतांना दिसून येते.

**आलेख क्रमांक 6.14.1**

**अमरावती विभागातील अपूर्ण / सुरु कामावरील खर्च**

**(2010-2011 ते 2019-2020)**

**(आकडे लक्ष रुपयात)**

सारणी व आलेख क्रमांक 6.14 मध्ये अमरावती विभागात सुरु होऊन अपूर्ण असलेल्या कामावरील खर्चाची आकडेवारी दिलेली आहे. सर्व (आकडे लक्ष रुपयात) आहेत. त्या मध्ये 2010-2011 ते 2019-2020 या वर्षामधील आकडेवारी नमुद केलेली आहे. या कालावधीत अमरावती विभागात सर्व प्रकारच्या अपूर्ण /सुरु कामावर एकूण खर्च 3950.86 झाला आहे. त्यापैकी अमरावती विभागातील अकोला 437.98, (11.09%), अमरावती 1746.76 (44.21%), बुलढाणा 301.77 (7.64%) वाशिम 628.98 (15.92%), यवतमाळ 835.37 (21.14%) या पाच जिल्हात सर्व प्रकारच्या अपूर्ण कामावर खर्च झाला आहे. परंतु अदयापही कामे अपूर्ण असल्याची दिसुन येत आहेत 2010-2011 ते 2019-2020 या कालखंडामध्ये टक्केवारीचे प्रमाण कमी जास्त असले तरी दरवर्षी पूर्ण कामावरील खर्चामध्ये वाढ होतांना दिसून येते.

**निष्कर्ष-**

1. अमरावती ग्रामीण विभागात सन 2010-2011 ते 2019-2020 या कालावधीत मोठया प्रमाणात कामे हाती घेऊन खर्च करण्यात आला आहे व त्यामाध्यमातुन अमरावती ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, योजनेचे लाभार्थी यांच्या उत्पन्नात वाढ होऊन मत्ता निर्मीती झाली आहे. 6.11 ते 6.14 सारणी व आलेखाव्दारे प्राप्त आकडेवारीवरुन निष्कर्ष निघतो

2. अमरावती ग्रामीण विभागात सन 2010-2011 ते 2019-2020 या कालावधीत मोठया प्रमाणात जॉबकार्ड वाटप करण्यात येऊन राजगार निर्मीती होऊन मणुष्य दिन निर्मीती झाली आहे त्याच बरोबर महिलाना मिळालेल्या रोजगारात व 100 दिवस मिळालेल्या रोजगारात वाढ झाली आहे प्राप्त आकडेवारीवरुन निष्कर्ष निघतो

**शिफारशी-**

1. अमरावती ग्रामीण विभागात सन 2010-2011 ते 2019-2020 या कालावधीत मोठया प्रमाणात कामे हाती घेऊन खर्च करण्यात आला आहे व त्यामाध्यमातुन अमरावती ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, योजनेचे लाभार्थी यांच्या उत्पन्नात वाढ होऊन मत्ता निर्मीती झाली आहे. परंतु त्या त्या आर्थिक वर्षात अपूर्ण कामे पूर्ण न होणे ही मत्ता निर्मीतीमधील व विकासातील सर्वात मोठी अडसर आहे याकरीता शासन स्तरावर कार्यपध्दती निश्चीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

2. अमरावती ग्रामीण विभागात सन 2010-2011 ते 2019-2020 या कालावधीत मोठया प्रमाणात जॉबकार्ड वाटप करण्यात आले परंतु सदर जॉबकार्डचे व्हेरीफीकेशन करण्यात न आल्यामुळे सक्रिय जॉबकार्ड मजुराची संख्या कमी असल्याचे दिसुन येते या करिता पंचायत समिती व तहसिल सतरावर योजनेच्या प्रभावी अंमलबजावनी करीता नियुक्त कर्मचारी यांचे संख्येमध्ये वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

3. एमजीनरेगा अंतर्गत सहाय्यक कार्यक्रम अधिकारी समन्वयक APO, तांत्रिक सहाय्यक TA, क्लर्क कम डाटा एनट्री ऑपरेटर CDEO आणि ग्राम रोजगार सेवक यांची निवड ही स्थायी स्वरूपाची नसते परंतु योजनेची सर्वात जासत कामे त्याना अल्प मानधनावर करावे लागतात. त्यामुळे योजनेची प्रभावी अंमलबजावनी होत नाही. त्याकरीता त्यांची जबाबदारी निश्चीत करुन त्यांची नियुक्ती ही स्थायी स्वरूपाची असावी आणि त्याचा पगार हा किमान वेतन कायदयानूसार असावा जेणेकरून ते पूर्ण कार्यक्षमतेने काम करतील अशी शिफारस करण्यात येत आहे.

4. प्रस्तूत संशोधनावरून असे दिसून येते की, अमरावती विभागातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना प्रभावीपणे कार्य करत आहे. परंतु ही योजना अधिक परिणामकारक होण्यासाठी प्रशासकीय स्तरावर अधिक प्रयत्न करण्यात यावे यामधे लाभार्थ्यांची निवड, मजूरी दरामध्ये महागाई दरानूसार वाढ तसेच लाभार्थ्यांपर्यंत विविध योजनांची माहीती पुरविणे इत्यादी उपाय करण्यात यावेत.

**संदर्भ ग्रंथ-**

1.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना कायदा 2005, वार्षिक मुख्य परीपत्रक 2020-2021, ग्रामिण विकास मंत्रालय भारत सरकार,

2.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना अधिनियम 2005 ॲन्युअल मास्टर सर्कुलर 2019-2020, ग्रामिण विकास मंत्रालय भारत सरकार,

3.रोजगार हमी प्रगतीची हमी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
4.सांसद आदर्श ग्राम योजना (एसएजीवाय) दिशा निर्देश, ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार कृषी भवन न्यू-दिल्ली-110001
5.2010-2011 ते 2019-2020 दरम्यानचे जिल्हा वार्षिकि अहवाल व ऑनलाईन रिपोर्ट
6. सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, भगवाघर कॉम्पलेक्स, धरमपेठ नागपुर (जानेवारी 2003) डॉ बोधनकर सुधीर, प्रा.अलोनी विवेक, ॲड कुलकर्णी मृणाल

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# रोजगाराभिमुख उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासामध्ये भरडधान्याचे(मिलेट्स) महत्त्व

कु. शिल्पा रमेशराव तिखिले
एम. ए. गृह-अर्थशास्त्र पी.एच.डी संशोधक विद्यार्थिनी रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर
मो. 9922943819 ,kurhekarshilpa@gamil.com

**सारांश (Abstract)**

भारतामध्ये उच्च शिक्षण घेतलेल्या युवकांची संख्या सातत्याने वाढत असली तरी रोजगाराच्या संधी त्या प्रमाणात निर्माण होत नाहीत, ही एक गंभीर सामाजिक-आर्थिक समस्या आहे. पारंपरिक पदवी अभ्यासक्रम ज्ञानकेंद्रित असले तरी ते उद्योगाभिमुख कौशल्यांशी थेट जोडलेले नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य अंतर (Skill Gap) निर्माण होते. या पार्श्वभूमीवर रोजगाराभिमुख उच्च शिक्षण आणि कौशल्य विकास ही संकल्पना महत्त्वाची ठरते.

भारत कृषिप्रधान देश असून कृषी व अन्नप्रक्रिया क्षेत्रात प्रचंड रोजगार क्षमता आहे. विशेषतः मिलेट्स (भरडधान्ये) — जसे की ज्वारी, बाजरी, नाचणी, कोदो, कुटकी इत्यादी — ही पिके पोषणमूल्यांनी समृद्ध, हवामान बदलास अनुकूल आणि शाश्वत शेतीस पूरक आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरही मिलेट्सचे महत्त्व अधोरेखित झाले असून United Nations आणि Food and Agriculture Organization यांनी 2023 हे आंतरराष्ट्रीय मिलेट्स वर्ष म्हणून घोषित केले होते. यामुळे जागतिक बाजारपेठेत मिलेट्स आधारित उत्पादनांची मागणी वाढली आहे.

या संशोधनात रोजगाराभिमुख उच्च शिक्षणात मिलेट्स आधारित कौशल्य विकासाचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमता (Employability), स्वयंरोजगार प्रवृत्ती आणि उद्योजकता विकास कसा वाढू शकतो याचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासामध्ये शासकीय धोरणे, कौशल्य विकास योजना, उद्योग संधी, मूल्यसाखळी व्यवस्थापन, महिला सबलीकरण आणि ग्रामीण विकास या घटकांचा विचार करण्यात आला आहे.

संशोधन निष्कर्षांनुसार, मिलेट्स प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकेजिंग, ब्रँडिंग, गुणवत्ता नियंत्रण, डिजिटल विपणन आणि निर्यात व्यवस्थापन यांसारख्या कौशल्यांचा उच्च शिक्षण अभ्यासक्रमात समावेश केल्यास रोजगार निर्मितीची प्रक्रिया गतीमान होऊ शकते. यामुळे ग्रामीण भागातील युवकांना स्थानिक स्तरावर उद्योग उभारण्याची संधी उपलब्ध होते, स्थलांतर कमी होते आणि स्थानिक अर्थव्यवस्था बळकट होते.एकूणच, रोजगाराभिमुख उच्च शिक्षण आणि कौशल्य विकास यामध्ये मिलेट्स उद्योगाचा समावेश हा केवळ आर्थिक विकासासाठीच नव्हे तर पोषणसुरक्षा, महिला सबलीकरण आणि शाश्वत विकासासाठीही अत्यंत महत्त्वाचा ठरतो, असा या संशोधनाचा निष्कर्ष आहे.

(कीवर्ड :- मिलेट्स, रोजगार, पोषण, कौशल्यविकास, उद्योग,)

**प्रस्तावना (Introduction)**

भारतीय शिक्षण व्यवस्थेने मागील काही दशकांत मोठी प्रगती केली असली तरी शिक्षण आणि रोजगार यामधील दरी अद्याप मोठी आहे. उच्च शिक्षण घेतलेले अनेक युवक नोकरीच्या शोधात असतात, परंतु उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेली कौशल्ये त्यांच्या जवळ नसतात. परिणामी बेरोजगारी व अपुरे रोजगार (Underemployment) वाढताना दिसतात. या समस्येवर उपाय म्हणून रोजगाराभिमुख, कौशल्याधारित आणि उद्योगसापेक्ष शिक्षण प्रणालीची आवश्यकता अधोरेखित होते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये बहुविध शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम, इंटर्नशिप, उद्योग-संस्था सहकार्य आणि स्थानिक गरजांवर आधारित अभ्यासक्रम रचना यांवर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच प्रधानमंत्री कौशल विकास योजना अंतर्गत युवकांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. या धोरणात्मक बदलांच्या पार्श्वभूमीवर कृषी व अन्नप्रक्रिया क्षेत्रामध्ये कौशल्य विकासाची मोठी संधी उपलब्ध आहे.भारतामध्ये पारंपरिकरित्या ज्वारी, बाजरी, नाचणी यांसारखी मिलेट्स पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. परंतु हरितक्रांतीनंतर गहू-तांदूळ पिकांना अधिक प्राधान्य मिळाल्याने मिलेट्सचे उत्पादन कमी झाले. अलीकडील काळात पोषणसुरक्षा, जीवनशैलीजन्य आजार (Lifestyle Diseases), हवामान बदल आणि शाश्वत शेती या मुद्द्यांमुळे मिलेट्सचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. मिलेट्समध्ये प्रथिने, तंतुमय पदार्थ (Fiber), लोह, कॅल्शियम आणि सूक्ष्मपोषक घटक मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे पोषणदृष्ट्या ते अत्यंत उपयुक्त आहेत.

मिलेट्स उद्योग हा केवळ शेतीपुरता मर्यादित नसून त्यामध्ये संपूर्ण मूल्यसाखळी (Value Chain) समाविष्ट असते — उत्पादन, साठवण, प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकेजिंग, ब्रँडिंग, विपणन आणि निर्यात. कृषी व प्रक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (APEDA) मार्फत मिलेट्स निर्यात प्रोत्साहनासाठी विविध उपक्रम राबविले जातात. तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी राज्यस्तरावर अन्नप्रक्रिया व कृषी-आधारित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित

करते.उच्च शिक्षण संस्थांनी जर मिलेट्स आधारित अभ्यासक्रम, प्रमाणपत्र कोर्स, पदविका व स्टार्टअप इनक्युबेशन सुविधा उपलब्ध करून दिल्या तर विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे संधी उपलब्ध होऊ शकतात:

1)मिलेट्स प्रक्रिया तंत्रज्ञान तज्ञ2)गुणवत्ता नियंत्रण अधिकारी
3)पोषण सल्लागार4)फूड स्टार्टअप उद्योजक
5)डिजिटल मार्केटिंग व्यवस्थापक6)निर्यात समन्वयक

याशिवाय महिला स्वयं-साहाय्य गट (Self Help Groups) आणि ग्रामीण युवकांसाठी मिलेट्स उद्योग अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. कमी भांडवलात लघुउद्योग सुरू करण्याची क्षमता, स्थानिक कच्चा माल उपलब्धता आणि वाढती बाजारपेठ यामुळे हा क्षेत्र रोजगारनिर्मितीचा प्रभावी पर्याय ठरतो.

म्हणूनच रोजगाराभिमुख उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या चौकटीत मिलेट्स उद्योगाचा समावेश करणे ही काळाची गरज आहे. शिक्षण, उद्योग आणि शासन यांच्यातील समन्वयातून एक शाश्वत, पोषणसमृद्ध आणि रोजगारनिर्मितीक्षम अर्थव्यवस्था उभी राहू शकते. प्रस्तुत संशोधनात या सर्व घटकांचा सखोल अभ्यास करून रोजगाराभिमुख शिक्षणात मिलेट्सचे स्थान स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे उच्च शिक्षण व्यवस्थेत मिलेट्स (भरडधान्य) आधारित कौशल्य विकासाचा समावेश केल्यास रोजगारनिर्मिती, स्वयंरोजगार आणि उद्योजकता विकास कसा साध्य होऊ शकतो याचा सखोल अभ्यास करणे. खालील उद्दिष्टे या संशोधनाला दिशा देतात:

१. रोजगाराभिमुख उच्च शिक्षणाच्या संकल्पनेचे विश्लेषण करणे

उच्च शिक्षण केवळ पदवीप्राप्तीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगाभिमुख कौशल्ये प्रदान करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये बहुविध, कौशल्याधारित आणि उद्योगसहकार्यावर आधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर रोजगाराभिमुख शिक्षणाची तत्त्वे, रचना आणि व्यवहार्यता यांचा अभ्यास करणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

२. मिलेट्स उद्योगातील रोजगार संधींचा अभ्यास करणे

मिलेट्स उत्पादन, प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकेजिंग, विपणन आणि निर्यात या संपूर्ण मूल्यसाखळीमध्ये विविध प्रकारच्या रोजगार संधी उपलब्ध आहेत. Food and Agriculture Organization आणि United Nations यांनी मिलेट्सचे जागतिक महत्त्व अधोरेखित केल्यामुळे या क्षेत्रात बाजारपेठेचा विस्तार झाला आहे. या संधींचे स्वरूप, प्रमाण आणि भविष्यकालीन क्षमता तपासणे हे संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

३. उच्च शिक्षण संस्थांमध्ये मिलेट्स आधारित अभ्यासक्रमांची आवश्यकता निश्चित करणे

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये मिलेट्स प्रक्रिया तंत्रज्ञान, अन्नसुरक्षा, गुणवत्ता नियंत्रण, कृषी उद्योजकता, डिजिटल मार्केटिंग इत्यादी विषयांचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता कशी वाढू शकते याचा अभ्यास करणे.

४. शासकीय कौशल्य विकास योजनांचा परिणाम तपासणे

प्रधानमंत्री कौशल विकास योजना, तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा मिलेट्स उद्योगाशी असलेला संबंध आणि त्याचा युवकांच्या रोजगारावर होणारा प्रभाव तपासणे.

५. ग्रामीण व महिला उद्योजकतेतील संधींचे विश्लेषण

मिलेट्स उद्योग ग्रामीण अर्थव्यवस्थेस पूरक ठरतो. महिला स्वयं-साहाय्य गट, लघुउद्योग आणि स्टार्टअप्सच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती कशी होऊ शकते याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके**

संशोधन गृहीतके ही संशोधनाला दिशा देणारी तात्पुरती विधाने असतात.

१) मिलेट्स आधारित कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता इतर विद्यार्थ्यांपेक्षा जास्त असते.हे गृहीतक असे सूचित करते की उद्योगाभिमुख प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामकाजाचे ज्ञान व कौशल्ये प्राप्त होतात, ज्यामुळे त्यांना रोजगार मिळण्याची शक्यता वाढते.

२) उच्च शिक्षणामध्ये मिलेट्स मूल्यसाखळी व्यवस्थापनाचा समावेश केल्यास स्वयंरोजगाराची प्रवृत्ती वाढते.
मिलेट्स उत्पादनापासून ते विपणनापर्यंत संपूर्ण साखळीचे ज्ञान मिळाल्यास विद्यार्थी स्वतःचा उद्योग सुरू करण्यास सक्षम होतात.

३) शासकीय कौशल्य विकास योजना मिलेट्स उद्योगातील रोजगारनिर्मितीस सकारात्मक चालना देतात.
शासनाच्या प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे युवकांना तांत्रिक व व्यवस्थापन कौशल्ये प्राप्त होतात, ज्यामुळे रोजगार व उद्योजकतेत वाढ होते.

४) मिलेट्स आधारित अभ्यासक्रम ग्रामीण युवकांसाठी अधिक उपयुक्त ठरतात.
ग्रामीण भागात कच्चा माल सहज उपलब्ध असल्याने स्थानिक स्तरावर उद्योग उभारणी सुलभ होते.
५) मिलेट्स उद्योगाशी संबंधित डिजिटल मार्केटिंग व ब्रँडिंग कौशल्ये विद्यार्थ्यांच्या उत्पन्नवाढीस सहाय्यक ठरतात.ई-कॉमर्स आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे मिलेट्स उत्पादनांची विक्री वाढविणे शक्य होते.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

या संशोधनामध्ये वर्णनात्मक (Descriptive) आणि विश्लेषणात्मक (Analytical) संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. रोजगाराभिमुख शिक्षण आणि मिलेट्स उद्योग यांच्यातील संबंध समजून घेण्यासाठी गुणात्मक (Qualitative) आणि दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

१. संशोधन प्रकार (Type of Research)

हे संशोधन प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन (Descriptive Research) प्रकारात मोडते. या पद्धतीत एखाद्या घटनेचे, प्रक्रियेचे किंवा संकल्पनेचे सविस्तर वर्णन केले जाते. रोजगाराभिमुख उच्च शिक्षण आणि मिलेट्स उद्योग यांचा परस्परसंबंध स्पष्ट करण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरते.तसेच काही प्रमाणात विश्लेषणात्मक संशोधन (Analytical Research) देखील वापरण्यात आले आहे. यामध्ये उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून त्यातून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला जातो.

**निष्कर्ष (Conclusion)**

मिलेट्स हे केवळ पोषणदृष्ट्या समृद्ध धान्य नसून रोजगारनिर्मितीचे प्रभावी साधन आहे. रोजगाराभिमुख उच्च शिक्षणात मिलेट्स आधारित कौशल्य विकासाचा समावेश केल्यास युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम होईल आणि शाश्वत विकास साध्य होईल. त्यामुळे शिक्षण संस्था, शासन व उद्योग यांच्यात समन्वय आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची (References)**

1) राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, भारत सरकार.
2) प्रधानमंत्री कौशल विकास योजना मार्गदर्शक पुस्तिका.
3) APEDA वार्षिक अहवाल.
4) FAO (2023). Millets and Sustainable Agriculture Report.
5) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अहवाल.
6) विविध संशोधन लेख व जर्नल्स – अन्नप्रक्रिया व कौशल्य विकास विषयक.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# आधुनिक तंत्रज्ञान आणि बोली भाषेचे संवर्धन

कु.शुभांगिनी सा. होले. (शुभांगी संदीप देवघरे)
एम ए (मराठी इति )एम . फिल,नेट, बी.एड. पीएचडी अभ्यासक.
मो.9373034181 ,Email ID-shubha. deoghare@gmail.com

**प्रस्तावना :** भारत हा विविधतेने नटलेला देश असून, महाराष्ट्रात तर 'कोसा कोसावरभाषा बदलते" असे म्हटले जाते. मराठी भाषेची मूळ श्रीमंती ही तिच्या विविध बोलीभाषांमध्ये (उदा . वऱ्हाडी, अहिराणी ,मालवणी ,कोकणी, झाडी बोली) दडलेली आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृती ,इतिहास आणि स्थानिक ज्ञानाचे संचित असते. परंतु जागतिकीकरण , आणि शहरीकरणाच्या युगात, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना या बोलीभाषा अस्तित्वाच्या संघर्षाला सामोरे जात आहे. अशा वेळी आधुनिक तंत्रज्ञानाचा (इंटरनेट ,सोशल मीडिया, AI) वापर करून या बोलीभाषांचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे.

21व्या शतकात आपण तंत्रज्ञानाच्या युगात जगत आहोत. मानवी भाषा आणि तंत्रज्ञान यांचा अतूट संबंध आपल्याला या शतकात पाहायला मिळतो. संगणक, इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता( AI) आणि स्मार्टफोन यांनी मानवी जीवन पूर्णपणे बदलून टाकले आहे. या तांत्रिक प्रगतीचा जसा मानवी जीवनशैलीवर परिणाम झाला आहे, तसाच तो भाषा आणि संवादावरही झाला आहे. बोलीभाषा या संस्कृतीचा आत्मा असतात, आधुनिक तंत्रज्ञानामुळे बोलीभाषा नामशेष होण्याचा धोका निर्माण झाला, तरी योग्य वापर केल्यास आधुनिक तंत्रज्ञानच या बोलीभाषेच्या संवर्धनाचे आणि प्रसाराचे सर्वात मोठे साधन बनू शकते.

**विषय विवेचन :** बोलीभाषा एखाद्या प्रदेशाची सांस्कृतिक ओळख, सामाजिक संवाद आणि भावनिक जवळीक टिकवून ठेवण्याचे सर्वात सशक्त माध्यम आहे. ती मूळ भाषेला समृद्ध करते, लोकसंस्कृती, परंपरा आणि स्थानिक ज्ञान पिढ्यानपिढ्या पुढे नेते. बोली मुळे लोकांमध्ये आत्मीयता वाढते आणि भाषिक विविधता जपली जाते. बोलण्यामध्ये जास्तीत जास्त साम्य आढळणाऱ्या व्यक्तीचा एखादा गट विशिष्ट नामाभीधानाने ओळखता येणे एवढा जाणवू लागल्यास त्या गटाच्या स्वाभाविक बोलण्याच्या गोळा बेरजेस 'बोली' अशी संज्ञा लावता येईल. यासंदर्भात डॉ. ना.गो. कालेलकर म्हणतात,"बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुख परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य."

**बोलीच्या निर्मितीची कारणे :** बोली भाषेच्या निर्मितीची अनेक कारणे आहेत. जी भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांशी संबंधित आहेत. मराठी भाषेत वऱ्हाडी, अहिराणी, मालवणी, मराठवाडी, नागपुरी, कोकणी, कोल्हापुरी इत्यादी अनेक बोलीभाषा आहेत या बोलीभाषांच्या निर्मितीची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

**अ. भौगोलिक अंतर आणि वेगळेपण :**

१. **अंतर :** दोन ठिकाणांमधील भौगोलिक अंतर जसे वाढते तशी भाषेच्या वापरात भिन्नता येते.

२. **नैसर्गिक अडथळे :** नद्या, डोंगर, पर्वत किंवा जंगलांमुळे लोकांचा एकमेकांशी असलेला संपर्क तुटतो किंवा कमी होतो. ज्यामुळे त्या विशिष्ट भागातील भाषेचे रूप बदलते.

**ब. सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव:**

१. **जाती समूह :** वेगवेगळ्या सामाजिक गटांतर्गत भाषेची वैशिष्ट्ये वेगळी असू शकतात.

२. **परकीय आक्रमण /संमिश्र संस्कृती :** ज्या भागात परकीय किंवा इतर भाषिक लोकांचा प्रभाव जास्त असतो, तिचे मूळ भाषेत नवीन शब्द येतात.

**क. दैनंदिन वापर आणि सहजता:**

१. **संवादाचे माध्यम :** बोलीभाषा ही मुख्यत्वे तोंडी असते आणि ती दैनंदिन संवादातून विकसित होते.

२. **सहज संवाद :** लोक सहजतेने एकमेकांशी संवाद साधण्यासाठी भाषेमध्ये बदल करतात. किंवा शब्द वापरतात, ज्यामुळे बोली तयार होते.

**ड. प्रमाणभाषेपासून दूर जाणे :**

१. **अपरिचितता :** एखादा प्रदेश प्रमाणभाषेपासून जितका दूर, तितकी त्याची बोली प्रमाणभाषेपासून वेगळी असते.

२. **अपभ्रष्ट :** अनेकदा प्रमाण भाषेचे स्थानीय उच्चारानुसार किंवा व्याकरणाच्या नियमांत बदल होऊन अपभ्रष्ट रूप म्हणजे बोलीभाषा निर्माण होते.

**इ. व्यवसाय आणि उद्योग:**

**१. व्यावसायिक भिन्नता :** वेगवेगळे व्यवसाय करणारे गट (उदा. कोळी, शेतकरी, आदिवासी) आपापल्या कामाच्या संदर्भातील शब्द वापरतात ज्यामुळे विशिष्ट बोली तयार होते. थोडक्यात सांगायचे तर "स्थळ, काळ आणि व्यक्ती" यानुसार भाषेमध्ये जो बदल होतो, त्यातूनच बोलीभाषांची निर्मिती होते. या बोलीभाषांमुळेच मराठी भाषा समृद्ध झाली आहे.

बोली म्हणजे जनसामान्यांच्या हृदयातून उमटणारी सहज, सोपी आणि भावनाप्रधान भाषा. प्रमाणभाषेच्या पलीकडे जाऊन विशिष्ट प्रदेशात, संस्कृतीत आणि समाजात बोलली जाणारी भाषा म्हणजे बोलीभाषा होय. महाराष्ट्रात मराठीची 'अहिराणी', 'वऱ्हाडी', 'मालवणी', 'कोकणी ','कोल्हापुरी' आगरी अशा अनेक समृद्ध बोली आहेत. परंतु आधुनिकता, जागतिकीकरण आणि शहरीकरणाच्या प्रवाहांमध्ये या बोलीभाषांकडे दुर्लक्ष होत आहे. अशा परिस्थितीत बोलीभाषेचे संवर्धन करणे काळाची मोठी गरज बनली आहे.

अशा या बोलीचे महत्व आपण तिच्या वैशिष्ट्यांद्वारे समजून घेऊ.

**१. संस्कृतीचे वाहक :** बोलीभाषा ही केवळ संवादाचे साधन नसते तर ती त्या भागाच्या लोकसंस्कृतीची ओळख करून देते. त्या प्रदेशातील लोकगीते, म्हणी, वाकप्रचार, लोककला आणि संस्कृतीचा आरसा असतो.

**२. मानवी भावनांची अभिव्यक्ती:** बोली भाषेत जेवढे सहजतेने आणि जिव्हाळयांनी भाव व्यक्त करता येतात ते प्रमाण भाषेत कठीण असते. स्थानिक बोलीत बोलल्याने लोकांमध्ये आत्मीयता वाढते.

**३. ओळख :** बोलीभाषा ही समूहाची किंवा प्रदेशाची ओळख असते.

**४. भाषेचा विकास :** बोलीभाषेमुळे मराठी भाषेचा विकास होतो. वेगवेगळया बोलींमुळे भाषेतील शब्दसंपदा आणि अभिव्यक्ती शैली समृद्ध होते.

**५. साहित्य आणि कला :** बोली भाषेचा वापर लोकसाहित्य, गाणी, नाटके आणि इतर कला प्रकारांमध्ये होतो. ज्यामुळे त्या क्षेत्राला प्रोत्साहन मिळते.

**६. भाषिक विविधता जपणे :** बोलीभाषेच्या माध्यमातून भाषिक विविधता जपली जाते. जी भाषेच्या समृद्धीचा भाग आहे.

**७. शिक्षण आणि स्थानिक ज्ञान :** स्थानिक बोलीत शिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांना समजायला सोपे जाते. आणि स्थानिक ज्ञानाचा प्रसार होतो.

मराठीतील बोलीभाषा केवळ संवादाचे माध्यम नाही तर ती सांस्कृतिक, सामाजिक आणि भाषिक समृद्धीची गुरुकिल्ली आहे त्यामुळे बोली भाषेचे जतन आणि संवर्धन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राला संतांची किंवा कवींची भूमी म्हणून ओळखले जाते. जिथे अनेक शतके ज्ञान, भक्ती आणि साहित्याचा प्रवाह अखंडितपणे वाहतो आहे. या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा आधारस्तंभ म्हणजे मराठी भाषा. मराठी ही एक मोठी भारतीय भाषा असून ऑक्टोबर 2024 मध्ये तिला भारत सरकारने अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला आहे. महाराष्ट्र ही भूमी केवळ भौगोलिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण नाही, तर तिच्या भाषिक वर्षातही अनोखी समृद्धी दडलेली आहे. मराठी ही प्रमाण भाषा असली तरी राज्याच्या कानाकोपऱ्यातून उमललेल्या बोलीभाषा या मराठीच्या मूळ रसाला अधिक गोड आणि वैशिष्ट्यपूर्ण बनवतात.

परंतु आज बोलीच्या विकासाला उतरती कळा लागलेली आहे. कुठेतरी ती लोप पावण्याच्या अवस्थेत दिसत आहे. तिच्या या अवस्थेची कारणे आपण जाणून घेऊ.

मराठी बोली भाषेच्या ऱ्हासाची मुख्य कारणे आधुनिकता, शहरीकरण आणि प्रमाणभाषेचा वाढता प्रभाव ही आहेत. अनेक बोलीभाषा आता केवळ बोलल्या जाणाऱ्या स्वरूपात न राहता लुप्त होत आहेत किंवा प्रमाणभाषेच्या प्रभावाखाली येत आहेत.

बोली भाषेच्या ऱ्हासाची प्रमुख कारणे खालील प्रमाणे आहेत.

**१. प्रमाण भाषेचे वर्चस्व :** शिक्षण, प्रशासन, माध्यम आणि पुस्तकांमध्ये प्रमाण मराठीचा वापर वाढला आहे. यामुळे बोलीभाषा 'अडाणी' किंवा 'कमी दर्जाची' मानण्याची मानसिकता निर्माण झाली आहे.

**२. शहरीकरण आणि स्थलांतर :** रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहराकडे होणाऱ्या स्थलांतरामुळे लोक आपल्या मूळ बोली सोडून प्रमाणभाषा किंवा हिंदी/ इंग्रजी स्वीकारत आहेत. शहरात एकाच मुलीचे लोक एकत्र नसल्याने ती भाषा बोलली जात नाही.

**३. शिक्षणपद्धती :** शालेय शिक्षणाचे माध्यम प्रमाणभाषा असल्याने, नवीन पिढीला आपली मूळ बोलीभाषा लिहिण्यास किंवा वाचण्यास शिकवली जात नाही. त्यामुळे ती पिढी बोली पासून दूर जात आहे.

**४. माध्यमांचा प्रभाव :** टीव्ही, रेडिओ, वर्तमानपत्रे आणि सोशल मीडियावर प्रमाण भाषेचा वापर होतो. करमणुकीच्या साधनांमुळे (उदा. चित्रपट, मालिका) ग्रामीण बोलीभाषा मागे पडत आहेत.

**५. सामाजिक प्रतिष्ठा :** आपली बोलीभाषा बोलल्यास लोक हसतील किंवा आपल्याला कमी लेखतील, या भीतीने अनेक जण प्रमाणभाषा बोलण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे बोली भाषेचा वापर घरगुती वातावरणातही कमी झाला आहे.

**६. आंतरजातीय आणि आंतरप्रांतीय विवाह :** यामुळे घरात वेगवेगळ्या भाषा किंवा बोली बोलल्या जातात. परिणामी मूळ बोलीभाषांचे संवर्धन होत नाही.

**७. जागतिकीकरण :** इंग्रजी भाषेचे वाढते प्रमाण आणि जागतिक संवादामुळे स्थानिक बोलीभाषा दुय्यम ठरत आहेत.

थोडक्यात सांगायचे तर, प्रमाणभाषेचे सक्तीकरण, शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक बदल हे बोलीभाषेच्या ऱ्हासासाठी प्रामुख्याने कारणीभूत आहेत.

महाराष्ट्रातील बोलीभाषा हा मराठी भाषेचा आणि पर्यायाने महाराष्ट्र संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. वऱ्हाडी आणि दख्खनी यासारख्या बोलींनी मराठीला प्राचीन साहित्य परंपरा दिली तर, अहिराणी आणि मालवणी सारख्या बोलींनी लोककला आणि साहित्याला अद्वितीय गोडवा दिला. आधुनिक काळात शहरीकरण, शिक्षण आणि प्रसारमाध्यमांमध्ये प्रमाणभाषेचा वापर वाढल्यामुळे अनेक स्थानिक बोलीभाषांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. भाषिक अस्मिता जपण्याची आणि त्या बोलींना प्रतिष्ठा मिळवून देण्याची ही लढाई अत्यंत महत्त्वाची आहे.

बोलीभाषा या संस्कृतीचा आत्मा असतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास तंत्रज्ञान या बोलीच्या संवर्धनाचे आणि प्रसाराचे सर्वात मोठे साधन बनू शकते.

**बोलीभाषा संवर्धनात आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका :**

तंत्रज्ञानाचा वापर करून बोलीभाषा जिवंत ठेवण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी खालील प्रकारे प्रयत्न करता येतील.

**१. डिजिटल दस्तऐवजीकरण :** अनेक बोलीभाषा लिखित स्वरूपात उपलब्ध नसतात. रेकॉर्डिंग डिवाइसेस, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लेटफॉर्म्सचा वापर करून या बोलीभाषा मधील लोकगीते कथा, म्हणी आणि शब्दसंपदा रेकॉर्ड केली जाऊ शकते.

**२. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भाषांतर :** AI आधारित साधने वापरून बोलीभाषेचे प्रमाण भाषेत (Standard Language)आणि प्रमाणवाषेचे बोलीभाषेत रूपांतर करता येते. उदा. वऱ्हाडी किंवा अहिराणी बोलीन मधील मजकूर AI द्वारे मराठीत समजून घेणे सोपे झाले आहे.

**३. व्हॉइस असिस्टंट (Voice Assistant) :** 'गुगल असिस्टंट' किंवा 'अलेक्सा' (Alexa) सारख्या साधनांना स्थानिक बोलीभाषा समजण्यासाठी विकसित केले जाऊ शकते. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकही तंत्रज्ञानाचा वापर करू शकतात.

**४. युनिकोड (Unicode) आणि लिपी विकास :** सर्व भारतीय भाषांसाठी युनिकोड मानक विकसित झाल्यामुळे, कोणत्याही लिपीत डिजिटल टाइपिंग करणे सोपे झाले आहे. यामुळे मोबाईल ॲप्लिकेशन्स मध्ये बोली भाषेचा वापर वाढला आहे.

**५. डिजिटल साक्षरता आणि ॲप्स :** स्थानिक बोलीभाषा मधून शैक्षणिक ॲप्स, ई-पुस्तके(e -books)आणि ऑडिओ बुक्स(audio books)तयार करून नवीन पिढीपर्यंत बोलीभाषा पोहोचवता येते.

डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे बोलीभाषांना आता पूर्वीपेक्षा मोठे व्यासपीठ मिळाले आहे. मराठी ब्लॉगिंगचा वाढता कल आणि मल्टीलींगुअल SEO (Multilingual SEO)चा प्रभावी वापर करून प्रादेशिक भाषिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. स्थानिक लेखकांनी आणि कलावंतांनी या संधीचा फायदा घेऊन आपापल्या बोलीभाषेतील साहित्य आणि कलाकृती डिजिटल माध्यमातून प्रकाशित करणे हा या भाषिक विविधतेचे संवर्धन करण्याचा आणि तिचा प्रसार करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यामुळे स्थानिक भाषिक अस्मिता टिकवून राहील.

**आधुनिक तंत्रज्ञान-आव्हाने आणि धोके :** जरी तंत्रज्ञान ही संवर्धनाचे साधन असले, तरी त्यातून काही आव्हाने निर्माण झाली आहेत.

**१. डाटाचा अभाव :** AI मॉडेल्सना प्रशिक्षित करण्यासाठी बोलीभाषेतील पुरेशा डिजिटल डेटाची (Text/Voice) कमतरता आहे.

**२. मानकीकरण (Standardization) :** डिजिटल प्लॅटफॉर्मवर अनेकदा प्रमाणभाषाच वापरली जाते, ज्यामुळे बोलीभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण लहेजा आणि शब्द नामशेष होऊ शकतात.

**३. तात्पुरता वापर:** सोशल मीडियावर बोलीभाषेचा वापर केवळ 'मजा' म्हणून केला जातो सखोल संवादासाठी नाही.

**सारांश :** आधुनिक तंत्रज्ञान ही मराठी बोलीभाषांच्या ऱ्हासाचे कारण नसून जर योग्य वापर केला तर संवर्धनाचे प्रभावी साधन आहे. आज बहुतेक मराठी इंटरनेट वापर करते प्रादेशिक भाषेतील सामग्रीला पसंती देतात. जे बोलीभाषेच्या

डिजिटल विस्तारासाठी सकारात्मक संकेत आहेत. ग्रामीण आणि शहरी बोलीभाषांचे डिजिटल दस्तऐवजीकरण, ऑडिओ- व्हिडिओ सादरीकरण आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आपण या बोलींना समृद्ध करू शकतो.

**भाषेच्या संवर्धनासाठी भावी दिशा :**

**१. लोकसहभाग :** बोलीभाषा बोलणाऱ्या समुदायानेच स्वतःच्या भाषेचा डिजिटल प्लॅटफॉर्मवर वापर वाढवणे गरजेचे आहे.

**२. लोककलेचे डिजिटायझेशन :** स्थानिक कलाकारांच्या बोलीभाषेतील कलाकृती रेकॉर्ड करून यूट्यूब (You Tube) किंवा सोशल मीडियावर प्रसारित कराव्यात.

**३. भाषा संशोधन :** विद्यापीठांनी संगणकीय भाषाविज्ञान च्या माध्यमातून बोलीभाषेचे संगणकीय व्याकरण विकसित करणे.

**४. मराठी भाषा धोरण सरकारकडून जाहीर.**

**निष्कर्ष :** १. आधुनिक तंत्रज्ञान हे दुधारी तलवारी सारखे आहे. जर आपण त्याचा योग्य वापर केला नाही, तर बोलीभाषा नामशेष होऊ शकतात. परंतु जर आपण AI, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि इंटरनेटचा वापर करून बोलीभाषेची जतन केले, तर या भाषा अधिक समृद्ध होऊन जगभरात पोहोचू शकतात.

२. बोलीभाषांच्या संवर्धनासाठी तांत्रिक कौशल्यांची आणि भाषिक प्रेमाची सांगड घालणे आवश्यक आहे. जेणेकरून भविष्यातही संवाद आणि संस्कृती जिवंत राहील.

३. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बोलीभाषेला 'जागतिक व्यासपीठ' (Global Platform) मिळवून देणे हे नवीन पिढीचे महत्त्वाचे कर्तव्य आहे.

४. बोलीभाषा टिकली तरच मराठी संस्कृती टिकेल.

५. आधुनिक तंत्रज्ञानात दळणवळणासाठी बोलीभाषेतील शब्दांचा जाणीवपूर्वक वापर करणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

१. ना. गो. कालेलकर - भाषा आणि संस्कृती
२. डॉ. दत्तात्रय पुंडे - सुलभ भाषा विज्ञान
३. मोहन आपटे - संगणक, इंटरनेट, यंत्रमानव भविष्यवेध
४. दै. लोकमत, डॉ. रघुनाथ माशेलकर - संशोधन हवे समाज विकासासाठी (20 ऑगस्ट 2013)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# अर्थव्यवस्था व उच्च शिक्षणातील उदयोन्मुख क्षेत्रे: एक संक्षिप्त अभ्यास

**जयश नरसिंगराव मुत्यालवार**
संशोधक विद्यार्थी शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था (स्वायत्त), अमरावती
ईमेल :jayashngmutyalwar788gmail.com

**गोषवारा:**

आजच्या जागतिकीकरण, तांत्रिक क्रांती आणि डिजिटल परिवर्तनाच्या युगात अर्थव्यवस्थेचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. जुन्या कृषी आणि औद्योगिक क्षेत्रांबरोबरच माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता(AI), डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, हरित ऊर्जा, जैवतंत्रज्ञान, फिनटेक, ई-कॉमर्स आणि स्टार्टअप संस्कृती यांसारखी उदयोन्मुख क्षेत्रे अतिशय वेगाने विकसित होत आहेत. या क्षेत्रांमुळे अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल होत असून उत्पादन पद्धती, सेवा क्षेत्र आणि रोजगाराच्या संधींचे स्वरूप जास्त प्रमाणात बदलत आहे.

उदयोन्मुख आर्थिक क्षेत्रांमुळे रोजगार बाजारात नव्या प्रकारच्या कौशल्यांची मागणी वाढली आहे. डेटा विश्लेषण, मशीन लर्निंग, क्लाउड कॉम्प्युटिंग, स्मार्ट शेती आणि ड्रोन तंत्रज्ञान यांसारख्या कौशल्यांना प्राधान्य दिले जात आहे. परिणामी, केवळ जुन्या शिक्षणापेक्षा कौशल्याधारित आणि तांत्रिक शिक्षण अधिक महत्त्वाचे ठरत आहे. तसेच, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार लवचिक अभ्यासक्रम, संशोधनाभिमुख शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आले. ऑनलाइन आणि डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून MOOCs, Virtual classrooms आणि Hybrid learning यांचा वापर वाढला आहे. यामुळे शिक्षण अधिक सुलभ, समावेशक आणि तंत्रज्ञानाधारित झाले आहे. अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षण यांचा परस्परसंबंध या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये विकसित करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेची भूमिका निर्णायक ठरते. उच्च शिक्षण संस्था उद्योगांशी सहकार्य करून संशोधन व नवोत्पक्रमाला चालना देत आहेत.

या अभ्यासाचा उद्देश अर्थव्यवस्थेतील नव्याने विकसित होणाऱ्या क्षेत्रांचा अभ्यास करणे, उच्च शिक्षणातील बदलांचे विश्लेषण करणे, दोन्ही क्षेत्रांतील परस्परसंबंध तपासणे आणि रोजगार निर्मितीवरील परिणामांचा अभ्यास करणे हा आहे. करिता सदर लेखामध्ये “अर्थव्यवस्था व उच्च शिक्षणातील उदयोन्मुख क्षेत्रे: एक संक्षिप्त अभ्यास.” याचे विश्लेषण केलेले आहे.

**बीज शब्द:** कार्बन व्यवस्थापन, ई-कॉमर्स, आभासी वर्ग, NEP, कृषी-तंत्रज्ञान, MOOCs.

**प्रस्तावना:**

एकविसाव्या शतकात जागतिक तसेच भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या संक्रमणाच्या टप्प्यातून जात आहे. तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारी प्रगती, उदारीकरण, जागतिकीकरण, डिजिटल क्रांती आणि पर्यावरणीय आव्हाने यामुळे आर्थिक संरचनेत मूलभूत बदल घडून आले आहे. पारंपरिक कृषी, औद्योगिक आणि सेवा क्षेत्रांबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा, डेटा सायन्स, जैवतंत्रज्ञान, ई-कॉमर्स, आणि स्टार्टअप उद्योग यांसारखी अनेक नवीन क्षेत्रे उदयास आले. ही उदयोन्मुख क्षेत्रे केवळ सेवा व उत्पादनच्या स्वरूपात बदल घडवत नाहीत, तर रोजगाराच्या संधी, कौशल्यांची गरज आणि आर्थिक स्पर्धात्मकतेचे स्वरूपही बदलत आहे. सदर आर्थिक परिवर्तनाचा थेट आणि सखोल परिणाम उच्च शिक्षण व्यवस्थेवर होत आहे. उद्योगांना आवश्यक असलेली तांत्रिक कौशल्ये, विश्लेषणात्मक क्षमता, संशोधनाभिमुख दृष्टी आणि बहुविषयक समज विकसित करण्याची जबाबदारी शिक्षण संस्थांवर आहे. पारंपरिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या चौकटीत राहून हे साध्य करणे शक्य नाही. यामुळे अभ्यासक्रम रचना, मूल्यमापन प्रणाली, अध्यापन पद्धती, आणि संशोधन धोरणांमध्ये व्यापक बदल करणे आवश्यक आहे. कौशल्याधारित शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, इंटर्नशिप, स्टार्टअप इनक्युबेशन, ऑनलाइन व मिश्र शिक्षण यांसारख्या संकल्पनांना विशेष महत्त्व आहे.

भारताच्या संदर्भात पाहता, १९९१ नंतरच्या उदारीकरणाच्या धोरणामुळे सेवा व माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. या नंतरच्या काळात डिजिटल अर्थव्यवस्था, स्टार्टअप संस्कृती आणि हरित ऊर्जा क्षेत्राने वेग घेतला आहे. या बदलांमुळे देशातील रोजगार बाजारपेठेत विशिष्ट तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्यांची मागणी वाढली आहे. देशातील उच्च शिक्षण संस्थांनी उद्योग-शैक्षणिक सहकार्य, नवोपक्रम व संशोधन केंद्रांची स्थापना, आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांसारख्या उपक्रमांद्वारे अर्थव्यवस्थेतील बदलांना प्रतिसाद देण्यास सुरुवात केली आहे. परंतु, ग्रामीण-शहरी दरी, संसाधनांची कमतरता, गुणवत्तेतील असमतोल आणि कौशल्य-अभाव यांसारखी आव्हाने अद्यापही अस्तित्वात आहेत. त्यामुळे अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षण यांच्यातील परस्परसंबंधांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षणातील उदयोन्मुख क्षेत्रांचा अभ्यास केवळ शैक्षणिक दृष्टीनेच नव्हे, तर योजनानिर्मिती, रोजगार नियोजन आणि दीर्घकालीन आर्थिक विकासासाठीही आवश्यक आहे. उदयोन्मुख क्षेत्रांमुळे

निर्माण होणाऱ्या संधी आणि समस्याचं विचार करून नवीन शिक्षण क्षेत्रात आवश्यक ते बदल केल्यास देशाच्या मानव संसाधन विकासाला चालना मिळेल. यामुळे सदर लेख मध्ये अर्थव्यवस्थेतील नव्याने विकसित होणाऱ्या क्षेत्रांचे स्वरूप, त्यांचा उच्च शिक्षणावर होणारा परिणाम आणि दोन्ही क्षेत्रांतील परस्परावलंबित्व यांचा नियोजनात्मक अभ्यास केला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षण यांचा विकास इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर परस्परावलंबी राहिला आहे. समाजाच्या आर्थिक रचनेत जसे बदल घडत गेले, तसेच शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप, उद्दिष्टे आणि प्राधान्यक्रमही बदलत गेले. त्यामुळे उदयोन्मुख क्षेत्रांचा अभ्यास करताना त्यांच्या ऐतिहासिक प्रवासाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्राचीन काळात भारतीय अर्थव्यवस्था मुख्यतः कृषीप्रधान होती. उत्पादन साधने पारंपारिक होती आणि कौटुंबिक किंवा स्थानिक स्तरावर व्यवसाय चालत होते. प्राचीन काळातील शिक्षण पद्धती गुरुकुल प्रणालीवर आधारित होती. ज्ञानप्राप्तीचा मुख्यत: उद्देश नैतिकता, तत्त्वज्ञान, धर्म आणि पारंपरिक विद्या यांचा अभ्यास करणे होता. त्या काळी वैद्यक, गणित, खगोलशास्त्र आणि राज्यकारभार यांसारख्या विषयांमध्ये उच्च शिक्षण दिले जात असले तरी त्यांचा संबंध औद्योगिक किंवा व्यापार विस्ताराशी मर्यादित प्रमाणातच होता. मध्ययुगीन काळात व्यापार, हस्तकला आणि लघुउद्योगांना चालना मिळाली. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे आर्थिक देवाणघेवाण वाढली; परंतु शिक्षण संस्था प्रामुख्याने धार्मिक केंद्रांपुरत्याच मर्यादित राहिल्या. या काळात तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण स्वतंत्रपणे विकसित झाले नाही. त्यामुळे आर्थिक क्षेत्रातील प्रगती आणि शिक्षण यांच्यातील संबंध तुलनेने कमकुवत राहिले. वसाहतवादी काळात परिस्थितीत महत्वपूर्ण बदल झाले. ब्रिटिश सत्तेने आधुनिक शिक्षण प्रणालीची पायाभरणी केली. यामुळे इंग्रजी शिक्षण, आधुनिक विज्ञान आणि प्रशासकीय प्रशिक्षण यांना महत्त्व प्राप्त झाले. या काळात शिक्षणाचे उद्दिष्ट वसाहतवादी प्रशासनासाठी आवश्यक मनुष्यबळ तयार करणे होते. याच वेळी औद्योगिक क्रांतीचा प्रभाव भारतावर पडले व रेल्वे, दळणवळण व्यवस्था आणि काही औद्योगिक उपक्रम सुरू झाले. परिणामी १९ व्या दशकात तांत्रिक शिक्षण संस्थांची गरज भासू लागली आणि याचं दशकात अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार झाले. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारला. औद्योगिकीकरण, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग आणि वैज्ञानिक संशोधन यांवर भर देण्यात आले. या पार्श्वभूमीवर तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण संस्थांची स्थापना झाली. अभियांत्रिकी, व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आले. उच्च शिक्षण व्यवस्थेचा विस्तार झाला आणि संशोधनाला चालना मिळाली. अर्थव्यवस्थेच्या गरजांनुसार कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यावर भर देण्यात आले.

१९९१ नंतरच्या उदारीकरण धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे संरचनात्मक बदल झाले. तसेच सेवा क्षेत्र, विशेषतः माहिती तंत्रज्ञान आणि वित्तीय सेवा, वेगाने वाढू लागल्या. जागतिक बाजारपेठेशी स्पर्धा करण्यासाठी उच्च तांत्रिक कौशल्यांची मागणी वाढली. परिणामी संगणकशास्त्र, व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांची लोकप्रियता वाढली. २१ व्या शतकात डिजिटल अर्थव्यवस्था, , डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा आणि जैवतंत्रज्ञान यांसारखी क्षेत्रे उदयास आली.

यावरून असे स्पष्ट होते की अर्थव्यवस्थेतील प्रत्येक परिवर्तनाने उच्च शिक्षणाच्या स्वरूपावर परिणाम केले आहे. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेपासून औद्योगिक आणि त्यानंतर डिजिटल व ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेकडे झालेल्या प्रवासात शिक्षण व्यवस्थाही सतत बदलत आहे.

**अर्थव्यवस्थेतील उदयोन्मुख क्षेत्रे:**

१) माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता

माहिती तंत्रज्ञान क्षेत्र हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ आहे. डिजिटल क्रांतीमुळे डेटा निर्मिती, विश्लेषण आणि व्यवस्थापन यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

▪ डेटा सायन्स

डेटा सायन्स हे मोठ्या प्रमाणातील माहितीचे विश्लेषण करून त्यातून उपयुक्त निष्कर्ष काढण्याचे शास्त्र आहे. उद्योग, आरोग्य, शिक्षण, बँकिंग आणि शासन व्यवस्थेत निर्णयप्रक्रिया अधिक अचूक करण्यासाठी डेटा सायन्सचा महत्व वाढत आहे. यामुळे अर्थव्यवस्थेत अधिक माहितीची आदान-प्रदान होत आहे.

▪ सायबर सुरक्षा

डिजिटल व्यवहार आणि ऑनलाइन सेवा वाढल्यामुळे माहिती सुरक्षेचे महत्त्व वाढले आहे. सायबर हल्ले, डेटा चोरी आणि आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी सायबर सुरक्षा तज्ञांची मागणी वाढत आहे.

▪ मशीन लर्निंग

मशीन लर्निंग ही कृत्रिम बुद्धिमत्तेची शाखा असून संगणक प्रणालींना अनुभवाच्या आधारे शिकण्याची क्षमता प्रदान करते. ई-कॉमर्स, आरोग्य निदान, बँकिंग आणि स्वयंचलित यंत्रणा यामध्ये याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. उत्पादनक्षमता वाढवणे आणि मानवी त्रुटी कमी करणे यासाठी हे क्षेत्र महत्त्वाचे आहे.

२) हरित ऊर्जा व पर्यावरण क्षेत्र

पर्यावरणीय संकट आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाच्या संकल्पनेला प्राधान्य दिले आहे.

▪ सौर ऊर्जा

सौर ऊर्जा ही अक्षय आणि प्रदूषणमुक्त ऊर्जा स्रोत आहे. औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी सौर प्रकल्पांची संख्या वाढत आहे. यामुळे ऊर्जा क्षेत्रात नव्या गुंतवणुकीच्या संधी निर्माण होत आहेत.

▪ कार्बन व्यवस्थापन

औद्योगिक उत्सर्जन कमी करण्यासाठी कार्बन क्रेडिट, कार्बन कॅप्चर तंत्रज्ञान आणि पर्यावरणीय लेखापरीक्षण यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

▪ इलेक्ट्रिक वाहन उद्योग

इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढत आहे. बॅटरी उत्पादन, चार्जिंग स्टेशन आणि संबंधित सेवा क्षेत्राचा विस्तार होत आहे.

३) स्टार्टअप आणि डिजिटल अर्थव्यवस्था

डिजिटल प्लॅटफॉर्म आणि नवकल्पनांवर आधारित व्यवसाय मॉडेल्स वेगाने विकसित होत आहेत.

▪ ई-कॉमर्स

ऑनलाइन खरेदी-विक्री प्लॅटफॉर्ममुळे व्यापाराची पद्धत बदलली आहे. लघु उद्योजकांनाही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश मिळाला आहे.या मुळे अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल झाले.

▪ डिजिटल पेमेंट प्रणाली

रोख व्यवहारांच्या ऐवजी डिजिटल व्यवहार वाढले आहेत. यामुळे आर्थिक व्यवहार अधिक सुरक्षित आणि नोंदणीकृत झाले आहेत.या कारणाने अर्थव्यवस्थेत पारदर्शकता आली आहे.

▪ ब्लॉकचेन तंत्रज्ञान

ब्लॉकचेनमुळे व्यवहारांची सुरक्षित आणि पारदर्शक नोंद ठेवणे शक्य होते. बँकिंग, पुरवठा साखळी आणि सरकारी व्यवहारांमध्ये याचा वापर केला जातो.

४ ) कृषी-तंत्रज्ञान

शेती क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे.

▪ स्मार्ट शेती

सेन्सर आणि डिजिटल उपकरणांद्वारे पाणी, माती आणि पिकांची स्थिती नियंत्रित केली जाते.

▪ ड्रोन तंत्रज्ञान

खत फवारणी, पिकांचे निरीक्षण आणि जमिनीचे सर्वेक्षण करण्यासाठी ड्रोनचा वापर होतो.

५) आरोग्य व बायोटेक्नॉलॉजी

आरोग्य सेवा क्षेत्रात संशोधन आणि तंत्रज्ञानामुळे मोठे परिवर्तन घडून आले आहे.

▪ जैवतंत्रज्ञान

जैविक प्रक्रियांवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर शेती, औषधनिर्मिती आणि पर्यावरण संरक्षणात केला जातो.

▪ फार्मास्युटिकल संशोधन

नवीन औषधे आणि लसी विकसित करण्यासाठी संशोधनावर भर दिला जात आहे. यामुळे औषध उद्योगाची वाढ झाली आहे.

**उच्च शिक्षणातील उदयोन्मुख क्षेत्रे:**

जागतिक अर्थव्यवस्थेतील वेगवान बदल, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि रोजगार बाजारातील स्पर्धा यामुळे उच्च शिक्षण व्यवस्थेत मूलभूत परिवर्तन घडून आले आहे.

१) कौशल्याधारित शिक्षण

▪ उद्योगाभिमुख अभ्यासक्रम

आजच्या काळात केवळ सैद्धांतिक ज्ञान पुरेसे नसून प्रत्यक्ष काम करण्याची क्षमता आवश्यक आहे. त्यामुळे अभ्यासक्रमांची रचना उद्योगांच्या गरजेनुसार केली जात आहे. माहिती तंत्रज्ञान, डेटा विश्लेषण, वित्तीय सेवा, आरोग्यसेवा आणि उत्पादन क्षेत्रात आवश्यक असलेल्या तांत्रिक कौशल्यांचा समावेश अभ्यासक्रमात केला जात आहे.

▪ इंटर्नशिप व अप्रेंटिसशिप

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग किंवा संस्थांमध्ये काम करण्याचा अनुभव देण्यासाठी इंटर्नशिप आणि अप्रेंटिसशिपची संकल्पना महत्त्वाची ठरली आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना कार्यसंस्कृती, समस्या सोडविण्याची रीत आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या यांची ओळख होते आहे.

२)ऑनलाइन व डिजिटल शिक्षण

डिजिटल तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झाले आहे. शिक्षण आता केवळ वर्गखोलीपुरते मर्यादित न राहता त्याचे जाळे विविध घटकात विस्तारले आहे.

▪ आभासी वर्ग

Virtual Classrooms मुळे विद्यार्थी आणि शिक्षक भौगोलिक मर्यादा ओलांडून संवाद साधू शकतात. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, डिजिटल सादरीकरणे, ऑनलाइन मूल्यांकन यामुळे शिक्षण अधिक तांत्रिक आणि आधुनिक झाले आहे

▪ Massive Open Online Courses

MOOCs च्या माध्यमातून जगातील नामांकित विद्यापीठांचे अभ्यासक्रम ऑनलाइन उपलब्ध झाले आहेत. विद्यार्थी आपल्या सोयीने आणि कमी खर्चात विविध विषयांचे अभ्यास करू शकतात. यामुळे शिक्षणाचे लोकशाहीकरण झाले असून ज्ञानप्राप्ती अधिक सर्वसमावेशक बनली आहे.

▪ मिश्र शिक्षण पद्धती

Hybrid Learning ही पद्धत ऑनलाइन आणि ऑफलाइन शिक्षणाचा समतोल साधते. या पद्धतीत काही भाग वर्गात शिकवला जातो, तर काही भाग डिजिटल माध्यमातून शिकवला जातो. या पद्धतीमुळे वेळेची बचत होते आणि शिक्षण अधिक लवचिक बनते.

3) संशोधन व नवोपक्रम

ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत संशोधन आणि नवोपक्रम हे प्रगतीचे मुख्य घटक आहेत.

▪ स्टार्टअप इनक्युबेशन सेंटर

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकसित करण्यासाठी महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये इनक्युबेशन केंद्रे स्थापन केली जात आहेत. या केंद्रांद्वारे मार्गदर्शन, निधी, बाजारपेठेची माहिती आणि तांत्रिक सहाय्य दिले जाते.

▪ उद्योग-शैक्षणिक सहकार्य

उद्योग आणि शिक्षण संस्था यांच्यातील सहकार्यामुळे संशोधन प्रकल्प, प्रशिक्षण कार्यक्रम आणि तंत्रज्ञान हस्तांतरण शक्य होते. यामुळे अभ्यासक्रम अद्ययावत राहतात आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळतो

४) बहुविध शिक्षण

आधुनिक समस्यांचे स्वरूप गुंतागुंतीचे असल्यामुळे एका विषयापुरते मर्यादित ज्ञान अपुरे ठरते.

▪ राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 नुसार अभ्यासक्रमात लवचिकता.

NEP 2020 नुसार विद्यार्थ्यांना विविध विषयांची निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले आहे. कला, विज्ञान, वाणिज्य आणि तंत्रज्ञान यांमधील दुरावा कमी करून बहुविषयक शिक्षणाला प्रोत्साहन दिले आहे. या नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. तसेच उच्च शिक्षणात संशोधनाभिमुख शिक्षणला प्राधान्य दिले आहे.

**उदयोन्मुख क्षेत्रात रोजगार निर्मिती:**

सध्याच्या काळात पारंपरिक उद्योगांच्या तुलनेत तंत्रज्ञानाधारित आणि ज्ञानाधारित क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी झपाट्याने वाढत आहे. विशेषतः NASSCOM च्या अहवालानुसार माहिती तंत्रज्ञान(IT) क्षेत्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर नव्या नोकऱ्या निर्माण होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा आणि क्लाउड कॉम्प्युटिंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी वाढलेली आहे. तसेच स्टार्टअप परिसंस्थेमुळे स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या संधी वाढल्या आहेत Startup India उपक्रमांतर्गत हजारो नवउद्योग सुरू झाले असून त्यांनी थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण केले. मात्र, रोजगार निर्मितीची ही वाढ कौशल्याधारित आहे. म्हणजेच पारंपरिक शिक्षणापेक्षा तांत्रिक कौशल्ये, डिजिटल साक्षरता आणि नवोपक्रम क्षमता अधिक महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांची भूमिका निर्णायक आहे.

वरील अभ्यासातून खालील काही मुद्दे स्पष्ट होतात:

. उदयोन्मुख क्षेत्रांमुळे थेट व अप्रत्यक्ष रोजगार संधींमध्ये वाढ झाली आहे.
. उच्च शिक्षण आणि उद्योग यांच्यातील समन्वय वाढल्यास रोजगारक्षमतेत वाढ होते.
. रोजगाराचे स्वरूप अधिक तंत्रज्ञानाभिमुख आणि कौशल्याधारित झाले आहे.

**विषयाचे महत्त्व:**

आधुनिक काळात अर्थव्यवस्थेची रचना आणि स्वरूप वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती, जागतिकीकरण आणि डिजिटल क्रांतीमुळे अनेक नवीन क्षेत्रांचा उदय झाला आहे. माहिती तंत्रज्ञान(IT), AI, डिजिटल अर्थव्यवस्था, हरित ऊर्जा आणि स्टार्टअप उद्योग यांसारखे उदयोन्मुख क्षेत्रे देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या क्षेत्रांच्या वाढीमुळे उत्पादनक्षमता वाढते, नवीन उद्योग निर्माण होतात आणि आर्थिक क्षेत्रातील विकासाला चालना मिळते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील या उदयोन्मुख क्षेत्रांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

आर्थिक क्षेत्रातील बदलांचा परिणाम उच्च शिक्षण व्यवस्थेवरही होत आहे. उद्योग आणि तंत्रज्ञानाच्या गरजेनुसार शिक्षण क्षेत्रात कौशल्याधारित शिक्षण, डिजिटल शिक्षण, संशोधनाभिमुख आणि बहुविषयक अभ्यासक्रम या शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जात आहे. नवीन ज्ञान, कौशल्ये आणि तांत्रिक क्षमता विकसित करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी अभ्यासक्रमात आवश्यक सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षण यांच्यातील परस्परसंबंध समजून घेणे महत्त्वाचे आहे. तसेच, उदयोन्मुख क्षेत्रांच्या विकासामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. विशेषतः IT, ई-कॉमर्स, फिनटेक, बायोटेक्नॉलॉजी आणि नूतनीकरणीय ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमध्ये युवकांसाठी विविध रोजगार उपलब्ध होत आहेत.

एकूणच, अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षणातील उदयोन्मुख क्षेत्रांचा अभ्यास केल्यामुळे आर्थिक विकास, रोजगार निर्मिती, कौशल्य विकास आणि शिक्षण व्यवस्थेतील बदल यांचे सखोल आकलन होण्यास मदत होते. त्यामुळे हा विषय संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

**विषयाची निवड:**

आजच्या काळात अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात जास्त प्रमाणावर बदल होत आहेत. तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती, जागतिकीकरण आणि डिजिटल क्रांतीमुळे माहिती तंत्रज्ञान, AI, हरित ऊर्जा, स्टार्टअप उद्योग आणि बायोटेक्नॉलॉजी यांसारखी अनेक नवीन क्षेत्रे वेगाने निर्माण होत आहेत. या क्षेत्रांना अर्थव्यवस्थेतील उदयोन्मुख क्षेत्रे असे म्हणता येते. या क्षेत्रांमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे, आणि रोजगाराच्या नवीन संधी देखील निर्माण होत आहेत.

आर्थिक विकास आणि उच्च शिक्षण यांच्यात परस्परसंबंध असल्यामुळे या दोन्ही क्षेत्रांतील परिवर्तनचा एकत्रित अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. उदयोन्मुख क्षेत्रांच्या विकासामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात कोणते बदल होत आहेत आणि या बदलांचा समाजव्यवस्थेवर व अर्थव्यवस्थेवर कसा परिणाम होतो, हे अभ्यासाने आहे.

**संशोधन पद्धती:**

सदर लेखमध्ये वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या अभ्यासामध्ये मुख्यतः द्वितीयक स्त्रोताचा उपयोग करून विषयाचे विश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये विविध प्रकाशित साहित्य, शासकीय अहवाल, संशोधन लेख आणि अधिकृत संकेतस्थळांवरील माहितीचा आधार घेण्यात आला आहे. तसेच भारत सरकारच्या विविध मंत्रालयांचे अहवाल, नीती आयोगाचे प्रकाशन, तसेच विविध संशोधन जर्नल्स, शैक्षणिक पुस्तके आणि अधिकृत संकेतस्थळांवर प्रकाशित लेखांचा अभ्यास करण्यात आला आहे.

संकलित माहितीचे वर्गीकरण करून त्याचे तक्ते आणि वर्णनात्मक पद्धतीने विश्लेषण करण्यात आले आहे. या विश्लेषणाच्या आधारे अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षणातील उदयोन्मुख क्षेत्रांचा विकास, त्यांचे महत्त्व आणि त्यांचा समाजव्यवस्था व अर्थव्यवस्थावर होणारा परिणाम याचा अभ्यास करण्यात आले आहे.

**उद्दिष्टे:**

1.अर्थव्यवस्थेतील उदयोन्मुख क्षेत्रांचे स्वरूप व वैशिष्ट्ये अभ्यासणे.
2.उच्च शिक्षण व्यवस्थेतील बदलांचे विश्लेषण करणे.
3.उदयोन्मुख क्षेत्रांचा रोजगार निर्मितीवर होणारा परिणाम तपासणे.

**भारतातील उदयोन्मुख क्षेत्रे आणि रोजगार निर्मिती:**

**सारणी क्र.१**

| उदयोन्मुख क्षेत्र | मुख्य उपक्षेत्र | रोजगार स्थिति |
|---|---|---|
| १)माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमात | AI, DATA SCIENCE, CYBER SECURITY, CLOUD COMPUTING | भारतातील आयटी क्षेत्रात सुमारे ५८ लाख लोक काम करत आहे. |
| २)स्टार्टअप व डिजिटल अर्थव्यवस्था | FINTECH, E-COMMERCE, DIGITAL PAYMENTS | भारतात १.६ लाखापेक्षा अधिक स्टार्टअप्स असून त्यांनी १७ लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्माण केले. |
| ३)हरित ऊर्जा क्षेत्र | SOLAR ENERGY, WIND ENERGY, ELECTRIC VEHICLES | भारतातील हरित ऊर्जा क्षेत्रात १० लाख रोजगार निर्माण झाले. |
| उच्च शिक्षण व कौशल्य क्षेत्रं | SKILL BASED EDUCATION, RESEARCH,INNOVATION | या क्षेत्रात राजगर वाढत आहे. |

NASSCOM – https://nasscom.in/knowledge-center/publications/strategic-review-2024.. Startup India https://www.startupindia.gov.in/content/sih/en/startup-scheme.in.com

आधुनिक काळात माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र भारताच्या आर्थिक विकासाचे प्रमुख केंद्र बनले आहे. तसेच उपलब्ध आकडेवारीनुसार भारतातील IT क्षेत्रात सुमारे 58 लाखांपेक्षा अधिक लोक कार्यरत आहेत आणि दरवर्षी नवीन रोजगार निर्माण होत आहेत.

त्याचप्रमाणे स्टार्टअप क्षेत्राने देखील रोजगारनिर्मितीत मोठे योगदान दिले आहे. डिजिटल पेमेंट, फिनटेक या सारख्या सेवांमुळे भारतात स्टार्टअप संस्कृती वेगाने वाढली आहे. Startup India उपक्रमामुळे 1.6 लाखांपेक्षा अधिक स्टार्टअप्स नोंदणीकृत झाले आहे. हरित ऊर्जा क्षेत्र देखील रोजगारनिर्मितीचे एक महत्त्वाचे उदयोन्मुख क्षेत्र ठरत आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहन उद्योग यांच्या विकासामुळे पर्यावरणपूरक उद्योगांमध्ये नवीन रोजगार संधी निर्माण झाले आहे. तसेच, उच्च शिक्षण क्षेत्राची भूमिका देखील अत्यंत महत्त्वाची आहे. यामुळे कौशल्याधारित शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम यांमुळे विद्यार्थ्यांना उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहे.

**भारतातील उच्च शिक्षणाचा विस्तार:**

**सारणी क्र.२)**

| घटक | २०१५ | २०२० | २०२३ |
|---|---|---|---|
| विद्यापीठांची संख्या | ७६० | १०४३ | १११३ |
| महाविद्यालय | ३८००० | ४२००० | ४३००० |
| G.E.R | २४.५% | २७.१% | २८.४% |

All India Survey on Higher Education- https://aishe.gov.in.com

वरील माहिती वरून असे स्पष्ट होते की भारतामध्ये उच्च शिक्षणाचा विस्तार सातत्याने वाढत आहे. विद्यापीठे व महाविद्यालयांची संख्या वाढल्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या जास्त संधी उपलब्ध झाल्या आहेत. तसेच

कौशल्याधारित आणि तंत्रज्ञानाभिमुख अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढली आहे. त्यामुळे उच्च शिक्षण आणि अर्थव्यवस्था यांच्यातील संबंध अधिक मजबूत होत आहे.

**निष्कर्ष:**

सदर लेखातून असे स्पष्ट होते की २१ व्या शतकातील अर्थव्यवस्था वेगाने परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जात आहे. माहिती तंत्रज्ञान, AI , हरित ऊर्जा, जैवतंत्रज्ञान, डिजिटल सेवा आणि कृषी-तंत्रज्ञान यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांनी आर्थिक विकासाला नवी दिशा दिली आहे. या क्षेत्रांमुळे उत्पादन पद्धती, सेवा वितरण प्रणाली, गुंतवणुकीचे स्वरूप आणि रोजगाराची रचना यांमध्ये मूलभूत बदल झालेले दिसून आले आहे. या संरचनात्मक परिवर्तनाचा थेट परिणाम उच्च शिक्षण व्यवस्थेवर झाला आहे. जुन्या सैद्धांतिक शिक्षणाच्या चौकटीतून बाहेर पडून शिक्षण संस्थांना अधिक लवचिक, कौशल्याधारित आणि उद्योगाभिमुख पद्धती स्वीकाराव्या लागत आहे. शिक्षणाचे अद्ययावतीकरण, डिजिटल शिक्षण पद्धतींचा स्वीकार, इंटर्नशिप आणि अप्रेंटिसशिप यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यां मध्ये रोजगारक्षमता वाढत आहे. बहुविषयक शिक्षण आणि संशोधनाभिमुख दृष्टिकोन यांमुळे विद्यार्थ्यांची विश्लेषणात्मक व सर्जनशील क्षमता विकसित होत आहे. तसेच, ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत संशोधन व नवोपक्रम यांचे महत्त्व अधिक वाढत आहे. उच्च शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे नवीन तंत्रज्ञान, उत्पादने आणि सेवा विकसित करण्यास चालना मिळत आहे. उदयोन्मुख क्षेत्रांमुळे निर्माण होणाऱ्या रोजगार संधींचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना तांत्रिक तसेच सॉफ्ट स्किल्सची(SKILL) आवश्यकता आहे.

थोडक्यात, अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षण यांचा परस्परसंबंध हा परस्परपूरक आणि गतिशील आहे. अर्थव्यवस्थेतील बदल शिक्षण क्षेत्राला दिशा देत आहे, तर शिक्षणातून निर्माण होणारे मानवसंसाधन आर्थिक प्रगतीस गती देत आहे.

सूचना आणि **शिफारसी :**

१) कौशल्य विकासावर भर देणे.

उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी विशेष तांत्रिक कौशल्यांची गरज असते. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांनी Skill-based courses सुरू करणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगाच्या गरजांनुसार प्रशिक्षण दिल्यास रोजगाराच्या अधिक संधी मिळू शकते.

२) संशोधन व नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्यात यावे.

उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये प्रगती करण्यासाठी Research and Innovation आवश्यक आहे. त्यामुळे विद्यापीठांमध्ये स्टार्टअप इनक्युबेशन सेंटर, संशोधन प्रयोगशाळा आणि नवोपक्रम केंद्र स्थापन करणे गरजेचे आहे.

३) डिजिटल व तांत्रिक शिक्षणाचा विस्तार करणे.

डिजिटल अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्यामुळे ऑनलाइन शिक्षण, डिजिटल कौशल्ये, डेटा अॅनालिटिक्स, सायबर सुरक्षा यांसारख्या विषयांवर अधिक भर देणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक रोजगार बाजाराशी जुळवून घेणे सोपे जाईल.

**संदर्भग्रंथ सूची:**

१) नीती आयोग.(२०२२) भारतामधील रोजगार व आर्थिक क्षेत्रातील बदल. नवी दिल्ली: https://www.niti.gov.in.COM

२) कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार.(२०२३) भारतामधील कौशल्य विकास व रोजगार अहवाल. https://www.msde.gov.in.com

३) NASSCOM. (२०२३) भारतातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा विकास व रोजगार निर्मिती. https://www.nasscom.in.com

४) Department for Promotion of Industry and Internal Trade (DPIIT). (२०२४). भारतामधील स्टार्टअप इकोसिस्टम व रोजगार निर्मिती अहवाल. https://dpiit.gov.in.com

५) भारत सरकार, नवीन व नूतनीकरणीय ऊर्जा मंत्रालय. (२०२३) Renewable Energy Sector in India – https://mnre.gov.in.com

५) देशपांडे, स. (2018). *भारतीय अर्थव्यवस्था: संकल्पना व प्रवाह.* पुणे: निराली प्रकाशन.

६) कुलकर्णी, अ. (2020). *उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह.* मुंबई: डायमंड पब्लिकेशन्स.

७) पाटील, र. (2019). *ज्ञान अर्थव्यवस्था आणि शिक्षण.* कोल्हापूर: फडके प्रकाशन.

८) जोशी, म., & शिंदे, प. (2021). उच्च शिक्षणातील उदयोन्मुख अभ्यासक्रम आणि रोजगाराच्या संधी. *शैक्षणिक संशोधन पत्रिका,* 12(2), 45–52.

९) पवार, क. (2022). डिजिटल अर्थव्यवस्था आणि कौशल्य विकासाचे नवे क्षेत्र. *आर्थिक अभ्यास जर्नल,* 8(1), 23–31.

१०) University Grants Commission. (2023). *भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती अहवाल*. नवी दिल्ली: UGC.
११) Ministry of Education. (2020). *राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020*. नवी दिल्ली: भारत सरकार.
१२) World Bank. (2022). *Higher Education and Economic Development Report*. वॉशिंग्टन, डी.सी.
13) National Statistical Office. (2023). भारतीय अर्थव्यवस्थेची आकडेवारी. https://mospi.gov.in
14) UNESCO. (2022). Global Education Monitoring Report. https://www.unesco.org

# उच्च शिक्षणाचेखाजगीकरण
# Privatization of Higher Education

**प्रा. कु. सारिका अ. माहोरे,**
कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक जनता कनिष्ठ महाविद्यालय, नेरपिंगळाई. ता. मोर्शी, जि. अमरावती.

**प्रस्तावना**

शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मुख्य साधन मानले जाते. विशेषतः उच्च शिक्षणामुळे ज्ञान, कौशल्य, संशोधनवृत्ती आणि व्यावसायिक क्षमता विकसित होतात. पूर्वी उच्च शिक्षणाची जबाबदारी प्रामुख्याने सरकारकडे होती; मात्र वाढती लोकसंख्या, मर्यादित सरकारी साधनसंपत्ती आणि जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात खाजगी संस्थांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढू लागला. यालाच उच्च शिक्षणातील खाजगीकरण असे म्हणतात.

उच्च शिक्षणातील खाजगीकरण म्हणजे सरकारकडून चालविल्या जाणाऱ्या शिक्षणव्यवस्थेत खासगी व्यक्ती, संस्था किंवा उद्योगसमूह यांचा वाढता सहभाग. भारतामध्ये १९९० नंतरच्या उदारीकरण धोरणानंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन इत्यादी शाखांमध्ये अनेक खाजगी महाविद्यालये आणि विद्यापीठे स्थापन झाली. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक पर्याय उपलब्ध झाले, आधुनिक सुविधा मिळाल्या आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले.

मात्र या प्रक्रियेमुळे शिक्षणाच्या व्यापारीकरणाचा प्रश्नही पुढे आला आहे. खाजगीकरण्याच्या संकल्पनेनुसार उच्च शिक्षणातील खाजगीकरणात नफा मिळविणे हा मूळ उद्देश असतो. विद्यार्थ्यांकडून शुल्क देणगी या स्वरूपात नफा मिळविणे हे उद्दिष्ट असते. त्यामुळे विद्यार्थ्यांकडे ग्राहक म्हणून पाहिल्या जाते. त्यामुळे उच्च शिक्षण देणाऱ्या खाजगी शिक्षण संस्था केवळ उच्च शिक्षणाकडे एक उद्योगधंदा म्हणून बघत आहे. वाढती शुल्करचना, गुणवत्तेतील असमानता आणि सामाजिक समतेवर होणारा परिणाम या बाबी चिंतेचा विषय ठरल्या आहेत. त्यामुळे उच्च शिक्षणातील खाजगीकरण हा विषय संधी आणि आव्हाने या दोन्ही बाजूने अभ्यासण्यासारखा आहे.

अशा प्रकारे, उच्च शिक्षणातील खाजगीकरण ही आजच्या शिक्षणव्यवस्थेतील एक महत्त्वाची आणि चर्चेची बाब असून तिचा सखोल विचार आणि अभ्यास करणे आवश्यक आहे.

**उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाची गरज का पडली?**

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात खाजगीकरणाची गरज विविध सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक कारणांमुळे निर्माण झाली. प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे—

**१) वाढती लोकसंख्या आणि मागणी**

भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने वाढली. सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी केवळ सरकारी महाविद्यालये अपुरी पडू लागली. त्यामुळे अतिरिक्त संस्था उभारण्यासाठी खाजगी क्षेत्राचा सहभाग आवश्यक ठरला.

**२) मर्यादित सरकारी साधनसंपत्ती**

सरकारकडे शिक्षणासाठी आवश्यक निधी मर्यादित असतो. पायाभूत सुविधा, प्रयोगशाळा, संशोधन केंद्रे उभारणे यासाठी मोठ्या गुंतवणुकीची गरज असते. ही तूट भरून काढण्यासाठी खाजगी गुंतवणूक महत्त्वाची ठरली.

**३) जागतिकीकरण आणि स्पर्धा**

१९९० नंतरच्या उदारीकरणाच्या काळात भारतात आर्थिक बदल झाले. आधुनिक तंत्रज्ञान, व्यवस्थापन, आयटी, वैद्यकीय शिक्षण यांची मागणी वाढली. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी नवीन अभ्यासक्रम व सुविधा देण्यासाठी खाजगी संस्थांची गरज भासली.

**४) गुणवत्तापूर्ण आणि व्यावसायिक शिक्षणाची गरज**

विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देणे आवश्यक झाले. अभियांत्रिकी, व्यवस्थापन, औषधनिर्माण, संगणक विज्ञान अशा क्षेत्रांत खासगी संस्थांनी आधुनिक साधने आणि उद्योगसंबंध विकसित केले.

**५) संशोधन व नवोपक्रमासाठी संधी**

सरकारी विद्यापीठांवरील ताण कमी करून संशोधन आणि नवोपक्रमाला चालना देण्यासाठी खाजगी विद्यापीठांचा सहभाग वाढविण्यात आला.

यामुळे स्पष्ट होते की, उच्च शिक्षणाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक व स्पर्धात्मक करण्यासाठी खाजगीकरणाची गरज निर्माण झाली. मात्र, त्यासोबतच गुणवत्ता, शुल्क नियंत्रण आणि सामाजिक समता यांचा समतोल राखणेही तितकेच आवश्यक आहे.

जगात चीन आणि अमेरिकेनंतर उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या बाबतीत जगात भारतचा तिसरा क्रमांक लागतो. ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भानुसार जगात वेगवेगळ्या प्रकारे शिक्षणातील खाजगीकरण्याची प्रक्रिया पार पडली. भारताच्या संदर्भात प्रसिद्ध शिक्षणतज्ञ जी.बी. टिळक यांनी भारतातील उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाचे चार प्रकारे वर्गीकरण केले आहे.

**उच्च शिक्षणाच्या खाजगी करण्याचे प्रकार**

**१) तीव्र किंवा टोकाचे खाजगीकरण –**

या प्रकारामध्ये महाविद्यालय किंवा विद्यापीठे पूर्णतः खाजगी तत्त्वावर चालविली जातात. व्यवस्थापन आणि निधी संकलन यावर खाजगी संस्थांचे नियमन असते. सरकारचा यामध्ये कुठलाही हस्तक्षेपण असतो.

**२) शक्तिशाली किंवा मजबूत खाजगीकरण-**

यामध्ये उच्च शिक्षणाची संपूर्ण किंमत उपभोक्त्यांकडून म्हणजे ग्राहकाकडून म्हणजेच विद्यार्थ्यांकडून वसूल केली जाते.

**३) मध्यम प्रकारचे खाजगीकरण-**

या प्रकारामध्ये उच्च शिक्षणाचे सार्वजनिक तरतूद असते परंतु अशासकीय संस्थांकडून वित्त पुरवठा केला जातो.

**४) अनुदानित खाजगीकरण -**

या श्रेणीतील शिक्षण संस्था खाजगी असतात परंतु त्यांना शासनाकडून 100% वित्तपुरवठा केला जातो.

भारतातील उच्च शिक्षणाची सध्या परिस्थिती पाहिली तर,आपण पहिल्या प्रकारास सामोरे जात आहोत. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर खाजगी शिक्षण संस्था उदयास आलेल्या आहे. स्वातंत्र्यानंतर देशात तंत्रज्ञ,कुशल कारागीर,अभियंता यांची मागणी वाढली. तांत्रिक शिक्षणाचा विस्तार ही राष्ट्र विकासासाठी काळाची गरज ठरली. त्यामुळे शासकीय शिक्षण संस्थांना तातडीने ही मागणी पूर्ण करणे शक्य नव्हते. त्यामुळे तामिळनाडू राज्याने पहिल्यांदा खाजगी क्षेत्राला उच्च शिक्षणात परवानगी दिली.

1988 मध्ये तामिळनाडू राज्याच्या पावलावर पाऊल ठेवत महाराष्ट्रात सुद्धा उच्च शिक्षणात खाजगी क्षेत्राचे स्वागत झाले.

**उच्च शिक्षणातील खाजगीकरणाचे परिणाम**

उच्च शिक्षणाचे खाजगीकरण झाल्यामुळे सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही प्रकारचे परिणाम आपणास दिसून येते. खाजगीकरणाची नकारात्मक बाजू आहे परंतु काही सकारात्मक परिणाम सुद्धा झालेले आहेत.

❖ **सकारात्मक परिणाम**

**१) शिक्षणसंस्थांची वाढ -**

खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन इत्यादी शाखांमध्ये मोठ्या प्रमाणात महाविद्यालये व विद्यापीठे स्थापन झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक प्रवेशाच्या संधी उपलब्ध झाल्या.

**२)आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञान -**

खाजगी संस्थांकडे अद्ययावत प्रयोगशाळा, डिजिटल वर्गखोल्या, उद्योगसंबंध यांसारख्या सुविधा उपलब्ध असतात. त्यामुळे शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण आणि रोजगाराभिमुख बनले.

**३) स्पर्धात्मक वातावरण -**

सरकारी व खाजगी संस्थांमध्ये स्पर्धा निर्माण झाल्यामुळे गुणवत्तेत सुधारणा होण्यास चालना मिळाली.

**४) संशोधन व नवोपक्रम -**

काही खाजगी विद्यापीठांनी संशोधन आणि स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन दिले, ज्यामुळे उद्योग-शिक्षण सहकार्य वाढले.

❖ **नकारात्मक परिणाम**

**१) शिक्षणाचे व्यापारीकरण -**

उच्च शुल्क आणि देणगी पद्धतीमुळे शिक्षण हे सेवा नसून 'व्यवसाय' बनत असल्याची टीका होते.

**२) सामाजिक विषमता -**

उच्च शुल्कामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे कठीण होते. त्यामुळे सामाजिक समतेवर परिणाम होतो.

**३) गुणवत्तेतील असमानता -**

सर्व खाजगी संस्था समान दर्जाच्या नसतात. काही ठिकाणी गुणवत्तेची कमतरता आढळते.

**४) नफेखोरीची प्रवृत्ती -**

काही संस्थांचा मुख्य उद्देश नफा मिळवणे हा असतो, त्यामुळे शैक्षणिक मूल्यांपेक्षा आर्थिक बाबींना प्राधान्य दिले जाते.

उच्च शिक्षणातील खाजगीकरणामुळे शिक्षणाच्या संधी वाढल्या आणि आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या; परंतु त्याच वेळी सामाजिक समता, गुणवत्ता आणि शुल्क नियंत्रण यांसारखी आव्हानेही निर्माण झाली. त्यामुळे खाजगीकरणासोबत प्रभावी नियमन आणि धोरणात्मक नियंत्रण आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

उच्च शिक्षणातील खाजगीकरणाच्या अभ्यासाचे निष्कर्ष असे आहेत:

**- खाजगीकरणामुळे उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढते:**

खाजगी संस्थांमध्ये स्पर्धा वाढल्यामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारतो.

**- खाजगीकरणामुळे उच्च शिक्षण अधिक सुलभ होते:**

खाजगी संस्थांमध्ये विविध अभ्यासक्रम ऑफर केले जातात, ज्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक विकल्प मिळतात.

**- खाजगीकरणामुळे उच्च शिक्षण अधिक महाग होते:**

खाजगी संस्थांमध्ये शिक्षणाचा खर्च अधिक असतो, ज्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे कठीण होते.

**- खाजगीकरणामुळे उच्च शिक्षणाचे व्यापारीकरण होते:**

खाजगी संस्थांमध्ये शिक्षणाला एक क्रय वस्तू मानले जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना ग्राहक म्हणून पाहिले जाते

उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाच्या फायद्यांमध्ये गुणवत्ता वाढ, अधिक विकल्प, आणि सरकारी खर्चात बचत यांचा समावेश आहे. मात्र, त्याच्या नुकसानांमध्ये उच्च शिक्षणाचा वाढता खर्च, व्यापारीकरण, आणि गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यात येणारी अडचण यांचा समावेश आहे.

उच्च शिक्षणातील खाजगीकरणामुळे गुणवत्ता, शुल्कवाढ, असमानता यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे सरकार व समाजाने योग्य नियंत्रण यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. खालील उपाय उपयुक्त ठरू शकतात —

**१) कठोर कायदे व नियमन**

खाजगी महाविद्यालयांसाठी स्पष्ट व कडक नियमावली तयार करणे.

शुल्क, प्रवेश प्रक्रिया व गुणवत्तेवर नियमित नियंत्रण ठेवणे.

मान्यताप्राप्त संस्थांकडूनच परवानगी देणे (उदा. University Grants Commission, All India Council for Technical Education).

**२) शुल्क नियंत्रण यंत्रणा**

प्रत्येक राज्यात शुल्क नियामक समिती स्थापन करणे.

अवाजवी शुल्कवाढीवर मर्यादा आणणे.

पारदर्शक फी-स्ट्रक्चर जाहीर करणे बंधनकारक करणे.

**३) गुणवत्तेचे मूल्यमापन**

नियमित शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण (Academic & Administrative Audit).

दर्जा तपासणीसाठी स्वतंत्र संस्था (उदा. National Assessment and Accreditation Council)कडून मूल्यांकन.

गुणवत्तेनुसार मानांकन (Accreditation)अनिवार्य करणे.

**४) सामाजिक न्याय व आरक्षण**

खाजगी संस्थांमध्येही सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षण धोरण राबवणे.

शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्जसुविधा उपलब्ध करणे.

**५) पारदर्शक प्रवेश प्रक्रिया**

प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन व पारदर्शक ठेवणे.

प्रवेशासाठी समान निकष व गुणवत्ता यादी जाहीर करणे.

**६) सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) मध्ये संतुलन**

सरकारने पूर्णपणे माघार न घेता देखरेख ठेवणे.

शिक्षण हा नफा कमावण्याचा व्यवसाय नसून सामाजिक जबाबदारी आहे, यावर भर देणे.

**७) तक्रार निवारण यंत्रणा**

विद्यार्थी व पालकांसाठी स्वतंत्र तक्रार निवारण समिती स्थापन करणे.

अन्यायकारक वर्तनावर त्वरित कारवाई करणे.

उच्च शिक्षणातील खाजगीकरण पूर्णपणे थांबविणे शक्य नसले तरी त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवून गुणवत्ता, समता आणि पारदर्शकता सुनिश्चित करता येते. शिक्षण हे समाजाच्या विकासाचे साधन आहे; त्यामुळे त्याचे व्यापारीकरण रोखणे आणि सर्वांसाठी समान संधी उपलब्ध करणे ही सरकारची व समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

**संदर्भ ग्रंथ**

जोशी मधुरा, (2022) उच्च शिक्षणाचे खाजगीकरण - मराठी विश्वकोश
भुताडे, (2025) शिक्षण क्षेत्राचे खाजगीकरण: सार्वत्रिक शिक्षणापुढील आव्हान
पाटील लीला, (2013) शिक्षणाचे अंतरंग शिक्षण व्यवस्थेचा सामाजिक दृष्टिकोन

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# उच्च शिक्षणाचे खाजगीकरण

विनय अरुण पद्लमवार
संशोधक विद्यार्थी, अमरावती

**प्रस्तावना :-**

मनुष्यबळ जडणघडणीत आणि देशाच्या सार्वजनिक व आर्थिक प्रगतीत शिक्षणाचा वाटा महत्त्वाचा असतो. कारण कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील सुशिक्षित आणि सुजाण मनुष्यबळावर अवलंबून असतो. मानव संपत्ती जेवढी प्रगत तेवढी त्या देशाच्या विकासाची गती अधिक व टिकाऊ असते. उद्योग, शेती, व्यापार, पतपुरवठा आणि अन्य संस्थात्मक सुई सुविधांच्या उभारणीवर भरमसाठ खर्च केला परंतु त्या वापरासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध नसेल तर त्यातून होणारा फायदा अल्प असेल. म्हणून देशातील प्रत्येक व्यक्तीला उच्च शिक्षण देणे गरजेचे आहे. सन १९९० मध्ये जॅमरीन (थायलंड) येथे पहिल्या शिक्षण परिषदेत जागतिक बँकेने सर्वांसाठी शैक्षणिक धोरण जाहीर करताना उच्च शिक्षणावरील सबसिडी कमी करण्याचे धोरण भारतासह सर्व विकसनशील देशाच्या गळी उतरवले. तेव्हापासून भारत सरकारने उच्च शिक्षण क्षेत्रातली आपली जबाबदारी कमी करण्यास सुरुवात केलेली दिसते. परिणामी १९९७ पासून देशातील अनुदानित महाविद्यालयांच्या संख्येत वाढ थांबली असून खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे.

उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे सर्व प्रकारच्या किफायतशीर व्यवसाय शिक्षण, मोठ्या उद्योगांना गरजेचे असलेले संशोधन, वित्तसंस्था, व्यापार व उद्योगांचे व्यवस्थापन, जाहिरातीचे जग, डिझाईनिंग, फिल्ममेकिंग इत्यादी क्षेत्रांतील उच्च शिक्षण घेण्यासाठी आज भरमसाठ पैसा मोजावा लागतो. नवीन शैक्षणिक धोरण भांडवलदार आणि व्यापार वर्गाला फायद्याचे ठरणारे असले तरी त्यामुळे उच्च शिक्षण प्रचंड महाग झालेले आहे. समाजाच्या वरच्या स्तरातील विद्यार्थ्यांची प्रतिष्ठेच्या शिक्षणावर मक्तेदारी तयार होणार असल्याने बहुतांश निम्नस्तरातील विद्यार्थी त्यापासून वंचित राहतील. याची चिंता व्यक्त केल्या जाते.

**अध्ययनाची उद्दिष्ट्ये :-**

१) उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाचे स्वरूप लक्षात घेणे.
२) उच्च शिक्षणाचे खाजगीकरणाचा आढावा घेणे.
३) उच्च शिक्षणाच्या सामाजिक परिणामांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी तथ्य संकलन मिळविताना द्वितीय संकलन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. ज्यामध्ये संशोधन विषयाशी संबंधित पुस्तके, ग्रंथ व निमशासकीय, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके, शोध प्रबंध, कार्यशाळा, सेमिनार, चर्चासत्र तसेच इंटरनेटवरील माहिती आधार घेण्यात आला आहे. संकलित तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे.

**व्याख्या :-**

उच्चशिक्षण :- उच्च शिक्षण म्हणजे १०+२ या स्तरानंतर दिले घेतले जाणारे शिक्षण किंवा विद्यापीठ शिक्षण होय.
सर्वसाधारणपणे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या १७ ते २३ वयोगटातील विद्यार्थ्यांना / विद्यार्थिनींना दिले जाणारे शिक्षण म्हणजे उच्च शिक्षण होय.
खाजगीकरण :- सरकारचे स्वामित्व काढून ते खाजगी उद्योगपतींकडे किंवा व्यक्तींकडे सोपविणे होय. मालकी हक्काचे हस्तांतरण करण्याकरिता सरकार आपल्या मालकीचे संपूर्ण अधिकार खाजगी व्यक्तींना देते.

**अध्ययन विषयाचे महत्त्व :-**

शिक्षण हे मानव विकासाचे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणाद्वारे विकास व विकासाद्वारे शिक्षण या संमिश्र प्रक्रियेतून मानव जीवनाचा प्रवास पुढे जात असतो. शिक्षणामुळे मानवी जीवनामध्ये उत्क्रांती घडून आलेली आहे. शिक्षणामुळे रूढी, प्रथा, परंपरा, अस्पृश्यता, गुलामगिरी या समस्या संपुष्टात येऊन प्रत्येक व्यक्तीला आत्मसन्मानाने जगता येते आणि कुटुंब समाज व देशाचा विकास होतो. शिक्षणामुळे व्यक्तीच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा सर्वोच्च आविष्कार होतो. जीवनावर सुसंस्कार करून ते अधिक सहेतुक, सुखी व समृद्ध बनविणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. भारताची शिक्षण व्यवस्था ही जागतिक उदारीकरणाच्या धोरणामुळे जागतिक बाजारासाठी खुली करण्यात आली. मुक्त आर्थिक धोरणानुसार शिक्षण क्रयवस्तू ठरले. शिक्षणावरील खर्च अनुत्पादक समजला गेल्यामुळे शिक्षणावरील खर्चात कपात करण्यात आली. शिक्षणाचे खाजगीकरण करून शैक्षणिक भेदभावाला सुरुवात झाली. जागतिक स्तरावरील एल.पी.जी. चा परिणाम भारतीय शिक्षण व्यवस्थेवर झाला आहे आणि त्यामुळे आज भारतीय शिक्षणव्यवस्थेचे

खाजगीकरण होताना दिसत आहे. त्या दृष्टीने "उच्च शिक्षणाचे खाजगीकरण" या संशोधन लेखांमध्ये उच्च शिक्षणाची संकल्पना समजून घेऊन. उच्च शिक्षणाचे खाजगीकरण यामुळे होणारे परिणाम याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. म्हणून प्रस्तुत अध्ययनाला खूप महत्त्व आहे.

**भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती :-**

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले तेव्हा देशात केवळ २० विद्यापीठे ५०० महाविद्यालय आणि त्यात केवळ १.२ लाख विद्यार्थी होते. आज मात्र देशातील विद्यापीठांची संख्या ४० टक्क्यांनी महाविद्यालयांची संख्या ८० टक्क्यांनी व विद्यार्थ्यांची संख्या १२७ टक्क्यांनी वाढली आहे. हे मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या २०१५ च्या वार्षिक अहवालानुसार मार्च २०१५ पर्यंत देशात विद्यापीठाची संख्या ७११ व महाविद्यालयांची संख्या ४०७६० इतकी आहे. राज्यनिहाय विद्यापीठांची संख्या लक्षात घेतली तर असे निदर्शनास येते की राजस्थान राज्यात सर्वात जास्त ६८ विद्यापीठे आहेत. त्या खालोखाल उत्तर प्रदेश ६४ आणि तामिळनाडू ५२ विद्यापीठ आहे. याचा अर्थ देशातील विविध राज्यात विद्यापीठांचे असमान वितरण झालेले आढळून येते. शैक्षणिक सत्र २०१४-१५ मध्ये सर्व अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांचे एकूण नामांकन २६५.८५ लाख होते. ज्यामध्ये १२४.७६ लाख विद्यार्थिनी होत्या. विद्यार्थिनींचे नामांकनांचे प्रमाण ४६.८२ टक्के इतके होते. उत्तर प्रदेश मध्ये विद्यार्थ्यांचे नामांकन सर्वात जास्त ४३.८७ लाख होते. त्यानंतर महाराष्ट्र २८.६० लाख, तमिळनाडू २४.०१ लाख आणि राजस्थान मध्ये १६.२४ लाख इतके होते. देशातील विद्यापीठांची व महाविद्यालयातील शिक्षकाची संख्या २०१३-१४ मध्ये १०.४६ लाख होती. ती २०१४-१५ मध्ये १२.६१ लाख इतकी झाली आहे. या १२.६१ लाख शिक्षकांपैकी ८४.६६ टक्के शिक्षक महाविद्यालयातील आणि बाकीचे १५.३४ लाख शिक्षक विद्यापीठात होते. वर्ष २०१४-१५ मध्ये २२८४९ पीएच. डी पदव्या प्राप्त करण्यात आल्या. यामध्ये सर्वात जास्त कला शाखेत ७४८० पीएच. डी पदव्या देण्यात आल्या त्यानंतर विज्ञान शाखेत ७०१८ पीएच. डी पदव्या प्रदान करण्यात आल्या. या दोन्ही शाखेतील पीएच. डी पदव्यांचे एकूण प्रमाण ६३.४५ टक्के इतके होते.

**उच्चशिक्षण खाजगीकरणाचे फायदे :-**

१) प्रवेशामध्ये वाढ - उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणांमध्ये शैक्षणिक संस्थांची वाढ झाली त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना शासकीय संस्थांमध्ये प्रवेश मिळत नव्हता त्यांना शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या.

२) शिक्षणाच्या विस्तारात वाढ - उच्चशिक्षणाच्या खाजगीकरणामुळे विविध शैक्षणिक वाढीस चालना मिळाली त्यामुळे वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण, कृषी इतर क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर विस्तार झालेला आहे.

३) प्रतिमा उंचावण्याची प्रक्रिया - खाजगी शिक्षण संस्थांची उच्च गुणवत्ता काळानुरूप बदलता व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम, माहिती तंत्र विज्ञानाच्या प्रभावी वापर, अत्याधुनिक सेवा सुविधा या सर्वांच्या नियोजित व्यवस्थापनामुळे खाजगी शिक्षण संस्थेचे व त्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रतिमा उंचावली.

४) नवीन बदलासाठी तयार - बदल हा निसर्गाचा नियम आहे. या नियमानुसार शिक्षण क्षेत्रात ही समाजाच्या गरजा नुसार खाजगीकरणामुळे विविध स्वरूपाचे बदल शक्य होतात.

५) कार्यक्षमतेत वाढ - खाजगीकरणामुळे शैक्षणिक संस्थांच्या कार्यक्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. विविध खाजगी संस्थांच्या स्पर्धात्मक वातावरणामुळे व यामध्ये आपले अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षण संस्थेकडे आकर्षित करून घेण्यासाठी संस्थांना त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करणे गरजेचे बनले.

**उच्च शिक्षणाचे खाजगीकरणाचे मर्यादा व तोटे :-**

१) घटनेच्या कलम १४ चा विरोध - भारतीय संविधानाच्या कलम 14 अन्वये सर्वांना शिक्षणाची समान संधी प्रदान करण्यात आली आहे. परंतु खाजगीकरणामुळे निर्माण झालेल्या शैक्षणिक संस्था व त्यांचे भरमसाठ शुल्क यामुळे आर्थिक दुर्बल, मागासवर्गीय घटक शिक्षणापासून वंचित राहतील.

२) उच्च शिक्षणात दाखल होणाऱ्यांच्यात घट :- भरमसाठ शिक्षण शुल्कामुळे अनुसूचित जाती, जमाती, आर्थिक दुर्बल घटक, ग्रामीण भागातील विद्यार्थीचे उच्च शिक्षणातील प्रमाण कमी होत चालले आहे.

३) वाढता लिंग भेद :- शिक्षणाचे खाजगीकरणामुळे स्त्री शिक्षणाचे प्रमाण घटले व लिंगभेद वाढले.

४) शिक्षणाच्या गुणवत्तेत घट :- खाजगीकरणामुळे संस्थांची फक्त संख्यात्मक वाढ होईल त्या प्रमाणात गुणवत्तेत घट झाल्याचे दिसून येते.

५) पोषक शैक्षणिक वातावरणाचा अभाव :- अद्यावत तंत्रज्ञान, अप्रशिक्षित शिक्षक, भौतिक साधन सुविधेचा अभाव इत्यादीच्या कमतरतेमुळे शैक्षणिक पोषकता राहिले नाही.

**निष्कर्ष :-**

२१ व्या शतकात जग विज्ञान आणि तंत्रज्ञानाने समृद्ध होऊन सर्व क्षेत्रात प्रगती करत आहे. भारत देखील त्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. भारतात युवा मनुष्यबळ सर्वाधिक आहे. त्या मनुष्यबळायला शिक्षित आणि प्रशिक्षित केल्यास भारत लवकरच आर्थिक महासत्ता होईल. विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधारे आर्थिक विकास साधतांना बौद्धिक विकासावर

भर देणे आवश्यक आहे. परंतु त्या दृष्टीने भारतात पुरेशा शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाही. आर्थिक नियोजनाच्या नावाखाली शिक्षणाचे खाजगीकरण करून बहुजनांच्या शैक्षणिक विकासाकडे दुर्लक्ष होत चालले आहे. सरकारने स्वीकारलेल्या शैक्षणिक धोरणावर उच्च शिक्षण क्षेत्रावर अनिष्ट परिणाम होत आहे. त्यामधून मार्ग काढावा लागेल शिक्षणाची गुणवत्ता वाढवावी लागेल शिक्षणावरील खर्च वाढ करावी लागेल. जागतिक बदलांचा विचार करता भारतातील परिस्थिती लक्षात घेऊन उच्च शिक्षणा संदर्भात नियोजन करावे लागेल.

नव्या शतकाच्या समाज रचनेचा आणि अर्थव्यवस्थेचा खरा आधार ज्ञान हाच आहे. ज्ञानातिष्ठ समाज रचना व ज्ञानाधिष्ठ अर्थव्यवस्था हेच भविष्यकाळ टिकून राहण्याचे मार्ग आहे. भारतीय समाज हा ज्ञानादिष्ट समाज व्हावा यासाठी समाजातील प्रत्येकाला न्याय मिळवण्याची समान संधी प्राप्त झाली पाहिजे. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार आणि शिक्षणाच्या न्याय व पुरेशा संधी उपलब्ध करून दिल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास करणे कठीण आहे. त्यामुळे शिक्षणाचे खाजगीकरण थांबविणे समाजची आणि एकंदरी देशाची गरज आहे.

**संदर्भग्रंथ सूची :-**

१) अहिरे शितल (२०१२). शिक्षणाचे खाजगीकरण
२) धोंडीभाऊ माशेरे (२०१२). गुणवत्तापूर्ण उच्चशिक्षणासमोरील आव्हाने व उपाय
३) कदम डी. (२०१५). उच्च शिक्षण आणि महिला सशक्तीकरण. अथर्व प्रकाशन, १४२-१४५
४) काळे प्रमोद (२०१६). शिक्षणाचे खाजगीकरण
५) वेल्हाळ एस. (२०१८). जागतिकीकरणाचे शिक्षणावरील परिणाम. नवोदित, vol.-II, Issue-IV, ४१-४३

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# महाराष्ट्रातील प्रादेशिकता व विविध साहित्यप्रकार

**साधना रमेशराव खेरडे**
एम ए मराठी पीएचडी अभ्यासक ,मोबा.8600853818 ,ई-मेल -renukabelsare 4@gmail.com

**सारांश :** महाराष्ट्रातील प्रादेशिकता ही प्रामुख्याने भौगोलिक, सांस्कृतिक,आणि ऐतिहासिक कारणावर आधारित आहे. ज्यामध्ये कोकण, पश्चिम महाराष्ट्र,मराठवाडा,विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र (खानदेश) हे पाच प्रमुख प्रदेश आहे. या प्रदेशामध्ये स्वतःची विशिष्ट भाषाशैली सांस्कृतिक आणि स्थानिक प्रश्न आहे. ज्यामुळे अनेकदा विकासाच्या मुद्द्यावरून किंवा संसाधनाच्या वितरणावरून प्रादेशिक अस्मिता आणि राजकीय मागणी( उदा. स्वतंत्र विदर्भ) निर्माण होते.

अज्ञान हा टीकेचा विषय न बनवता नवे कलावंत या सामान्य माणसाच्या अंधश्रद्धांना रीतीरीवाज यांना कलात्मक अभिव्यक्ती देऊ लागले. सामान्य माणूस आपल्या निसर्ग सिद्ध प्रदेशात फुलतो. नव्हे त्याच्या संपूर्ण जीवनाला निसर्गच आकार करीत असतो प्रकृती हीच त्याच्या जीवनाची अंतिम नियंत्रक शक्ती ठरते. त्यामुळे निसर्ग,वातावरण, भूमी हे प्रादेशिक तेचे अंगभूत असे महत्त्वाचे घटक होत. या सर्व घटकांचा अभ्यास करून अनेक लेखकांनी प्रादेशिक साहित्यामध्ये विशिष्ट प्रदेशातील ज्वलंत समस्या, त्यांच्यातील अंतर्विरोध तेथे होणारे आर्थिक, सामाजिक व राजकीय बदल जुळणारे -बिघडणारी मनुष्य मनुष्यातील संबंध, नीतिमूल्य याबरोबरच तेथील भौगोलिक व नैसर्गिक स्थिती तिचा जनमनावरील होणारा परिणाम व तेथले मागासले पण,अर्ध मागासले पण यातून ही प्रादेशिकता अविरभूत होत असते.

**प्रस्तावना :** महाराष्ट्रातील प्रादेशिकता ही भौगोलिक विविधतेमुळे नैसर्गिक रित्या निर्माण झाली आहे.जी राज्याच्या राजकीय आणि सामाजिक जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावते. प्रादेशिकता म्हणजे एखाद्या प्रदेशातील लोकांनी त्याच्या प्रदेशाच्या हितासाठी, संस्कृतीसाठी,भाषा,परंपरा, आर्थिक,सामाजिक, राजकीय हक्कासाठी एकत्र येणे, व त्या हक्कासाठी प्रयत्न करणे. प्रादेशिक साहित्याची आरंभीची प्रेरणा ही जीवनातील वास्तववादी अनुभूतीतूनच निर्माण झालेली आहे असे म्हणता येईल.प्रादेशिक ही वर्तमान युगाची प्रमुख प्रेरणा असली तरी प्रादेशिकतेचे तत्व व प्रकृती प्राचीनच होय. मानवी जीवनाच्या प्रारंभ काळापासून ही प्रवृत्ती आहे.व परिस्थितीनुरूप ती बदलत राहते. प्रादेशिक साहित्यातील प्रादेशिकता ही विश्वव्यापी रोमँटिक चळवळीची अभिव्यक्ती होय. रोमँटिक तत्त्वज्ञानात व्यक्तीला महत्त्व असूनही ते व्यक्तिवादी नाही प्रादेशिक साहित्यात सामान्य माणसाला अग्रस्थान मिळाली त्याची हेच कारण होय.

**विषय विवेचन :** प्रादेशिकता हे वांग्मयीन मूल्य नव्हे तर ती एक प्रवृत्ती आहे. वांग्मय अपरिहार्यतेतून प्रादेशिक साहित्याची निर्मिती झालेली आहे.प्रदेश म्हणजे विशिष्ट भूभागावरील विशिष्ट निसर्ग असलेला व मानवी जनजीवनावर प्रभाव गाजविणारा प्रभावी घटक होय. प्रादेशिकता हे साहित्याला प्राप्त झालेले एक वैशिष्ट्य आहे. नैसर्गिक व सांस्कृतिक वातावरणाला महत्त्व देणारी ती एक प्रवृत्ती आहे. औद्योगिक जीवनापासून दूर असलेल्या भागाचा समावेश करून त्या प्रदेशातील नैसर्गिक सृष्टीचे यथा वत चित्रण करीत असतानाच तेथील समाजजीवन, चालीरीती, परंपरा,श्रद्धा इत्यादींचे तसेच तेथील बोलीभाषेची प्रतिबिंब साहित्यात उमटल्यावर तत्व निर्माण होत असते. प्रादेशिक तेत विशिष्ट प्रदेशाच्या सांस्कृतिक पारंपरिक व भाषिक वैशिष्ट्यांचा आढळ होतो.

**प्रादेशिकतेची वैशिष्ट्ये**

1) **सांस्कृतिक विविधता :** प्रत्येक विभागाची स्वतःची वेगळी ओळख खाद्य संस्कृती, लोककला आणि बोलीभाषा आहे.

2) **राजकीय प्रादेशिकता :** विदर्भ आणि मराठवाड्यातील विकासाच्या मुद्द्यांवरून अनेकदा प्रादेशिक अस्मिता अधोरेखित केली जाते.

3) **प्रशासकीय विभाग :** शासनाच्या सोयीसाठी राज्याची कोकण पुणे नाशिक औरंगाबाद अमरावती आणि नागपूर असे सहा प्रशासकीय विभाग आहेत.

**विविध साहित्यप्रकार :** महाराष्ट्रातील प्रादेशिक साहित्यात वऱ्हाडी, अहिराणी, मालवणी,कोकणी आणि आगरी अशा विविध बोलीभाषांमधील ग्रामीण व प्रादेशिक जीवनाची प्रतिबिंब पडलेले दिसते.तसेच मराठी साहित्यात कथा,कादंबरी, कविता, नाटक, ललित लेख, आणि वैचारिक लेखन यासारखी विविध प्रकार समृद्ध असून ते संतपरंपरेपासून ते आधुनिक काळापर्यंत विकसित झाले आहेत.

**ग्रामीण साहित्य :-** आनंद यादव,शंकर पाटील,र.रा. बोराडे सदानंद देशमुख यांच्या लेखनातून ग्रामीण संस्कृती व बोलीभाषेचे दर्शन घडते.

**दलित साहित्य :-** शोषित समाजाची अनुभव आणि विद्रोह

**कविता :-** अभंग,ओवी,गझल,चारोळी, भावकविता.

**गद्य प्रकार :-** कादंबरी,लघुकथा, ललित लेख.

**नाटक:-** महाराष्ट्रात नाटकांची परंपरा खूप जुनी व समृद्ध आहे.

ISSN : 2278-9308
February 2026

**संत साहित्य :-** ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत (अभंग ओवी)
**आधुनिक साहित्य :-** कादंबरी, कथा,नाटक,कविता, ललित लेख, विनोदी साहित्य आणि दलित साहित्य.
**ऐतिहासिक साहित्य :-** छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्य यावर आधारित ऐतिहासिक कादंबऱ्या आणि पोवाडे.

**महाराष्ट्रातील प्रमुख प्रादेशिक आणि साहित्यप्रकार :**

**लोक साहित्य**

**पोवाडा-** ऐतिहासिक वीरांच्या पराक्रमाचे वर्णन करणारा काव्यप्रकार
**लावणी -** शृंगारिक आणि सामाजिक विषयांवर आधारित लोकगीत.
**भारुड -** संत एकनाथांनी लोकप्रिय केलेला,अध्यात्मिक अर्थ असलेला रूपकात्मक काव्यप्रकार.
**गोंधळ-** धार्मिक प्रसंगी गायले जाणारे गीत.
राज्यातील ग्रामीण भागातील गरिबीचे निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात सन २०११ मध्ये केली. महाराष्ट्र राज्यात सदरील अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या स्वतंत्र संस्थेची स्थापना संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करण्यात आलेली आहे. सदरील अभियानाची अंमलबजावणी राज्यातील ३४ जिल्हे व ३५१ तालुक्यात पूर्ण ताकदीने अभियान राबविले जात आहे. महाराष्ट्र राज्यातील ७१ लक्ष गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविकेच्या माध्यमातून गरिबीतून बाहेर काढण्यासाठी अभियान कटिबद्ध आहे याकरिता समुदाय संघटन, गरिबांच्या गरिबांनी निर्माण केलेल्या बळकट समुदायस्तरीय संस्थांची निर्मिती, विविध पथदर्शी प्रकल्प, स्वयंसेवी व शासकीय तसेच खाजगी संस्थासोबत भागीदारी अद्यावत मनुष्यबळ संसाधन विकास पद्धती, शास्वत उपजीविकेचे स्त्रोत उभे करण्याकरिता अभियाना मार्फत तसेच विविध वित्तीय संस्था व बँकांच्या माध्यमातून वेळेवर किफायत व्याज दराने व नियमित वित्त पुरवठा, कृतीसंगमाच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचा गरीब कुटुंबांना लाभ मिळण्याकरिता समुदायस्तरीय संस्थांची क्षमता बांधणी करणे, अशा अनेक नाविन्यपूर्ण व परिणामकारक पद्धतीने अभियानाची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे. राज्यात हे अभियान इंटेन्सिव्ह, सेमी इंटेन्सिव्ह, नॉन इंटेन्सिव्ह कार्यपद्धतीनुसार राबविण्यात येत असून २०२३-२४ पर्यंत सर्व ग्रामीण कुटुंबांचे दारिद्र्य निर्मूलन करण्याचे ध्येय आखण्यात आले आहे. तसेच १०० % जिल्ह्यामध्ये इंटेन्सिव्ह पद्धतीने अभियान राबविण्याचे लक्ष आहे. केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांमध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी १९७८ मध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाची अंमलबजावणी १९९८ पर्यंत संपूर्ण देशभरात करण्यात आली. त्यानंतर एकात्मिक ग्रामीण स्वयंरोजगार कार्यक्रमात एकात्मिक दृष्टिकोनाचा अभाव जाणवल्यामुळे १ एप्रिल १९९९ मध्ये स्वयंरोजगार कार्यक्रमाचे स्वरूप बदलवून स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना हा पतकर्ज नी अर्थसहाय्य असा नवीन कार्यक्रम सुरू केला. या योजनेचे केंद्र शासनाने विविध संस्थांकडून मूल्यांकन केले असता स्वर्ण जयंती ग्रामस्वराजगार योजना राबविण्याचा अनेक मर्यादा जाणवू लागल्या. त्यामुळे केंद्रशासनाने स्वर्ण जयंती ग्रामस्वरोजगार योजनेचे उद्दिष्टे कायम ठेवून या योजनेचे राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोनती अभियानात ( NRLM ) मध्ये ३ जून २०११ मध्ये १२ राज्यात निश्चित केलेल्या टप्प्याने अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

**अभियानाचा उद्देश्य :-**

ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीमप्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाचे व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्त्वावर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करून त्यांचे अधिकार व हक्क मिळवून देणे, विविध वित्तीय सेवा तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त करून देणे या दृष्टीने पोषक वातावरणाची निर्मिती करणारी एक समर्पित व संवेदनशील संस्था उभारणी करणे हे मुख्य उद्देश्य असून समन्यायी लिंग समभावाचे मूल्य जपणाऱ्या प्रगतिशील महाराष्ट्राची निर्मिती, जिथे सर्व नागरिक सुरक्षित सन्मानाचे

आणि संपन्नतेचे जीवन जगतील हा महत्त्वाचा उद्देश्य या अभियानाचा आहे. राज्यातील किमान ४५ लक्ष गरीब कुटुंबापर्यंत पोहोचून त्यांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या सक्षम करण्यास प्रयत्न करून २०२३-२४ पर्यंत विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे लक्ष आहे. जेणेकरून ते देशाच्या पायाभूत विकासाचा एक भाग बनतील.

**अभियानाची उद्दिष्टे :-**

दारिद्र्य निर्मूलनासाठी दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगाराची क्षमता वाढविण्यासाठी तळागाळापासून भक्कम संस्थीय प्रणाली स्थापन करून त्याद्वारे दारिद्र्य निर्मूलन करणे. या संस्था दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींनी, व्यक्तीच्या व्यक्तीकरिता स्थापित केलेल्या असतील व दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारींना लाभदायक क्षमतावृद्धी, स्वरोजगार व कौशल्य आधारित ( वेतनी व स्वरोजगारीच्या ) संधी उपलब्ध करून देतील, जेणेकरून त्यांच्याकडे शाश्वत रोजगार साधन उपलब्ध होऊन त्यांचे कायमस्वरूपी उत्पन्न वाढेल.

**अभियानाचे लक्ष घटक :-**

ग्रामीण भागातील सर्व गरीब कुटुंब हे अभियानाचा प्रमुख लक्ष घटक आहे. या गरीब कुटुंबातील अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती, जमाती, मागास प्रवर्गातील महिला, एकल महिला, अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या महिला, वेठबिगार, शेतकरी मजूर, बेरोजगार युवक अल्प व अत्यअल्प - भूधारक, वृद्ध, दिव्यांग, वेश्या व्यवसायातील महिला, प्रकल्प बाधित निराधार, स्थलांतरित मजूर, परितक्तया, विधवा, तृतीयपंथी, जोगीन, देवदासी इ. वंचित घटकांना संघटन, बांधणी व अर्थसहाय्य या माध्यमातून जीवनोन्नतीची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**अभियानातील योजना :-**

**१) योजनेचे नाव - पं. दीनदयाल उपाध्याय कौशल्य ग्रामीण योजना.**

**योजनेची सुरुवात** - २५ सप्टेंबर २०१४.

योजनेचा उद्देश्य - ग्रामीण भागातील बेरोजगार युवक / युवती यांना तांत्रिक प्रशिक्षण देणे व रोजगार उपलब्ध करून देणे.

**योजनेची उद्दिष्टे -**

* अल्पशिक्षित अशिक्षित किंवा बेरोजगारीचा सामना करणाऱ्या अशा तरुणांना सरकारकडून प्रशिक्षण दिले जाणार.
* युवक स्वतःच्या पायावर उभे राहून देशातील बेरोजगारी दूर करणे.
* ग्रामीण भागात राहणाऱ्या बेरोजगार तरुणांसाठी ही योजना फायदेशीर ठरणार आहे तसेच देशातील कुशल लोकांच्या संख्येतही झपाट्याने वाढ होणार आहे.

**योजनेची वैशिष्ट्ये -**

*योजनेसाठी दीनदयाल उपाध्याय यांच्या ९८व्या जयंतीचे निमित्त साधण्यात आले योजनेद्वारे १५ ते ३५ वयोगटातील ग्रामीण युवकांना लक्ष बनविण्यात आले आहे.
* ग्रामीण भागात राहणाऱ्या बेरोजगार तरुणांना विविध प्रकारच्या कामाचे प्रशिक्षण दिले जाते.
* प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर तरुणांना सरकारकडून प्रमाणपत्र देखील दिले जाते तसेच ते संपूर्ण भारतात वैद्य असेल.
* तरुणांना नोकरीसाठी अर्ज करताना मिळालेल्या प्रमाणपत्राचा वापर करता येतो.
* अधिकाधिक तरुणांना योजनेचा लाभ घेता यावा याकरिता सरकारकडून विविध राज्यांमध्ये प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आली.

* योजनेअंतर्गत २00 पेक्षा अधिक विविध कामांचा समावेश करण्यात आला असून यामध्ये युवकांना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण घेऊन प्रवीण बनवता येणार आहे.
* प्रशिक्षणानंतर नोकरी मिळून बेरोजगारीची समस्या दूर करणे तसेच देशातील बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्याचे योजनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

**२) योजनेचे नाव - महिला किसान सशक्तिकरण योजना.**

( 'उमेद' अभियानातील अल्पभूधारक महिला शेतकरी)

**योजनेची सुरुवात -** २०११.

**योजनेचा उद्देश -** देशातील महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण.

**योजनेची उद्दिष्टे -**
* कृषी क्षेत्रात महिलांना त्यांचा सहभाग आणि उत्पादकता वाढविण्यासाठी पद्धतशीर गुंतवणूक करून सक्षम करणे.
* ग्रामीण महिलांसाठी शेती आधारित उपजीविका निर्माण करणे आणि ती टिकवून ठेवणे.
* कृषी क्षेत्रातील महिलांची उत्पादक क्षमता सुधारून त्यांच्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी अन्नसुरक्षा निर्माण करणे.
* हा प्रकल्प महिलांना सरकार आणि इतर एजन्सी द्वारे प्रदान केलेल्या इनपुट आणि सेवांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे प्रवेश मिळवण्यासाठी सक्षम करण्याचा प्रयत्न करते.

**योजनेची वैशिष्ट्ये -**
* कृषी क्षेत्रात महिलांसाठी शाश्वत कृषी उपजीविकेच्या संधी निर्माण करणे.
* शेती आणि बिगर शेती आधारित क्रियाकलापांना पाठिंबा देण्यासाठी कृषी क्षेत्रातील महिलांची कौशल्य आणि क्षमता सुधारणे.
* घरगुती आणि समुदाय स्तरावर अन्न आणि पोषण सुरक्षा सुनिश्चित करणे.
* महिलांना सरकार आणि इतर एजन्सीच्या निविष्ठा आणि सेवांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न करणे.
* शाश्वत आधारावर शेतीतील महिलांच्या उत्पन्नात निव्वळ वाढ घडवून आणणे, उत्पादक जमीन, निविष्ठा, पत, तंत्रज्ञान आणि माहिती यामध्ये कृषी क्षेत्रातील महिलांचा प्रवेश वाढविणे.
* शेतीवर आधारित उपजीविका टिकवण्यासाठी मातीचे आरोग्य आणि सुपीकता वाढवणे.
* कृषी क्षेत्रात महिलांमध्ये सामुदायिक एकत्रीकरण कौशल्य विकसित करणे ज्यामुळे त्यांना शाश्वत कृषी पद्धतीचे फायदे प्रदर्शित करणे आणि स्पष्ट करणे सोपे जाईल.

**३) योजनेचे नाव - सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना.**

**योजनेची सुरुवात -** १४ ऑक्टोंबर २०१६.

योजनेचा उद्देश्य - महिला स्वयंसहायता समूहांना सवलतीच्या 0 % व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणे.

**योजनेची उद्दिष्टे -**
* ग्रामीण भागातील महिलांमध्ये उद्यमशीलता वाढावी यासाठी महिला स्वयंसहायता समूहांना सवलतीच्या 0 % व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देणे.
* महिलाची उपजीविका बळकट होऊन दारिद्र्य निर्मूलनास मदत करणे.
* महिला उद्योग व्यवसायात अधिक कार्यरत व्हाव्यात महिला सक्षमीकरण व बळकटीकरण करण्यासाठी योजना.

**योजनेची वैशिष्ट्ये -**

* ज्या महिला बचत गटाकडून आपल्या घेतलेल्या कर्जाची वेळेवर आणि नियमितपणे परतफेड करण्यात येते अशा महिला बचत गटाला योजनेअंतर्गत व्याजावर अनुदान प्रदान करण्यात येते.

* सदर योजनेअंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नियमित कर्ज पेठ करणाऱ्या केंद्र शासनाकडून व्याज अनुदान पात्र महिला स्वयंसहायता समूहांना प्रभावी 0 % दराने कर्ज उपलब्ध करून देण्यास व या संदर्भात व्याज अनुदान देण्यासाठी स्वयंसहायता समूहास देण्यात येणाऱ्या कर्जाच्या व्याजाची कमाल मर्यादा 12.50 % ठेवण्यास मान्यता देण्यात येते.

* व्याज अनुदानाच्या परीगणनेसाठी रिझर्व बँक ऑफ इंडिया द्वारे विहित कार्यपद्धती मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात येतो.

* या योजनेअंतर्गत व्याज अनुदानाची रक्कम महिला स्वयंसहायता समूहाच्या खात्यात थेट जमा करण्यात येते.

**४) योजनेचे नाव - अस्मिता योजना (किशोरवयीन मुली व महिला यांना सॅनिटरी पॅड बद्दल योजना )**

**योजनेची सुरुवात -** ८ मार्च २०१८.

**योजनेचा उद्देश्य -** माफक किंमतीमध्ये शालेय विद्यार्थिनींना व महिलांनाही सॅनिटरी नॅपकिन विकत घेणे शक्य व्हावे.

**योजनेची उद्दिष्टे -**

* मुलींचे शाळांमधील अनुपस्थितीचे प्रमाण कमी करून मुलींची शाळांमधील उपस्थिती वाढविणे.

* योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनाही अत्यंत माफक दरात सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणे.

* मुली आणि महिलांना माफक दरात सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणे व त्यांच्यासाठी आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे.

**योजनेची वैशिष्ट्ये -**

* अस्मिता योजना ग्रामीण भागातील मुली आणि महिला यांच्या आरोग्यासाठी वरदान ठरत असून मुली आणि महिलांना माफक दरात सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देण्याकरिता राज्यात अस्मिता योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

* जिल्हा परिषद शाळा मधील ११ ते १९ या वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी ही योजना अनुदान तत्त्वावर राबविण्यात येत आहे त्यासाठी जिल्हा परिषद शाळा मधील मुलींना अस्मिता कार्ड देण्यात येते.

* योजनेच्या माध्यमातून ग्रामीण महिला बचत गटामधील महिलांना मानधन देण्यात येते त्यामुळे या योजनेद्वारे रोजगार निर्माण होण्यास मदत होते.

* यासाठी महिला बचत गटांना अस्मिता अप्लिकेशन वापर करण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

* अस्मिता योजनेअंतर्गत उमेद पुरस्कृत स्वयंसहायता समूहाची (SHG) सॅनेटरी नॅपकिन मागणी नोंदविण्यासाठी व त्याचा पुरवठा करण्यासाठी अस्मिता या नावाच्या स्वतंत्र मोबाईल □पचा वापर केला जातो.

सदरील सर्व योजना या ग्रामीण विकास मंत्रालयामार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबवित असून याद्वारे मोठ्या प्रमाणावर ग्रामीण विकास घडवून आणणे तसेच अशा प्रगतिशील महाराष्ट्राची निर्मिती करणे जिथे सर्व नागरिक सुरक्षित, सन्मानाने आणि संपन्नतेचे जीवन जगतील. या सर्व योजनाद्वारे ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यात मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित केलेले आहे. सदर योजनेच्या माध्यमातून शाश्वत उपजीविका निर्माण करणे व गरिबी निर्मूलन करणे हा महत्त्वाचा उद्देश असून ग्रामीण भागामधील गरीब परिवारांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न वाढविणे तसेच रोजगार आणि स्वयंरोजगार संधी उपलब्ध करून देणे याच्यावर भर दिला आहे.

त्यामुळे या अभियानांतर्गत सर्व योजनांचा लाभ घेणाऱ्यांची संख्या अधिकाधिक असून त्यांचे आर्थिक व सामाजिक प्रगती साधल्या जात आहे तसेच त्यांचे जीवनमान उंचावण्यास या योजना मदत करत आहे.

**संदर्भ :-**

1) चौधरी प्रतिमा बी.( २०१० ):यवतमाळ स्वर्ण जयंती ग्राम स्वयं रोजगार योजनेचे आर्थिक विश्लेषण.

2) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक: एनआरएलएम योजना-३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक १८जुलै, २०१२.

3) https://vikaspedid.in/social-welfare

4) https://meld.maharashtra.gov.in

5) https://mrtba.org/mahilabachatg

6) https://shodhganga.inflibet.ac.in/simple-search?query=nrlm&go=

7) https://hi.m.wikipedia.org

8) http://diohingoli.blogspot.com.

9) http://Rural.nic.in.

10) https://mr.m.wikipedia.org.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील महिलांच्या उच्च शिक्षणासाठीच्यातरतुदी:एक अभ्यास

**सौ.अमिता मनोज चौधरी**
(संशोधक विद्यार्थी) स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ, ता. जि.अमरावती
E-mail- amitachoudhari20582@gmail.com

• **सारांश**

शिक्षण व्यवस्थेच्या विकासाकरिता २०२० मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. शिक्षण क्षेत्रामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, सर्वसमावेशकता आणि मुला-मुलींना शिक्षणाच्या समान संधी प्राप्त करून देणे हा या धोरणाचा प्रमुख उद्देश आहे. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मुलींच्या उच्चशिक्षणातील विकासाकरिता सुचविण्यात आलेल्या तरतुदींचा अभ्यास करण्यात आलेला आहे. लैंगिक समानता, शिक्षणातील प्रवेशाच्या संधी, शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ या घटकांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. संशोधनाकरिता दुय्यम संशोधन साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

• **की वर्ड**

२०२० राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, स्त्री शिक्षण, महिला सक्षमीकरण.

• **प्रस्तावना**

कोणत्याही समाजाचा सर्वांगीण विकास हा त्या समाजातील स्त्रियांच्या विकासावर अवलंबून असतो, ज्या समाजातील स्त्रियांचा शिक्षणाचा दर हा उच्च आहे त्या समाजाची प्रगती होते व पर्यायाने त्या राष्ट्राची प्रगती होते, त्यामुळे स्त्री शिक्षण हे केवळ समाज विकासाचेच नाही तर राष्ट्राच्या विकासाचे व प्रगतीचे तसेच समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे माध्यम ठरते. नवीन शैक्षणिक धोरण (NEP) २०२० हे महिला आणि मुलींच्या शिक्षणासाठी अत्यंत पुरोगामी असून, 'जेंडर इन्क्लूजन फंड' (Gender Inclusion Fund), दुर्गम भागात शाळा, मोफत गणवेश/पुस्तके आणि ५+३+३+४ रचनेद्वारे शालेय गळती रोखण्यावर भर देते. हे धोरण केवळ साक्षरता नाही, तर व्यावसायिक कौशल्ये (Vocational Skills) आणि उच्च शिक्षणात मुलींचा सहभाग वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचे उद्दिष्ट ठेवते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये स्त्री शिक्षणाच्या विकासाकरिता अनेक शैक्षणिक धोरणे योजना राबविण्यात आलेल्या आहेत, तरीसुद्धा पूर्वापार चालत आलेल्या रूढी परंपरा लिंगभेद आर्थिक स्थिती ग्रामीण लोकजीवन दळणवळणाच्या साधनांचा अभाव या आणि अशा अनेक कारणांमुळे अनेक मुली स्त्रिया ह्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या दिसून येतात. अशा पार्श्वभूमीवर शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये सर्वांगीण विकास होण्याकरिता समान संधी शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये सुधार आणि सर्वसमावेशकता निर्माण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० घोषित केली. यामध्ये शिक्षणाच्या सर्व स्तरावरील सुधारणांबरोबरच मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या अनेक योजना सुचविण्यात आलेल्या आहेत. यामध्ये मुख्यत्वे लिंगभेद दूर करणे, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या शालाबाह्य मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात परत आणणे, सर्वांगीण दृष्टीने सुरक्षित असे शैक्षणिक वातावरण निर्माण करणे, विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य करून मुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करणे यावर विशेष भर दिल्याचे दिसून येते.

आणि म्हणूनच प्रस्तुत संशोधनामध्ये NEP २०२० तील स्त्री शिक्षणाच्या तरतुदीं मांडण्यात आलेले आहेत. या अभ्यासाच्या माध्यमातून हे शैक्षणिक धोरण स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने किती महत्त्वपूर्ण आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

• **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०-ऐतिहासिक पार्श्वभूमी**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शिक्षण प्रणाली च्या विकासाकरिता मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात आले. दौलत सिंग कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली कोठारी आयोगाची स्थापना करण्यात आली आणि या आधारावर १९६८ चे शैक्षणिक धोरण जाहीर झाले.त्यानंतर 1986 चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि कालांतराने सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक क्षेत्रांमध्ये मोठे बदल झाले, व या बदलत्या गरजानुरूप शिक्षण क्षेत्रामध्ये व्यापक परिवर्तन करण्याची आवश्यकता लक्षात घेता, टी.एस.आर.सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली एका कमिटीचे गठन करण्यात आले. या कमिटीच्या शिफारशींच्या आधारे कृष्णास्वामी कस्तुरीरंगण यांच्या अध्यक्षतेखाली २९ जुलै २०२० ला नवीन शैक्षणिक धोरण जाहीर झाले. या धोरणाद्वारे शिक्षणाच्या सर्व स्तरावर सुधारणा सुचविण्यात आल्या व सर्व समावेशक अशा गुणवत्तापूर्ण, कौशल्यावर आधारित शिक्षण पद्धती विकसित करण्यावर भर देण्यात आला. नवीन एज्युकेशन पॉलिसी

मध्ये समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना स्वावलंबी बनविणे हा उद्देश ठेवलेला आहे. यामध्ये स्त्रियांकरिता अतिशय महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

"महिलांचे शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन नसून, ते देशाच्या आर्थिक विकास आणि सामाजिक समतेचा मुख्य आधार आहे." (NEP 2020)

- **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील महिलांच्या उच्च शिक्षणासाठीच्या तरतुदी**

नवीन शैक्षणिक धोरण (NEP) २०२०मध्ये महिलांच्या उच्च शिक्षणासाठी सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारलेला आहे.यामध्ये Gender Inclusion Fund (लिंग समावेशन निधी), आर्थिकदृष्ट्या मागास मुलींसाठी मोफत व्यावसायिक शिक्षण, डिजिटल साक्षरता आणि ८ लाख रुपये पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना मोफत उच्च शिक्षणाची तरतूद आहे. ज्यामुळे उच्च शिक्षणातील महिलांचे प्रमाण वाढण्यास मदत होईल.

**१.लिंग समावेशन निधी (Gender Inclusion Fund - GIF)**

नवीन शैक्षणिक धोरण (NEP) २०२० नुसार, लिंग समावेशन निधी (Gender Inclusion Fund - GIF) ची व्याख्या खालीलप्रमाणे प्रमाणे प्रस्तुत केलेली आहे.

"लिंग समावेशन निधी हा केंद्र सरकारने प्रस्तावित केलेला एक विशेष राखीव निधी आहे, ज्याचा मुख्य उद्देश देशातील सर्व मुली आणि ट्रान्सजेंडर (तृतीयपंथीय) विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळवून देण्यासाठी येणारे अडथळे दूर करणे, त्यांना सुरक्षित शैक्षणिक वातावरण प्रदान करणे आणि शिक्षणातील लिंगाधारित तफावत (Gender Gap) पूर्णपणे मिटवणे हा आहे". (शिक्षण मंत्रालय, २०२०)

ही एक अत्यंत महत्त्वाची आणि नाविन्यपूर्ण तरतूद आहे. हा एक विशेष प्रकारचा निधी असून त्याद्वारे मुली आणि ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना येणारे अडथळे दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.या निधीचा मुख्य उद्देश देशातील सर्व मुली आणि ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांना समान आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याची क्षमता निर्माण करणे हा आहे.सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित गटांमधील (SEDGs) या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे धोरणाचे ध्येय आहे.

हा निधी केंद्र सरकारद्वारे राज्यांना उपलब्ध करून दिला जातो, ज्याचा वापर खालील गरजांसाठी केला जातो:

१.शाळांमध्ये स्वच्छ प्रसाधनगृहे (Toilets), पिण्याचे पाणी आणि सुरक्षित वातावरणाची निर्मिती करणे.

२.ज्या मुली शाळा सोडून देतात, त्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सायकल वाटप किंवा थेट रोख लाभ (Cash Transfers) यांसारख्या योजना राबवणे.

३.दुर्गम भागातील मुलींच्या सुरक्षिततेसाठी निवासी शाळा (उदा. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय) आणि शिक्षकांसाठी निवासाची सोय करणे.

४.समाजात शिक्षणाबद्दलचे गैरसमज दूर करण्यासाठी आणि लिंग समानतेबद्दल शिक्षकांचे संवेदीकरण (Sensitization) करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

"लिंग समावेशन निधीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकार आणि नागरी समाज यांच्यातील संवाद महत्त्वपूर्ण मानला जातो." (शिक्षण मंत्रालय, २०२०)

**२. वंचित घटकांसाठी विशेष शिक्षण योजना**

दुर्गम व ग्रामीण भागातील शिक्षणापासून अनेक कारणांमुळे वंचित राहणाऱ्या विद्यार्थिनी करिता सुरक्षित व सुलभ शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आलेला आहे. यासाठी कस्तुरबा गांधी विद्यालयाचा विस्तार करून या शाळांची मर्यादा इयत्ता बारावी पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. जेणेकरून मुलींना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाकरिता लांब जाण्याची गरज पडू नये, तरीसुद्धा ज्या मुली घरून शाळेपर्यंत पोहोचू शकत नाही त्यांच्याकरिता वस्तीगृहांची सोय करून पालकांच्या मुलींच्या सुरक्षितते च्या काळजीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. शाळा घरापासून लांब असल्यास मोफत सायकल तसेच स्कूल बस व व्हॅन उपलब्ध करून देण्याची सोय करण्यात आलेली आहे. जेणेकरून प्रवासाच्या भीतीने मुलींचे शिक्षण सुटणार नाही. ग्रामीण आणि दुर्गम भागात महिला आदर्श (Role Models) निर्माण करण्यासाठी महिला शिक्षकांच्या भरतीला प्राधान्य देण्यात येणार आहे,जेणेकरून मुलींना मोकळा संवाद साधता येऊन एक सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्माण होईल. मुलींना आत्मसंरक्षण करता यावे याकरिता शाळांमध्ये शारीरिक व मानसिक सक्षमीकरणाचे प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आलेले आहे.

**३. व्यावसायिक शिक्षणावर भर (Vocational Education):**

NEP २०२० नुसार मुलींना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. यासाठी इयत्ता सहावीपासून अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक शिक्षणाची ओळख करून देण्यात येणार आहे. यामध्ये कोडीग, सुतारकाम, बागकाम, इलेक्ट्रिकल काम तसेच कलाकुसरीचे काम शिकविले जाणार आहे.

ISSN : 2278-9308
February 2026

तसेच वर्षातून दहा दिवस 'बॅगलेस पिरेड' म्हणून प्रत्यक्ष क्षेत्रभेटी देऊन स्थानिक कारागिरांसोबत व्यावसायिक कार्यानुभव तिला जाणार आहे. सोबतच आर्थिक स्वावलंबनाकरिता मुलींच्या आवडीप्रमाणे त्यांना शिवणकाम, ब्युटीपार्लर, नर्सिंग, फूड प्रोसेसिंग, सॉफ्टवेअर डिझाईनिंग सारख्या कोर्सेस चे प्रशिक्षण देऊन शिक्षण पूर्ण होताच त्यांना आपला स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. मुलींचा आत्मविश्वास वाढविण्याकरिता त्यांना सुट्ट्यांच्या काळामध्ये Internship ची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**४. डिजिटल साक्षरता (Digital Literacy):**

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात सर्वांगीण विकासासाठी NEP २०२० मध्ये डिजिटल शिक्षणाला विशेष स्थान दिले आहे, यासाठी ग्रामीण व दुर्गम भागातही तंत्रज्ञानाचा वापर करून संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षण देण्यावर भर दिला आहे. यामुळे संपूर्ण जगाचे ज्ञान कोणत्याही भौगोलिक अडथळ्याशिवाय उपलब्ध होत आहे. यासाठी शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूम,कम्प्युटर लॅब विकसित करण्यात आल्या आहेत. जेणेकरूनलहानपणापासूनच विद्यार्थ्यांना लॅपटॉप व टॅबलेट वापरण्याचा सराव होईल. उच्च शिक्षणाकरिता 'दीक्षा' (DIKSHA) आणि 'स्वयम' (SWAYAM) या सारखे ऑनलाईन प्लॅटफॉर्म मोफत पणे घरात बसून शिकण्याची संधी उपलब्ध करून देतात. मुलींना केवळ संगणक चालविणेच नाही तर कोडींग, आर्टिफिशल इंटेलिजन्स सारखे प्रगत विषय शिकण्यास प्रोत्साहन दिले जात आहे, जेणेकरून भविष्यात तांत्रिक क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी त्यांना प्राप्त होतील. डिजिटल शिक्षणामध्ये मुलींना इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी याचेही ज्ञान सायबर सुरक्षिततेच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून दिले जाणार आहे.

**५. उच्च शिक्षणाला प्रोत्साहन आणि आर्थिक सवलती**

आर्थिक कारणांमुळे शालेय शिक्षणानंतर उच्च शिक्षणामध्ये अडचणी येऊ नये यासाठी NEP २०२० मध्ये विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. ज्या भागात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे तेथे 'विशेष शैक्षणिक क्षेत्र' घोषित करून मुलींच्या उच्च शिक्षणातील प्रवेशाचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष मोहिमा राबविण्यात येणार आहेत.गरजू व हुशार मुलींना केंद्र व राज्य सरकार तर्फे विविध प्रकारच्या स्कॉलरशिप्स दिल्याजातात. (उदाहरणार्थ: नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीचा भाग म्हणून, महाराष्ट्र सरकारने ८ लाख रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना इंजिनिअरिंग, मेडिकल, फार्मसी आणि कृषी यांसारख्या ८०० हून अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १००% शिक्षण शुल्क (Tuition Fees) माफी जाहीर केली आहे.)[Government of Maharashtra, Higher & Technical Education Dept. GR 2024]

आर्थिक टंचाईमुळे कोणत्याही हुशार मुलीला तांत्रिक किंवा व्यावसायिक शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, हे यामागचे प्रमुख उद्दिष्ट आहे.जर एखाद्या मुलीला कुठल्याही कारणामुळे आपले शिक्षण पूर्ण करता आले नाही तर मल्टिपल एंट्री आणि एक्झिट (Multiple Entry & Exit) या धोरणानुसार तिला पुन्हा तिचे सुटलेले शिक्षण सुरू करता येऊ शकते, यामुळे तिचा वेळ व आधीची मेहनत वाया जाणार नाही, हे या धोरणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. उच्च शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या मुलींना स्वस्त दरात विद्यापीठ व महाविद्यालयाच्या सुरक्षित परिसरामध्ये वस्तीगृहाची सोय करण्यावर भर दिला गेला आहे. तसेच क्रेडिट बँकेमुळे मुलींचे 'क्रेडिट्स' (गुण) डिजिटल पद्धतीने साठविले जातात, व ज्यामुळे त्यांना एका कॉलेजमधून दुसऱ्या कॉलेजमध्ये बदली करून घेणे सोपे होते.

**६. आर्थिक साक्षरता आणि सामाजिक जाणीवजागृती (Financial Literacy & Awareness):**

केवळ सोयी-सुविधा देऊन चालणार नाही, तर मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांचा आणि समाजाचा दृष्टिकोन बदलणे हे NEP 2020 चे एक मुख्य उद्दिष्ट आहे.ग्रामीण भागात आजही मुलींच्या शिक्षणापेक्षा त्यांच्या लग्नाला अधिक महत्त्व दिले जाते. हे बदलण्यासाठी सरकार पालकांचे समुपदेशन करते आणि त्यांना मुलींच्या शिक्षणाचे आर्थिक व सामाजिक फायदे पटवून देते.मुलींना लहानपणापासूनच बचतीचे महत्त्व, बँकिंग व्यवहार आणि सरकारी योजनांची (उदा. सुकन्या समृद्धी योजना) माहिती दिली जाते. यामुळे त्या भविष्यात स्वतःचे आर्थिक निर्णय स्वतः घेऊ शकतात.शाळांच्या अभ्यासक्रमातच अशा पाठांचा समावेश केला जात आहे, ज्यामुळे मुले आणि मुली एकमेकांचा आदर करतील आणि समाजात स्त्री-पुरुष समानता निर्माण होईल.सरकार 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या मोहिमांना NEP 2020 च्या धोरणांशी जोडून तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवत आहे, जेणेकरून एकही मुलगी शिक्षणापासून वंचित राहणार नाही.

- **निष्कर्ष:**

अशा प्रकारे नवीन शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आलेल्या सर्व तरतुदी मुलींमधील आत्मविश्वास वाढविणाऱ्या आहेत, हे धोरण शैक्षणिक बदलांचा केवळ आराखडा नसून ते महिला सक्षमीकरणाचे प्रभावी माध्यम आहे. या धोरणानुसार स्त्रियांच्या शिक्षणातील सामाजिक, आर्थिक व भौगोलिक असे सर्व अडथळे दूर करून मुलींना शिक्षित, सुरक्षित व स्वावलंबी बनविण्यासाठी अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. आपल्या देशाला जगामध्ये उभारी घेण्याकरिता देशातील प्रत्येक मुलीला उच्चशिक्षित आणि कौशल्य संपन्न करणे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

• **संदर्भ ग्रंथसूची(Reference List)**

(Online Sources)

Ministry of Education. (2020). National Education Policy 2020: Official Information Page. Government of India. www.education.gov.in (Retrieved March 7, 2026).

Ministry of Education. (2020). National Education Policy 2020: Curriculum and Pedagogy in Schools. Government of India. www.education.gov.in (Retrieved March 7, 2026).

Ministry of Education. (2023, July 31). National Education Policy, 2020 provides for setting up a Gender Inclusion Fund (GIF) especially for girls and transgender students to provide them equitable quality education. Government of India. www.education.gov.in (Retrieved March 7, 2026).

NCERT. (2020). Teacher and Teacher Education under NEP 2020: Policy Document. National Council of Educational Research and Training. ncert.nic.in (Retrieved March 7, 2026).

शिक्षण मंत्रालय. (२०२०). राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020): अधिकृत दस्तऐवज. भारत सरकार, नवी दिल्ली. www.education.gov.in (प्रवेश दिनांक: ७ मार्च २०२६).

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# डिजिटल अर्थशास्त्राचा वाणिज्य शिक्षणावर होणारा प्रभाव: अभ्यासक्रमातील बदलाचे विश्लेषण

**डॉ.आकाश प्रदीप बिडवई**
M.com,B.ed,Ph.D (वाणिज्य व व्यवस्थापन) E-mail-abidwai95@Gmail.com ,Mo.9405432556

**सारांश**

प्रस्तुत संशोधन लेखात डिजिटल अर्थशास्त्रामुळे वाणिज्य शिक्षणातील अभ्यासक्रमात झालेले बदल, त्याची आवश्यकता आणि विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेवर होणारा प्रभाव याचे विश्लेषण करण्यात आले आहे. कारण २१व्या शतकात डिजिटल तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढलेल्या वापरामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत मोठे परिवर्तन झाले आहे. या परिवर्तनाला "डिजिटल अर्थशास्त्र" असे संबोधले जाते. ई-कॉमर्स, डिजिटल पेमेंट, फिनटेक, डेटा ॲनालिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि ब्लॉकचेन यांसारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे व्यवसायाच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झाले आहेत. या बदलांचा परिणाम वाणिज्य शिक्षणावरही स्पष्टपणे दिसून येतो. पारंपरिक वाणिज्य अभ्यासक्रमांमध्ये डिजिटल कौशल्ये, तंत्रज्ञानाधारित व्यवसाय व्यवस्थापन आणि डेटा विश्लेषण यांसारख्या विषयांचा समावेश करण्याची गरज निर्माण झाली आहे. या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधन लेखात या विषयावर चर्चा करण्यात आली आहे.

**कीवर्ड:** डिजिटल अर्थशास्त्र, वाणिज्य शिक्षण, ई-कॉमर्स, फिनटेक, कौशल्य विकास.

**प्रस्तावना**

मागील दोन दशकांत माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून आले आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन, क्लाउड कॉम्प्युटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्म यांच्या व्यापक वापरामुळे आर्थिक व्यवहार अधिक वेगवान, पारदर्शक आणि सुलभ झाले आहेत. या बदलत्या आर्थिक व्यवस्थेला "डिजिटल अर्थव्यवस्था" किंवा "डिजिटल अर्थशास्त्र" असे संबोधले जाते. डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने व्यापार, सेवा, बँकिंग आणि विपणन क्षेत्रांमध्ये नव्या संधी निर्माण झाल्या असून व्यवसाय करण्याच्या पद्धतीत मोठे परिवर्तन झाले आहे.

डिजिटल अर्थशास्त्रामुळे व्यवसाय व्यवहारांचे स्वरूप, उत्पादन प्रक्रिया, विपणन धोरणे तसेच ग्राहकांचा सहभाग या सर्व बाबींमध्ये लक्षणीय बदल दिसून येतात. ई-कॉमर्स, डिजिटल पेमेंट प्रणाली, फिनटेक, डेटा ॲनालिटिक्स आणि ऑनलाइन विपणन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. परिणामी उद्योग व सेवा क्षेत्राला डिजिटल कौशल्ये, तांत्रिक ज्ञान आणि नवोन्मेषी विचारसरणी असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक झाले आहे.

या पार्श्वभूमीवर वाणिज्य शिक्षणाच्या पारंपरिक अभ्यासक्रमात बदल करून तो अधिक कौशल्याधारित, तंत्रज्ञानाभिमुख आणि उद्योगसंगत बनविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक आर्थिक परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्ये प्राप्त होण्यास मदत होते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1.डिजिटल अर्थशास्त्राची संकल्पना आणि स्वरूप स्पष्ट करणे.
2.वाणिज्य शिक्षणावर डिजिटल अर्थव्यवस्थेचा प्रभाव अभ्यासणे.
3.वाणिज्य अभ्यासक्रमात झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.
4.डिजिटल कौशल्यांचा विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम माहिती पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. माहिती संकलनासाठी विविध संशोधन लेख, शैक्षणिक अहवाल, सरकारी धोरणे, पुस्तके आणि इंटरनेट स्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. तसेच वाणिज्य शिक्षणातील अभ्यासक्रमातील बदलांचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

**डिजिटल अर्थशास्त्राची संकल्पना**

डिजिटल अर्थशास्त्र म्हणजे डिजिटल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आर्थिक व्यवहार, उत्पादन, वितरण आणि सेवा व्यवस्थापनाची प्रक्रिया होय. इंटरनेट, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान, डिजिटल प्लॅटफॉर्म, डेटा विश्लेषण आणि आधुनिक तांत्रिक साधनांच्या माध्यमातून आर्थिक क्रियाकलाप पार पाडले जातात, त्याला डिजिटल अर्थव्यवस्था असे म्हणतात. या अर्थव्यवस्थेत माहिती आणि तंत्रज्ञान हे महत्त्वाचे घटक ठरतात.

डिजिटल अर्थशास्त्रामुळे व्यापार, बँकिंग, वित्तीय सेवा, विपणन आणि ग्राहक व्यवहार अधिक जलद, पारदर्शक आणि सुलभ झाले आहेत. ई-कॉमर्स, ऑनलाइन पेमेंट प्रणाली, मोबाइल बँकिंग, फिनटेक, क्लाउड कॉम्प्युटिंग आणि डेटा ॲनालिटिक्स यांसारख्या तंत्रज्ञानामुळे आर्थिक व्यवहारांचे स्वरूप बदलले आहे.

डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे जागतिक बाजारपेठ अधिक जोडली गेली असून व्यवसायांना नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे उत्पादनक्षमता वाढणे, व्यवहारांचा वेग वाढणे आणि नवोन्मेषाला चालना मिळणे असे सकारात्मक परिणाम दिसून येतात. आधुनिक काळात आर्थिक विकासासाठी डिजिटल अर्थशास्त्र अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

**डिजिटल अर्थव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत**

डिजिटल अर्थव्यवस्थेची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहेत ज्यामुळे आधुनिक आर्थिक व्यवस्थेचे स्वरूप बदलले आहे. सर्वप्रथम, ई-कॉमर्स आणि ऑनलाइन व्यापार हे डिजिटल अर्थव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. इंटरनेटच्या माध्यमातून वस्तू व सेवांची खरेदी-विक्री सुलभ झाली असून व्यवसाय जागतिक स्तरावर पोहोचला आहे. दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे डिजिटल पेमेंट प्रणाली. मोबाईल बँकिंग, UPI, डिजिटल वॉलेट्स आणि ऑनलाइन बँकिंगच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार अधिक वेगवान, सुरक्षित आणि पारदर्शक झाले आहेत.

तिसरे वैशिष्ट्य म्हणजे डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया. आजच्या डिजिटल युगात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या डेटाच्या विश्लेषणाच्या आधारे उद्योग आणि संस्था प्रभावी व्यवसाय निर्णय घेतात. चौथे वैशिष्ट्य म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऑटोमेशनचा वापर. या तंत्रज्ञानामुळे उत्पादन प्रक्रिया, सेवा वितरण आणि व्यवस्थापन अधिक कार्यक्षम झाले आहे. शेवटी, जागतिक डिजिटल बाजारपेठ हे डिजिटल अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. डिजिटल तंत्रज्ञानामुळे जगभरातील बाजारपेठा परस्पर जोडल्या गेल्या असून व्यवसायांना आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार करण्याच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**वाणिज्य शिक्षणावर डिजिटल अर्थशास्त्राचा प्रभाव**

**ई-कॉमर्स आणि डिजिटल व्यवसाय**

डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वाढीमुळे ई-कॉमर्स आणि डिजिटल व्यवसाय क्षेत्राचा वेगाने विस्तार झाला आहे. पारंपरिक व्यापार पद्धतींमध्ये दुकान, बाजारपेठ आणि प्रत्यक्ष व्यवहार यांना महत्त्व होते; परंतु आज ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून व्यापाराचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. Amazon, Flipkart, Meeshoयांसारख्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्ममुळे वस्तू आणि सेवांची खरेदी-विक्री जागतिक स्तरावर सुलभ झाली आहे. या बदलांचा परिणाम वाणिज्य शिक्षणावरही दिसून येतो. विद्यार्थ्यांना आधुनिक व्यापार पद्धती समजण्यासाठी अभ्यासक्रमात ई-कॉमर्स, डिजिटल मार्केटिंग, ऑनलाइन ग्राहक व्यवस्थापन आणि सोशल मीडिया विपणन यांसारख्या विषयांचा समावेश करण्यात येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन व्यवसाय उभारणे, डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करणे आणि जागतिक बाजारपेठेतील स्पर्धा समजून घेणे शक्य होते. परिणामी वाणिज्य शिक्षण अधिक आधुनिक आणि उद्योगाभिमुख बनत आहे.

**डिजिटल पेमेंट आणि फिनटेक**

डिजिटल तंत्रज्ञानामुळे वित्तीय व्यवहारांच्या पद्धतीत मोठे परिवर्तन झाले आहे. UPI, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, डिजिटल वॉलेट्स आणि क्रिप्टोकरन्सी यांसारख्या तंत्रज्ञानामुळे आर्थिक व्यवहार जलद, सुरक्षित आणि पारदर्शक झाले आहेत. भारतात डिजिटल इंडिया मोहिमेमुळे डिजिटल पेमेंटचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या पार्श्वभूमीवर वाणिज्य शिक्षणातही वित्तीय तंत्रज्ञान या नव्या क्षेत्राला महत्त्व प्राप्त झाले आहे. बँकिंग आणि वित्तीय व्यवस्थापनाच्या अभ्यासक्रमात डिजिटल बँकिंग, ब्लॉकचेन तंत्रज्ञान, ऑनलाइन पेमेंट प्रणाली आणि सायबर सुरक्षा यांसारख्या विषयांचा समावेश वाढत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक वित्तीय प्रणालीचे ज्ञान मिळते आणि ते डिजिटल वित्तीय व्यवस्थापनाशी संबंधित रोजगाराच्या संधींसाठी सक्षम बनतात.

**डेटा ॲनालिटिक्स आणि निर्णय प्रक्रिया**

डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये डेटा हा अत्यंत महत्त्वाचा घटक बनला आहे. व्यवसाय संस्था ग्राहकांचे वर्तन, बाजारातील मागणी, विक्रीचे ट्रेंड आणि आर्थिक धोरणे समजून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात डेटा संकलित करतात. या डेटाचे विश्लेषण करून प्रभावी आणि योग्य व्यवसाय निर्णय घेतले जातात. त्यामुळे डेटा ॲनालिटिक्स, बिझनेस ॲनालिटिक्स आणि बिग डेटा यांसारख्या विषयांचे महत्त्व वाढले आहे. वाणिज्य शिक्षणाच्या अभ्यासक्रमातही या विषयांचा समावेश करण्यात येत आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना डेटा संकलन, विश्लेषण आणि त्यावर आधारित निर्णय प्रक्रिया समजून घेण्याची क्षमता विकसित होते. अशा प्रकारचे ज्ञान व्यवसाय व्यवस्थापन, विपणन धोरणे आणि आर्थिक नियोजनासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

**कौशल्य-आधारित शिक्षण**

डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे केवळ सैद्धांतिक ज्ञान पुरेसे नसून व्यावहारिक आणि तांत्रिक कौशल्यांची आवश्यकता वाढली आहे. उद्योग क्षेत्राला डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारे आणि समस्यांचे तांत्रिक पद्धतीने निराकरण करणारे प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक आहे. त्यामुळे वाणिज्य शिक्षणात कौशल्य-आधारित शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जात आहे. विविध महाविद्यालये आणि विद्यापीठे विद्यार्थ्यांना डिजिटल मार्केटिंग, डेटा विश्लेषण, ई-कॉमर्स व्यवस्थापन, फिनटेक आणि उद्योजकता यांसारख्या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण देत आहेत. तसेच इंटर्नशिप, प्रकल्प कार्य आणि उद्योग-संलग्न प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढते आणि ते आधुनिक व्यवसाय वातावरणाशी सहज जुळवून घेऊ शकतात.

**वाणिज्य अभ्यासक्रमातील बदल**

डिजिटल अर्थशास्त्राच्या वाढत्या प्रभावामुळे वाणिज्य शिक्षणाच्या अभ्यासक्रमात महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत. आधुनिक व्यवसाय व्यवस्थापन आणि जागतिक बाजारपेठेतील स्पर्धा लक्षात घेऊन अभ्यासक्रम अधिक तंत्रज्ञानाभिमुख आणि कौशल्याधारित बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्वप्रथम, ई-कॉमर्स आणि डिजिटल मार्केटिंग या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. ऑनलाइन व्यापार, सोशल मीडिया विपणन, ग्राहक संबंध व्यवस्थापन आणि डिजिटल जाहिरात यांसारख्या संकल्पनांचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते.

याशिवाय फिनटेक आणि डिजिटल बँकिंग या विषयांना महत्त्व प्राप्त झाले आहे. डिजिटल पेमेंट प्रणाली, ब्लॉकचेन तंत्रज्ञान, ऑनलाइन बँकिंग आणि वित्तीय तंत्रज्ञानाच्या नव्या संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या जातात. तसेच डेटा ॲनालिटिक्स आणि बिझनेस इंटेलिजन्स यांसारख्या विषयांचा समावेश करून विद्यार्थ्यांना डेटा विश्लेषणाच्या आधारे व्यवसाय निर्णय घेण्याचे कौशल्य विकसित केले जाते.तसेच स्टार्टअप आणि उद्योजकता शिक्षण या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवउद्योजकता आणि स्वयंरोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले जाते. यासोबतच उद्योग-संलग्न प्रशिक्षण आणि इंटर्नशिप कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग अनुभव मिळतो. या सर्व बदलांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक व्यवसाय वातावरणाशी जुळवून घेणे आणि रोजगाराच्या संधी मिळवणे अधिक सुलभ होते.

**आव्हाने**

डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वाढत्या प्रभावामुळे वाणिज्य शिक्षणात अनेक सकारात्मक बदल झाले असले तरी त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसमोर काही महत्त्वाची आव्हानेही उभी आहेत. सर्वप्रथम, अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये डिजिटल पायाभूत सुविधांचा अभाव आढळतो. संगणक प्रयोगशाळा, उच्चगती इंटरनेट, आधुनिक सॉफ्टवेअर आणि तांत्रिक साधनांची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचा पूर्ण लाभ मिळत नाही.

दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता. डिजिटल अर्थशास्त्राशी संबंधित विषय शिकविण्यासाठी तांत्रिक ज्ञान आणि आधुनिक कौशल्ये असलेले शिक्षक आवश्यक असतात; परंतु अनेक ठिकाणी अशा प्रशिक्षित शिक्षकांची उपलब्धता मर्यादित आहे. तिसरे आव्हान म्हणजे तांत्रिक साधनांचा अपुरा वापर. काही संस्थांमध्ये आवश्यक साधने उपलब्ध असली तरी त्यांचा प्रभावीपणे वापर केला जात नाही.

तसेच अभ्यासक्रम अद्ययावत करण्यातील विलंब हीही एक महत्त्वाची समस्या आहे. डिजिटल क्षेत्रात झपाट्याने बदल होत असताना शिक्षण संस्थांचे अभ्यासक्रम वेळेवर बदलले जात नाहीत. याशिवाय ग्रामीण भागातील डिजिटल दरी हे मोठे आव्हान आहे. इंटरनेट सुविधा आणि तांत्रिक साधनांच्या अभावामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाच्या संधी मर्यादित प्रमाणात मिळतात. त्यामुळे या सर्व आव्हानांवर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

डिजिटल अर्थशास्त्रामुळे वाणिज्य शिक्षणाच्या स्वरूपात लक्षणीय बदल घडून आले आहेत. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढलेल्या वापरामुळे व्यवसाय व्यवहार, वित्तीय सेवा, विपणन पद्धती आणि व्यवस्थापनाच्या कार्यपद्धती अधिक तंत्रज्ञानाधारित झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आधुनिक व्यवसाय व्यवस्थापनासाठी डिजिटल कौशल्ये, डेटा विश्लेषण, ई-कॉमर्स, फिनटेक आणि डिजिटल मार्केटिंग यांसारख्या क्षेत्रांचे ज्ञान अत्यावश्यक झाले आहे. त्यामुळे वाणिज्य शिक्षणाचा अभ्यासक्रम अधिक आधुनिक, कौशल्याधारित आणि उद्योगाभिमुख बनविण्याची गरज निर्माण झाली आहे.विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान देण्याऐवजी त्यांना व्यावहारिक कौशल्ये, तांत्रिक ज्ञान आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर भर देणे आवश्यक आहे. यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करणे, उद्योग-संलग्न प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे तसेच ई-कॉमर्स, डेटा ॲनालिटिक्स आणि उद्योजकता यांसारख्या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करणे गरजेचे आहे.

याशिवाय शिक्षकांचे प्रशिक्षण, डिजिटल पायाभूत सुविधा आणि अद्ययावत अभ्यासक्रम यांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. अशा प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढेल आणि ते बदलत्या आर्थिक व तांत्रिक वातावरणाशी

सहज जुळवून घेऊ शकतील. परिणामी देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल तसेच ज्ञानाधिष्ठित आणि तंत्रज्ञानसमृद्ध समाजनिर्मितीसही हातभार लागेल.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1.Implementation of NEP- Digital Learning, Ministry of Education, Govt. of India
2.RajatSinghal -NEP 2020 and Online Education – A Paradigm Shift, March 2021
3.Mosteanu, N. (2020). Finance digitalization and its impact on labour market. Technium Social Studies Journal, 8, 598–605.
4.Chankseliani, M., &McCowan, T. (2021). Higher education and the sustainable development goals. Higher Education, 81(1
5.Sabbagh, K., El-Darwiche, B., Friedrich, R., Singh, M. (2012). Maximizing the Impact of Digitization, PwC
6.Holland, P., & Brewster, C. (2021). Contemporary work and the future of employment in developed countries. Taylor & Francis.
7.Creswell, J. W. (2012). Educational research: Planning, conducting, and evaluating quantitative and qualitative research. Pearson Education, Inc.
8.Chinoracky, R., &Corejova, T. (2019). Impact of digital technologies on Labour market and the transport sector. Transportation Research Procedia, 40, 994–1001.
9.Berger, R. (2015). The digital transformation of industry, BDI, https://www.rolandberger.com/media/pdf/Roland_Berger_digital_transformation_of_industry_20150315.pdf. Accessed: 21.05.2019.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# उच्च शिक्षणात भारतीय महिलांचा वाढता सहभाग : एक समाजशास्त्रीय अभ्यास

कु. सारिका शंकरराव वासनिक
संशोधक विद्यार्थी (समाजशास्त्र विभाग) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**प्रस्तावना:**

भारतीय समाजात शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षण हे केवळ व्यक्तीच्या ज्ञानवृद्धीसाठी नसून सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनासाठी देखील एक प्रभावी साधन आहे. विशेषतः महिलांच्या शिक्षणामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. महिलांचे शिक्षण हे कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचे महत्त्वपूर्ण आधारस्तंभ मानले जाते. शिक्षित महिला केवळ स्वतःच्या आयुष्याची उन्नती करत नाहीत, तर त्या संपूर्ण कुटुंब आणि समाजाच्या प्रगतीत सक्रिय भूमिका बजावतात.भारतीय समाजाच्या इतिहासात पाहिले तर महिलांना शिक्षणाच्या संधी अत्यंत मर्यादित प्रमाणात उपलब्ध होत्या. पारंपरिक सामाजिक व्यवस्था, पितृसत्ताक विचारसरणी, बालविवाह, आर्थिक दुर्बलता, लैंगिक भेदभाव आणि महिलांच्या स्वातंत्र्यावर असलेली सामाजिक बंधने यामुळे महिलांचे शिक्षण दीर्घकाळ दुर्लक्षित राहिले. अनेक ठिकाणी मुलींच्या शिक्षणाला महत्त्व दिले जात नव्हते आणि त्यांना केवळ घरगुती कामांपुरते मर्यादित ठेवले जात असे.

परंतु काळानुसार सामाजिक विचारांमध्ये बदल होत गेले. सामाजिक सुधारकांच्या प्रयत्नांमुळे आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे महिलांच्या शिक्षणाबाबत समाजात जागरूकता निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने महिलांच्या शिक्षणाला विशेष प्राधान्य दिले. शिक्षणाच्या क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी अनेक धोरणे आणि योजना राबविण्यात आल्या. संविधानाने स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार दिल्यामुळे महिलांच्या शिक्षणाला नवी दिशा मिळाली.

गेल्या काही दशकांमध्ये उच्च शिक्षण क्षेत्रात महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येतो. विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये महिला विद्यार्थिनींची संख्या सातत्याने वाढत आहे. सरकारी योजना, शिष्यवृत्ती, सामाजिक जागरूकता, महिलांसाठी आरक्षण आणि शिक्षण संस्थांची वाढ यामुळे महिलांना उच्च शिक्षण घेण्याची संधी अधिक प्रमाणात उपलब्ध झाली आहे.

अलीकडील आकडेवारीनुसार भारतातील उच्च शिक्षणात महिलांचे प्रमाण जवळपास 48 टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. ही बाब शिक्षण क्षेत्रातील लैंगिक समतेकडे होत असलेल्या प्रगतीचे द्योतक आहे. त्यामुळे भारतीय महिलांच्या उच्च शिक्षणातील वाढत्या सहभागाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

- भारतातील उच्च शिक्षणात महिलांच्या सहभागाचे स्वरूप समजून घेणे.
- महिलांच्या शिक्षणवाढीमागील प्रमुख कारणांचे विश्लेषण करणे.
- उच्च शिक्षण घेताना महिलांना भेडसावणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
- महिलांच्या उच्च शिक्षणामुळे समाजात घडणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.
- भारतीय महिलांच्या शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा

भारतातील महिलांच्या शिक्षणाचा इतिहास अत्यंत गुंतागुंतीचा आहे. प्राचीन काळात काही प्रमाणात महिलांना शिक्षणाची संधी उपलब्ध होती. वेदकालीन काळात गार्गी, मैत्रेयी यांसारख्या विदुषींचा उल्लेख आढळतो. या विदुषी तत्त्वज्ञान, धर्म आणि सामाजिक विषयांवर चर्चा करत असत. त्यामुळे त्या काळात काही प्रमाणात महिलांना ज्ञानार्जनाची संधी होती असे दिसते.

परंतु नंतरच्या काळात सामाजिक परिस्थितीत बदल झाला. मध्ययुगीन काळात महिलांच्या स्वातंत्र्यावर विविध प्रकारची बंधने लादली गेली. पितृसत्ताक व्यवस्थेमुळे महिलांना घराच्या चौकटीत मर्यादित ठेवण्यात आले. बालविवाह, पर्दा प्रथा, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक परंपरा यामुळे महिलांचे शिक्षण जवळजवळ थांबले.

ब्रिटिश कालखंडात सामाजिक सुधारणा चळवळींमुळे महिलांच्या शिक्षणाला नवी दिशा मिळाली. अनेक सामाजिक सुधारकांनी महिलांच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी भारतातील मुलींच्या शिक्षणासाठी मोठे योगदान दिले. सावित्रीबाई फुले यांनी 1848 मध्ये पुण्यात भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. हा भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

याशिवाय महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिलांच्या उच्च शिक्षणासाठी मोठे योगदान दिले. त्यांनी महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा उपक्रम हाती घेतला. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथा बंद करण्यासाठी आणि महिलांच्या सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न केले.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना आणि धोरणे राबवली. शिक्षणाचा अधिकार, स्त्री-पुरुष समानता, शिष्यवृत्ती योजना आणि विशेष कार्यक्रम यामुळे महिलांच्या शिक्षणात लक्षणीय वाढ झाली.

**भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती:**

भारताची उच्च शिक्षण व्यवस्था जगातील सर्वात मोठ्या शिक्षण व्यवस्थांपैकी एक मानली जाते. देशात हजारो महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन संस्था आणि तांत्रिक शिक्षण संस्था कार्यरत आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात उच्च शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे.

अलीकडील आकडेवारीनुसार भारतातील उच्च शिक्षणात एकूण विद्यार्थ्यांची संख्या सुमारे 4.46 कोटी आहे. यामध्ये महिला विद्यार्थिनींची संख्या 2 कोटींहून अधिक आहे. यावरून महिलांचा उच्च शिक्षणातील सहभाग सातत्याने वाढत असल्याचे स्पष्ट होते.भारतामध्ये कला, विज्ञान, वाणिज्य, वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि संशोधन अशा विविध क्षेत्रांमध्ये शिक्षणाची संधी उपलब्ध आहे. तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातही महिलांचा सहभाग हळूहळू वाढत आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 नुसार शिक्षणाचा विस्तार, गुणवत्ता सुधारणा आणि समान संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या धोरणामुळे महिलांच्या शिक्षणाला आणखी प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे.

**उच्च शिक्षणात महिलांचा वाढता सहभाग:**

गेल्या काही दशकांमध्ये भारतातील उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढलेला आहे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये महिला विद्यार्थिनींची संख्या सातत्याने वाढत आहे.उपलब्ध आकडेवारीनुसार उच्च शिक्षणात महिलांचे एकूण नोंदणी प्रमाण सुमारे 48 टक्के आहे. काही राज्यांमध्ये तर महिलांचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त आहे. 2014 ते 2022 या कालावधीत महिला विद्यार्थिनींच्या संख्येत सुमारे 38 टक्के वाढ झाल्याचे दिसून येते.पीएचडी स्तरावरही महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. सध्या पीएचडी स्तरावर महिलांचे प्रमाण जवळपास 47 टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. ही बाब संशोधन क्षेत्रात महिलांची वाढती उपस्थिती दर्शवते.

कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षण, वैद्यकीय आणि सामाजिक विज्ञान या क्षेत्रांमध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसते. काही अभ्यासक्रमांमध्ये तर महिलांचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक आहे. उदाहरणार्थ शिक्षण, कला आणि वैद्यकीय क्षेत्रात महिलांची संख्या जास्त आहे.

**महिलांच्या शिक्षणवाढीची कारणे:**

**1) सरकारी धोरणे-**

भारत सरकारने महिलांच्या शिक्षणासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. “बेटी बचाओ बेटी पढाओ”, “सुकन्या समृद्धी योजना”, विविध शिष्यवृत्ती योजना आणि मुलींसाठी विशेष शिक्षण कार्यक्रम यामुळे मुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन मिळाले आहे.

**2) सामाजिक जागरूकता-**

आजच्या समाजात शिक्षणाचे महत्त्व मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. पालक आपल्या मुलींना उच्च शिक्षण देण्यास प्रोत्साहित करतात. मुलींच्या शिक्षणामुळे कुटुंबाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारते याची जाणीव समाजात निर्माण झाली आहे.

**3) आर्थिक स्वावलंबनाची गरज-**

आजच्या आधुनिक समाजात महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची गरज वाढली आहे. त्यामुळे अनेक महिला व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षण घेण्याकडे वळत आहेत. शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी वाढतात.

**4) शिक्षण संस्थांची वाढ-**

देशात विद्यापीठे, महाविद्यालये आणि तांत्रिक शिक्षण संस्था मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची उपलब्धता वाढली आहे.

**5) स्त्रीवादी चळवळीचा प्रभाव-**

स्त्रीवादी चळवळीमुळे महिलांच्या अधिकारांबाबत समाजात जागरूकता वाढली आहे. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक समानता याबाबत महिलांनी स्वतःचा आवाज बुलंद केला आहे. त्यामुळे महिलांच्या शिक्षणाला अधिक महत्त्व मिळू लागले आहे.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

**उच्च शिक्षणात महिलांसमोरील समस्या :**

महिलांचा सहभाग वाढत असला तरी त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

**1) सामाजिक बंधने-**

अनेक भागात अजूनही महिलांना घरगुती जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामुळे त्यांना शिक्षणासाठी पुरेसा वेळ आणि संधी मिळत नाही.

**2) आर्थिक अडचणी-**

गरीब कुटुंबांमध्ये मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. त्यामुळे मुलींचे शिक्षण अनेकदा दुर्लक्षित राहते.

**3) ग्रामीण-शहरी दरी-**

ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधा कमी असल्यामुळे मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी शहरात जावे लागते. परंतु अनेक कुटुंबे मुलींना दूर पाठवण्यास तयार नसतात.

**4) सुरक्षेचे प्रश्न-**

महिलांच्या सुरक्षेच्या समस्येमुळे काही पालक मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेर पाठवण्यास कचरतात. सुरक्षित वसतिगृहे आणि वाहतूक सुविधा नसल्यामुळे अडचणी निर्माण होतात.

**5) तांत्रिक क्षेत्रातील कमी सहभाग-**

अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रात अजूनही महिलांचे प्रमाण तुलनेने कमी आहे. सामाजिक मानसिकता आणि संधींचा अभाव ही यामागील कारणे आहेत.

**उच्च शिक्षणामुळे महिलांमध्ये झालेले बदल :**

**1) सामाजिक दर्जा वाढ**

उच्च शिक्षण घेतलेल्या महिलांचा समाजातील दर्जा उंचावतो. त्यांना अधिक आदर आणि मान्यता मिळते.

**2) आर्थिक स्वावलंबन**

शिक्षणामुळे महिलांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतात. त्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतात.

**3) सामाजिक परिवर्तन**

शिक्षित महिला समाजात जागरूकता निर्माण करतात. त्या सामाजिक प्रश्नांवर मत व्यक्त करतात आणि समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देतात.

**4) कुटुंबाचा विकास**

शिक्षित आई आपल्या मुलांच्या शिक्षणावर सकारात्मक परिणाम करते. त्यामुळे पुढील पिढी अधिक जागरूक आणि शिक्षित बनते.

**समाजावर होणारे परिणाम:**

महिलांच्या उच्च शिक्षणामुळे समाजात अनेक सकारात्मक बदल घडून येतात.

* महिलांचे सक्षमीकरण
* आर्थिक विकासाला चालना
* सामाजिक समतेची वाढ
* लोकशाही मूल्यांचा प्रसार
* लैंगिक भेदभावात घट

महिलांचे शिक्षण वाढल्यामुळे समाजातील विकास प्रक्रिया अधिक वेगाने घडते.

**निष्कर्ष :**

भारतातील उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग गेल्या काही दशकांमध्ये लक्षणीयरीत्या वाढलेला आहे. सरकारी धोरणे, सामाजिक जागरूकता, शिक्षण संस्थांची वाढ आणि महिलांच्या सक्षमीकरणाच्या चळवळीमुळे महिलांना शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध झाल्या आहेत.तथापि, ग्रामीण-शहरी दरी, आर्थिक अडचणी, सामाजिक बंधने आणि सुरक्षेच्या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी सरकार, समाज आणि शैक्षणिक संस्था यांनी संयुक्त प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

महिलांचे उच्च शिक्षण केवळ व्यक्तीगत प्रगतीसाठीच नव्हे तर राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षित महिला हे प्रगत आणि समतावादी समाजाचे प्रतीक आहेत. त्यामुळे महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे आधुनिक भारताच्या विकासासाठी अत्यावश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1.अग्रवाल, जे. सी. (2010). आधुनिक शिक्षणाचा विकास आणि नियोजन. नवी दिल्ली : विकास प्रकाशन.
2.देसाई, नीरा. आधुनिक भारतातील महिला. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
3.आळतेकर, ए. एस. (2016). प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्था. दिल्ली : मोतीलाल बनारसीदास प्रकाशन.
4.शर्मा, आर. के. (2015). भारतीय समाज. नवी दिल्ली : अटलांटिक पब्लिशर्स.
5.तिलक, जे. बी. जी. (2014). भारतातील उच्च शिक्षण. नवी दिल्ली : सेज पब्लिकेशन्स.
6.भारत सरकार. अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण अहवाल (AISHE). नवी दिल्ली : शिक्षण मंत्रालय.
7.भारत सरकार. राष्ट्रीय शिक्षण धोरण – 2020. नवी दिल्ली : शिक्षण मंत्रालय.
8.विद्यापीठ अनुदान आयोग (UGC). वार्षिक अहवाल. नवी दिल्ली.
9.योगेंद्र सिंग (2018). भारतीय परंपरेचे आधुनिकीकरण. नवी दिल्ली : रावत पब्लिकेशन्स

# उच्च शिक्षण क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) , मशिन लर्निंग, डेटा सायन्स आणि संगणक विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि संशोधन

*** कु. अर्चना तेजराव वरखेडे ***
एम. ए. एम.एड. संशोधक प्रशिक्षणार्थी, स्व. लालासाहेब देशमुख शिक्षण महाविद्यालय,
तिवसा, जि. अमरावती. ,संपर्क क्र.- 8308931169 ,ई -मेल :- archanawarkhede14@gmail.com
**प्रा. डॉ. सुजाता नानासाहेब तायडे, ( प्राचार्य )**
* मार्गदर्शक * स्व. लालासाहेब देशमुख शिक्षण महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती.

**सारांश :-**

एकविसाव्या शतकातील शिक्षण व्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) ही एक परिवर्तनकारी शक्ती म्हणून उदयास आली आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात अध्ययन, अध्यापन व प्रशासन या तिनही पातळयांवर AI ने मुलभूत बदल घडवून आणले आहेत.कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मशीन लर्निंग (Machine Learning) या प्रगत तंत्रज्ञानांचा वापर अध्यापन, अध्ययन, मूल्यमापन, संशोधन व प्रशासकीय व्यवस्थापनामध्ये मोठ्या प्रमाणावर होत आहे. AI आधारित अनुकूल शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम सादर करतात, तर मशीन लर्निंग डेटा विश्लेषणाद्वारे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे अचूक मूल्यमापन करते.

प्रस्तुत संशोधनात उच्च शिक्षणातील AI व मशीन लर्निंगच्या वापराचा अभ्यास करून त्यांचे शैक्षणिक परिणाम, संधी आणि आव्हाने यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करून दुय्यम स्रोतांवर आधारित माहितीचे परीक्षण करण्यात आले आहे. अभ्यासातून असे दिसून येते की AI मुळे शिक्षण अधिक वैयक्तिक, सुलभ आणि परिणामकारक झाले आहे; परंतु डेटा गोपनीयता, नैतिकता, डिजिटल दरी आणि शिक्षकांच्या भूमिकेतील बदल ही महत्त्वाची आव्हाने आहेत.

योग्य धोरणात्मक नियोजन, तांत्रिक पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून AI व मशीन लर्निंगचा संतुलित वापर केल्यास उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढू शकते.

**कीवर्ड्सः- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग ( Machine Learning), उच्च शिक्षण, डिजिटल शिक्षण, स्मार्ट मूल्यांकन प्रणाली, शैक्षणिक तंत्रज्ञान, डेटा विश्लेषण, ई-लर्निंग, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020**

**प्रस्तावना :-**

एकविसाव्या शतकात मानवी सभ्यता ज्या वेगाने तंत्रज्ञानाशी एकरूप होत चालली आहे सर्वाधिक त्यातील , कृत्रिम म्हणजे घटक प्रभावशालीबुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI).कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखी कार्य करण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान होय, तर मशीन लर्निंग ही AI ची उपशाखा असून ती डेटाच्या आधारे स्वयंचलितपणे शिकण्याची व निर्णय घेण्याची क्षमता प्रदान करते.

उच्च शिक्षण संस्थांमध्ये AI व मशीन लर्निंगचा वापर अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण करण्यासाठी, संशोधनातील डेटा हाताळण्यासाठी आणि प्रशासकीय व्यवस्थापन सुधारण्यासाठी केला जात आहे. अनुकुली शिक्षण प्रणाली ( Adaptive Learning ), स्मार्ट मूल्यांकन प्रणाली, चॅटबॉट्स, आभासी सहाय्यक (Virtual Assistants) आणि ऑनलाइन अभ्यासक्रम हे AI च्या वापराची काही प्रमुख उदाहरणे आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 नुसार तंत्रज्ञानाधारित शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे उच्च शिक्षणात AI आणि मशीन लर्निंगचा अभ्यास करणे काळाची गरज ठरते.वैयक्तिक अधिक शिक्षण तंत्रज्ञानामुळे , सुलभ आणि परिणामकारक झाले असले तरी त्यासोबत नैतिकता, डेटा गोपनीयता, डिजिटल दरी आणि शिक्षकांच्या भूमिकेतील बदल यांसारखी आव्हानेही निर्माण झाली आहेत.

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये उच्च शिक्षणातील AI व मशीन लर्निंगचा वापर, त्यांचे शैक्षणिक परिणाम, संधी, आव्हाने आणि भविष्यातील दिशा यांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टेः-**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :-

1.उच्च शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंगचा वापर समजून घेणे.

2.अध्यापन व अध्ययन प्रक्रियेत AI मुळे होणारे बदल अभ्यासणे.

3.मूल्यमापन पद्धतीत मशीन लर्निंगच्या उपयोगाचे विश्लेषण करणे.

4.संशोधन कार्यामध्ये AI च्या भूमिकेचा अभ्यास करणे.
5.AI व मशीन लर्निंगच्या वापरामुळे निर्माण होणारी शैक्षणिक, तांत्रिक व नैतिक आव्हाने ओळखणे.
6.उच्च शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी AI च्या प्रभावाचे परीक्षण करणे.
7.भविष्यातील संधी व धोरणात्मक दिशा सुचविणे.

**संशोधनाची गरज व महत्त्व:-**

सध्याच्या तंत्रज्ञानप्रधान युगात उच्च शिक्षण क्षेत्रात डिजिटल साधनांचा वापर झपाट्याने वाढत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंग ही तंत्रज्ञान साधने केवळ औद्योगिक किंवा व्यावसायिक क्षेत्रापुरती मर्यादित न राहता शिक्षण व्यवस्थेतही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे या विषयाचा सखोल अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना अध्यापनाची गुणवत्ता टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान आहे. AI आधारित अनुकूली शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजांनुसार शिक्षण देण्यास मदत करतात. तसेच मशीन लर्निंगच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे अचूक विश्लेषण करता येते. त्यामुळे शिक्षण अधिक परिणामकारक व विद्यार्थी-केंद्रित बनते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये तंत्रज्ञानाधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर AI व मशीन लर्निंगचा उच्च शिक्षणातील वापर, त्याचे परिणाम आणि संभाव्य धोके समजून घेणे महत्त्वाचे आहे.

याशिवाय डेटा गोपनीयता, सायबर सुरक्षा, नैतिकता, डिजिटल दरी आणि शिक्षकांच्या भूमिकेतील बदल ही उद्भवणारी प्रश्नचिन्हे आहेत. या सर्व बाबींचा अभ्यास करून योग्य धोरणे व उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधन उच्च शिक्षण क्षेत्रातील धोरणनिर्माते, शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी यांच्यासाठी मार्गदर्शक ठरेल.AI व मशीन लर्निंगचा संतुलित व प्रभावी वापर कसा करावा याबाबत या अभ्यासातून दिशादर्शन होईल.

**संबंधित साहित्याचा आढावा:-**

उच्च शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंग संदर्भात विविध संशोधकांनी अभ्यास केला आहे. या साहित्याच्या आधारे विषयाची पार्श्वभूमी आणि संशोधनातील प्रवाह स्पष्ट होतो.

UNESCO (2019) च्या अहवालानुसार शिक्षण क्षेत्रात AI चा वापर केल्यास शिक्षणाची गुणवत्ता, उपलब्धता आणि समावेशकता वाढू शकते. मात्र यासाठी नैतिक मार्गदर्शक तत्त्वांची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

World Economic Forum (2020) च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, AI मुळे उच्च शिक्षणातील कौशल्याधारित अभ्यासक्रमांना चालना मिळेल आणि भविष्यातील रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल.

काही संशोधनांमध्ये अनुकूली शिक्षण प्रणाली (Adaptive Learning Systems) विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गतीनुसार अभ्यासक्रमात बदल करतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांची कामगिरी सुधारते असे आढळले आहे. मशिन लर्निंग तंत्रज्ञानाव्दारे विद्यार्थांच्या शैक्षणिक डेटाचे विश्लेषण करून त्यांच्या कमकुवत व मजबूत बाजू ओळखता येतात.

तथापि, काही अभ्यासांमध्ये AI च्या वापरामुळे डेटा गोपनीयतेचे प्रश्न, अल्गोरिदममधील पक्षपात (Algorithmic Bias) आणि तंत्रज्ञानावर वाढते अवलंबित्व याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे शिक्षकांच्या . पारंपरिक आणि बदल होणारे भूमिकेतअध्यापन पद्धतींवरील परिणाम यावरही संशोधकांनी चर्चा केली आहे.

**चर्चा व विश्लेषण:-**

उच्च शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंगचा प्रभाव विविध स्तरांवर दिसून येतो. या विभागात त्याचे शैक्षणिक, तांत्रिक आणि सामाजिक परिणामांचे विश्लेषण करण्यात येत आहे.

**अध्यापन व अध्ययन प्रक्रियेवरील परिणाम :-**

AI आधारित अनुकूली शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या क्षमतेनुसार अभ्यासक्रम सादर करतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन मिळते. पारंपारिक एकसमान अध्यापन पध्दतीऐवजी विद्यार्थी-केंद्रित शिक्षणाला चालना मिळते. लर्निंग मशीन अल्गोरिदम विद्यार्थांच्या उत्तरांचे विश्लेषण करून तात्काळ अभिप्राय देतात, ज्यामुळे शिकण्याची प्रक्रिया अधिक परिणामकारक होते.

**केस स्टडी 1 - पुणे विद्यापीठात आर्टिफिशियल इंटेलिजन्स ( AI) चा वापर :-**

पुणे विद्यापीठाने 2020 मध्ये शिक्षणात AI तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला. AI च्या मदतीने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत शिक्षण पद्धतींचा अभ्यास करून त्यांना योग्य ते अभ्यासक्रम आणि अतिरिक्त साहित्याची शिफारस करण्यात येत होती त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील प्रगतीत 25% वाढ झाली विद्यार्थ्यांनी AI च्या मार्गदर्शनानूसार आपले

कमजोर विषय ओळखले आणि त्यावर अधिक मेहनत घेतली. गुणवत्तात्मक सुधारणा झाल्याने पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय पातळीवरील रँकिंग सुधारले.

**केस स्टडी 2 – मुंबई विद्यापीठात ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्मचा वापर :-**

मुंबई विद्यापीठाने 2018 मध्ये आपल्या विविध कोर्सेस साठी ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्म (MOOC) वापरण्याची सूरुवात केली. यामध्ये विविध विषयांसाठी ई- लर्निंग सामग्री, व्हिडीओ लेक्चर्स, आणि इंटरेक्टिव्ह असाईनमेंटचा समावेश करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी MOOC च्या माध्यमातून अधिक सखोल आणि विस्तृत ज्ञान मिळवले ऑनलाईन लेक्चर मुळे शिक्षणाची उपलब्धता वाढली आणि विद्यार्थी कोणत्याही ठिकाणाहून शिकु शकले. विद्यापीठाच्या गुणवत्तेच्या मुल्यांकनात30% वाढ झाली, जे त्यातील नव्या माध्यमांच्या उपयोगामुळे शक्य झाले.

**मूल्यमापन प्रणालीतील बदल :-**

AI आधारित स्मार्ट मूल्यांकन प्रणालींमुळे उत्तरपत्रिका तपासणी वेगवान आणि अचूक झाली आहे ऑनलाइन. साठीओळखण्या फसवणूक प्रणालीत परीक्षाAI चा वापर केला जातो लर्निंग मशीन .विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे दीर्घकालीन विश्लेषण करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा अंदाज लावू शकते करता मार्गदर्शन वेळी योग्य शिक्षकांना यामुळे. येते.

**संशोधन क्षेत्रातील योगदान :-**

मशीन लर्निंग मोठ्या प्रमाणातील डेटाचे विश्लेषण करण्यास सक्षम आहे .संशोधनामध्ये सांख्यिकीय विश्लेषण, ट्रेंड ओळखणे आणि निष्कर्ष काढणे यासाठी AI उपयुक्त ठरते.साहित्य शोध (Literature Review) आणि संदर्भ व्यवस्थापन प्रक्रियाही सुलभ झाली आहे . त्यामुळे संशोधन कार्याची गती आणि अचुकता वाढली आहे.

प्रशासकीय व्यवस्थापनातील उपयोग :-

विद्यार्थ्यांची उपस्थिती, प्रवेश प्रक्रिया, निकाल विश्लेषण आणि संस्थेचे नियोजन यासाठी AI आधारित सॉफ्टवेअर वापरले जाते. यामुळे प्रशासकीय कार्य पारदर्शक आणि कार्यक्षम झाले आहे.

उद्भवणारी आव्हाने :-

**AI च्या वापरामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण होतात.**

- **डेटा गोपनीयता:** विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण आवश्यक आहे.
- **डिजिटल दरी:** ग्रामीण व शहरी भागातील तांत्रिक सुविधांमध्ये असमानता आहे.
- **नैतिकता:** अल्गोरिदममधील पक्षपातामुळे अन्यायकारक परिणाम होऊ शकतात.
- **शिक्षकांची भूमिका:** AI मुळे शिक्षकांच्या पारंपरिक भूमिकेत बदल होत असून त्यांना नव्या कौशल्यांची गरज आहे.

उपरोक्त विश्लेषणावरून असे दिसून येते की AI व मशीन लर्निंग उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, वेग आणि अचूकता वाढविणारी साधने आहेत. मात्र, ही साधने शिक्षकांची जागा घेवू शकत नाहीत, संगणक तंत्रज्ञान, डेटा सायन्स, मशिन लर्निंग यांच्या मदतीने अध्ययन – अध्यापन प्रक्रीया अधिक सुलभ होऊ शकते. योग्य धोरण, तांत्रिक पायाभूत सुविधा आणि नैतिक मार्गदर्शक तत्त्वे असल्यास AI चा वापर शिक्षण अधिक समावेशक, विद्यार्थी-केंद्रित आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवू शकतो.

**निष्कर्ष:-**

प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की उच्च शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंग ही परिवर्तन घडवून आणणारी प्रभावी तंत्रज्ञाने ठरत आहेत. अध्यापन, अध्ययन, मूल्यमापन, संशोधन व प्रशासकीय व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांमध्ये AI चा वापर वाढत असून त्यामुळे शिक्षण अधिक परिणामकारक, वेगवान व वैयक्तिक स्वरूपाचे झाले आहे.

1. AI आधारित अनुकूली शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार मार्गदर्शन करतात, तर मशीन लर्निंग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक डेटाचे विश्लेषण करून त्यांच्या प्रगतीचे अचूक चित्र सादर करते. यामुळे शिक्षकांना योग्य वेळी योग्य हस्तक्षेप करता येतो. संशोधन कार्यातही मोठ्या प्रमाणातील डेटाचे विश्लेषण सुलभ झाल्यामुळे संशोधनाची गुणवत्ता व गती वाढली आहे.
2. तथापि, या तंत्रज्ञानासोबत काही महत्त्वाची आव्हाने देखील आहेत. डेटा गोपनीयता, सायबर सुरक्षा, नैतिकता, डिजिटल दरी आणि शिक्षकांच्या भूमिकेतील बदल ही गंभीर मुद्दे आहेत. त्यामुळे AI चा वापर करताना संतुलित दृष्टिकोन, स्पष्ट धोरणे आणि योग्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.
3. एकूणच, योग्य नियोजन व प्रभावी अंमलबजावणी केल्यास AI व मशीन लर्निंग उच्च शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी महत्त्वपूर्ण साधन ठरू शकतात. भविष्यात तंत्रज्ञान आणि मानवी मूल्ये यांचा समतोल राखून शिक्षण क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधणे ही काळाची गरज आहे.

**सूचना व शिफारशी :-**

उच्च शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मशीन लर्निंगचा प्रभावी आणि संतुलित वापर करण्यासाठी पुढील सूचना व शिफारशी मांडण्यात येत आहेत :

1. धोरणात्मक नियोजन :-

उच्च शिक्षण संस्थांनी AI वापरासाठी स्पष्ट धोरण (Policy Framework) तयार करावे. तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी कसा करायचा याबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करावीत.

2. शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण :-

AI व मशीन लर्निंग साधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी शिक्षकांना नियमित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. डिजिटल कौशल्यविकास कार्यक्रम राबवावेत.

3. डेटा गोपनीयता व सायबर सुरक्षा:-

विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी मजबूत डेटा संरक्षण प्रणाली विकसित करावी. सायबर सुरक्षेबाबत कठोर नियम आणि उपाययोजना राबवाव्यात.

4. डिजिटल पायाभूत सुविधा :-

ग्रामीण व शहरी भागातील डिजिटल दरी कमी करण्यासाठी इंटरनेट सुविधा, संगणक प्रयोगशाळा आणि तांत्रिक साधने उपलब्ध करून द्यावीत.

5. नैतिक मार्गदर्शक तत्त्वे :-

AI च्या वापरामध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि न्याय सुनिश्चित करण्यासाठी नैतिक मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत. अल्गोरिदमिक पक्षपात टाळण्यासाठी नियमित तपासणी करावी.

6. संशोधन व नवोन्मेष प्रोत्साहन :-

उच्च शिक्षण संस्थांनी AI व मशीन लर्निंग संदर्भातील संशोधनाला प्रोत्साहन द्यावे. उद्योग व शिक्षण संस्थांमध्ये सहकार्य वाढवावे.

7. विद्यार्थी जागरूकता :-

विद्यार्थ्यांना AI च्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन करावे आणि तांत्रिक कौशल्ये विकसित करण्यासाठी कार्यशाळा आयोजित कराव्यात.

**संदर्भ सूची:-**

1. गोमासे डॉ. मंगेश, (2023, September ) उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी नव्या माध्यमाची भूमिका: एक संशोधनात्मक अभ्यास.
International Journal of Researches in Social Science and Information Studies, 3,37-39
2. सोनटक्के डॉ. राजाराम तुकाराम ( 2025, September )कृत्रिम बुद्धिमत्ता AI) उच्च शिक्षणात सक्षम परिवर्तन: अध्ययन, अध्यापन आणि प्रशासन.
Research and Development, 17(9).
3. आर्य डॉ. रुचि हरीश ( 2018, ) शिक्षा मे कृत्रिम बुद्धिमत्ता का प्रभाव.
Shodhshauryam, International Scientific Referred Research Journal, 1(2).
4. UNESCO. (2019). *Artificial intelligence in education: Challenges and opportunities for sustainable development*. UNESCO Publishing.
5. UNESCO (2021). AI and Education: Guidance for Policy-makers.
6. Government of India. (2020). *National Education Policy 2020*. Ministry of Education.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा प्राचार्य, शिक्षक, आणि विद्यार्थ्यांच्या भूमिकांवर होणारा परिणाम.

**प्रा. रुपेश सुधाकर नामेवार**
संशोधक प्रशिक्षणार्थी नागरिक ज्यु. कॉलेज ऑफ एज्युकेशन, रामटेक एम. ए.(राज्य., समाज., इति.,इंग्रजी ), एम. एड., एम. फील., (शिक्षण शास्त्र), नेट. ( शिक्षण शास्त्र) मो. नं. :- 9823972312,
ई-मेल rnamewar1234@gmail.com

**प्राचार्य डॉ. सुजाता तायडे**
मार्गदर्शक ( एम. ए. इंग्रजी, अर्थ., तत्वज्ञान, इति., समाज., राज्य. ) एम. एड., एम.फील., नेट , सेट, पी.एच.डी .
प्राचार्य ,स्व. लालासाहेब देशमुख शिक्षण महाविद्यालय, तिवसा, जिल्हा - अमरावती

---

**सारांश**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये भारतीय लोकमानसात रुजलेल्या शिक्षण व्यवस्थेची कल्पना केली आहे. ही व्यवस्था समाजात परिवर्तन घडवेल, शाश्वतपणे एकसमान आणि चैतन्यपूर्ण ज्ञान देईल, तसेच सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन भारताला जागतिक महासत्ता बनवेल.

अभ्यासक्रम आणि अध्यापन शास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशाबद्दल मूलभूत कर्तव्य, घटनात्मक मूल्यांबद्दल आधाराची भावना, नातेसंबंध, बदलत्या जगात आपल्या भूमिका तसेच जबाबदाऱ्या याबद्दल जाणीवपूर्वक जागरूकता निर्माण होईल, असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये नमूद केले आहे.

मन, बुद्धी व कृतीत भारतीय असण्याचा अभिमान खोलवर बिंबवणे. तसेच ज्ञान, कौशल्य, मूल्य आणि संवेदनशीलता बालकांमध्ये विकसित करणे हा या धोरणाचा मुख्य हेतू आहे, त्यामुळे मानवी हक्काची जाणीव, शाश्वत विकास मूल्य आणि विश्वबंधुत्वाची भावना प्रतिबिंबित होणारा बालक एक उत्तम जागतिक नागरिक बनेल.

- **पारिभाषिक शब्द :-** उच्च शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, प्राचार्य, शिक्षक, आणि विद्यार्थ्यांची भूमिका.

*** उद्दिष्टे**

1. उच्च शिक्षणातील बदलत्या विचार प्रवाहाच्या संदर्भात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा अभ्यास करणे.
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे स्वरूप थोडक्यात समजून घेणे.
3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा प्राचार्यांच्या भूमिकांवर होणारा परिणाम अभ्यासणे.
4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा शिक्षकांच्या भूमिकेवर होणारा परिणाम अभ्यासणे.
5. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा विद्यार्थ्यांच्या भूमिकेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

*** गृहीतके**

1. उच्च शिक्षणातील बदलत्या विचार प्रवाहाच्या संदर्भात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे.
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये प्राचार्य शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या भूमिकेवर विशेष भर देण्यात आला आहे.

*** प्रस्तावना:**

भारताने 29 जुलै 2020 रोजी एक ऐतिहासिक पाऊल उचलत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ला मंजुरी दिली. डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेले हे धोरण 1968 च्या जुन्या धोरणाऐवजी 21 व्या शतकातील गरजांनुसार बदल घडवून आणण्यासाठी आणले गेले आहे. हे धोरण भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहते.

1.**पायाभूत टप्पा (Foundation Stage – 5 वर्षे) -3 ते 8,** वयोगटातील मुलांसाठी (प्री-प्रायमरी 3 वर्षे + वर्ग 1आणि 2). यामध्ये खेळातून शिक्षण आणि मुलांच्या कृतींवर भर दिला जाईल.

2.**पूर्व-तयारी टप्पा (Preparatory Stage – 3 वर्षे) - वर्ग 3 ते 5,** साठी, जिथे भाषा आणि संख्यात्मक कौशल्यांवर लक्ष केंद्रित केले जाईल.

3.**मध्यम टप्पा (Middle Stage - 3 वर्षे) - वर्ग 6 ते 8,** व्यावसायिक अभ्यासक्रम (Vocational Courses) आणि कोडिंग सुरू केले जाईल.

4.**माध्यमिक टप्पा (Secondary Stage - 4 वर्षे) - वर्ग 9 ते 12,** बहु-विषय (Multidisciplinary) अभ्यासक्रम आणि विषयांची लवचिक निवड.

* **मातृभाषेतून शिक्षण:**

या धोरणामध्ये इयत्ता 5 वी पर्यंत, आणि शक्य असल्यास 8 वी पर्यंत, शिक्षणाचे माध्यम मातृभाषा, स्थानिक भाषा किंवा प्रादेशिक भाषा असावे, यावर विशेष भर देण्यात आला आहे.

* **उच्च शिक्षणातील महत्त्वाचे बदल:**

**बहु-प्रवेश आणि निर्गमन (Multiple Entry/Exit):** विद्यार्थी अभ्यासक्रम मध्येच सोडू शकतात आणि परत येऊ शकतात.

**हस्तांतरणीय क्रेडिट्स (Academic Bank of Credits):** विद्यार्थ्यांचे गुण डिजिटल स्वरूपात साठवले जातील.

**बहुविद्याशाखीय शिक्षण:** कला, वाणिज्य आणि विज्ञान असा कडक भेद न ठेवता विद्यार्थी आवडीचे विषय निवडू शकतात.

**शिक्षक प्रशिक्षण आणि तंत्रज्ञान:** शिक्षकांचे कौशल्य वाढवण्यासाठी नवीन प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार केले जातील. तसेच, ई-लर्निंग, ऑनलाइन लॅब्स आणि तंत्रज्ञानस्नेही शिक्षण प्रणाली विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे.

एक चांगली शैक्षणिक संस्था अशी असते की ज्यात प्रत्येक विद्यार्थ्याला आपण स्वागतारह असल्याची तसेच स्वतःची दखल घेतली जात असल्याची प्रबळ भावना असते एक सुरक्षित आणि प्रेरणादायी वातावरण अस्तित्वात असते सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विविध प्रकारचे अध्ययन अनुभव उपलब्ध करून दिले जातात आणि चांगल्या भौतिक पायाभूत सुविधा व अध्ययनासाठी अनुकूल संसाधने सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जातात हे सर्व गुण प्राप्त करणे प्रत्येक शैक्षणिक संस्थांचे ध्येय असले पाहिजे या दृष्टिकोनातून संस्थेचा प्रधान म्हणून मुख्याध्यापकाची भूमिका ही अतिशय महत्त्वाची असणार आहे.

शिक्षक हा शिक्षण प्रणालीतील मूलभूत सुधारणांचा केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षकांना माजातील अत्यंत आदरणीय आणि आवश्यक घटक म्हणून सर्व स्तरांवर पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी मदत झाली पाहिजे कारण तेच खऱ्या अर्थाने आपल्या भावी पिढीला आकार देतात शिक्षकांना सक्षमपणे आणि त्यांचे कार्य शक्य तितक्या प्रभावीपणे करण्यास त्यांना मदत करणे यासाठी आवश्यक सर्व बाबीत होणार असावेत नवीन शैक्षणिक धोरण आहे प्रत्येक स्तरावर अध्यापन क्षेत्रात सर्वोत्तम आणि विज्ञान विद्वान व्यक्तीची भरती होण्यासाठी त्यांचा उतरनिर्वाह सन्मान प्रतिष्ठान आणि स्वायत्तता यांची निश्चिती करून व्यवस्थेमध्ये गुणवत्ता नियंत्रण आणि उत्तरदायित्वाच्या मूलभूत पद्धतीने बंद करणे गरजेचे आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात सर्वच परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण निरीक्षण देखील करणे आवश्यक आहे यासाठी ऐतिहासिक दृष्टीने उपेक्षित वंचित आणि अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे शिक्षण हे समता सुनिश्चित करण्याचे एक उत्तम माध्यम आहे ज्याद्वारे समाजात समानता समावेशकता आणि सामाजिक आर्थिक गतिशीलता मिळू शकते अशा गटांमध्ये सर्व मुलांसाठी पूर्वापार अडथळे असले तरी या गटातील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन यथोचित प्रगती करते या दृष्टीने निश्चित पावले उचलली गेली पाहिजेत.

**NEP 2020 चा मुख्याध्यापकांच्या भूमिकेवर होणारा प्रमुख परिणाम:**

* **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या संदर्भात मुख्याध्यापकांच्या भूमिका बाबतीत झालेले संशोधनाची आकडेवारी.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 नुसार मुख्याध्यापक हे केवळ प्रशासक नसून शैक्षणिक नेतृत्व (Academic Leader) म्हणून भूमिका बजावत आहेत. संशोधनानुसार, ते शालेय संस्कृती, शिक्षक विकास, आणि 5+3+3+4 रचनेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार आहेत. ब्रूकिंग्सच्या अहवालानुसार (2026), शिक्षकांवरील प्रशासकीय बोजा कमी करून त्यांना वर्गातील शिकवण्यावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करणे ही त्यांची मुख्य भूमिका बनली आहे.

* **NEP 2020 नुसार मुख्याध्यापकांच्या भूमिकेवर झालेले संशोधन आणि आकडेवारी:**

* **मुख्याध्यापकांवर आधारित संशोधनाचे महत्त्वाचे पैलू:**

**नेतृत्व आणि बदल व्यवस्थापन:** NEP 2020 नुसार, मुख्याध्यापकांना केवळ प्रशासकीय प्रमुख न राहता, शैक्षणिक 'नेते' म्हणून काम करावे लागेल. संशोधनातून दिसून येते की, 60% पेक्षा जास्त शाळांमध्ये मुख्याध्यापक सध्या प्रशासकीय कामातच व्यस्त आहेत.

**डिजिटल साक्षरता आणि तंत्रज्ञान :** नवीन धोरणांतर्गत 'ऑनलाइन' आणि 'ब्लेंडेड लर्निंग' लागू करण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर अनिवार्य आहे. संशोधनानुसार, मुख्याध्यापकांना तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची गरज आहे.

5+3+3+4 रचना अंमलबजावणी: पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून (Early Childhood Care and Education - ECCE) ते माध्यमिक स्तरापर्यंतच्या नवीन रचनेची अंमलबजावणी करण्याचे मोठे आव्हान मुख्याध्यापकांवर आहे.

**शिक्षक आणि पालकांशी समन्वय :** राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याशी (NCFSE 2020-21) सुसंगत राहून अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी मुख्याध्यापकांना पालक आणि शिक्षकांशी समन्वय साधावा लागतो.

**आव्हाने :** संशोधनातून स्पष्ट झाले आहे की, पायाभूत सुविधांची कमतरता आणि नवीन प्रणाली समजून घेण्यासाठी पुरेसा वेळ न मिळाल्याने मुख्याध्यापकांवर मानसिक ताण वाढला आहे.

NEP 2020 च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापकांना 'शालेय संकुल' (School Complexes) च्या माध्यमातून सातत्याने प्रशिक्षण (CPD - Continuous Professional Development) देणे गरजेचे आहे.

**नेतृत्व आणि विकास : (Leadership & Development):** संशोधनानुसार, प्रभावी मुख्याध्यापक शालेय संसाधनांचा योग्य वापर करतात आणि शिक्षकांना शिकवण्याच्या नवीन पद्धतींचा अवलंब करण्यास प्रवृत्त करतात.

**प्रशासकीय बोजा कमी करणे : (Reducing Administrative Load):** Brookings अहवाल (2026) सुचवते की, शिक्षकांना शिकवण्याव्यतिरिक्त इतर कामातून (non-teaching duties) मुक्त करून मुख्याध्यापकांनी अध्यापनासाठी वेळ मोकळा करणे आवश्यक आहे.

**शैक्षणिक भूमिका (Academic Role) :** मुल्यांकन (assessment), अभ्याक्रम (curriculum) आणि स्थानिक ज्ञानाचा वापर करून अध्यापन (pedagogical knowledge) यावर नेतृत्वाने भर देणे आवश्यक आहे.

**समुदाय सहभाग (Community Involvement) :** शाळा व्यवस्थापन समिती आणि पालकांशी संवाद साधून, शाळेच्या विकासात समाजाचा सहभाग वाढवणे ही प्रमुख भूमिका आहे.

**प्रशासकाकडून दूरदर्शी नेत्याकडे : (From Administrator to Visionary Leader)** : मुख्याध्यापक आता केवळ वेळापत्रक किंवा दैनंदिन कामकाजापुरते मर्यादित नसून, शाळेच्या विकासाचा दृष्टीकोन (Vision) निश्चित करणारे नेते बनतील.

**शिक्षक क्षमता बांधणी (Building Teacher Capacity):** NEP नुसार शिक्षकांचे सतत व्यावसायिक विकास (CPD) वर्कशॉप्स आयोजित करणे आणि त्यांना नवीन अध्यापन पद्धतींसाठी प्रेरित करणे ही मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे.

**सर्वांगीण विकासाला प्राधान्य (Prioritizing Holistic Development) :** घोकंपट्टी सोडून कौशल्य-आधारित शिक्षण, कला-एकीकृत शिक्षण (Art-integrated learning) आणि क्रीडा क्रियाकलापांवर भर देणे.

**शैक्षणिक स्वायत्तता (Academic Autonomy) :** शाळांना अधिक स्वायत्तता मिळणार असल्याने, स्थानिक गरजांनुसार अभ्यासक्रमात बदल आणि नावीन्यपूर्ण प्रयोग करण्याची मुभा मुख्याध्यापकांना असेल.

**मूल्यमापन सुधारणा (Assessment Reforms):** पाठांतरावर भर देणाऱ्या परीक्षांऐवजी, विद्यार्थ्यांच्या क्षमता आणि विश्लेषणात्मक कौशल्यांचे (Critical Thinking) मूल्यमापन करणारी पद्धत (Formative Assessment) राबवणे.

डिजिटल शिक्षण आणि तंत्रज्ञान: वर्गामध्ये स्मार्ट क्लासरूम, डिजिटल साहित्य आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढवण्यासाठी पुढाकार घेणे.

थोडक्यात, मुख्याध्यापक आता शाळेचे "मुख्य कार्यकारी अधिकारी" (CEO) म्हणून काम करतील, जे शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यात समन्वय साधून, आनंदी आणि उच्च दर्जाचे शैक्षणिक वातावरण निर्माण करतील.

**मुख्याध्यापकांसाठी प्रमुख आव्हाने:**

**प्रशिक्षण अभाव** अनेक ठिकाणी मुख्याध्यापकांसाठी पुरेसे आणि योग्य प्रशिक्षण उपलब्ध नसते.

**कामाचा जास्त ताण** आणि **गैर-शैक्षणिक कामांमुळे** शैक्षणिक नेतृत्वाकडे दुर्लक्ष होते.

संशोधन दर्शविते की, यशस्वी NEP 2020 अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापकांना "प्रशासक" वरून "शैक्षणिक मार्गदर्शक" (Mentors) बनणे गरजेचे आहे

**NEP 2020 मध्ये शिक्षकाची भूमिका :**

* **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 नुसार शिक्षकांची भूमिका माहिती देणाऱ्याकडून 'सुविधादाता' (Facilitator), मार्गदर्शक आणि संशोधक अशी बदलली आहे. संशोधनानुसार, शिक्षकांनी केवळ सैद्धांतिक अध्यापन न करता अनुभवात्मक शिक्षण (Experiential Learning), डिजिटल साक्षरता आणि मूल्य-आधारित शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे.**

* **शिक्षकांच्या भूमिकेवर झालेल्या संशोधनातील मुख्य बाबी:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 नुसार शिक्षकांबाबतच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की, सुमारे 90% माध्यमिक शिक्षकांना या धोरणाविषयी मध्यम (average) जागरूकता आहे, तर केवळ 0.1% शिक्षकांमध्ये कमी जागरूकता आढळली आहे. संशोधनानुसार, ग्रामीण/शहरी किंवा स्त्री/पुरुष शिक्षकांमध्ये जागृततेत मोठा फरक नसला तरी, शासकीय व खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या माहितीत तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे.

* **NEP 2020 अंतर्गत शिक्षकांशी संबंधित मुख्य संशोधनाचे मुद्दे:**

**शिक्षकाची भूमिका :** शिक्षकांना आता केवळ माहिती देणारे नसून, विद्यार्थ्यांना विचार करण्यास, सर्जनशील बनण्यास आणि समस्या सोडवण्यासाठी प्रेरित करणारे (Facilitator) म्हणून पाहत आहे.

**टीईटी (TET) अनिवार्य :** प्रत्येक शालेय टप्प्यासाठी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य करण्यात आली असून, ती शिक्षकांच्या क्षमतेची पातळी निश्चित करेल.

**शिक्षण पदवी (B.Ed) :** 2030 पर्यंत, अध्यापनासाठी किमान पात्रता चार वर्षांची एकात्मिक बी.एड. (Integrated B.Ed.) पदवी असेल.

**व्यावसायिक विकास (CPD) :** शिक्षकांसाठी Continuous Professional Development (CPD) अंतर्गत दरवर्षी किमान 50 तासांचे प्रशिक्षण अनिवार्य असेल.

**गुणोत्तर :** प्रभावी अध्यापनासाठी शिक्षकांशी 30:1 Pupil-Teacher Ratio - PTR) चे गुणोत्तर राखण्यावर भर दिला जात आहे.

**भाषिक दृष्टिकोन :** शिक्षकांना स्थानिक भाषेत शिकवण्यासाठी (mother tongue/local language) प्रोत्साहन दिले जात आहे, जेणेकरून शिकण्यात अडथळे येणार नाहीत.

या धोरणाचे उद्दिष्ट शिक्षकांना अधिक सक्षम, व्यावसायिक आणि तंत्रज्ञानस्नेही बनवणे हे आहे.

**बदलती भूमिका :** शिक्षकांना आता वर्गात सर्जनशील विचार, समस्या निवारण आणि टीकात्मक विचारसरणी (Critical Thinking) विकसित करणारी भूमिका बजावायची आहे.

**डिजिटल क्षमता :** NEP 2020 डिजिटल शिक्षण प्रणालीवर भर देते; त्यामुळे शिक्षकांना ई-संसाधने (e-resources) वापरण्यात प्रवीण असणे गरजेचे आहे.

**सतत व्यावसायिक विकास (CPD) :** शिक्षकांनी स्वतःचे अद्ययावत ज्ञान ठेवण्यासाठी सतत व्यावसायिक विकासात (CPD) सहभागी होणे आवश्यक आहे.

**बहुभाषिकता आणि समावेशकता :** भाषा बदल आणि अपंगत्व समावेशाच्या संदर्भात शिक्षकांनी, विशेषतः प्राथमिक स्तरावर, मातृभाषेतून शिक्षणाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे।

**संशोधन-आधारित दृष्टिकोन :** पदव्युत्तर स्तरावर संशोधन प्रकल्पांना (Research projects) प्रोत्साहन दिले जात आहे, ज्यामध्ये शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील।

**संशोधनातील आव्हाने :**

काही अभ्यासांतून असे दिसून आले आहे की, अजूनही अनेक ठिकाणी शिक्षक प्रशिक्षण हे अधिक सैद्धांतिक आहे आणि ते वर्गातील प्रत्यक्ष परिस्थितीशी (Classroom realities) तितकेसे जुळत नाही। तसेच, शिक्षकांवर अतिरिक्त गैर-शैक्षणिक कामांचा बोजा हे एक मोठे आव्हान आहे।

या धोरणांतर्गत, शिक्षकांना केवळ अभ्यासाचे नियोजन करणारे नसून, विद्यार्थी-केंद्रित शिक्षणाचे शिल्पकार म्हणून पाहिले जात आहे

**डिजिटल साक्षरता (Digital Literacy) :** मुख्याध्यापकांनी शाळांमध्ये तंत्रज्ञानाचा (ICT) वापर वाढवणे आणि शिक्षक व विद्यार्थ्यांना डिजीटल साधनांचा वापर करण्यास सक्षम करणे आवश्यक आहे.

*** NEP 2020 चा शिक्षकांच्या भूमिकेवर होणारा प्रमुख परिणाम:**

**शिक्षकांचे सक्षमीकरण :** शिक्षकांना केवळ वर्ग शिकवणारे नाही, तर बदल घडवणारे (Change Agents) मानले गेले आहे.

**मार्गदर्शक आणि सुविधा प्रदाता :** शिक्षकांची भूमिका ज्ञान देणाऱ्याची न राहता, विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मदत करणारा मार्गदर्शक, मार्गदर्शक आणि सुविधा प्रदाता (Facilitator) अशी होईल.

**कौशल्य-आधारित शिक्षण :** घोकंपट्टीऐवजी, शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये गंभीर विचार (Critical Thinking), सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य विकसित करण्यावर भर देतील.

**डिजिटल अध्यापनशास्त्र :** तंत्रज्ञानाचा (ICT) प्रभावी वापर करून, शिक्षक वर्गखोल्या आधुनिक आणि तंत्रज्ञानस्नेही बनवतील.

**सलग व्यावसायिक विकास (CPD) :** प्रत्येक शिक्षकाने दरवर्षी किमान ५० तासांच्या CPD (Continuous Professional Development) कार्यक्रमात सहभागी होणे बंधनकारक आहे, ज्यामुळे ते अद्ययावत राहतील.

**सर्वांगीण मूल्यांकन :** परीक्षांच्या पलीकडे जाऊन, विद्यार्थी सर्वांगीण विकास कसा साधेल यावर शिक्षक भर देतील.

थोडक्यात, NEP 2020 अंतर्गत शिक्षकांना अधिक लवचिक, सर्जनशील आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षणावर भर द्यावा लागेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे शिक्षकांना नव्या भूमिकेत ढकलणारे धोरण आहे. शिक्षक आता केवळ शिकवणारे नसून मार्गदर्शक, संशोधक, समुपदेशक आणि समाज-निर्माते झाले आहेत. हा बदल भारतीय शिक्षण व्यवस्थेला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवेल.

**NEP 2020 मुळे विद्यार्थ्यांची भूमिका :**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 च्या संदर्भात झालेल्या संशोधनानुसार, सुमारे 64% विद्यार्थी धोरणाबद्दल जागरूक आहेत, तर 54% विद्यार्थ्यांनी यातील बदलांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले आहे. संशोधनात असेही दिसून आले आहे की, ५०% विद्यार्थी (मुख्यतः महिला) यातील वैशिष्ट्यांशी परिचित आहेत, तर उर्वरित ५०% (पुरुष) अद्याप पूर्णपणे अवगत नाहीत.**

* **विद्यार्थ्यांवर झालेल्या संशोधनातील मुख्य आकडेवारी:**

**जागरूकता पातळी :** 36% विद्यार्थ्यांना NEP 2020 बद्दल माहिती नाही.

**सकारात्मक/नकारात्मक दृष्टिकोन :** 54% विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन सकारात्मक आहे, तर 46.29% विद्यार्थ्यांचा नकारात्मक किंवा संमिश्र दृष्टिकोन आहे.

**शिक्षण रचना :** 64% विद्यार्थी जागरूक असून, पैकी 75% विद्यार्थ्यांना NEP च्या प्रमुख वैशिष्ट्यांची (उदा. 5+3+3+4 रचना) कल्पना आहे.

**उच्च शिक्षण ध्येय :** 2035 पर्यंत उच्च शिक्षणात 50% सकल नामनोंदणी प्रमाण (GER) वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.

**बहुविद्याशाखीय (Multidisciplinary) दृष्टिकोन :** पदव्युत्तर स्तरावर, ४ वर्षांचा संशोधन पदवी अभ्यासक्रम (75% गुण) पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थी थेट पी.एच.डी.साठी पात्र ठरतील.

* **संशोधनाचे इतर निष्कर्ष :**

संशोधन हे प्रामुख्याने विद्यार्थ्यांची जागरूकता, पदवीपूर्व विद्यार्थ्यांची धारणा आणि नवीन धोरणाबद्दलचा दृष्टिकोन यावर केंद्रित आहे.

अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणातील 'एक्झिट' (Exit) पर्यायांबद्दल (१ वर्षात सर्टिफिकेट, २ वर्षात डिप्लोमा) उत्सुक आहेत.

या धोरणामुळे उच्च शिक्षणामध्ये संशोधन-केंद्रित संस्कृतीला प्रोत्साहन मिळण्याची शक्यता आहे.

पाठांतराकडून संकल्पनात्मक समज, कौशल्य विकास आणि चिकित्सक विचारांकडे (critical thinking) बदलते. यामध्ये लवचिक विषय निवड (multi-disciplinary), व्यावसायिक शिक्षण. 5+3+3+4 रचना आणि शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट्स (ABC) मुळे शिक्षण विद्यार्थी-केंद्रित होऊन समग्र विकासावर भर दिला जातो.

* **NEP 2020 चा विद्यार्थ्यांवर होणारा प्रमुख परिणाम खालीलप्रमाणे आहे:**

**लवचिक शिक्षण आणि विषय निवड :** विद्यार्थी आता त्यांच्या आवडीनुसार कला, विज्ञान आणि वाणिज्य अशा विविध शाखांमधून विषय निवडू शकतात, ज्यामुळे शिक्षणात लवचिकता आली आहे .

**पाठांतराऐवजी समजावर भर :** परीक्षेतील पाठांतराची पद्धत कमी होऊन संकल्पना समजून घेण्यावर (Conceptual Understanding) आणि ते प्रत्यक्ष आयुष्यात वापरण्यावर भर दिला जातो.

व्यावसायिक आणि कौशल्य-आधारित शिक्षण: शालेय स्तरापासूनच (इयत्ता ६ वी पासून) व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर (Skill Development) भर दिला जात आहे.

**अकॅडमीक बँक ऑफ क्रेडिट (ABC) :** विद्यार्थी मधूनच शिक्षण सोडून पुन्हा सुरू करू शकतात, कारण त्यांचे क्रेडिट्स डिजिटल स्वरूपात जमा राहतात.

**समग्र विकास :** केवळ अभ्यासातच नाही, तर शारीरिक शिक्षण, कला आणि नैतिक मूल्यांच्या विकासावरही भर दिला जातो.

**तांत्रिक कौशल्ये :** डिजिटल साक्षरता आणि ऑनलाइन शिक्षणाला चालना दिली जात आहे.

या धोरणांचा उद्देश विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम करणे हा आहे.

**निष्कर्ष:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. हे केवळ पुस्तकी ज्ञान न देता 'करून शिका' (Learning by doing) या तत्त्वावर आधारित आहे, जे भारताच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

एक चांगली शैक्षणिक संस्था अशी असते की ज्यात प्रत्येक विद्यार्थ्याला आपण स्वागतारह असल्याची तसेच स्वतःची दखल घेतली जात असल्याची प्रबळ भावना असते एक सुरक्षित आणि प्रेरणादायी वातावरण अस्तित्वात असते सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विविध प्रकारचे अध्ययन अनुभव उपलब्ध करून दिले जातात आणि चांगल्या भौतिक पायाभूत सुविधा व अध्ययनासाठी अनुकूल संसाधने सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जातात हे सर्व गुण प्राप्त करणे प्रत्येक शैक्षणिक संस्थांचे ध्येय असले पाहिजे या दृष्टिकोनातून संस्थेचा प्रधान म्हणून **मुख्याध्यापकाची भूमिका** ही अतिशय महत्त्वाची असणार आहे.

**शिक्षक** हा शिक्षण प्रणालीतील मूलभूत सुधारणांचा केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षकांना समाजातील अत्यंत आदरणीय आणि आवश्यक घटक म्हणून सर्व स्तरांवर पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी

मदत झाली पाहिजे कारण तेच खऱ्या अर्थाने आपल्या भावी पिढीला आकार देतात शिक्षकांना सक्षमपणे आणि त्यांचे कार्य शक्य तितक्या प्रभावीपणे करण्यास त्यांना मदत करणे यासाठी आवश्यक सर्व बाबीत होणार असावेत नवीन शैक्षणिक धोरण आहे प्रत्येक स्तरावर अध्यापन क्षेत्रात सर्वोत्तम आणि विज्ञान विद्वान व्यक्तीची भरती होण्यासाठी त्यांचा उतरनिर्वाह सन्मान प्रतिष्ठान आणि स्वायत्तता यांची निश्चिती करून व्यवस्थेमध्ये गुणवत्ता नियंत्रण आणि उत्तरदायित्वाच्या मूलभूत पद्धतीने बंद करणे गरजेचे आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात सर्वच परिक्षेत्रातील **विद्यार्थ्यांना** गुणवत्तापूर्ण निरीक्षण देखील करणे आवश्यक आहे यासाठी ऐतिहासिक दृष्टीने उपेक्षित वंचित आणि अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे शिक्षण हे समता सुनिश्चित करण्याचे एक उत्तम माध्यम आहे ज्याद्वारे समाजात समानता समावेशकता आणि सामाजिक आर्थिक गतिशीलता मिळू शकते अशा गटांमध्ये सर्व मुलांसाठी पूर्वापार अडथळे असले तरी या गटातील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन यथोचित प्रगती करते या दृष्टीने निश्चित पावले उचलली गेली पाहिजेत.

*** संदर्भ**

1. Government of India. (2020). National Education Policy 2020. Ministry of Education.
2. Sharma, R. (2021). Role of Teachers in Implementing NEP 2020. Journal of Education and Development, 15(3), 45–53.
3. Patel, S. (2022). Teacher Professional Development in NEP 2020. International Journal of Pedagogical Studies, 9(2), 112–124.
4. UNESCO. (2021). The role of teachers in transforming education systems. Paris: UNESCO Publishing.
5. Singh, A. (2023). Technology and Pedagogy in Indian Classrooms. Indian Journal of Education

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# अर्थव्यवस्थेतील उदयोन्मुख क्षेत्र आणि उच्च शिक्षण

**आकाश संपतराव ढोमणे**
विद्यार्थी , पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग ,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**प्रस्तावना**

उदयोन्मुख क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र की जे उद्योग किंवा क्षेत्र नव्याने निर्माण होत आहे किंवा प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे आणि येणाऱ्या भविष्यातील त्या-त्या क्षेत्रांमध्ये वेगाने विकासाची गती आणि मोठ्या संधी निर्माण करणारी क्षेत्र होय. कोणत्याही अर्थव्यवस्थेतील किंवा देशाच्या अंतर्गत असणारे उद्योग सुरुवातीच्या टप्प्यात असून येत्या काही वर्षात वेगाने रोजगाराच्या संधी आणि प्रगती करणाऱ्या क्षेत्रांचा देशाच्या विकासाला आणि विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका असते .

**साधारणतः उदयोन्मुख क्षेत्र ठरवण्याचे काही निकष**

1) ते असे क्षेत्र असावे की जो उद्योग स्थापन केलेला आहे परंतु ते सध्या फार मोठे झाले नाही .

2) सध्या नव्याने स्थापलेले असलेले तरी जवळच्या काळात अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे क्षेत्र बनण्याची अपेक्षा असणारे आहे .

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतर आर्थिक अहवालानुसार अशाही जगातील सर्वात वेगाने वाढणारे बाजारपेठ आणि आर्थिक विकासाचे केंद्र बनत आहे. चीन आणि भारत हे दोन देश मिळून जगाच्या जीडीपी वाढीमध्ये साधारणता 44% योगदान देतील असा अंदाज आयएमएफने दर्शविला आहे. एप्रिल 2015 मध्ये प्रसिद्ध केलेल्या वर्ल्ड इकॉनोमी आउटलूक अहवालात भारत 2025 मध्ये 4.19 ट्रिलियन अमेरिकन डॉलरच्या जीडीपी सह जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनलेली आहे आणि खरेदी क्षमता म्हणजेच परचेसिंग पावर पॅरिटीनुसार भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. भारताच्या वाढत्या विकासदर आणि उद्योन्मुख क्षेत्रासाठी शासनाचे धोरण यांचा परिणाम म्हणून भारतात नवीन बाजारपेठ नव्या गुंतवणुकीच्या संधी त्यासोबत नवीन उपक्रम शोधणाऱ्या विकसित अर्थव्यवस्थेचे भारत हे आर्थिक केंद्रबिंदू बनत आहे. ज्यामुळे इतर क्षेत्रांच्या तुलनेत उदयोन्मुखी क्षेत्राकडे बदललेला कल दिसून येतो .

**जसे अंटक (UNCTAD ) जून 2025** मध्ये जाहीर केलेल्या जागतिक गुंतवणूक अहवाल 2025 नुसार परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणजेच एफ.डी.आय प्राप्त देशांमध्ये भारत 15 व्या स्थानी तर एफ.डी.आय बाहेर प्रवाहामध्ये भारत 18 व्या स्थानी आहे .

स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्था ही सुरुवातीच्या काळात लोकशाही समाजातील आधारित विचार प्रणालीवर आधारित असूनही वेळी मिश्र अर्थव्यवस्थेचे स्वरूप असल्याचे दिसून येते, परंतु 24 जुलै 1991 च्या नवीन आर्थिक धोरणाचा सकारात्मक परिणाम होऊन अर्थव्यवस्थेचा वाढणारा विकासदर त्यासोबतच बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रवाह त्यामुळे त्यासोबत येणारा नाविन्यपूर्ण कौशल्य, शोध, गुंतवणूक, आधुनिक पद्धतीचे तंत्रज्ञान आणि कौशल्यावर आधारित विभिन्न उत्पादन कंपन्या यामुळे उदयोन्मुख क्षेत्राला पोषक असे वातावरण निर्माण झाले. भारतीय अर्थव्यवस्था ही आदेशात्मक अर्थव्यवस्थेपासून ही सुचकात्मक म्हणजेच भांडवलशाहीकडे कल झुकलेली आपल्याला दिसून येते. ज्यामध्ये एलपीजी मॉडेलच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेत ऊर्जा, पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, उत्पादन, अन्नप्रक्रिया आणि अलीकडच्या काळात माहिती तंत्रज्ञान, पर्यटन, शिक्षण या उदयोन्मुख क्षेत्रांचा विकास होताना दिसून येत आहे .

**रोस्टो मॉडेल** ज्यामध्ये अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचे पाच टप्पे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार आज जर पाहीले तर आपल्याला साधारणता तिसरा टप्प्यामध्ये (टेकऑफ) म्हणजेच उद्योग क्षेत्र आणि चौथ्या (ड्राईव्ह मॅच्युरिटी) म्हणजेच सेवा क्षेत्राकडे कल असल्याचे आपल्याला दिसून येते. ज्यानुसार अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी भारताला उत्पादनाचे केंद्र बनवण्याच्या उद्देशाने उदयोन्मुख क्षेत्राकडे लक्ष आणि धोरण निर्मिती करणे हे गरजेचे आहे आणि त्याला अनुसरून सरकार वेगवेगळे धोरणे आणि योजना आखताना दिसून येते, उदाहरणार्थ स्टार्ट अप इंडिया, मेक इन इंडिया , स्टँड अप इंडिया .

भारतीय अर्थव्यवस्थेत आज उद्योन्मुख क्षेत्र म्हणून अन्नप्रक्रिया उद्योग, उत्पादन क्षेत्र, आरोग्य क्षेत्र, शिक्षण, पर्यटन, ज्ञान प्रक्रिया इत्यादी उद्योगाची क्षमता लवचिक असल्याने त्यांचा विकासातील वाटा, प्रगती आणि लक्षणीय बदल हे अर्थव्यवस्थेत दिसू शकते. परंतु कोणत्याही क्षेत्राला त्याच्या आजच्या परिस्थितीवरून आपण उदयोन्मुख क्षेत्र आहे असे म्हणू शकत, कारण अर्थव्यवस्था ही सतत बदलणारी असून ही दिवसागणिक अजुन गुंतागुंतीची होत आहे,

त्यामुळे निश्चित असे कोणतेही क्षेत्र ओळखता येऊ शकत नाही, तरी काही त्यांच्या बदलांच्या क्षमता आणि लवचिकता या आधारावर उदयोन्मुख क्षेत्र खालील असल्याचे दिसून येते .

**कृषी व अन्नप्रक्रिया -**

भारतातील कृषी व अन्न प्रक्रिया उदयोन्मुख उद्योग हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवे आयाम व नवी दिशा देणाऱ्या महत्त्वाचे क्षेत्र बनत आहे. आधुनिक पद्धतीने शेतीतील उत्पादनात प्रक्रिया करून त्याला जागतिक बाजार पेठेपर्यंत पोहोचवण्याचा मुख्य हेतू हा अन्नप्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून होत असल्याचा दिसून येते. शेती आणि उद्योग यामधील दुवा म्हणूनही काम करताना आपल्याला दिसून येतो, तसेच चीन नंतर भारत हा जगातील सर्वात मोठा अन्न उत्पादक देश आहे .

**राष्ट्रीय उत्पादन धोरण 2017** नुसार प्रत्येक शेतकऱ्यांचे दरडोई धरण उत्पादन हे 2022 पर्यंत दुप्पट करण्याचे लक्ष ठेवले होते. त्या अनुषंगाने या क्षेत्राला पूरक असे वातावरण, संशोधन, प्रक्रिया आणि उत्पादनाचे जागतिकीकरणाची संधी आणि शेती उत्पादन वाढवण्यास चालना मिळाली आहे .

भारतातील अन्नप्रक्रिया क्षेत्राने गेल्या दशकामध्ये विशेषता परकीय थेट गुंतवणुकीत एप्रिल 2019 डिसेंबर 2024 पर्यंत यामध्ये एकूण 13.01 अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक मिळाली त्यातही विशेष म्हणजे 2014 ते 2024 या कालावधीत सुमारे सात अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक अन्नप्रक्रिया उद्योगांमध्ये झालेले आहे आणि सध्या एकूण अन्न बाजारपेठेत त्याचा वाटा 32% आहे यावरून लक्षात येते की आगामी काळात उत्पादन वापर निर्यात आणि अपेक्षित वाढते साठी हे क्षेत्र भविष्यात मोठ्या प्रमाणात विकसित होताना दिसेल .

**आरोग्य सेवा आणि औषध निर्माण क्षेत्र**

आरोग्य सेवा क्षेत्रातील आणि औषध निर्माण करण्यात दिवसेंदिवस वाढत जाणारे गुंतवणुकीमुळे हे क्षेत्र वेगाने वाढत आहेत सोबतच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून मानवी आरोग्याची जैवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून देखरेख ठेवले जात आहे. मानव विकास निर्देशांक अहवाल 2025 नुसार भारताचा 130 वा क्रमांक तसेच भारताचे सरासरी आयुर्मान 72 वर्ष हे सुधारलेले स्थान निर्देशित करतात की आरोग्य सेवा तसेच औषध निर्माण क्षेत्रामध्ये होत जाणारे मूलभूत असे बदल त्यासोबतच सरकारच्या वेगवेगळ्या सर्व समावेशी योजनेच्या माध्यमातून उदाहरणार्थ आयुष्यमान भारत योजना यासारख्या योजनाची अंमलबजावणी मुळे आरोग्य सेवेला चालना मिळत आहे .

**पर्यटन**

पर्यटन हे उदयोन्मुख क्षेत्र असून ते बहुआयामी आहे. असा भारतीय अर्थव्यवस्थेतील संधी रोजगार आणि कौशल्य आधारित व्यवसाय मूलभूत अशा प्रकारचा आधार देणारे क्षेत्र म्हणून ओळखल्या जाते. ज्यात विविध निवासी, सेवाभावी धार्मिक स्थळे, पर्यावरण व कृषी पर्यटन त्यासोबतच आज वेगाने वाढत जाणारे वैद्यकीय पर्यटन इत्यादी प्रकारच्या पर्यटनाचा यामध्ये मोलाचा वाटा आहे .

2023 मध्ये भारताच्या जीडीपी मध्ये सुमारे 7.6% वाटा हा पर्यटनाचा होता. ज्यामध्ये अतुल्य भारत "अतिथी देवो भव" यास लोकांचा परकीय पर्यटकांना या क्षेत्रात अधिकाधिक आकर्षित केलेल्या आहेत. तसेच भारतातील विविध पर्यटन स्थळांना भेटी देण्यामध्ये एकूणच 6.43 मिलियन इतक्या वाटा असून परकीय पर्यटकांची संख्या अधिकच वाढत आहे, 2023 या वर्षात 17.611 बिलियन डॉलर्स इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

**शिक्षण**

भारतीय शिक्षण प्रणाली ही आजच्या बदलत्या परिस्थितीनुसार आणि जागतिक करणाच्या युगात भारताला लोकसंख्या लाभांशाचा फायदा मिळवून देणे उच्च शिक्षण प्रणाली ही महत्त्वाची भूमिका बजावते ज्याच्या माध्यमातून धोरणात्मक निर्णय नाविन्यपूर्ण धोरणे (उदाहरणार्थ NEP - 2020) , उपक्रम (उदाहरणार्थ - स्टार्टअप इंडिया) आणि सहकार्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक आणि दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करू शकतो .

**एन ए पी 2020** हे धोरण शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्या सोबतच कौशल्य आधारित शिक्षणाला चालना देऊन विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता , नेतृत्व , कौशल्य निर्माण करण्याचे ही मदत करते .

आज शिक्षण क्षेत्रातील उदयोन्मुख क्षेत्र म्हणून आधुनिक तंत्रज्ञान आणि त्याला अनुसरून असे विविध प्रकारचे शिक्षण उदा. दूर शिक्षण प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कौशल्य आधारित विविध उपक्रम हे उच्च शिक्षणामध्ये राबवले जात आहे . भारतीय एडटेक बाजारपेठ ही 2030 पर्यंत 29 - 30 अब्ज अमेरिकन डॉलर पर्यंत पोहोचवण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. ज्यामध्ये या क्षेत्राच्या वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ताद्वारे शिक्षण संशोधन आणि व्यावसायिक बुद्धिमत्तेत वाढ तसेच प्रादेशिक शिक्षणासोबतच डिजिटल पद्धतीने वेगवेगळे शैक्षणिक साधनसामग्री यांचा समावेश यामध्ये होतो .

भारतीय शिक्षण मंत्रालयद्वारे शेती, आरोग्य सेवा आणि शाश्वत शहरांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी एआय सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करणे आणि त्या माध्यमातून विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने उच्च

शिक्षणातील उदयोन्मुख क्षेत्रातील उद्योगांचा आणि स्टार्टअप च्या सहकार्याने हे उच्च शिक्षण संस्थांकडून ही केंद्रे चालवली जातील असे म्हटले आहे . शिक्षण क्षेत्रातील काही उदयोन्मुख क्षेत्रे खालील प्रमाणे

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उच्च शिक्षण**

एआय च्या माध्यमातून शिक्षणात गुणवत्तापूर्ण आणि शैक्षणिक साधनसामग्री तयार करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जात आहे त्यासोबतच या क्षेत्रात मध्ये सहभागात्मक आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी आज AI चा वापर हा उच्च शिक्षणातील संशोधन , माहिती स्त्रोत , ज्ञान प्रणाली म्हणूनही केला जात आहे . अमेरिकेनंतर भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा ई लर्निंग बाजार बनलेला आहे

**कौशल्य विकास आधारित शिक्षण**

21 व्या शतकात जागतिकीकरणाच्या स्पर्धेत स्पर्धात्मकता आणि नाविन्यपूर्ण कौशल्यांचा विकास विद्यार्थ्यांचा होण्यासाठी एन. इ. पी. 2020 च्या शैक्षणिक धोरणातील बदल हे त्या अनुषंगाने केलेले दिसते ज्या मधून विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा विकास होऊन अर्थव्यवस्थेला एक नवीन आयाम प्राप्त होऊन 2047 पर्यंतचा विकसित भारत श्रेष्ठ भारत ही संकल्पना साकार करण्यास मदत होईल .

**निष्कर्ष**

नव्या उदयोन्मुख क्षेत्र जे एकूणच अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक घटकातील मूलभूत असे बदल आणि बदलत्या परिस्थितीला अनुरूप अशी प्रणाली जी जुन्या तंत्रज्ञानाच्या जागी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून सामाजिक - आर्थिक समानता, दर्जा व समाजात समतामुलक वितरण करून लोक कल्याणकारी राज्य स्थापन करण्यास मदत करते. तसेच देशाच्या जलद, शाश्वत आणि सर्वसमावेशी विकासाला आणि अर्थव्यवस्थेला जागतिक आर्थिक केंद्र बनवण्याची क्षमताही उदयोन्मुख क्षेत्रात असल्याचेही दिसून येते.

**संदर्भ**

1 ) भारतीय अर्थव्यवस्था - रमेश सिंह (Mc graw Hills Publication )
2) स्पर्धा परीक्षेचे अर्थशात्र भाग -१- किरण देसले, द्वीपस्तंभ प्रकाशन, जळगाव
3 ) www.ibef.org
4) www . apeda.gov.in
5 ) www . tourism . gov . in ( ministry of tourism )
6 ) www. wikipidia . org . com
7) www . Imf org .
8) www . indiabudget . gov . in

# महाराष्ट्रातील शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांतील असमानता: एक विश्लेषणात्मक अभ्यास

**सायत्रा दिगंबर मकेश्वर**
संशोधक विद्यार्थी ,भारतीय महाविद्यालय, अमरावती

**गोषवारा:**

महाराष्ट्र हे शिक्षण व आरोग्य क्षेत्रात प्रगत राज्य मानले जाते. मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध आहेत. मात्र ग्रामीण, आदिवासी व मागास भागांमध्ये या सुविधांची मोठी तफावत दिसून येते.महाराष्ट्र हे भारतातील सर्वात औद्योगिक व आर्थिकदृष्ट्या विकसित राज्यांपैकी एक आहे. मुंबई व पुणे या शहरांनी राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती दिली आहे. तथापि, या विकासाचा लाभ राज्यातील सर्व प्रदेशांना समान प्रमाणात मिळालेला नाही. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या भागांमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता दिसून येते. महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांमधील दिसून येणाऱ्या असमानतेचा सविस्तर अभ्यास प्रस्तुत संशोधन लेखात करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्रात शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांमध्ये प्रादेशिक असमानता (Regional Disparity) मोठ्या प्रमाणावर आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई- पुणे पट्टा प्रगत, तर विदर्भ, मराठवाडा आणि आदिवासी पट्ट्यात (उदा. पालघर, नंदुरबार) आरोग्य सेवा, गुणवत्तेचे शिक्षण आणि रस्ते- पाणी या सुविधांची कमतरता आहे. ग्रामीण- शहरी दरी आणि खासगी- सार्वजनिक सेवांमधील असमानता हे प्रमुख आव्हान आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने दोन समित्या गठित केल्या होत्या. सन 1984 साली डॉ. वी. एम. दांडेकर समिती आणि सन 2011 साली विजय केळकर समिती. या दोन्ही समितीने या भागाच्या विकासासाठी शिफारसी सुचवल्या होत्या. मात्र, त्या कागदोपत्रीच राहिल्या आहेत. तर मराठवाडा, विदर्भ विकास महामंडळाकडूनही सक्रियपणे फारसे काही उपक्रम राबवले जात नसल्याचं पाहायला मिळतं. या प्रशासकीय अनिच्छेमुळे ही प्रादेशिक विकासातील दरी वाढत असल्याचे दिसून येते. करिता प्रस्तुत विषयाचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**मुख्य मांडणी:**

महाराष्ट्रातील क्षेत्र निहाय पायाभूत सेवांमधील दिसून येणारी तफावत, कारणे आणि उपायोजना या मुद्द्यांच्या आधारे अभ्यासता येईल.

**1)शिक्षण क्षेत्रातील असमानता ग्रामीण-** शहरी दरी- शहरी भागात उच्च दर्जाच्या शाळा, कॉलेजेस, IT शिक्षण उपलब्ध नसल्यामुळे व तसेच ग्रामीण भागात मूलभूत शाळांचीही कमतरता असल्यामुळे अनेक गावांमध्ये माध्यमिक शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना दूर जावे लागते.ग्रामीण शिक्षणाचा दर्जा तुलनेने कमी राहतो.

**जिल्हानिहाय तफावत-** मुंबई, पुणे, नागपूर अशा ठिकाणी उच्च साक्षरता व शिक्षण सुविधा असून नंदुरबार, बीड, धुळे, परभणी येथील शिक्षण पातळी घसरलेली दिसून येते महिलांच्या शिक्षणातही मोठी तफावत दिसतेज्या जिल्ह्यांत शिक्षण जास्त → बालविवाह कमीज्या जिल्ह्यांत शिक्षण कमी बालविवाह जास्त अशा सारखी स्थिती आढळून येते.

**शिक्षक व शाळांची कमतरता-** ग्रामीण शाळांमध्ये शिक्षकांची कमतरताकाही शाळांमध्ये मुख्याध्यापकही नाहीत फक्त सुमारे 31% ग्रामीण शाळांमध्ये नियमित शिक्षक उपलब्ध आहे.

**डिजिटल दरी-** शहरी भागात ऑनलाइन शिक्षण, स्मार्ट क्लासग्रामीण भागात इंटरनेट व उपकरणांची कमतरता COVID नंतर ही दरी अधिक स्पष्ट झाली.

**सामाजिक व आर्थिक अडथळे-** गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षण सोडावे लागते मुलींच्या शिक्षणात अडथळे (लवकर लग्न, घरकाम) पाहायला मिळतात.

**2)आरोग्य सुविधांमधील असमानता-** शहरी भागात सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल्स असूनग्रामीण भागात फक्त प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC)आणि बेड उपलब्धता अत्यल्प असूनशहर: 3–4 बेड प्रति 1000 लोक ग्रामीण: 1 पेक्षा कमी दिसून येते.

**डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता-** शहरात डॉक्टरांची उपलब्धता जास्त तरग्रामीण भागात डॉक्टर- लोकसंख्या प्रमाण खूपच कमी (1:3000 पेक्षा जास्त)यामुळे ग्रामीण भागात आरोग्य स्थिती अधिक खराब होत आहे.

**भौगोलिक अडचणी-** अनेक गावांमधून रुग्णालय 20–50 किमी दूर असूनवाहतूक सुविधा अपुरी आपत्कालीन सेवांमध्ये विलंब होताना दिसून येते.

**रोगांचा स्वरूपातील फरक-** ग्रामीण भाग → संसर्गजन्य रोग (मलेरिया, टीबी)शहरी भाग → जीवनशैलीजन्य रोग (डायबिटीज, BP)अलीकडील सर्वेक्षणानुसार1 पैकी 4 लोकांना मधुमेह आढळला.

आरोग्य खर्चातील असमानताग्रामीण लोकांना स्वतःच्या खिशातून जास्त खर्च (60–70%) खर्च करावे लागतात तरशहरी भागात तुलनेने कमी खर्च होतो.

**परिणाम**

- मानवी विकासात तफावत
- गरिबी व बेरोजगारी वाढ
- महिलांचे सशक्तीकरण कमी
- आरोग्यदृष्ट्या मागास समाज
- ग्रामीण- शहरी स्थलांतर वाढ

**३.आर्थिक तरतूदीमधील असमानता-** राज्याच्या सन 2024 – 2025 अर्थसंकल्पामध्ये राज्यांतर्गत विविध भागाच्या विकासासाठी दिल्या जाणाऱ्या निधीमधील असमानता ठळकपणे दिसून येते. या अर्थसंकल्पामध्ये कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ, मराठवाडा या भागात असमान निधी वाटप केल्याचं निदर्शनास येतं.

एकीकडे पश्चिम महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद आणि गुंतवणुकीसाठी प्राधान्य दिलं जात आहे. तर दुसरीकडे मराठवाडा विभाग हा पाणी, शिक्षण आरोग्य अशा मूलभूत गरजा आणि पायाभूत सुविधा मिळवण्यासाठी धडपडत आहे.

मराठवाड्यामध्ये उत्तम शिक्षण आणि रोजगाराच्या संधीही नाहीत. त्यामुळे इथल्या विद्यार्थ्यांना शहरी भागामध्ये शिक्षणासाठी आणि नंतर नोकरीसाठी स्थलांतर करावं लागतं. त्यामुळे इथली अर्थव्यवस्था आणखीन दुर्बल झाली आहे.

**४.प्रादेशिक असमतोल हे प्रशासकीय आव्हान-** प्रादेशिक असमतोल विकास हे केवळ आर्थिक अपयश नाही तर ते प्रशासनाचं अपयश आहे. त्यामुळे संपूर्ण राज्याचा समतोल विकास साधणं हे प्रशासना समोरचं मोठं आव्हान आहे. हा समतोल विकास साधण्यासाठी अवाढव्य निधी वा गुंतवणूकीऐवजी शिस्तबद्ध पद्धतीने इथली भौगोलिक स्थिती समजून घेऊन त्यानुसार विकास आराखडा तयार करणं गरजेचं आहे.

नैसर्गिक वातावरणाचा अभ्यास करुन इथल्या शेतजमिनीत कमी पाण्यात कोणती पिकं घेतली जाऊ शकतात त्याचा अभ्यास करणे, या शेतमालाच्या विक्रीसाठी उत्तम विक्री व्यवस्था उभी करणे, सिंचन व्यवस्था सक्षम करण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड योजना प्रभावीपणे राबवणे, दर्जेदार रस्ते बांधणी करणे, औद्योगिक विकासासाठी त्याला सुयोग्य अशा पायाभूत सुविधा निर्माण करणे, दर्जेदार शिक्षणसंस्था उभ्या करणे अशा शाश्वत विकासाच्या अनुषगांने उपाययोजना राबवणे अत्यावश्यक आहे.

कारण महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीवर काही घटकांचा, काही शहरांचा विशेषाधिकार नसून महाराष्ट्रातील सर्व नागरिकांचा समान हक्क असला पाहिजे. राज्यातील सर्व प्रादेशिक विभागाचा सर्वसमावेशक विकास घडला तरच राज्य हे खऱ्या अर्थाने अर्थशक्तीचं केंद्र बनू शकते.

**असमानतेची प्रमुख कारणे-**

**शिक्षणासाठी-** शाळा व शिक्षकांची कमतरता,आर्थिक अडचणी,सामाजिक परंपरा,डिजिटल सुविधांचा अभाव दिसून येतो.

**आरोग्यासाठी-** आरोग्य केंद्रांची कमी संख्या,डॉक्टरांची कमतरता,वाहतूक व पायाभूत सुविधा कमी,जागरूकतेचा अभाव आढळतो.

**परिणाम-** मानवी विकासात तफावत,गरिबी व बेरोजगारी वाढ,महिलांचे सशक्तीकरण कमी, आरोग्यदृष्ट्या मागास समाजग्रामीण- शहरी स्थलांतर वाढ होत आहे

महाराष्ट्रातील सामाजिक पायाभूत सुविधा विकासासाठी शासनाच्या उपाययोजना आणि योजना

महाराष्ट्र शासनाने सामाजिक पायाभूत सुविधा विकासासाठी खालील प्रमुख उपाययोजना आणि योजना राबविल्या आहेत.

**1. शिक्षण क्षेत्रातील सुधारणा-** मुक्त शिक्षण योजना: प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत करण्यासाठी योजना,शाळा बांधणी व सुधारणा: नवीन शाळा उभारणी आणि विद्यमान शाळांचे नूतनीकरण,डिजिटल शिक्षण: शाळांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे.

**2. आरोग्य सेवा सुधारणा-** ग्रामीण आरोग्य केंद्रे: ग्रामीण भागात आरोग्य केंद्रांची स्थापना व सुधारणा,मोबाईल आरोग्य सेवा: दुर्गम भागात आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी मोबाईल क्लिनिक, टीकाकरण मोहीम: लसीकरण मोहिमा राबवून रोग प्रतिबंध.

**3. पाणी व स्वच्छता सुधारणा-** ग्रामीण व शहरी भागात स्वच्छ पाणी पुरवठा सुनिश्चित करणे,स्वच्छता अभियान: स्वच्छता राखण्यासाठी स्वच्छता अभियान राबविणे,

**4. वाहतूक व संपर्क सुविधा-** रस्ते बांधणी: ग्रामीण व शहरी भागात रस्ते व पूल बांधणी,सार्वजनिक वाहतूक सुधारणा: बस सेवा व रेल्वे सेवा सुधारणा.

**5. सामाजिक सुरक्षा योजना-** वृद्धापकाळीनिधी योजना: वृद्ध व्यक्तींना आर्थिक मदत,महिला व बालकल्याण योजना: महिलांसाठी स्वयंरोजगार व बालकल्याण योजना.

**6. डिजिटल महाराष्ट्र योजना-** शासनाच्या सेवा डिजिटल माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविणे.

**सारांश :-**

महाराष्ट्र शासनाने सामाजिक पायाभूत सुविधा विकासासाठी शिक्षण, आरोग्य, पाणी, स्वच्छता, वाहतूक, सामाजिक सुरक्षा आणि डिजिटल सेवा या क्षेत्रात विविध योजना राबवून विकासाला चालना दिली आहे. ग्रामीण भागातील शाळा घरापासून खूप दूर असू शकतात, ज्यामुळे मुलांना शाळेत नियमित जाणे कठीण होते. काही ग्रामीण कुटुंबांमध्ये शिक्षणाबाबत जागरूकता कमी असते. परिणामी, मुलांना लवकरच कामावर लावणे किंवा शिक्षणापेक्षा कामाला प्राधान्य देणे ही समस्या उद्धवते. अनेक ग्रामीण शाळांमध्ये वीज, पाणी, स्वच्छता या मुलभूत सुविधांचा अभाव असतो. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यात अडचणी येतात आणि शिकण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. ग्रामीण भागातील शाळांमध्ये अद्ययावत शैक्षणिक साधने, पुस्तकं, संगणक आणि इंटरनेटची उपलब्धता मर्यादित असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणापासून वंचित राहावे लागते.अनेकदा ग्रामीण शाळांमध्ये शिक्षकांची संख्या पुरेशी नसते किंवा प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळण्यात अडचणी येतात.

विज्ञान, गणित आणि इंग्रजी शिकण्याच्या संधींची कमी उपलब्धता ग्रामीण भागात या विषयांच्या शिक्षकांची कमतरता आणि पुरेसे साधनसामग्री नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येतात. ग्रामीण भागातील शाळा घरापासून खूप दूर असू शकतात, ज्यामुळे मुलांना शाळेत नियमित जाणे कठीण होते. काही ग्रामीण कुटुंबांमध्ये शिक्षणाबाबत जागरूकता कमी असते. परिणामी, मुलांना लवकरच कामावर zलावणे किंवा शिक्षणापेक्षा कामाला प्राधान्य देणे ही समस्या उद्धवते.

अनेक ग्रामीण शाळांमध्ये वीज, पाणी, स्वच्छता या मुलभूत सुविधांचा अभाव असतो. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यात अडचणी येतात आणि शिकण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. ग्रामीण भागातील शाळांमध्ये अद्ययावत शैक्षणिक वसाधने, पुस्तकं, संगणक आणि इंटरनेटची उपलब्धता मर्यादित असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणापासून वंचित राहावे लागते.अनेकदा ग्रामीण शाळांमध्ये शिक्षकांची संख्या पुरेशी नसते किंवा प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळण्यात अडचणी येतात.

विज्ञान, गणित आणि इंग्रजी शिकण्याच्या संधींची कमी उपलब्धता ग्रामीण भागात या विषयांच्या शिक्षकांची कमतरता आणि पुरेसे साधनसामग्री नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येतात. महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांमधील असमानता ही राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी गंभीर अडथळा आहे. काही मोजक्या भागांमध्ये विकास केंद्रित राहिल्यामुळे इतर प्रदेश मागे पडले आहेत. समतोल व समावेशक विकासासाठी नियोजनबद्ध, क्षेत्रनिहाय आणि दीर्घकालीन धोरणे राबविणे अत्यावश्यक आहे.शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील असमानता दूर करणे हे महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. यासाठी केवळ पायाभूत सुविधा वाढवणे नव्हे, तर समावेशक, दीर्घकालीन आणि प्रभावी धोरणांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची-**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – रुपयाची समस्या – 1923.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – शेतकऱ्यांचा प्रश्न – 1943.
३. ग. प्र. प्रधान – सामाजिक न्यायाची संकल्पना – 2005.
४. डॉ. नरेंद्र जाधव – आमचा बाप आणि आम्ही – 1993.
५. डॉ. सुहास पळशीकर – समकालीन राजकारण – 2010.
६. डॉ. राजेंद्र व्होरा – भारतीय लोकशाही – 2008.
७. शरद जोशी – शेतकरी संघटना आणि प्रश्न – 1990.
८. डॉ. अभय बंग – माझा साक्षात्कार – 2010.

# अमरावती जिल्ह्यातील रासायनिक खतांचे वितरण आणि वापर

**भुषण भाऊरावजी गावंडे**
संशोधक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
**डॉ. एम. के . तानुरकर**
मार्गदर्शक ,वाणिज्य विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मारेगाव जि.यवतमाळ.
**डॉ. पी.पी.कुलकर्णी**
वाणिज्य विभाग, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मारेगाव जि.यवतमाळ

**सारांश :**

अमरावती जिल्हा हा महाराष्ट्रातील कृषी प्रधान जिल्हा आहे. येथील शेतकरी रासायनिक खतांचा वापर करून पीक उत्पादन वाढवतात. परंतु, खतांचा अयोग्य वापर मातीची गुणवत्ता, पाणी प्रदूषण आणि पर्यावरणीय समस्या निर्माण करतो. या संशोधनाचा उद्देश अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खतांच्या वापराच्या पद्धतीचा अभ्यास करून त्यांच्यात सुधारणा करण्याच्या उपाययोजना शोधणे हा आहे. शेती उत्पादनवाढीसाठी रासायनिक खतांची महत्त्वाची भूमिका आहे. अमरावती जिल्ह्यात रासायनिक खतांच्या वितरणाची सध्याची स्थिती, शेतकऱ्यांचा त्याविषयीचा अनुभव, व खतांच्या उपयोगाचा जमीन व उत्पादनावर झालेला परिणाम याचा अभ्यास या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे. संशोधन पद्धतीमध्ये प्रायमरी डेटा गोळा करण्यासाठी प्रश्नावली व प्रत्यक्ष मुलाखतींचा उपयोग करण्यात आला. निष्कर्ष दर्शवतो की वेळेवर वितरण, किमतीतील चढ-उतार, आणि सुलभ उपलब्धतेची समस्या महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांना सुधारित वितरण प्रणाली व सेंद्रिय आणि रासायनिक खतांचा समतोल वापर याबाबत मार्गदर्शन देणे गरजेचे आहे.

संशोधनासाठी शेतकऱ्यांमध्ये सर्वेक्षण करून माहिती गोळा करण्यात आली. या माहितीचे विश्लेषण करून शेतकऱ्यांच्या खतांच्या वापराच्या पद्धती, त्यांची जागरूकता आणि खतांची उपलब्धता या बाबींचा अभ्यास करण्यात आला. संशोधनातून असे दिसून आले की, अनेक शेतकरी खतांचा योग्य मात्रा आणि पद्धतीने वापर करत नाहीत. तसेच, खतांची उपलब्धता आणि किंमत याबाबतही समस्या आहेत.

**Keywords (कीवर्ड्स):**
रासायनिक खते, वितरण व्यवस्था, खतांचा वापर, कृषी इनपुट्स (कृषी साधने), अमरावती जिल्हा.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश असून शेती उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांचे योगदान अनन्यसाधारण आहे. अमरावती जिल्हा हा विदर्भातील महत्त्वाचा कृषी जिल्हा असून सोयाबीन, कापूस, तूर व गहू ही प्रमुख पिके येथे घेतली जातात. परंतु, याठिकाणी खत वितरण व्यवस्थेत येणाऱ्या अडचणी व शेतकऱ्यांचा त्या संदर्भातील अनुभव यावर अभ्यास होणे आवश्यक आहे. हा पेपर खत वितरणाच्या सध्याच्या प्रणालीचे मूल्यांकन, शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, व पर्यायी उपाय यावर भर देतो.

रासायनिक खतांच्या वितरण साखळीत कच्च्या मालापासून ते प्रत्यक्ष शेतापर्यंत एक महत्त्वाची साखळी कार्यरत असते. या प्रक्रियेची सुरुवात **पुरवठादारांपासून** होते, जे खत निर्मितीसाठी आवश्यक असलेले नैसर्गिक वायू, तेल आणि कोळसा यांसारखा कच्चा माल **उत्पादकांना** (कारखान्यांना) पुरवतात. उत्पादक या मालावर प्रक्रिया करून खते तयार करतात. तयार झालेली ही खते सुरक्षित ठेवण्यासाठी **साठादारांची** भूमिका महत्त्वाची ठरते; हे साठादार बंदर, कारखाने किंवा प्रादेशिक गोदामांमध्ये खतांची साठवणूक करतात.




साठवलेला हा माल **वितरकांमार्फत** पुढे सरकतो. वितरक हे उत्पादक किंवा साठादारांशी कायदेशीर करार करून वाहतूक व्यवस्थेच्या सहाय्याने खतांचा पुरवठा **किरकोळ विक्रेत्यांपर्यंत** पोहोचवतात. यामध्ये प्रामुख्याने शेतकरी सेवा केंद्रे आणि कृषी सेवा दुकानांचा समावेश होतो. शेवटी, या साखळीतील अत्यंत महत्त्वाचा आणि अंतिम घटक म्हणजे **शेतकरी**, जो आपल्या पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी या किरकोळ विक्रेत्यांकडून खते खरेदी करून प्रत्यक्ष शेतात वापरतो.

भारताच्या कृषी क्षेत्रात रासायनिक खतांचे योगदान महत्त्वाचे आहे. या खतांचा योग्य वापर केल्यास पिकांचे उत्पादन वाढते आणि शेतकऱ्यांची उत्पन्न वाढते. परंतु, अयोग्य वापरामुळे मातीची गुणवत्ता कमी होते, पाणी प्रदूषित होते आणि पर्यावरणीय समस्या निर्माण होतात. अमरावती जिल्हा हा महाराष्ट्रातील कृषी प्रधान जिल्हा आहे. येथील शेतकरी रासायनिक खतांचा वापर करून पीक उत्पादन वाढवतात. परंतु, खतांचा योग्य वापर करण्याबाबत शेतकऱ्यांची जागरूकता अपुरी आहे.
या पार्श्वभूमीवर, हा संशोधन अभ्यास अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रासायनिक खतांच्या वापराच्या पद्धतीचा अभ्यास करणार आहे.

**साहित्य परीक्षण :**

रासायनिक खते ही कृषी उत्पादनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. परंतु, त्यांचा अयोग्य वापर मातीची गुणवत्ता कमी करतो, पाणी प्रदूषित करतो आणि पर्यावरणीय समस्या निर्माण करतो. अमरावती जिल्हा हा महाराष्ट्रातील कृषी प्रधान जिल्हा आहे. येथील शेतकरी रासायनिक खतांचा वापर करून पीक उत्पादन वाढवतात. परंतु, खतांचा योग्य वापर करण्याबाबत शेतकऱ्यांची जागरूकता अपुरी आहे.
अमरावती जिल्ह्यातील रासायनिक खतांच्या वापराबाबतचे अनेक संशोधन आणि अभ्यास केले गेले आहेत. या अभ्यासांमधून खालील निष्कर्ष काढता येतात:

- **खतांचा अयोग्य वापर:** अनेक शेतकरी शिफारस केलेल्या मात्रेपेक्षा जास्त खत वापरतात. यामुळे खतांचा अपव्यय होतो आणि पर्यावरण प्रदूषित होते.
- **खतांची उपलब्धता:** शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि योग्य किंमतीत खते उपलब्ध होत नाहीत.
- **खतांची गुणवत्ता**: बाजारात काही खतांची गुणवत्ता कमी असते.
- **शेतकऱ्यांची जागरूकता:** अनेक शेतकऱ्यांना खतांचा योग्य वापर करण्याबाबत पुरेशी माहिती नाही.

या समस्यांचे निराकरण करण्यासाठी खालील उपाययोजना सुचविल्या जातात:

- **शेतकऱ्यांना प्रशिक्षण:** शेतकऱ्यांना खतांचा योग्य वापर करण्याबाबत प्रशिक्षण देणे.
- **खतांची योग्य किंमत:** खतांच्या किमती नियंत्रणात ठेवणे.
- **खतांची उपलब्धता:** खतांची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करणे.
- **सेंद्रिय खतांचा वापर:** सेंद्रिय खतांचा वापर वाढवण्यास प्रोत्साहन देणे.
- **पर्यावरणपूरक शेती पद्धती:** पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा प्रचार-प्रसार करणे.

या संशोधनाच्या निष्कर्षांचा वापर करून अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा योग्य वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी योजना आखता येतील. यामुळे शेती उत्पादन वाढीसह पर्यावरण संरक्षणास देखील चालना मिळेल.

**अभ्यासाचे उद्देश्य :**

या संशोधन अभ्यासाचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे आहेत:

- **शेतकऱ्यांच्या जागरूकतेचे मूल्यमापन:** शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा योग्य वापर करण्याबाबत किती माहिती आहे हे जाणून घेणे.
- **खतांची उपलब्धता आणि किंमत:** शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि किंमतीत खते उपलब्ध होतात का हे तपासणे.
- **खतांचा योग्य वापर:** शेतकरी शिफारस केलेल्या मात्रेनुसार खते वापरतात का हे पाहणे.
- **पर्यावरणीय प्रभाव:** खतांचा अयोग्य वापरामुळे पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम अभ्यासणे.
- **सुधारणा उपाययोजनांची शिफारस:** खतांचा योग्य वापर वाढवण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

**संशोधन क्षेत्र :** अमरावती जिल्हा

**संशोधन कालावधी:** [2019-2024]

या संशोधनासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला. या पद्धतीत अस्तित्वात असलेल्या माहितीचा संग्रह, विश्लेषण आणि व्याख्या केली जाते.

**डाटा संग्रह पद्धती:**

- साहित्य सर्वेक्षण
- संबंधित शास्त्रीय लेख आणि संशोधन पत्रिका
- कृषी विभागाचे अहवाल
- शेतकरी सर्वेक्षण अहवाल
- इंटरनेटवरील माहिती

**माहिती विश्लेषण पद्धती (Data Analysis Method):**

या संशोधनात संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी गुणात्मक व परिमाणात्मक या दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. गुणात्मक विश्लेषणात शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या मतांचे, अनुभवांचे व सूचनांचे विषयानुसार गट तयार करून त्यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. त्याचबरोबर परिमाणात्मक विश्लेषणात संख्यात्मक माहितीचे सांख्यिकीय पद्धतीने परीक्षण करून टक्केवारी, सरासरी आणि तक्त्यांच्या माध्यमातून माहितीचे सादरीकरण करण्यात आले. या प्रक्रियेच्या साहाय्याने खतांचा वापर, जमीन क्षेत्रफळ आणि पिकांचे उत्पादन यांसारख्या घटकांमधील संबंध समजून घेऊन संशोधनाचे निष्कर्ष अधिक स्पष्ट आणि विश्वासार्ह पद्धतीने मांडण्यात आले.

**संशोधनाच्या मर्यादा:**

- वेळ आणि साधनसंपत्तीची मर्यादा
- शेतकऱ्यांच्या सहकार्याची उपलब्धता
- मौसमी बदलांचा प्रभाव

**संशोधनाचे महत्त्व:**

या संशोधनामुळे अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा योग्य वापर करण्याबाबत जागरूकता वाढेल. तसेच, खतांची योग्य उपलब्धता आणि किंमत नियंत्रणास मदत होईल. यामुळे शेती उत्पादन वाढीसह पर्यावरण संरक्षणास चालना मिळेल.

**डेटा संग्रहण टेबल :**

| गाव | शेतकऱ्याचे नाव | जमीन क्षेत्रफळ (एकर) | वापरलेले खत (प्रकार आणि प्रमाण) | लागवड केलेले पीक | उत्पादन (क्विंटल/एकर) |
|---|---|---|---|---|---|
| बहादा | रामराव पाटील | 5 | युरिया (50 किलो), डीएपी (25 किलो) | गहू | 15 |
| अमळा | श्यामराव जाधव | 3 | युरिया (30 किलो), डीएपी (15 किलो) | सोयाबीन | 10 |
| बेलकुंड | शरद जोशी | 2 | युरिया (20 किलो), डीएपी (10 किलो) | कापूस | 8 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अंजनगाव | दत्तात्रेय पाटील | 4 | युरिया (40 किलो), डीएपी (20 किलो) | ऊस | 60 |
| धारणी | कृष्णराव पाटील | 6 | युरिया (50 किलो), डीएपी (35 किलो) | गहू | 15 |
| मोरगाव | शांतिलाल बगडे | 5 | युरिया (30 किलो), डीएपी (15 किलो) | सोयाबीन | 10 |
| सावरगांव | प्रभाकर देशमुख | 2 | युरिया (25 किलो), डीएपी (15 किलो) | कापूस | 8 |
| चिखली | सुधाकर देशमुख | 8 | युरिया (50 किलो), डीएपी (20 किलो) | ऊस | 60 |
| बडनेरा | दत्तात्रेय भोसले | 4 | युरिया (50 किलो), डीएपी (25 किलो) | गहू | 15 |
| अमरावती | प्रदीप जाधव | 5 | युरिया (30 किलो), डीएपी (15 किलो) | सोयाबीन | 10 |
| मोर्शी | संजय जगताप | 6 | युरिया (40 किलो), डीएपी (10 किलो) | कापूस | 8 |
| मोरगाव | रवींद्र गायकवाड | 8 | युरिया (50 किलो), डीएपी (50 किलो) | ऊस | 60 |
| चिखली | विजय जाधव | 9 | युरिया (60 किलो), डीएपी (35 किलो) | ऊस | 15 |
| बडनेरा | सुरेश धोत्रे | 2 | युरिया (10 किलो), डीएपी (5 किलो) | गहू | 10 |
| अमरावती | सुनील कांबळे | 6 | युरिया (20 किलो), डीएपी (15 किलो) | सोयाबीन | 8 |

**माहितीचे विश्लेषण**:

अमरावती जिल्ह्यातील निवडक गावांमधून गोळा केलेल्या प्राथमिक माहितीच्या विश्लेषणातून असे दिसून आले आहे की रासायनिक खते कृषी उत्पादकता सुधारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. आकडेवारीवरून असे दिसून येते की बहुतेक शेतकरी गहू, सोयाबीन, कापूस आणि ऊस यासारख्या प्रमुख पिकांच्या लागवडीसाठी प्रामुख्याने नायट्रोजन आणि फॉस्फरस-आधारित खतांवर, विशेषतः युरिया आणि डायमोनियम फॉस्फेट (डीएपी) अवलंबून असतात.

अभ्यासातून असेही दिसून आले आहे की खतांचा वापर पिकाच्या प्रकारानुसार आणि जमिनीच्या आकारानुसार बदलतो. मोठ्या जमिनी असलेल्या शेतकऱ्यांना लहान शेतकऱ्यांच्या तुलनेत तुलनेने जास्त प्रमाणात खतांचा वापर करावा लागतो. अभ्यास केलेल्या पिकांमध्ये, उसाच्या लागवडीला तुलनेने जास्त खतांची आवश्यकता असते, जी प्रति एकर त्याच्या उच्च उत्पादकता पातळीमध्ये दिसून येते.

**सकारात्मक परिणाम** :

- **उत्पादन वाढ:** रासायनिक खतांच्या वापरामुळे जिल्ह्यातील कृषी उत्पादन वाढले आहे. विशेषत: पिकांचे उत्पादन आणि दर्जा सुधारला आहे.
- **आर्थिक स्थिरता:** वाढलेल्या उत्पादनामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्थिरता वाढली आहे.
- **पिकांची विविधता:** रासायनिक खतांच्या वापरामुळे शेतकरी विविध प्रकारची पिके घेऊ शकतात.

**नकारात्मक परिणाम :**
- **जमिनीचे क्षरण:** अत्यधिक आणि असंतुलित खतांच्या वापरामुळे जमिनीचे क्षरण होत आहे.
- **पर्यावरणीय प्रदूषण:** रासायनिक खते पाणी आणि हवा प्रदूषित करतात.
- **आरोग्य समस्या:** रासायनिक खतांच्या संपर्कात येऊन शेतकरी आणि ग्राहक यांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो.
- **खर्च वाढ:** रासायनिक खते खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागतो.
- **खतांची उपलब्धता:** खतांचा पुरवठा नेहमीच नियमित होत नाही, ज्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी येतात.

**भविष्यातील मार्गदर्शन :**
- **सेंद्रिय खतांचा वापर:** रासायनिक खतांच्या जागी सेंद्रिय खतांचा वापर वाढवणे आवश्यक आहे.
- **एकत्रित पद्धती:** रासायनिक आणि सेंद्रिय खतांचे योग्य संयोजन करून शेतकरी उत्पादन वाढवू शकतात.
- **जमिनीची तपासणी:** जमिनीची तपासणी करून त्यानुसार खतांची मात्रा आणि प्रकार निश्चित करणे आवश्यक आहे.
- **जागरूकता मोहीम:** शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेती आणि खत वापराबाबत जागरूकता वाढवणे आवश्यक आहे.
- **सरकारी धोरणे:** सरकारने सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी धोरणात्मक बदल करावे.
- **शिक्षण:** शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धतीने शेती करण्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

एकंदरीत, अभ्यासात अमरावती जिल्ह्यात कृषी उत्पादन वाढविण्यासाठी कार्यक्षम खत वितरण आणि योग्य वापर पद्धतींचे महत्त्व अधोरेखित केले आहे. संतुलित खत वापराबाबत शेतकऱ्यांची जागरूकता वाढवणे, खतांची उपलब्धता सुधारणे आणि वैज्ञानिक पोषक व्यवस्थापन पद्धतींना प्रोत्साहन देणे या प्रदेशातील शाश्वत कृषी विकासात लक्षणीय योगदान देऊ शकते.

अमरावती जिल्ह्यात रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय खतांचा वापर वाढवणे ही काळाची गरज आहे. यामुळे जमिनीचे आरोग्य सुधारेल, पर्यावरण संरक्षण होईल आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारेल. यासाठी शासन, शेतकरी संस्था आणि शेतकरी यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.अमरावती जिल्ह्यातील रासायनिक खतांचे वितरण आणि वापर या विषयावर संशोधन पत्र तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे संदर्भांचा आधार घेण्यात आला.

**संदर्भ :**

**1. अधिकृत शासकीय अहवाल**
-महाराष्ट्र कृषी विभाग (2024). _कृषी आणि रासायनिक खतांचे वितरणाचे आकडेवारी_: अमरावती जिल्हा. महाराष्ट्र शासन, कृषी संचालनालय.

**2. अकादमिक संशोधन पत्रे**
- Deshmukh, P., & Kulkarni, S. (2023). "Chemical Fertilizer Use and Its Impact on Agriculture in Vidarbha Region." Journal of Agricultural Sciences in India*, Vol. 12(3), pp. 245-258.
- Sharma, R., & Singh, A. (2022). "Fertilizer Distribution Systems and Farmer Accessibility in Maharashtra." International Journal of Agronomy and Agricultural Economics*, Vol. 15(4), pp. 300-312.

**3. पुस्तके**
- Patil, B. R. (2020). _Agricultural Practices and Fertilizer Management in India_. New Delhi: Oxford University Press.
- Kumar, N. & Sharma, R. (2018). _Modern Fertilizer Technology and its Application in Indian Agriculture_. Springer.
-Sharma, R. K. (2020). Marketing of fertilizers in India: Issues and challenges. Indian Journal of Agricultural Economics, 75(2), 145–158.
-Singh, P., & Verma, S. (2019). Role of cooperative societies in agricultural input marketing in India. Journal of Rural Development, 38(3), 321–334.
-Deshmukh, M. S., & Patil, R. R. (2018). Chemical fertilizer consumption pattern in Maharashtra. International Journal of Agricultural Sciences, 10(1),45–52.

**4. वेब स्त्रोत**
- महाराष्ट्र शासन कृषी पोर्टल: [www.mahaagri.gov.in](http://www.mahaagri.gov.in)
-NationalFertilizerStatistics: [www.fertilizerindia.org](http://www.fertilizerindia.org)

**5. सर्वेक्षण आणि क्षेत्रीय डेटा**
- स्थानिक कृषी कार्यालयांचे प्रादेशिक सर्वेक्षण अहवाल (2023). अमरावती जिल्ह्यातील शेतकरी संघटनांकडून गोळा केलेली माहिती.

**6. इतर संदर्भ**

- भारतीय कृषी संशोधन संस्था (IARI). (2022). _Fertilizer Usage and Crop Productivity: A State-Wise Analysis_.
- भारतातील खत उत्पादन व वितरणावर आधारित वार्षिक अहवाल, राष्ट्रीय खत विकास महामंडळ (NFL), 2023.

# महाराष्ट्रातील कौशल्य विकास सध्याची स्थिती आणि आव्हाने

**कु. अश्विनी सुधाकरराव हूड**
संशोधक विद्यार्थिनी रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर ,Mo. 9011477423 ,ashwinijaalkar111@gmail.com

**प्रस्तावना**

रोजगार क्षमता वाढवण्यासाठी आर्थिक विकासाला प्राधान्य देण्यासाठी आणि शिक्षण आणि उद्योगाला गरजा मधील अंतर भरून काढण्यात कौशल्य विकास महत्त्वाची भूमिका बजावतो महाराष्ट्रातील पी एम के व्ही वाय, एम एस एस डी एस, आणि आयटीआय सारख्या सरकारी उपक्रमांद्वारे कौशल्य विकासात लक्षणीय प्रगती केलेली आहे कौशल्य विकास शोधनिबंधामध्ये रोजगार क्षमता वाढवणे आर्थिक वाढीला चालना देणे आणि शिक्षण उद्योग यांच्यातील दरी कमी करणे यावर भर दिला जातो पी एम के व्ही वाय सारख्या सरकारी योजना 21व्या शतकातील तांत्रिक कौशल्य (डिजिटल साक्षरता) आणि सॉफ्ट स्किल्स (संवाद कौशल्य) यांचा अभ्यास करून तरुण पिढीला आत्मनिर्भर बनविण्याची ध्येय यात असते.

भारतातील अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास त्यावेळी भारतात लघु कुठे उद्योगाची संख्या फार मोठ्या प्रमाणात होती परंतु इंग्रजांनी गृह उद्योग व छोट्या उद्योगांचा ऱ्हास घडून आणला भारतातील कच्चामाल आपल्या देशामध्ये नेऊन त्यावर प्रक्रिया करून तोच पक्का म** आपल्याला जास्त किमतीत विकण्याचे प्रक्रिया इंग्रजांनी अंगीकारल्यामुळे भारतातील छोट्या-छोट्या उद्योगांचा ऱ्हास घडून आला, त्याकाळी गावातील गरजा गावातच भागवल्या जात लोहार, सुतार, कुंभार, चांभार ,माळी ,कुणबी, मेंढपाळ ,अल्पभूधारक, शेतकरी ,शेतमजूर, गुराखी, कुक्कुटपालन करणारे गवळी ,सोनार, हातमाग यंत्रावर काम करणारे कारागीर इत्यादींच्या स्वरूपात आपली उपजीविका करण्यासाठी आपल्या कुटुंबासहित राबायचे आणि आपल्या आर्थिक गरजा भागविण्या इतपत मिळकत कमवायचे त्याकाळी कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण न घेता सुप्त स्वरूपात उद्योजकांचे बीज रोवल्या गेले सध्याच्या बदलत्या परिस्थितीत प्रशिक्षणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. बदलते तंत्रज्ञान, संगणकाचे महत्व, माहिती ,तंत्रज्ञानाचा विकास, ई-कॉमर्स इत्यादीमुळे प्रशिक्षण आवश्यक ठरते. आपल्या परीने ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न सर्वजण करीत असतात परंतु सामग्रीतील बदल, तंत्रज्ञानाचा विकास, पर्यायी कच्चामाल इतर साधनांचा विकास या शिक्षणातूनच माहिती होऊ शकतात. तंत्रज्ञानातील होणाऱ्या बदल अविश्वासनीय वाटत आहे जुन्या पद्धती कालबाह्य ठरवून नवीन पद्धती विकसित करण्यात आलेल्या आहेत पूर्वीच्या मोठ्या संगणकाची जागा आता छोट्या लहान संगणकाने घेतलेली आहे इलेक्ट्रॉनिक च्या माध्यमातून तर कोणतीही यांत्रिक रचना हव्या त्या पद्धतीने बनवून घेता येते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१) रोजगार क्षमता आणि आर्थिक विकास याचे अध्ययन करणे
२) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना पी एम के व्ही वाय याचे अध्ययन करणे
३) एन ए पी 2020 आणि कौशल्य याविषयी अध्ययन करणे

**विषयाचे महत्त्व**

१) रोजगाराच्या संधीत वाढ

देशातील औद्योगिक आणि आर्थिक विकास बऱ्यापैकी झाल्यानंतर सरकारने छोट्या व कुटीर उद्योगाकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे याचे कारण असे की समजा 500 कोटी रुपयांच्या मोठ्या कारखान्यात किमान 500 लोकांना रोजगार मिळत असेल तर त्याचे भांडवलात एक कोटी लघु उद्योगात 50 तर 500 कोटी रुपयात 25 हजार लोकांना रोजगार मिळण्याची संधी उपलब्ध होऊ शकते त्यामुळे ग्रामीण भागातील रोजगार वाढवण्याच्या दृष्टीने ह्या उद्योगांना विकासाच्या अत्यंत महत्त्वाचा आहे भारतात या कुटीर उद्योगात साधारणतः दोन कोटी लोकांना रोजगार मिळत आहे

२) आर्थिक विषमता कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्व

मोठ्या उद्योगाच्या स्थापनेमुळे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊन मक्तेदारी प्रवृत्ती वाढीला लागते त्यामुळे मोठ्या उद्योगाला निर्माण होणाऱ्या लाभाचा फार मोठा वाटा मुठभर उद्योगपतींच्या खिशात जातो त्यामुळे उत्पन्न व संपत्ती वाटणीतील विषमता मोठ्या प्रमाणावर वाढते परंतु कुटीर व लघु उद्योगाच्या विकासामुळे ही आर्थिक विषमता बरीच कमी होऊ शकते.

३) मर्यादित भांडवल

मर्यादित भांडवल लघु व कुठीर उद्योगाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून उत्पादन घटकांची जुळवाजुळ करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागत नाही अविकसित देशाच्या दृष्टीने कुटीर व लघु उद्योगाची स्थापना सोयीस्कर असते.

४) सुप्त साधनसामग्रीचा उपयोग

आपल्या देशामध्ये विपुल प्रमाणात नैसर्गिक साधनसामुग्री आहे. परंतु भांडवलाच्या कमतरतेमुळे उपलब्ध असलेल्या साधन सामग्रीचा पुरेपूर उपयोग होऊ शकत नाही .कुटीर व लघु उद्योगाच्या स्थापनेमुळे उपलब्ध साधनसामग्रीचा महत्तम उपयोग होऊन राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ होऊ शकते

५) शेती व्यवसायाला पूरक व पोषक

भारतातील शेती व्यवसाय हा पूर्ण वर्षभर चालणारा नसून विशिष्ट हंगाम झाल्यानंतर शेतकरी व शेतमजूर यांना रिकामे राहावे लागेल अशा वेळी कुटीर व लघु उद्योगामुळे ग्रामीण शेतकरी व शेतमजुराला दुय्यम रोजगार मिळून यांच्या उत्पन्नात वाढ होते. व त्यामुळे शेतीतील गुंतवणूक वाढते शेतीचे उत्पादकता वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन राहणीमानात वाढ संभवते.

६) भांडवल निर्मितीच्या दरात वाढ होते

कुटीरल व लघुउद्योगामुळे रोजगार निर्मितीत वाढ होते त्यामुळे त्यांच्या क्रयशक्तीत वाढ होते, क्रयशक्तीत वाढ झाल्यामुळे मागणीतील वाढ होते त्यामुळे पुरवठ्यात वाढ करावी लागते पुरवठ्यात वाढ करण्याकरिता नवीन उत्पादनात वाढ करणे गरजेचे असते पुन्हा रोजगार निर्मिती होणे व त्यामुळे बचतीची वाढ होऊन भांडवल निर्मिती करणे शक्य होते

७) प्रादेशिक असमतोल दूर करता येतात

साधारणतः श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब होत जातात याप्रमाणे या विभागाच्या औद्योगिक विकासा विकास झालेला आहे त्याच ठिकाणी उद्योगांना आवश्यक असणाऱ्या सोयी सवलती उपलब्ध होत असतात त्यामुळे विशिष्ट प्रदेशांमध्ये उद्योगाचे केंद्रीकरण होते त्यामुळे प्रादेशिक विषमता निर्माण होते कुटीर व लघु उद्योगामुळे ज्या ठिकाणी पायाभूत सोयी उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी त्या उपलब्ध करून सरकारद्वारे प्रादेशिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला जातो.

८) सुंदर व कलापूर्ण वस्तूचे उत्पादन

आजच्या यंत्र युगात वैयक्तिक कला कौशल्याला मोठ्या उद्योगांमध्ये फारसा भाव नसतो याउलट कुटीर व लघु उद्योगात कारागीर आपल्या जवळील सर्व कौशल्य पणाला लावून मनापासून काम करून अत्यंत कलापूर्ण व सुबक वस्तू तयार करतो अशा वस्तूंना विदेशी बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते.

९) शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते

ग्रामीण भागात छुपी बेकारीचा प्रश्न फार मोठा भेडसावतो आहे ग्रामीण भागात लघु व कुटीर उद्योगांना विकास करण्यात आल्यास बेकार व्यक्तींना पूर्ण वेळ रोजगार मिळेल आणि अशा शेतकऱ्यांनाही त्यांच्या गरजेप्रमाणे आर्थिक रोजगार मिळू शकेल त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात पर्यायाने बरीच वाढ होईल.

**PMKVY(प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना**

ही योजना कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे (MCED) एक प्रमुख कौशल्य प्रमाणपत्र योजना आहे ज्याचा उद्देश संबंधित प्रशिक्षण द्वारे तरुणांची रोजगार क्षमता वाढवणे आहे ही योजना 15 ते 45वयोगटातील तरुणांना लक्ष करून ए आय इ व्ही आणि आरोग्य सेवा यासारख्या क्षेत्रांमध्ये मोफत प्रशिक्षण आणि प्रमाणपत्र मिळवून देते.

**PMKVY योजनांचे प्रमुख उद्देश**

उद्योगाशी संबंधित कौशल्य प्रशिक्षण आणि भारतीय तरुणांना चांगले राहणीमान चांगले जीवनमान मिळवून देण्यासाठी सक्षम करणे.

**PMKVY योजनेचे वैशिष्ट्ये**

१) मोफत प्रशिक्षण--खर्च पूर्णपणे सरकार द्वारे केला जातो आणि तरुणांना मोफत प्रशिक्षण व प्रमाणपत्र दिले जाते
२) प्रमाणपत्र--वैद उद्योग मान्यताप्राप्त प्रमाणपत्र प्रदान केले जाते
३) प्लेसमेंट सहाय्य--रोजगार शोधण्यास मदत केल्या जाते.
४) लक्ष गट--बेरोजगार तरुणांना शाळा महाविद्यालयातून शिक्षण सोडून गेलेले विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे शिक्षण धोरणावर अवलंबून असते आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासाची प्रक्रिया शिक्षणातून उभे राहते. राष्ट्रासाठीचे शिक्षण धोरण हे राष्ट्राच्या भविष्यासाठी विकासाचा एक मार्ग असतो त्यामुळे शिक्षण धोरण आह्वांना ते भविष्यवेधी असायला हवे, शिक्षण धोरण म्हणजे त्या देशाचे भविष्याची विकासाचे दिशा असते भारत सरकारने 21 व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण जाहीर केले 1984 च्या शैक्षणिक धोरणानुसार 34 वर्षांनी नवीन शैक्षणिक धोरण आले आहे आणि सध्या या धोरणावर फार मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे कारण शिक्षण हे जीवन समाज परिवर्तनाचे अत्यंत प्रभावी साधन आहेत कारण यामुळे समाजही शिक्षणाच्या संदर्भात अधिक

जागृत होतो केंद्राने नवीन धोरण तयार केल्यानंतर ते स्वीकारण्याची प्रक्रिया अनेक राज्यांनी केली आहे. मात्र काही राज्यांनी याला विरोध ही केला आहे सरकारने नवी घोषणा केली होती मात्र या धोरणाच्या अंमलबजावणीचे मोठे आव्हान सरकार समोर आहे धोरणाचे यशापयश हे धोरणाची भूमिका लक्षात घेऊन कार्यरत मनुष्यबळाच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते त्यामुळे एकदमच बदल घडवायचा असेल तर सक्षम पर व परिवर्तनाचाही मनुष्यबळ कुठून आणणार म्हणूनच या धोरणात मोठ्या प्रमाणावर बदल सुचविलेले आहे काही संस्थांनी नव्याने उभारणी केली जाणार आहे यासाठी मोठा निधी सुद्धा लागणार आहे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे ज्येष्ठ वैज्ञानिक डॉक्टर डी के कस्तुरी नंदन यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले धोरणात समाज शिक्षण, समानता, गुणवत्ता सर्वांना परवडणारे सर्वांना शिक्षण आणि उत्तरदायित्व या पाच स्तंभाचा विचार केलेला आहे शिक्षण धोरणात अत्यंत व्यापक दृष्टिकोन राखण्यात आला आहे आपली संस्कृती आणि उद्याचे भविष्य याचा संगम घालण्याचा प्रयत्न केलेला आहे शिक्षण आनंददायी करण्याबरोबरच ते जीवनविमुक आणि अधिक रोजगार बिमुख करण्यावर भर देण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष**

कौशल्य विकासामुळे व्यक्ती अधिक उत्पादक आणि नावीन्यपूर्ण बनतात ज्यामुळे वैयक्तिक आणि आर्थिक वाढीस मदत होते महाराष्ट्रातील कौशल्य विकासाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करून रोजगाराच्या विशिष्ट वाढीवर विशेष भर दिला जात आहे. नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुद्धा कौशल्य विकासाला अतिशय महत्त्वाचे स्थान दिलेले आहे ज्यामुळे कोणीही बेरोजगार राहणार नाही आणि प्रत्येकामध्ये एक कौशल्य विकासातील विकासामुळे त्यांच्या अंगी असलेले सुप्त गुण यांना वाव मिळून त्यांना आर्थिक अर्थाजनासाठी मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१) डॉ .किशोर वंगळ.
उद्योजकता आणि विकास साई ज्योती पब्लिकेशन
२) सोपान एकनाथ कांगणे
महाराष्ट्रीयन मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण विद्यालय गुलटेकडी पुणे

# उत्पादक लोकसंख्या घडविण्यात उच्च शिक्षणाकडून असलेल्या अपेक्षा”

संशोधक विद्यार्थीनी
प्रा. दामिनी अर्जुन कापडे
(डॉ.गोपाळराव खेडकर महाविद्यालय, तेल्हारा.)

---

**सारांश**

बदलत्या काळाबरोबर प्रत्येक देश प्रगती करत आहे. जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर देशा देशांमध्ये विकासाची स्पर्धा निर्माण झाली आहे. जर आपल्याला त्या स्पर्धेत टिकायचे असेल तर देशाची लोकसंख्या ही उच्चशिक्षित असणे गरजेचे आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसंख्या उच्चशिक्षित असणे आवश्यक आहे. उच्च शिक्षणाचा उद्देश केवळ विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त करून देणे हा नसतो तर देशासाठी एक कौशल्यपूर्ण सक्षम व जबाबदार व्यक्ती घडवणे हा असतो. या वाढत्या स्पर्धेबरोबर उच्च शिक्षणाच्या अपेक्षासुद्धा वाढल्या आहेत.

प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये उच्च शिक्षणाकडून उत्पादक लोकसंख्या घडविण्यासाठी असलेल्या अपेक्षा, परिस्थिती, त्या समोरील अडचणी आणि भविष्यातील दिशा यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**मुख्य शब्द (key words)**

उत्पादक लोकसंख्या, उच्च शिक्षण, मानवी भांडवल.

**प्रस्तावना**

देशाचा विकास हा त्या देशाच्या लोकांवर अवलंबून असतो. केवळ लोकसंख्या जास्त आहे म्हणजेदेश प्रगती करेल असे नाही तर लोकसंख्येपैकी किती लोकसंख्या ही उत्पादक लोकसंख्या आहेयावर देशाचा विकास अवलंबून असतो. त्यामुळे देशाची लोकसंख्या ही जास्तीत जास्त उत्पादकलोकसंख्या असणे आवश्यक असते. जगातून सर्वात जास्त लोकसंख्या असणाऱ्या भारतामध्येतरुण लोकसंख्याही सर्वात जास्त आहे. त्यामुळे या तरुण लोकसंख्येच्या विकासाचा सर्वात जास्त भार हा उच्च शिक्षणावर आहे. उच्च शिक्षण हे व्यक्तीच्या विचाराला, त्याच्या बुद्धीला, सामाजिक प्रतिष्ठेला, व्यावसायिक विकासाला दिशा देते आजच्या प्रगत अर्थव्यवस्थेमध्ये शिक्षण व उत्पादक लोकसंख्या यांचा जवळचा संबंध आहे. उच्च शिक्षणाकडून अपेक्षा असते की त्यांनी केवळ विद्यार्थ्यांना बौद्धिक ज्ञानच न देता विद्यार्थ्यांना जीवनात उपयोगी पडणारे रोजगारासाठी आवश्यक असणारे व्यावहारिक ज्ञान व कौशल्य प्रदान केली पाहिजे. या संशोधन पेपर मध्ये उच्च शिक्षण व उत्पादक लोकसंख्या यांचा प्रत्यक्ष संबंध स्पष्ट केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

उत्पादक लोकसंख्या घडविण्यात उच्च शिक्षणाकडून असलेल्या अपेक्षा या संशोधन विषयाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1) उच्च शिक्षण व उत्पादक लोकसंख्या यांचा परस्पर संबंधांचा अभ्यास करणे.
2) विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासात उच्च शिक्षणाची भूमिका स्पष्ट करणे.
3) उच्च शिक्षणाकडून लोकसंख्येच्या असलेल्या अपेक्षांचा अभ्यास करणे.
4) राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने उच्च शिक्षणाचे महत्त्व समजून घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत लेख हा दुय्यम माहितीवर आधारित आहे. विविध पुस्तके, संशोधन लेख, जर्नल्स व विविध अहवालांचा अभ्यास करून विश्लेषणात्मक निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**उत्पादक लोकसंख्या - संकल्पना**

उत्पादक लोकसंख्या म्हणजे अशी लोकसंख्या जी आपल्या ज्ञान, व्यवसाय, कौशल्य व क्षमतांवर आधारित व्यवसायातून रोजगार प्राप्त करून देशाच्या अर्थव्यवस्थेत हातभार लावते. उत्पादक लोकसंख्येची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

1) रोजगार व स्वयंरोजगार रोजगार क्षम असते.
2) बुद्धीवर आधारित काम करण्याची क्षमता असते.

3) सामाजिक जबाबदारीची जाणीव असते.
4) नैतिक मूल्यांची जोपासना करतात.
उच्च शिक्षण हे देशाच्या विकास करण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

**उच्च शिक्षणाची उद्दिष्टे व स्वरूप**

उच्च शिक्षणामध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी, व्यावसायिक शिक्षण, कलाशिक्षण, संशोधन शिक्षणाचा समावेश होतो. उच्च शिक्षणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1) ज्ञानाची निर्मिती व त्याचा प्रसार करणे.
2) विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यावर आधारित क्षमतांचा विकास करणे.
3) संशोधन व नवनिर्मितीला चालना देणे.
4) विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य रुजवणे.
5) विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व क्षमतांचा विकास करणे.

ही उच्च शिक्षणाची उद्दिष्टे आहेत आणि ही उद्दिष्टे पूर्णत्वास आल्यास देशाला उत्पादक लोकसंख्याप्राप्त होऊशकते.

**उच्च शिक्षणाकडून लोकसंख्येच्या असलेल्या प्रमुख अपेक्षा**

1) रोजगार व स्वयंरोजगार क्षमतेचा विकास:

बेरोजगारी ही मोठी समस्या बनलेली आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाकडून लोकसंख्येच्या अपेक्षासुद्धा वाढलेल्या आहेत. उच्च शिक्षणात व्यावसायिक व उद्योगाभिमुख अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी असतील तर विद्यार्थ्यांमध्ये रोजगार व स्वयंरोजगारासाठी आवश्यक कौशल्य व नेतृत्व विकसित होतील.

2)कौशल्यावर आधारित शिक्षण:

सैद्धांतिक ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य, कलाशिक्षण, डिजिटल साक्षरता, नेतृत्व क्षमता, समस्या निराकरण क्षमता यांसारखी कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. ही कौशल्ये विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगार प्राप्त करण्यासाठी महत्त्वाचे ठरतात.

3) संशोधन व नाविन्यता:

उच्च शिक्षण संस्थांकडून संशोधन शिक्षणाची अपेक्षा असते. संशोधनामुळे नवीन तंत्रज्ञान, कल्पना व नाविन्यता निर्माण होऊन समाजाची उत्पादकता वाढते.

4) उद्योजकतेला प्रोत्साहन:

आजच्या काळात रोजगार मागणारे नाही तर स्वयंरोजगार निर्माण करणाऱ्या लोकसंख्येची गरज आहे. उच्च शिक्षणाकडून उद्योजक वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे अपेक्षित आहे.

5) नैतिक मूल्य व सामाजिक मूल्यांची जोपासना:

उत्पादक लोकसंख्या ही केवळ आर्थिक बाबीत सक्षम असावी असे नाही तर ती नैतिकता व सामाजिक जबाबदारी जोपासणारी असणे आवश्यक आहे

**वर्तमान परिस्थिती व त्या समोरील आव्हाने**

वर्तमान काळात बदलत्या परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासमोर अनेक अडचणीसुद्धा आहेत
1)अभ्यासक्रम वव्यावसायिक गरजांमध्ये असलेली तफावत.2)गुणवत्ते मधील असमानता.
3)संशोधनासाठी असणारी अपुरी साधने.
4)कौशल्यावर कमी भर.
5)ग्रामीण व शहरी शिक्षणामध्ये असलेली तफावत.
या सर्व अडचणीमुळे भारतात उत्पादक लोकसंख्या घडविण्यात अडचणी निर्माण होतात.

**उच्च शिक्षण व आर्थिक विकास**

उच्च शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य, मूल्य व व्यावसायिक दृष्टिकोन वाढून मानवी भांडवलाची गुणवत्ता वाढते. कुशल मनुष्यबळामुळे उत्पादन क्षमता वाढते व त्यामुळे देशाच्या उत्पन्नात वाढ होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाच्या विकासाच्या स्पर्धेत उच्च शिक्षणामुळे स्पर्धात्मक क्षमता मजबूत होते. त्यामुळे उच्च शिक्षण हा देशाच्या आर्थिक विकासाचा कणा मानला जातो

**भविष्यातील दिशा व उपाययोजना**

उच्च शिक्षणाच्या भविष्यातील दिशा व उपाय योजना पुढीलप्रमाणे आहेत.

1. अभ्यासक्रम नियमित आधुनिक व नवीन असा करणे.
2. व्यावसायिक व कौशल्य आधारित शिक्षणावर भर.
3. तंत्रज्ञान व डिजिटल आधारित शिक्षणाचा विस्तार.
4. संशोधनासाठी अधिक साधने व सुविधा.
5. नैतिक व सामाजिक मूल्य आधारित शिक्षणाचा समावेश.

**निष्कर्ष**

उच्च शिक्षण व उत्पादक लोकसंख्या यांचा अतूट संबंध आहे. उच्च शिक्षण हे गुणवत्ता पूर्ण,कौशल्यावर आधारित, व्यावसायिक गुणवत्ता वाढविणारे, मूल्य व नैतिकता निर्माण करणारे असेल तर समाजाला जबाबदार व सक्षम नागरिक मिळतील. देशाच्या संपत्तीत मानवी संपत्ती ही सर्वात मोठी संपत्ती आहे. त्यामुळे देशाचे मानवी भांडवल हे जबाबदार व सक्षम असणे आवश्यक आहे. हे मानवी भांडवल सक्षम व जबाबदार करण्यात उच्च शिक्षणाची सर्वात मोठी भूमिका आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीत उच्च शिक्षणाने स्वतःमध्ये परिवर्तन करून अध्यायावत अभ्यासक्रम व सामाजिक गरजांची सुसंगत राहणे आवश्यक आहे.

**संदर्भसुची**

1) कौठेकर, प्र. द. (2017). भारतातील उच्च शिक्षण: समस्या व आव्हाने. डायमंड पब्लिकेशन.
2) Government of India (2020). National Education Policy 2020. Ministry of Education.
3) University Grants commission (2019). Higher Education in India: Issues, challenges and reforms. UGC
4) World Bank (2020) Higher Education for development: An evaluation of the world bank group's support. World Bank.

# उच्च शिक्षणातील खासगीकरण

**प्रा. हेमा गुल्हाने**
संशोधन विद्यार्थी श्री. शिवाजीकलाआणिवाणिज्यमहाविद्यालय , अमरावती
**मो. नं:** +919067698005 Email : hemagulhane1981@gmail.com

**सारांश**

भारताची उच्च शिक्षण व्यवस्था ही जगातील मोठ्या शिक्षण व्यवस्थांपैकी एक मानली जाते. या क्षेत्रात भारताचा क्रमांक चीन आणि अमेरिकेनंतर तिसऱ्या स्थानावर आहे. उच्च शिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करणे, समाजात समानता व न्यायाची भावना निर्माण करणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, विद्यार्थ्यांना रोजगारासाठी सक्षम बनवणे आणि ज्ञानाधारित समाज व अर्थव्यवस्था उभारणे हा आहे.मात्र सध्याच्या काळात शिक्षण व्यवस्थेत प्रशासनातील त्रुटी, कार्यपद्धतीतील अकार्यक्षमता, भ्रष्टाचार आणि आर्थिक संसाधनांची कमतरता यांसारख्या समस्या निर्माण झाल्यामुळे उच्च शिक्षणाच्या प्रगतीत अडथळे येत आहेत. या आर्थिक अडचणींवर उपाय म्हणून सरकारने मोठ्या खर्चाची गरज असलेल्या नवीन सरकारी संस्था उभारण्याऐवजी विद्यमान संस्थांची क्षमता वाढवण्यावर आणि खासगी क्षेत्राला उच्च शिक्षणात सहभागी करून नवीन शैक्षणिक संस्था सुरू करण्यावर अधिक भर दिला आहे.
उच्च शिक्षणाच्या खासगीकरणाच्या प्रक्रियेत प्रामुख्याने तीन प्रकारच्या संस्था आढळतात. पहिला प्रकार म्हणजे सरकारच्या नियंत्रणाखाली चालणाऱ्या स्वयंअर्थसहाय्यित संस्था. दुसरा प्रकार म्हणजे सरकारी अनुदान मिळणाऱ्या परंतु स्वयंअर्थसहाय्यित पद्धतीने चालणाऱ्या खासगी संस्था. तिसरा प्रकार म्हणजे पूर्णपणे खासगी व्यवस्थापनाच्या आधारे चालणाऱ्या उच्च शिक्षण संस्था. जगातील विकसित तसेच विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक प्रगतीसह सामाजिक विकासासाठी उच्च शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. उच्च शिक्षण संस्था व्यक्तींना प्रगत ज्ञान, कौशल्ये आणि बौद्धिक क्षमता विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देतात. सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रातील विविध जबाबदारीच्या पदांसाठी आवश्यक असलेली पात्रता व कौशल्ये विकसित करून या संस्था समाजाच्या एकूण प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देतात (Gupta, 2008).

भारतातील शिक्षण खासगीकरणाचा प्रवास 1980 च्या दशकाच्या शेवटच्या काळात निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर सुरू झाल्याचे मानले जाते. 1991 मधील आर्थिक सुधारणांनंतर स्वीकारलेल्या नवउदारमतवादी धोरणांमुळे सरकारी धोरणांची दिशा मोठ्या प्रमाणात खासगीकरणाकडे वळली. त्यानंतरच्या तीन दशकांत ही प्रक्रिया टप्प्याटप्प्याने वाढत गेली आणि जागतिक स्तरावर स्वीकारल्या गेलेल्या प्रवाहाशी तिचे साम्य दिसू लागले.खासगीकरणाचा हा कल केवळ धोरणनिर्मितीपुरता मर्यादित नसून न्यायालयीन निर्णयांमध्येही त्याचे प्रतिबिंब दिसून येते. त्यामुळे भारतातील शिक्षण खासगीकरण ही प्रक्रिया एखाद्या आर्थिक संकटामुळे अचानक घडलेली नसून ती दीर्घकालीन आणि क्रमिक स्वरूपात विकसित झालेली आहे असे म्हणता येते.

जगातील विकसित तसेच विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक प्रगतीसह सामाजिक विकासासाठी उच्च शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. उच्च शिक्षण संस्था व्यक्तींना प्रगत ज्ञान, कौशल्ये आणि बौद्धिक क्षमता विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देतात. सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रातील विविध जबाबदारीच्या पदांसाठी आवश्यक असलेली पात्रता व कौशल्ये विकसित करून या संस्था समाजाच्या एकूण प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देतात (Gupta, 2008).परंतु बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या अपेक्षा व गरजा झपाट्याने वाढत आहेत. या वाढत्या मागणीला त्वरित आणि प्रभावी प्रतिसाद देण्यात सरकारी शिक्षण व्यवस्थेला अनेक मर्यादांचा सामना करावा लागला. परिणामी या गरजा पूर्ण करण्यासाठी खासगी शैक्षणिक संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसून येते.

या संशोधन लेखाचा मुख्य उद्देश भारतातील उच्च शिक्षणाच्या खासगीकरणामागील प्रमुख कारणे, त्यासमोरील आव्हाने आणि त्याची गरज यांचे सखोल विश्लेषण करणे हा आहे. यासाठी विविध संशोधन निबंध, पुस्तके, शासकीय अहवाल, शैक्षणिक धोरणे, कार्यक्रम तसेच भारतातील शिक्षक शिक्षणाशी संबंधित पद्धतींचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.या अभ्यासामध्ये खासगी उच्च शिक्षण संस्थांमधील शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी काही उपयुक्त आणि व्यवहार्य सूचना मांडण्याचा प्रयत्नही करण्यात आला आहे. या संशोधनातून मिळालेली निष्कर्षे उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय अधिकारी, धोरणनिर्माते आणि शैक्षणिक व्यवस्थापक यांच्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतात.

तसेच उच्च शिक्षणातील खासगीकरणाची आवश्यकता आणि त्यामागील घटक समजून घेण्यासाठी तसेच खासगी शिक्षण संस्थांमध्ये गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक नियामक उपाययोजना निश्चित करण्यासाठी हे अध्ययन उपयुक्त ठरेल.

**प्रस्तावना**

उच्च शिक्षण ही ज्ञानाधारित समाज आणि अर्थव्यवस्थेच्या उभारणीसाठी मूलभूत घटक मानली जाते. दर्जेदार अध्यापन आणि संशोधनाची सुविधा उपलब्ध करून देणारी सक्षम उच्च शिक्षण व्यवस्था समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देते. म्हणून भारतीय संविधानानुसार उच्च शिक्षण सर्व नागरिकांसाठी उपलब्ध करून देणे सरकारचे महत्त्वपूर्ण कर्तव्य आहे.तथापि, भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था जागतिकीकरण, सामाजिक-आर्थिक बदल, आर्थिक मर्यादा आणि व्यवस्थापनातील अडचणींमुळे अनेक आव्हानांना सामोरी जाते. समान संधी, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांसाठी अप प्रवेश या उद्दिष्टांमध्ये आर्थिक कमतरता मोठा अडथळा ठरते.यावर उपाय म्हणून सरकारने उच्च शिक्षणात खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्याचा निर्णय घेतला. यामुळे शैक्षणिक संस्था वाढतात, सुविधा सुधारतात आणि गुणवत्तेत वाढ होते. परंतु, काही संस्थांमध्ये शुल्कावर अवलंबून व्यापारी दृष्टिकोन वाढल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल पण हुशार विद्यार्थ्यांना संधी कमी मिळण्याचा धोका निर्माण होतो.

प्रारंभी स्वतंत्र स्वरूपाच्या शैक्षणिक संस्था आणि डीम्ड विद्यापीठांमध्ये खासगी क्षेत्राचा सहभाग अधिक दिसून येत होता. मात्र अलीकडच्या काळात विद्यापीठांच्या पातळीवरही खासगी क्षेत्राची उपस्थिती वाढताना दिसते, ही एक महत्त्वाची घडामोड मानली जाते. त्याचवेळी उच्च शिक्षणासाठी सरकारकडून दिल्या जाणाऱ्या आर्थिक सहाय्याची पातळी ही खासगी क्षेत्राच्या विस्तारावर प्रभाव टाकणारा महत्त्वाचा घटक ठरते.१९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणांनंतर उद्योग, व्यापार आणि परकीय गुंतवणूक क्षेत्रातील मुक्तता उच्च शिक्षणावरही परिणामकारक ठरली. शैक्षणिक संस्थांनी संसाधने संकलित करणे, खासगी आणि परकीय संस्था प्रवेश घेणे आणि शिक्षणाला व्यावसायिक दृष्टीने पाहणे यावर भर दिला. या बदलामुळे उच्च शिक्षणाच्या खासगीकरणासाठी ठोस धोरण तयार होण्यास तीन दशकांचा कालावधी लागला, ज्याचे प्रतिबिंब राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये दिसते.आज, भारतातील उच्च शिक्षणात खासगीकरण वाढत आहे. यातून स्पर्धा निर्माण होते, नवीन संशोधन आणि तांत्रिक कौशल्य वाढतात, परंतु गुणवत्ता, सर्वसमावेशक प्रवेश आणि सामाजिक मूल्ये टिकविणे ही आव्हाने राहतात. विकसनशील देशांसाठी उच्च शिक्षणाचा विस्तार आणि गुणवत्तात्मक सुधारणा ही देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी अत्यावश्यक आहेत.

उच्च शिक्षण हे ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे स्तंभ असून व्यक्तींमध्ये कौशल्य, संशोधन क्षमता व व्यावसायिक पात्रता विकसित करते. भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेचा विस्तार लक्षणीय आहे—1992 मध्ये जवळपास 1,043 विद्यापीठे आणि 46,000 महाविद्यालये होती; 2022 पर्यंत विद्यार्थ्यांची संख्या 39.4 दशलक्षपेक्षा जास्त झाली असून GER सुमारे 28% आहे, जे 2035 पर्यंत 50% करण्याचे लक्ष्य आहे.याच बरोबर, खासगी क्षेत्राचा सहभागही वाढत आहे—2022 मध्ये 55.5% विद्यार्थ्यांनी खासगी संस्था निवडल्या आणि विद्यापीठांपैकी सुमारे 47% आता खासगी आहेत, मागील 15 वर्षांत 480% वाढ झाली आहे.

उच्चशिक्षणातखासगीकरण म्हणजे सरकारच्या थेट आर्थिक व व्यवस्थापकीय हस्तक्षेपाची कमतरता आणि खासगी क्षेत्राचा वाढता सहभाग. यामुळे स्पर्धा वाढते, सुविधा सुधारतात व प्रवेश उपलब्धता वाढते; परंतु गुणवत्ता, समावेश व प्रवेशाच्या संधींबाबत आव्हाने देखील निर्माण होतात. योग्य नियमनाशिवाय हा विकास सर्वांसाठी फायदेशीर होईल याची हमी नाही.

**साहित्य समीक्षा**

Baweja, Oberon आणिManmeet (2017) यांच्याअभ्यासातभारतातील उच्च शिक्षणाच्याखासगीकरणाची गरज, त्याचे परिणाम आणि उपाय यांचाआढावाघेतलाआहे. निधीअभावी आणि व्यवस्थापनातील त्रुटींमुळे उच्च शिक्षण व्यवस्थेला अनेक अडचणी निर्माण झाल्या असून, वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी खासगी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरते. मात्र खासगीकरणाचे सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही परिणाम आढळतात.Oza, Chandni (2018) यांनी उच्च शिक्षणातील गुणवत्ता हमी (Quality Assurance) या संकल्पनेचा अभ्यास केला आहे. या संशोधनात महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये गुणवत्ता मूल्यमापनाचे महत्त्व स्पष्ट केले असून, गुणवत्ता मूल्यांकनाबाबत सर्व संबंधित घटकांमध्ये अधिक जागरूकता निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली आहे. Sreenivas, T., Babu, N. आणि Suresh (2015) यांनी भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेचा गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून आढावा घेतला आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण व्यवस्थेचे केंद्रबिंदू मानून उच्च शिक्षण संस्थांसमोर असलेली आव्हाने आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक उपाय सुचवले आहेत.Alam, K. आणिHalder, U.K. (2016) यांच्यामते 1991 च्याउदारीकरण, खासगीकरणआणिजागतिकीकरण (LPG) धोरणानंतरभारतातील उच्च शिक्षणामध्येखासगीकरणाची प्रक्रिया वेगानेवाढली. वाढत्या शिक्षणाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी खासगी संस्थांची संख्या वाढली असून याचे समाज व शिक्षण व्यवस्थेवर मिश्र परिणाम दिसून येतात.Ibrahim, Y. आणिRamzan (2016) यांनी सार्वजनिक आणिखासगीविद्यापीठांमधीलशिक्षकांच्यामतांचा

तुलनात्मक अभ्यास केला. या संशोधनानुसार खासगी विद्यापीठांतील शिक्षकांचे खासगीकरणाबद्दलचे मत अधिक सकारात्मक असले तरी दोन्ही प्रकारच्या संस्थांतील शिक्षकांनी उच्च शिक्षणातील समस्यांवर खासगीकरण हा पूर्णतः प्रभावी उपाय नसल्याचे मत व्यक्त केले आहे.

**भारतामधील उच्च शिक्षणाचा ऐतिहासिक विकास**

भारतामध्ये उच्च शिक्षणाचा इतिहास प्राचीन काळापासून संपन्न आहे. नालंदा, तक्षशिलाआणिविक्रमशिलायांसारख्यामहत्त्वाच्या शिक्षण केंद्रांकडेज्ञानासाठीदेशभरातूनआणिपरदेशातून विद्वान येतअसत (Khemani& Narayan, 2006). या संस्थांमध्ये निवासी शिक्षणाची पद्धत होती आणि त्या आधुनिक विद्यापीठांच्या आधारे समजू शकतात. मुस्लिम राज्यकर्त्यांच्या काळात काही संस्थांचे स्वरूप बदलले आणि त्यांना नव्या प्रशासनासह अनुरूप केले गेले.आधुनिक उच्च शिक्षणाची सुरुवात 1817 मध्ये राजा राम मोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या हिंदू कॉलेजपासून झाली. 1824 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने कोलकत्त्यात संस्कृत कॉलेज उभारले. परंतु भारतीय समाजसुधारकांनी युरोपियन भाषेत आधुनिक विज्ञान शिकवण्याच्या भूमिकेला विरोध दर्शविला. या वादामुळे 1835 मध्ये प्रसिद्ध 'मॅकालेच्यामिन्ट्स' (Macaulay Minutes) जारी झाले, ज्यातइंग्रजीला उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणूनस्वीकारण्याचीशिफारसकेलीगेली (Naik&Nurullah, 1974).

उच्च शिक्षणाच्या दृष्टीने भारतात विद्यापीठे उन्नीसव्या शतकाच्या सुरुवातीस लंडन विद्यापीठाच्या मॉडेलवर उभारली गेली. 1857 मध्येकोलकत्ता, बॉम्बे आणि मद्रास विद्यापीठांची स्थापना झाली, जी "Magna Carta of English Education in India" म्हणूनओळखली जाते (Ved Prakash, 2007). या विद्यापीठांमध्ये युरोपियन कला, विज्ञान, तत्त्वज्ञान, साहित्य तसेच भारतीय भाषांचा समावेश होता. उन्नीसव्या शतकाच्या शेवटी लाहोर (1882) आणि इलाहाबाद (1887) विद्यापीठ स्थापन झाले. 1857 ते 1882 या काळात महाविद्यालयांची संख्या 27 वरून 75 वर वाढली, ज्यामुळे नवीन विद्यापीठांची गरज निर्माण झाली आणि 3 विद्यापीठांपासून संख्या 12 पर्यंत पोहोचली.

ब्रिटिश सरकारने कोलकत्ता विद्यापीठासमोरील समस्या आणि इतर विद्यापीठांची स्थिती समजून घेण्यासाठी 1917–1919 मध्ये कोलकत्ता विद्यापीठ आयोगाची नेमणूक केली. या आयोगाने भारतातील विद्यापीठ शिक्षणाच्या विकासासाठी दीर्घकालीन शिफारसी दिल्या, ज्याचा परिणाम पुढील दशकांमध्ये स्पष्ट झाला. स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला, 1947 मध्ये भारतात 20 विद्यापीठे अस्तित्वात होती, ज्या बहुतेक शिक्षणावर केंद्रित होत्या.या ऐतिहासिक प्रवासातून स्पष्ट होते की, भारतातील उच्च शिक्षणाची पायाभरणी प्राचीन विद्वत्तेपासून सुरू झाली, ब्रिटिश काळात आधुनिक संरचना स्वीकारली गेली आणि स्वातंत्र्यपूर्वेपर्यंत महत्त्वपूर्ण विस्तार घडवून आणला गेला. हे पारंपरिक आणि आधुनिक शिक्षणाच्या संगमाचे महत्त्वपूर्ण उदाहरण ठरते.

**उच्चशिक्षणाच्याखासगीकरणाची संकल्पना**

खासगीकरण ही प्रक्रिया आहे जिथे पारंपरिकरीत्या सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या क्षेत्रांमध्ये खासगी सहभाग वाढतो. शिक्षण क्षेत्रात हे थेट मालकी हस्तांतरणाऐवजी शैक्षणिक संस्थांची वाढ, विद्यार्थ्यांकडून शुल्क वसुली, आणि वित्तपुरवठ्याच्या पद्धतींमध्ये बदलाद्वारे दिसते. वाढती शैक्षणिक मागणी आणि सरकारच्या धोरणात्मक निर्णय हे खासगीकरणाला चालना देतात.शिक्षणातील खासगीकरण दोन प्रकारचे मानले जातात. Exogenous Privatisationमध्ये नफा कमावण्याच्याहेतूने सार्वजनिक शिक्षण सेवा खासगीसंस्थांसाठीखुल्याकेल्याजातात. Endogenous Privatisationमध्ये सार्वजनिक संस्थांमध्ये व्यावसायिक तत्त्वांचा अवलंब केला जातोआणि व्यवस्थापन खासगीसंस्थांसारखे केले जाते .

खासगीकरणाचे कारणे बहुआयामी आहेत. जागतिकीकरणामुळे जागतिक अर्थव्यवस्थेचा प्रभाव वाढला असून आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांचा दबावही महत्त्वाचा ठरतो (Dale, 2000; Robertson, 2005). दुसऱ्या बाजूला, सांस्कृतिक आणि आधुनिकतेच्या प्रभावामुळे पाश्चात्त्य मूल्ये जगभर पसरत आहेत, ज्यामुळे अनेक देश समान प्रकारच्या धोरणांकडे वळले आहेत (Meyer et al., 1997).भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये निधीची मर्यादा, विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि शैक्षणिक गरजांची पूर्तता ही कारणे शिक्षणाच्या खासगीकरणासाठी व्यावहारिक आधार ठरतात. मात्र, हा बदल सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण सुनिश्चित करतो का, यावर सखोल विचार करणे गरजेचे आहे.शैक्षणिक पातळीवर चर्चा प्रामुख्याने सार्वजनिक व खासगी संस्थांच्या कार्यपद्धतीवर केंद्रित असते, तर धोरणात्मक स्तरावर सर्वमान्य मत नाही. म्हणून, शिक्षणाच्या खासगीकरणाची प्रक्रिया बहुआयामी असून, तिचा अभ्यास काळजीपूर्वक आणि सखोल पद्धतीने करणे आवश्यक आहे.

**भारतामधील उच्च शिक्षणाची स्थिती**

भारताची उच्च शिक्षण व्यवस्था जागतिक स्तरावर सर्वात मोठ्या व्यवस्थांपैकी एक आहे. आर्थिक सर्वे 2025–26 नुसार, देशातील उच्च शिक्षण संस्था (HEIs) 70,018 इतक्या वाढल्या आहेत, ज्यात विद्यापीठे, महाविद्यालये आणि स्वतंत्र शिक्षण संस्था यांचा समावेश आहे. देशाचे लक्ष 2035 पर्यंत Gross Enrolment Ratio (GER) 50% पर्यंत

वाढवण्यावर केंद्रित आहे, ज्यामध्ये सध्या 18–23 वयोगटातील विद्यार्थ्यांपैकी सुमारे 28.4% पर्यंत प्रवेश नोंदवला गेला आहे. भारतातील उच्च शिक्षणात विविध अभ्यासक्रम आणि शाखांमध्ये अंदाजे 4.46 कोटी विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे, ज्यात महिला सहभाग सुमारे अर्ध्या आसपास आहे. ही वाढ उच्च शिक्षण व्यवस्थेच्या विस्ताराचे आणि विद्यार्थ्यांच्या वाढत्या आकांक्षांचे प्रतीक आहे.

**संस्थात्मक रचना:**देशात विविध प्रकारच्या संस्थांनी उच्च शिक्षणाची रचना तयार केली आहे — केंद्रीय आणि राज्य विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित महाविद्यालये, व्यावसायिक संस्था आणि मुक्त व दूरस्थ शिक्षण संस्थांची मोठी संख्या कार्यरत आहे. अशा एकूण 70,018 HEIs आणि त्यांतून चालणाऱ्या अभ्यासक्रमांमुळे शिक्षणाचा विस्तार आणि उपलब्धता वाढत आहे.

**प्रवेश व नोंदणी**:विद्यार्थी नोंदणी सातत्याने वाढत असली तरी काही पारंपरिक कोर्समध्ये प्रवेश कमी होत असल्याचे स्थानिक आराखड्यांमध्ये दिसून येते जसे की उत्तर प्रदेशमध्ये सामान्य पदवी कोर्स प्रवेशात घट झाली आहे.

**नियमन व धोरणे:**भारताच्या उच्च शिक्षणाचे नियमन UGC, AICTE, NMC, BCI, NCTE, PCI इत्यादी विविध संस्था करतात, ज्या गुणवत्ता, अभ्यासक्रम व मानके निश्चित करतात. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत विविध सुधारणा केल्या जात आहेत, जसे Academic Bank of Credits (ABC), Multiple Entry–Exit System, कौशल्याधारित शिक्षण आणि डिजिटल शिक्षणाचे प्रोत्साहन.

**खासगी क्षेत्राचे वाढते वर्चस्व:**उच्च शिक्षणाच्या विस्तारात खासगी क्षेत्राची भूमिका लक्षणीय वाढली आहे. अनेक राज्यांमध्ये महाविद्यालये आणि विद्यापीठे खासगी पद्धतीने उभारण्यात आली आहेत, ज्यामुळे प्रवेश संधी वाढल्या आहे. परंतु यामुळे काही आव्हाने देखील समोर येत आहेत. भारतातील एकूण प्रवेशांपैकी मोठा भाग खासगी संस्थांमध्ये नोंदवला जातो आणि व्यावसायिक/तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये त्यांचे वर्चस्व अधिक आहे.

**सकारात्मक परिणाम:**खासगी क्षेत्रामुळे शिक्षणाच्या संधी वाढल्या आहेत, विशेषतः व्यावसायिक आणि कौशल्याधारित अभ्यासक्रमांमध्ये. यामुळे पायाभूत सुविधा सुधारणा, संशोधन व नवोपक्रमाला चालना मिळाली आहे.

**उद्भवलेली आव्हाने:**शिक्षण शुल्कात वाढ, गुणवत्ता आणि प्रवेशातील असमानता, तसेच ग्रामीण भागात सेवा उपलब्धतेत फरक हे चिंतेचे प्रमुख गोष्टी आहेत.

**उच्च शिक्षणामध्ये खासगीकरणाची गरज**

भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेवर वाढती लोकसंख्या आणि शिक्षणाबाबत वाढलेली जागरूकता मोठा ताण निर्माण करत आहेत. सरकारी विद्यापीठे आणि महाविद्यालये सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास सक्षम नसल्यामुळे, खासगी क्षेत्राचा सहभाग अत्यावश्यक ठरतो. खासगीकरणामुळे अधिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होते, विद्यमान संस्थांची क्षमता वाढते आणि नवीन शैक्षणिक संस्था उभ्या राहतात.सरकारकडे उच्च शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी आवश्यक निधी मर्यादित असल्याने, खासगी गुंतवणूक महत्त्वाची ठरते. यामुळे पायाभूत सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान आणि अभ्यासक्रमांची उपलब्धता वाढते, तसेच शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा होते. विशेषतः अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वैद्यकीय, आयटी आणि अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी खासगी संस्थांचा मोठा वाटा आहे.

खासगी आणि सरकारी संस्थांमध्ये स्पर्धा निर्माण झाल्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता, सुविधा, अध्यापन पद्धती आणि अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा होते. तसेच, खासगी विद्यापीठे संशोधन, उद्योग सहकार्य, नवोपक्रम आणि कौशल्याभिमुख प्रशिक्षणावर भर देतात, ज्यामुळे ज्ञाननिर्मिती, कौशल्य विकास आणि रोजगारक्षमतेची वाढ घडते.याशिवाय, खासगीकरणामुळे शैक्षणिक व्यवस्थेत नवकल्पना आणि आधुनिक पद्धतींचा समावेश होतो, विद्यार्थी उद्योगक्षेत्राशी संबंधित अनुभव घेऊ शकतात आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनतात. सरकारकडे विद्यमान संसाधने मर्यादित असल्यामुळे, खासगी क्षेत्राची गुंतवणूक उच्च शिक्षण क्षेत्राला स्थिरता, विस्तार आणि गुणवत्तावृद्धीसाठी आवश्यक आर्थिक पाठबळ पुरवते, वाढती विद्यार्थीसंख्या, सरकारी निधीची मर्यादा, व्यावसायिक शिक्षणाची वाढती मागणी आणि गुणवत्तावृद्धीची गरज लक्षात घेतल्यास, खासगीकरण ही उच्च शिक्षणाच्या विस्तार, गुणवत्ता सुधारणा, संशोधन, नवोपक्रम आणि कौशल्य विकासासाठी अपरिहार्य उपाय ठरते. भविष्यातील ज्ञानाधारित समाज आणि अर्थव्यवस्थेसाठी खासगी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची राहणार आहे.

**उच्च शिक्षणावर खासगीकरणाचा परिणाम**

गेल्या दोन दशकांत भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेत मोठा बदल घडून आला आहे. वाढती विद्यार्थीसंख्या, रोजगाराभिमुख कौशल्यांच्या मागणीनुसार बदल आणि सरकारी संसाधनांची अपुरी क्षमता यामुळे खासगी क्षेत्राचा सहभाग झपाट्याने वाढला आहे. आजची आकडेवारी दाखवते की भारतातील एकूण उच्च शिक्षण प्रवेशांपैकी सुमारे 62% प्रवेश खासगी संस्थांमध्ये आहेत, ज्यामुळे देशातील शिक्षण विस्ताराला मोठी गती मिळाली आहे.

खासगीकरणामुळे अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन, संगणक व अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध पर्याय उपलब्ध झाले आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार क्षेत्र निवडण्याची संधी वाढली आहे. याशिवाय आधुनिक पायाभूत सुविधा, डिजिटल शिक्षण प्रणाली आणि उद्योग-शिक्षण भागीदारीमुळे विद्यार्थ्यांना रोझगारक्षम कौशल्ये आणि व्यावसायिक अनुभव मिळण्यास मदत झाली आहे. काही उच्च दर्जाच्या खासगी विद्यापीठांनी संशोधन व नवोपक्रमासाठी स्वतंत्र संशोधन केंद्रे स्थापन केली आहेत आणि उद्योग क्षेत्राशी सहकार्य वाढवले आहे, ज्यामुळे ज्ञाननिर्मितीच्या संधी वाढल्या आहेत.तथापि, भारताच्या उच्च शिक्षणातील खासगीकरणाचे परिणाम एकसूत्री नाहीत. काही खासगी संस्था नफा कमावण्याच्या उद्देशाने चालवल्या जात असल्याचेही दिसून येते, ज्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर, प्रवेशातील समतेवर आणि शुल्क संरचनेवर नकारात्मक परिणाम होत आहेत. अनेक ठिकाणी शुल्क संरचना खूप महाग असल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचे स्वप्न धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली आहे.

याशिवाय, नियमनातील कमतरता आणि स्पष्ट धोरणात्मक मार्गदर्शन नसल्यामुळे काही संस्थांच्या गुणवत्ता आणि मानकांमध्ये तफावत दिसते. विद्यार्थ्यांच्या करिअर परिणाम, अभ्यासक्रमाची शास्त्रीयता आणि शिक्षक क्षमता यासारख्या बाबींवर सतत मूल्यांकन आणि गुणवत्ता वाढवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रभावी गुणवत्ता नियंत्रण, मानके आणि जबाबदारीची स्पष्ट चौकट असणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे.एकूण पाहता, खासगीकरणामुळे भारतातील उच्च शिक्षणाचा प्रवेश आणि सुविधा यांच्यात वाढ झाली आहे, परंतु गुणवत्ता, समावेश आणि समान संधी सुनिश्चित करण्यासाठी धोरणात्मक योजनांची गरज आहे. संतुलित नियमन, शिक्षणातील नवीन तंत्रज्ञानाचा वापर, संशोधनाला प्रोत्साहन आणि सर्वसमावेशक प्रवेश या तत्त्वांवर आधारित धोरणे राबविली, तर भारताची उच्च शिक्षण व्यवस्था जागतिक स्तरावर स्पर्धात्मक, समावेशक आणि गुणवत्तापूर्ण बनू शकते.

**उच्च शिक्षणातील खासगीकरणाचे आव्हाने-**जागतिक स्तरावर उच्च शिक्षण संस्थांना आज अनेक गंभीर आव्हानांना तोंड देण्याची गरज आहे. शिक्षणाची वाढती मागणी आणि मर्यादित आर्थिक संसाधने या दोघांमधील तणावामुळे सरकारी व खासगी दोन्ही क्षेत्रांना दबाव जाणवतो. अनेक देशांमध्ये, त्यात भारतही सामील, सरकारकडे पर्याप्त निधी नसल्याने उच्च शिक्षणाच्या विस्तारासाठी आणि दर्जा राखण्यासाठी आवश्यक ती गुंतवणूक करणे कठीण झाले आहे. परिणामी, खासगीकरणावर आश्रय घेतल्याने काही प्रमाणात संधी वाढल्या असल्या, तरी त्यासोबत आव्हानांची संख्या वाढली आहे.

एक महत्वाचे आव्हान म्हणजे शैक्षणिक गुणवत्ता राखणे. काही खासगी संस्थांमध्ये नफा आणि अधिक प्रवेश याकडे अधिक लक्ष देण्यामुळे अभ्यासक्रम, अध्यापन व मूल्यांकनाच्या पद्धतींची गुणवत्ता धोक्यात पडते. यामुळे विद्यार्थ्यांना व्यवहार्य शिक्षण न मिळणे, गुणवत्तेत तफावत आणि रोजगारक्षमतेवर परिणाम होण्याची संभाव्यता वाढते.याशिवाय प्रशासकीय व नियामक कमकुवतपणा देखील मोठे आव्हान आहे. प्रभावी नियमन व मूल्यांकनाची स्पष्ट चौकट नसल्यामुळे काही संस्थांमध्ये व्यवस्थापनातील अप्रभावीता, अभावी प्रशिक्षित शिक्षक, पायाभूत सुविधांची कमी आणि विद्यार्थ्यांच्या गरजांचे दुर्लक्षण यासारख्या समस्या वाढल्या आहेत. याचा परिणाम म्हणून शिक्षणातील समता, प्रवेशातील पारदर्शकता आणि गुणवत्ता नियमितपणे राखणे कठीण झाले आहे.तिसरे आव्हान म्हणजे शिक्षणातील असंतुलन बाजारपेठेच्या दडपणामुळे संस्था अधिक नफा, ब्रँडिंग आणि स्पर्धात्मक फायदा याकडे वळतात, ज्यामुळे पारंपरिक शैक्षणिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि संस्थात्मक स्वायत्तता टिकवणे कठीण बनते. हे विशेषतः ग्रामीण व दुर्बल सामाजिक स्तरातील विद्यार्थ्यांसाठी चिंतेचे आहे, कारण शुल्क आधारित प्रवेशामुळे त्यांची शिक्षणात प्रवेशाची संधी कमी होण्याचा धोका वाढतो.

आर्थिक दृष्ट्या, वाढत्या खर्चाचे व्यवस्थापन आणि संसाधनांचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे हे अजूनही मोठे आव्हान आहे. खर्च वाढत असताना उपलब्ध निधी मर्यादित असल्यामुळे दीर्घकालीन शाश्वती, संशोधन व नवोपक्रमासाठी निधीची उपलब्धता हा प्रश्न बनतो. 2026 पर्यंत उच्च शिक्षणातील खासगीकरणामुळे उपलब्धता आणि संधी वाढल्या असल्या तरी गुणवत्ता नियंत्रण, नियामक चौकट, शाश्वत संसाधन व्यवस्थापन आणि सामाजिक समावेशता यांसारख्या आव्हानांना प्रभावीपणे तोंड देणे आवश्यक आहे.

**उच्च शिक्षणातील खासगीकरण: सुचवण्या / सूचना**

भारतातील उच्च शिक्षणात खासगीकरणामुळे संधी वाढल्या असल्या तरी गुणवत्ता, सामाजिक जबाबदारी आणि सर्वसमावेशकता राखणे महत्त्वाचे ठरते. यासाठी काही प्रमुख उपाय केले पाहिजेत.

1. गुणवत्ता व सामाजिक जबाबदारी: खासगी संस्थांमध्ये शैक्षणिक ऑडिट प्रणाली अनिवार्य करावी. UGC, AICTE, NCTE, MCI, DCI यांसारख्या राष्ट्रीय नियामक संस्थांनी संस्थांमध्ये गुणवत्ता व सामाजिक दायित्व सुनिश्चित करावे.
2. विद्यापीठांची जबाबदारी: विद्यापीठांनी फक्त पारंपरिक अभ्यासक्रम नाकारता, शिक्षणाची गुणवत्ता राखण्यावर लक्ष केंद्रित करावे.
3. स्वतंत्र वित्तसंपन्न संस्था: शुल्कातून चालणाऱ्या संस्थांवर नियमन कडक ठेवून अनुचित शुल्कवाढ टाळावी.

4. स्पष्ट सरकारी मार्गदर्शन: खासगी महाविद्यालये व विद्यापीठ स्थापन करण्यासाठी स्पष्ट धोरणे ठरवावी, जेणेकरून विद्यार्थ्यांचे शोषण टाळता येईल.
5. सार्वजनिक-खासगी सहकार्य: सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राचे सहकार्य उच्च गुणवत्तेचे शिक्षण व संशोधन वाढविण्यास उपयोगी ठरेल.
6. तंत्रज्ञानाचा वापर: डिजिटल शिक्षण आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे शिक्षणाची पोहोच आणि गुणवत्ता सुधारावी.
7. सर्वसमावेशकता व आर्थिक मदत: मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी फंड, हार्डशिप योजना व शिष्यवृत्ती उपलब्ध करून संधी वाढवाव्यात.
8. गुणवत्ता खात्री: पुरेसे शिक्षक, संशोधन सुविधा, अद्ययावत अभ्यासक्रम व पायाभूत सुविधा आवश्यक आहेत.
9. शिक्षक व व्यवस्थापन: शिक्षकांना नवोपक्रमाची मुभा देऊन व्यवस्थापनात सहभागी करणे गरजेचे आहे.
10. शुल्क व आर्थिक व्यवहार: शुल्क वाढ सरकारी मंजुरीशिवाय करू नये; पारदर्शकता आणि आर्थिक जवाबदारी आवश्यक आहे.
11. संस्थात्मक सुधारणा:स्वतंत्र नियामक संस्था स्थापन करावी (UGC, NAAC, NBA, NIEPA सहकार्याने).प्रवेश सामान्य परीक्षा व राष्ट्रीय कौशल्य चाचणीनंतरच द्यावा.NAAC प्रमाणपत्रावर आधारित स्वायत्तता व शुल्क ठरवावे.उद्योग-संस्था सहकार्यातून संशोधनाचा फायदा मिळवावा.विद्यार्थ्यांसाठी शिक्षण कर्ज आणि निष्पक्ष मूल्यांकन सुनिश्चित करावे.

**निष्कर्ष**-भारतामध्ये उच्च शिक्षणात खासगीकरणाचा वाढता सहभाग देशातील शैक्षणिक विस्ताराला चालना देतो, परंतु यासोबतच शिक्षणाचा खर्च वाढतो आणि आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी संधी कमी होण्याचा धोका निर्माण होतो. तरीही, ठोस नियमन, गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम, सक्षम शिक्षक, संशोधन व नवोपक्रमासाठी साधने आणि पारदर्शक आर्थिक व्यवहार यावर भर दिल्यास खासगीकरण सकारात्मक परिणाम साधू शकते. यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख कौशल्ये, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेषाचे संधी मिळतात तसेच शैक्षणिक स्पर्धात्मक वातावरण तयार होते. उलट, गुणवत्ता, पारदर्शकता आणि सामाजिक जबाबदारी नसेल तर सामाजिक अंतर वाढते, शिक्षकांचा अनादर होतो आणि विद्यार्थी शोषित होऊ शकतात.म्हणून उच्च शिक्षणातील खासगीकरण सर्वसमावेशक आणि जबाबदार स्वरूपाचे असावे, ज्यात सार्वजनिक-खासगी सहकार्य, कडक नियमन, आर्थिक सहाय्य योजना आणि गुणवत्तेची हमी यांचा संतुलित समावेश असावा. फक्त अशाच दृष्टीकोनातून समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थी गुणवत्तापूर्ण, रोजगाराभिमुख आणि संशोधनप्रधान शिक्षण घेऊ शकतील, जे देशाच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी उपयुक्त ठरेल.

**संदर्भ**

1.Baweja, Oberoi, Manmeet. (2017). Privatization of Higher Education in India: Need, Impact and Suggestions. International Journal of Recent Scientific Research, Vol. 8, Issue, 3, pp. 15973- 15975, ISSN: 0976-303
2.Koul, Lokesh: Methodology of Educational Research (Fourth Edition); New Delhi, Vikas Publishing House Pvt. Ltd
3.Chauhan, C. P.S (2002) : " Higher Education in India: Challenges of Global Trends", University News , 40 (17) April 29 – May 05 .
4.Patel ,I. G. (2003) : 'Higher Education And Economic Development' in J B G Tilak (ed ) Education Society And Development : National and International Perspective , APH for NIEPA , New Delhi .
5.Khan K. (2022). Choice of higher education in India and its determinants. International Journal of Economic Policy Studies, 16(1), 237–251.
6.Dr. T. Sreenivas, N. Suresh Babu,(2015).Higher Education In India – QualityPerspectiveInternational Journal of Advanced Research in Management and Social Sciences Vol. 4 No. 7 July 2015.
7.Yirci, Ramazan&Kocabas, Ibrahim. (2016). International Online Journal of Educational Sciences, 8 (4), 59-73, ISSN: 1309-2707.
8.Alam, Khabirul, Halder, Ujjwal Kumar. (2016). The Emergence and Impact of Privatization of Higher Education: Indian Overview, Journal of Education and Development, Vol.6, No. 12, ISSN: 2248-9703.
9.Agarwal, P. (2006). "Higher Education in India: The Need for Change." ICRIER Working Paper, Indian Council for Research on International Economic Relations: No. 180
10. Dale R. (2000). Globalisation and education: Demonstrating a "common world educational culture" or locating a "globally structured educational agenda"? Educational Theory, 50(4), 427–448. https://doi.org/10.1111/j.1741-5446.2000.00427.x

11. Oza, Chandni, A Study on Impact of Quality Assurance on Higher Education in India (January04, 2018),SSRN: https://ssrn.com/abstract=3105154 or http://dx.doi.org/10.2139/ssrn.3105154

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# उच्च शिक्षणाचे खाजगीकरण - एक अभ्यास

**कु.प्रीती महादेवराव पायघन**
paighanpritee@gmail.com

**सारांश:**

उच्च शिक्षण हे कोणत्याही देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अलीकडच्या काळात भारतात उच्च शिक्षण क्षेत्रात खाजगी संस्थांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या संशोधनाचा उद्देश उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाची कारणे, फायदे, तोटे आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे.

**प्रस्तावना:**

आजच्या आधुनिक काळात शिक्षणाला खूप महत्त्व आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा आणि समाजाचा सर्वांगीण विकास होतो. परंतु अलीकडच्या काळात शिक्षणाचे खाजगीकरण वेगाने वाढताना दिसत आहे. शिक्षण व्यवस्था सरकारऐवजी खाजगी संस्था, ट्रस्ट किंवा कंपन्या चालवू लागल्या तर त्याला शिक्षणाचे खाजगीकरण असे म्हणतात.

पूर्वी बहुतांश शाळा व महाविद्यालये ही सरकारी होती. पण वाढती लोकसंख्या, विद्यार्थ्यांची संख्या आणि शिक्षणाची वाढती मागणी यामुळे सरकारवर मोठा ताण पडला. त्यामुळे अनेक खाजगी शाळा व महाविद्यालये सुरू झाली. खाजगी संस्थांमुळे आधुनिक सुविधा, चांगल्या इमारती, प्रयोगशाळा, संगणक आणि नवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाले. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता काही प्रमाणात वाढली आहे.

मात्र शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे काही समस्या देखील निर्माण झाल्या आहेत. अनेक खाजगी शाळा व महाविद्यालयांची फी खूप जास्त असते. त्यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना ते शिक्षण परवडत नाही. काही ठिकाणी शिक्षण हा व्यवसाय बनला आहे आणि नफ्याला जास्त महत्त्व दिले जाते.

म्हणून शिक्षणाचे खाजगीकरण करताना सरकारने योग्य नियम व नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. तसेच सरकारी शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यावरही भर दिला पाहिजे. शिक्षण हे प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे, त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना परवडणारे आणि दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे.

**शिक्षणाच्या खाजगीकरणाचा अर्थ:**शिक्षण व्यवस्था चालवणे, निधी देणे आणि व्यवस्थापन करणे हे काम सरकारऐवजी खाजगी संस्थांकडे जाणे म्हणजे शिक्षणाचे खाजगीकरण.शिक्षणाचे खाजगीकरण ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे, कारण त्यामुळे शिक्षण हे 'ज्ञानदानाचे माध्यम' न राहता 'नफा कमावण्याचा व्यवसाय' बनले आहे. यामुळे महागड्या शिक्षणामुळे गरीब व श्रीमंत विद्यार्थ्यांमध्ये दरी निर्माण होऊन, दर्जेदार शिक्षण फक्त पैशांच्या जोरावर उपलब्ध होत आहे आणि सामाजिक असमानता, बेरोजगारी वाढून शिक्षणाचे बाजारीकरण होत आहे.

**शिक्षणाचे बाजारीकरण व नफा:** खाजगी संस्था शिक्षणाकडे सेवा म्हणून न पाहता व्यवसाय म्हणून पाहतात, ज्यामुळे फी गगनाला भिडली आहे.सामाजिक असमानता: गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांची गुणवत्ता असूनही महागड्या शिक्षणामुळे त्यांना उच्च व उत्तम शिक्षणापासून वंचित राहावे लागते, ज्यामुळे समाजात दरी निर्माण होते.गुणवत्तेत घट व बेरोजगारी: खाजगी संस्थांमध्ये पायाभूत सुविधा असल्या तरी शिक्षणाची गुणवत्ता खालावली आहे. पदवी मिळाल्यानंतरही नोकरी मिळत नसल्याने बेरोजगारी व ससेहोलपट वाढली आहे.

सरकारी शिक्षणाकडे दुर्लक्ष: खाजगी संस्थांच्या वाढीमुळे सरकारी शाळा व महाविद्यालयांची अवस्था खालावली आहे, कारण शासनाचे लक्ष याकडे कमी होत आहे.गुणवत्तेऐवजी पैसा: अनेक ठिकाणी प्रवेशासाठी ज्ञानाऐवजी पैसा हा निकष बनला आहे.

नव्वदच्या दशकानंतर खाजगीकरण हा शब्द मानवाच्या सार्वजनिक जीवनाचा मोठा भाग बनला असून आज शासनाद्वारे समाजातील अनेक मुलभूत क्षेत्रांचे खाजगीकरण केले जात आहे. गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण घडून आलेल्या क्षेत्रांपैकी शिक्षण हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. शिक्षणाचे खाजगीकरण समजून घेण्याआधी खाजगीकरणाची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक गुंतवणुकीकडून अधिकाधिक खाजगी गुंतवणुकीवरील भर होय. उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणात सरकारी गुंतवणूक आणि नियंत्रण कमीत कमी होत जाऊन खाजगी गुंतवणूक वाढण्याबरोबरच निर्णयप्रक्रियेचे केंद्रीकरण, कमी होणारी अकादमीक निकषांची मान्यता, प्राध्यापकांच्या स्वायततेवर मर्यादा आणि खाजगी निधी स्रोत विकसित करण्यावरील भर ही काही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

उच्च शिक्षणातील खाजगीकरणामध्ये बिगर शासकीय संस्थांचा समावेश होतो. अशा खाजगी संस्थांना कोणत्याही प्रकारच्या शासकीय मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःचा खर्च स्वतः करावा लागतो. खाजगीकरणाच्या संकल्पनेनुसार उच्च शिक्षणातील खाजगीकरणात नफा हा मूळ उद्देश असतो. हा नफा विद्यार्थ्यांकडून शुल्क, देणगी

इत्यादींमार्फत मिळविला जातो. नफा मिळविणे हेच मुख्य उद्दिष्ट असल्यामुळे खाजगीकरणात शिक्षणाला केवळ एक 'क्रय वस्तू' मानले जाऊन विद्यार्थ्यांकडे 'ग्राहक' या नात्याने पहिले जाते. त्यामुळे विद्यार्थी ग्राहक आणि खाजगी सेवा पुरविणाऱ्या शिक्षणसंस्था रचनेत आज उच्च शिक्षण एक उद्योगधंदा म्हणून उभा राहिला आहे.

स्वातंत्र्यापूर्वी अस्तित्त्वात असलेल्या खासगी अनुदानित शाळा आणि महाविद्यालये यांचा समावेश शिक्षणाच्या खाजगीकरणात होत नाही. या खाजगीकरणाच्या व्याख्येत मुख्यत्वे गेल्या शतकाच्या शेवटास उदयास आलेल्या खासगी स्व-वित्तपुरवठा करणाऱ्या महाविद्यालयांचा समावेश होतो. गेल्या काही वर्षांत जगभरातील अनेक देशांमध्ये खाजगी महाविद्यालये आणि विद्यापीठे यांची संख्या वाढत आहे. शिक्षणाच्या विकासाचे धोरण म्हणून खाजगीकरणाला गेल्या काही वर्षांत फार महत्त्व प्राप्त झाले आहे. एका बाजुला काही देशांमध्ये घसरत जाणारे सार्वजनिक क्षेत्रातील निधी आणि दुसऱ्या बाजूला उच्च शिक्षणाची वाढत जाणारी सामाजिक मागणी ही यामागील प्रमुख कारणे आहेत.

भारतामध्ये प्राचीन काळापासून उच्च शिक्षणात अनेक बदल झालेले दिसून येतात. ब्रिटिश काळ हा भारतीय उच्च शिक्षणासाठी निर्णायक ठरला. वसाहत काळात शिक्षणाच्या उद्दिष्टांमध्ये मूलभूत बदल घडून आले. पारंपरिक शिक्षणाची जागा आधुनिक इंग्रजी शिक्षणाने घेतली. स्वातंत्र्यानंतर भारताकडे बरीच आव्हाने होती. त्यांपैकी शिक्षण एक होते. उच्च शिक्षण हे एखाद्या देशाच्या प्रगती आणि विकासाचे साधन मानले जाते. स्वातंत्र्यापूर्वी भारतीय शिक्षण पद्धतीत सुधारणा करण्याची आवश्यकता भासली गेली असली तरी स्वातंत्र्यानंतरच राष्ट्रीय नेतृत्वाला त्या सुधारणा घडवून आणण्याची संधी मिळाली. स्वातंत्र्योत्तर काळातील नवीन शिक्षण स्वतंत्र भारताच्या नवीन राष्ट्रीय उद्दीष्टांशी संबंधित असले पाहिजे ह्याविषयी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आग्रही होते. ह्या राष्ट्रीय उद्दिष्टांमध्ये भारतीय राज्यघटनेमधील लोकशाही, धर्मनिरपेक्षता, दारिद्र्य निर्मूलन, समाजवादी समाज निर्माण करणे आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे ह्यांचा समावेश होतो. स्वतंत्र भारतातील पहिले शिक्षण कमिशन असणाऱ्या राधाकृष्णन कमिशन च्या शिफारसींमध्ये आपल्याला वरील उद्दिष्टांचा समावेश असलेला आढळतो. उच्च शिक्षणाकडे लोकशाहीवादी समाज निर्माण करण्याचे साधन म्हणून पहिले गेले. त्यामुळेच राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे मानले जाऊन त्याचा विस्तार करणे महत्त्वपूर्ण ठरले. स्वातंत्र्यानंतर उच्च शिक्षण वेगाने वाढले. १९८० पर्यंत देशात १३२ विद्यापीठे आणि ४,७३८ महाविद्यालयांत उच्च शिक्षणासाठी पात्र वयोगटातील प्रवेशसंख्या पाच टक्के होती. त्या वेळी उच्च शिक्षणाची वाढ मुख्यत्वे कला, विज्ञान आणि वाणिज्य या शाखांपुरतीच मर्यादित होती. सरकारने केवळ विद्यापीठे व महाविद्यालये स्थापन करून उच्च शिक्षणाला पाठिंबा दिला नाही, तर खासगी क्षेत्रामार्फत स्थापन केलेल्या संस्था चालविण्याची जबाबदारीही घेतली, ज्यांना अनुदानित (जीआयए) संस्था किंवा खाजगी अनुदानित संस्था म्हणून ओळखले जाते, अशा संस्थांमध्ये भांडवली खर्चाच्या मुख्य भागासाठी खासगी क्षेत्राने वित्तपुरवठा केला असला तरी, वारंवार येणाऱ्या खर्चाचा भार भागविण्यासाठी आणि कधीकधी काही भांडवलाच्या कामांसाठी सार्वजनिक अनुदान दिले जाते. सार्वजनिक वित्त पुरवठा करण्याबरोबरच सरकार या खासगी संस्थांचे नियमित नियमन करते.

जगात चीन आणि अमेरिकेनंतर उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या संख्येच्या बाबतीत भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. संस्थांद्वारे सुमारे ७०% उच्च शिक्षण कोणत्याही राष्ट्रीय ध्येय, दिशा, माहिती आणि कायद्याशिवाय खाजगीरित्या व्यवस्थापित केल्या जातात. ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भानुसार वेगवेगळया देशांमध्ये वेगवेगळया प्रकारे उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाची प्रक्रिया घडली आहे. जे. बी. टिळक यांनी भारताच्या संदर्भात खासगीकरणाच्या अनेक प्रकारांचे चार प्रकारात वर्गीकरण केले आहे.

**प्रकार :** उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाचे मुख्यत: चार प्रकार पडतात.

**(१) तीव्र किंवा टोकाचे खाजगीकरण :** यामध्ये विद्यापीठे आणि महाविद्यालये संपूर्णतः खाजगी तत्त्वांवर चालवली जातात. व्यवस्थापन आणि निधी यांचे नियमन खाजगी संस्था करतात. यामध्ये सरकारचा हस्तक्षेप नगण्य असतो.

(२) शक्तिशाली मजबूत खाजगीकरण : यामध्ये सार्वजनिक उच्च शिक्षणाची संपूर्ण किंमत त्याच्या उपभोगत्यांकडून म्हणजेच विद्यार्थी आणि त्यांचे नियोक्ते यांच्याकडून वसूल केली जाते. याप्रकारचे खाजगीकरण सोयीचे नसल्यामुळे अस्तित्वात येण्यास थोडे कठीण असते.

(३) मध्यम प्रकारचे खाजगीकरण : यामध्ये उच्च शिक्षणाची सार्वजनिक तरतूद असते; परंतु अशासकीय स्रोतांकडून वाजवी पातळीवर वित्तपुरवठा केला जातो.

(४) अनुदानित खासगीकरण : या श्रेणीतील उच्च शिक्षणसंस्था खाजगी असतात; परंतु त्यांना सरकारकडून १०० टक्के आर्थिक अनुदान त्यांच्या खर्चासाठी दिला जातो. म्हणून या संस्था खाजगीरित्या व्यवस्थापित केल्या जातात; परंतु त्यांना सार्वजनिकरित्या अर्थसाहाय्य केला जातो.

आज भारतीय उच्च शिक्षण खाजगीकरणाच्या पहिल्या प्रकारास सामोरे जात आहे. भारतामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यांमध्ये खासगी उच्च शिक्षणसंस्था मोठ्या प्रमाणात आहेत. स्वातंत्र्यानंतर देशात कुशल कामगार, तंत्रज्ञ आणि अभियंता यांना मोठी मागणी होती. तांत्रिक शिक्षणाचा विस्तार ही राष्ट्रीय विकासाची तातडीची

गरज बनली. तांत्रिक शिक्षणाच्या इतक्या मोठ्या मागणीला सामोरे जाणे या राज्यांस शक्य नव्हते. त्यामुळे तमिळनाडू राज्याने खासगी क्षेत्रास उच्च शिक्षणात परवानगी दिली. १९८८ मध्ये या राज्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून महाराष्ट्र राज्याने तांत्रिक शिक्षणात खासगी क्षेत्रातील सहभागाचे स्वागत केले. स्वातंत्र्यापूर्वी सुरू झालेल्या महाराष्ट्रातील रयत शिक्षण संस्थेसारख्या खासगी संस्था या समाजातील शोषित आणि वंचित घटकातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याच्या उद्देशाने स्थापन झाल्या होत्या. त्या आणि आजच्या खाजगी संस्थांमध्ये त्यामुळेच मोठी तफावत असलेली आढळून येते. आजच्या खासगी शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये शुल्क आकारतात. त्यामुळे तेथे विशिष्ट वर्गातील विद्यार्थीच प्रवेश घेऊ शकतात.

उद्योजक मुकेश अंबानी आणि कुमारमंगलम बिर्ला यांनी २००० मध्ये भारत सरकारच्या पतंप्रधानांच्या व्यापार व उद्योग परिषदेला एक अहवाल सादर केला. या अहवालाचा मुख्य विषय शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकासात खासगी गुंतवणुकीसाठी धोरणात्मक चौकट तयार करणे हा असून सरकारने उच्च शिक्षण सर्वस्वी खाजगी क्षेत्राच्या हवाली करावे, अशी मागणी केली होती. येथूनच उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाला खरी सुरुवात झाली. पुढे २०१२ मध्ये नारायण मूर्ती यांनी उच्च शिक्षणामध्ये व्यावसायिक क्षेत्राचा सहभाग वाढावा यासंबंधी सरकारला शिफारस केली. सरकारने काही प्रमाणात ती मान्य केली. त्यामुळे आज उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात टोकाचे खाजगीकरण सुरू आहे. खाजगीकरणामुळे ज्या विषयांना बाजारपेठेमध्ये मागणी आहे, तेच विषय महत्त्वाचे ठरू लागले. मागणी तसा पुरवठा या तत्त्वानुसार अभ्यासक्रम ठरले जाऊ लागले. उद्योजकांना त्यांच्या उद्योगवाढीसाठी ज्याप्रकारचे कौशल्य असलेले कामगार हवे आहेत, तसेच विद्यार्थी घडविण्यात खाजगी शिक्षण संस्था कार्यरत आहेत. यामध्ये साहजिकच कला, सामाजिक शास्त्रे यांसारखे विषय कमी महत्त्वाचे ठरविले जाऊ लागले. बाजारपेठेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असून शिक्षणाला केवळ रोजगारापुरते मर्यादित पाहिले जाऊ लागले.

आज महाराष्ट्रात अभियांत्रिकी महाविद्यालयापासून सुरू झालेल्या खासगी संस्थांचा विस्तार ललित कला, फार्मसी, लिबरल आर्ट्सपर्यंत झाला आहे. सध्या भारतीय उच्च शिक्षण टोकाच्या खाजगीकरणाच्या प्रकारास सामोरे जात आहे. भारतामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश अशी काही राज्ये आहेत, ज्यांची खासगी उच्च शिक्षणसंस्था मोठ्या प्रमाणात आहेत. महाराष्ट्रात भारतातील विविध राज्यांतील विद्यार्थी शिक्षणाच्या कारणास्तव स्थलांतरित झाले आहेत.

भारतातील उच्च शिक्षणात १९९० च्या दशकातील आर्थिक सुधारणांमुळे महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण या पार्श्वभूमीवर भारतीय उच्च शिक्षणाला अनेक नव्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. तसेच जागतिक व्यापार संघटना या संस्थेच्या गॅट करारामध्ये उच्च शिक्षणाचा उल्लेख व्यापार करण्यायोग्य सेवा म्हणून केला गेला आहे. ज्यामुळे उच्च शिक्षणक्षेत्रातील खाजगीकरणास प्रोत्साहन मिळत आहे. गेल्या ५० वर्षांत देशात उच्च शिक्षणाचा वेग वाढला असला, तरी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये उच्च शिक्षणक्षेत्राच्या विकासामध्ये मोठी असमानता आहे. म्हणूनच भारतीय उच्च शिक्षणात मोठी आव्हाने आहेत, यात शंका नाही. एकीकडे जास्तीत जास्त तरुणांना उच्च शिक्षणक्षेत्रात आणण्याची गरज आहे, तर दुसरीकडे शिक्षणाची गुणवत्ता आणि जागतिक स्पर्धात्मकतेवर लक्ष केंद्रित करणेही आवश्यक आहे.

सद्यपरिस्थितीत भारतीय उच्च शिक्षणासमोर अनेक आव्हाने आहेत. सर्व शैक्षणिक पातळ्यांवरील असमानता, गुणवत्ता ही त्यातील काही आव्हाने होत. सुरुवातीला उच्च शिक्षणाच्या लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेत खाजगी क्षेत्र योगदान देईल, या विश्वासावर खाजगी क्षेत्राच्या वाढीस प्रोत्साहन देण्यात आले; परंतु आज खाजगी क्षेत्रामुळे आणखी असमानता वाढताना दिसून येत आहे. आज शिक्षणाचा अत्यंत सुमार दर्जा, अपुऱ्या पायाभूत सुविधा, शिक्षकांची अनुपस्थिती, पदभरतीवरील बंदी, भ्रष्टाचार, मोठ्या प्रमाणात शुल्क वाढ दिसून येते. तरीसुद्धा खासगी संस्थांची संख्या अभूतपूर्व वाढत आहे. उच्च शिक्षण मानवी मूल्यनिर्मितीचे साधन न बनता सांस्कृतिक व्यापार बनले आहे. सर्वसामान्य लोक शिक्षणाकडे भौतिक स्वप्नपूर्तीचे साधन म्हणून पाहत आहेत. आजच्या भांडवली व्यवस्थेत या शिक्षणाला चालना दिली जात आहे. यातूनच भारतात उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाची प्रकिया अधिक गतिशील बनत आहे.

**खाजगीकरणाची कारणे:**

1.सरकारी शिक्षणावर वाढता ताण – विद्यार्थ्यांची संख्या जास्त.

2.सुविधांची कमतरता – इमारत, प्रयोगशाळा, शिक्षकांची कमतरता.

3.गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मागणी – आधुनिक तंत्रज्ञान, इंग्रजी माध्यम इ.

4.सरकारचा खर्च कमी करण्याचा प्रयत्न.

**खाजगीकरणाचे फायदे:**

•आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञान.

•स्पर्धेमुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढते.

•विविध अभ्यासक्रम आणि करिअर पर्याय उपलब्ध होतात.

•व्यवस्थापन अधिक वेगवान आणि लवचिक असते.

**खाजगीकरणाचे तोटे:**

•फी खूप जास्त असते, त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना अडचण.
•शिक्षण व्यवसाय बनण्याची शक्यता.
•सामाजिक समानतेवर परिणाम होऊ शकतो.
•काही ठिकाणी नफ्याला जास्त …

**परिणाम व उपाय:**

खाजगीकरणा मुळे शिक्षण हे श्रीमंतांची मक्तेदारी बनत आहे आणि हुशार, पण गरीब विद्यार्थी संधी गमावत आहेत. या समस्येवर उपाय म्हणून, खाजगी संस्थांवर कडक सरकारी नियंत्रण असणे आणि सरकारी शिक्षण व्यवस्था अधिक बळकट करणे आवश्यक आहे, जेणेकरून सर्वांना समान व दर्जेदार शिक्षण मिळू शकेल.

**निष्कर्ष:**

शिक्षणाचे खाजगीकरण पूर्णपणे चांगले किंवा वाईट नाही. सरकारी आणि खाजगी शिक्षण यांचा समतोल राखला तर सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि परवडणारे शिक्षण घेता येते.
शिक्षणाचे खाजगीकरण काही प्रमाणात उपयुक्त असले तरी त्यावर नियंत्रण ठेवणे आणि सरकारी शिक्षण मजबूत करणे हे समाजाच्या हितासाठी महत्त्वाचे आहे.

**संदर्भ:**

1.Indian Education System – S. P. Agrawal
2.Education in India: Development and Challenges – J. C. Aggarwal
3.Higher Education in India – Pawan Agarwal
सरकारी अहवाल (Government Reports)
4.National Education Policy 2020 – भारत सरकार
5.University Grants Commission चे अहवाल
6.Ministry of Education India चे वार्षिक अहवालजर्नल्स आणि लेख (Journals / Articles)
7.Economic and Political Weekly मधील शिक्षणविषयक संशोधन लेख
8.Indian Journal of Educational Planning and Administrationवेबसाईट्स (Web Sources)
9.UNESCO – शिक्षणाशी संबंधित जागतिक अहवाल
10.World Bank – शिक्षण क्षेत्रातील धोरण व संशोधन

# उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह आणि स्त्री सक्षमीकरण :मराठी साहित्याच्या संदर्भात

**मयुरी दिनकरराव जाधव**
संशोधक विद्यार्थी ,जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर

**प्रस्तावना**

२१व्या शतकात उच्च शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होताना दिसतात. जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, संशोधनाभिमुख शिक्षण आणि बहुविषयक अभ्यासक्रम या घटकांमुळे शिक्षणव्यवस्थेचे स्वरूप बदलले आहे. शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळवणे किंवा नोकरी मिळवणे इतकाच मर्यादित राहिलेला नसून व्यक्तिमत्त्व विकास, विचारस्वातंत्र्य, संशोधनवृत्ती, सामाजिक जाणीव आणि स्वावलंबन यांचा विकास करणे हा शिक्षणाचा व्यापक उद्देश बनला आहे.

या बदलांचा स्त्रियांच्या जीवनावर विशेष परिणाम झाला आहे. पूर्वी स्त्रियांना उच्च शिक्षणाच्या संधी मर्यादित प्रमाणात उपलब्ध होत्या. त्यामुळे त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि वैचारिक सक्षमीकरण मर्यादित राहिले होते. परंतु आधुनिक काळात उच्च शिक्षणाच्या संधी वाढल्यामुळे स्त्रिया विविध क्षेत्रांमध्ये आपले स्थान निर्माण करताना दिसतात.

मराठी साहित्यामध्ये या सामाजिक आणि शैक्षणिक बदलांचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसते. मराठी कादंबऱ्यांमध्ये शिक्षणामुळे बदलणारी स्त्री, तिचे आत्मभान, स्वावलंबन, संघर्ष आणि सामाजिक जाणीव यांचे प्रभावी चित्रण दिसून येते. त्यामुळे उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह आणि स्त्री सक्षमीकरण यांचा अभ्यास मराठी साहित्याच्या संदर्भात करणे महत्त्वाचे ठरते.

**उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह**

अलीकडच्या काळात उच्च शिक्षण क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, संशोधन पद्धती आणि मूल्यमापन पद्धती या सर्व क्षेत्रांत बदल दिसून येतात.

आजच्या शिक्षणव्यवस्थेत बहुविषयक शिक्षणाला महत्त्व दिले जाते. विज्ञान, सामाजिक शास्त्रे, साहित्य, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या विविध शाखांमधील परस्परसंबंध लक्षात घेऊन नवीन अभ्यासक्रम तयार केले जात आहेत. तसेच डिजिटल तंत्रज्ञानामुळे शिक्षण अधिक सुलभ झाले आहे. ऑनलाइन शिक्षण, ई-लर्निंग, आभासी वर्ग, डिजिटल ग्रंथालये आणि संशोधन डेटाबेस यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या अधिक संधी उपलब्ध झाल्या आहेत.

उच्च शिक्षणात संशोधनाला विशेष महत्त्व दिले जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक दृष्टी, विश्लेषण क्षमता आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित करण्यावर भर दिला जात आहे. या सर्व बदलांचा स्त्रियांच्या शिक्षणावर सकारात्मक परिणाम झाला आहे. अनेक स्त्रिया उच्च शिक्षण घेऊन संशोधन, अध्यापन, प्रशासन, उद्योग, साहित्य आणि सामाजिक कार्य या क्षेत्रांत कार्यरत आहेत.

**स्त्री शिक्षण आणि स्त्री सक्षमीकरण**

स्त्री सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणामुळे स्त्रीमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, ती स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक होते आणि समाजातील अन्यायकारक परंपरांना प्रश्न विचारू लागते.

शिक्षणामुळे स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनते. आर्थिक स्वावलंबनामुळे तिचा सामाजिक दर्जा उंचावतो आणि कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग वाढतो. शिक्षित स्त्री आपल्या मुलांच्या शिक्षणाबद्दल जागरूक असते, आरोग्याबद्दल सजग असते आणि सामाजिक समस्यांविषयी संवेदनशील असते. त्यामुळे स्त्री शिक्षणाचा परिणाम केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण कुटुंब आणि समाजावर होतो.

मराठी साहित्यामध्येही शिक्षणामुळे बदलणाऱ्या स्त्रीचे चित्रण प्रभावीपणे केलेले दिसते. अनेक कादंबऱ्यांमध्ये शिक्षणामुळे स्त्रीचे व्यक्तिमत्त्व कसे घडते, ती कशी स्वावलंबी बनते आणि सामाजिक परिवर्तनाची वाहक कशी बनते हे दाखवले आहे.

**मराठी साहित्यामधील स्त्री सक्षमीकरणाचे चित्रण**

मराठी कादंबऱ्यांमध्ये स्त्री प्रतिमा अधिक जागरूक, स्वाभिमानी आणि संघर्षशील स्वरूपात दिसते. आधुनिक मराठी साहित्यातील स्त्री ही पारंपरिक चौकटीत अडकलेली नसून शिक्षण, नोकरी, स्वातंत्र्य आणि स्वाभिमान यांचा शोध घेणारी स्त्री म्हणून चित्रित केलेली दिसते. अनेक कादंबऱ्यांमध्ये स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसते. काही साहित्यकृतींमध्ये स्त्रीच्या मानसिक संघर्षाचे, आत्मभानाचे, स्वाभिमानाचे आणि सामाजिक जाणीवेचे प्रभावी चित्रण केलेले दिसते.

शिक्षणामुळे स्त्रीमध्ये निर्णयक्षमता, आत्मविश्वास आणि स्वातंत्र्याची जाणीव निर्माण होते, असे साहित्यामधून दिसून येते. मराठी कादंबऱ्यांतील स्त्री ही अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी, स्वतःच्या हक्कांसाठी लढणारी आणि समाजातील बदलांची वाहक म्हणूनही दिसते. या साहित्यकृतींमधून स्त्री सक्षमीकरण ही केवळ आर्थिक किंवा सामाजिक प्रक्रिया नसून मानसिक, वैचारिक, सांस्कृतिक आणि मानवी मूल्यांशी संबंधित प्रक्रिया आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे मराठी साहित्य हे स्त्री सक्षमीकरणाचे वास्तव आणि प्रभावी चित्रण करणारे साहित्य आहे असे म्हणता येईल.

**अनुभव, शिक्षण आणि स्त्रीचे व्यक्तिमत्त्व विकास**

उच्च शिक्षणामुळे स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून येतात. शिक्षणामुळे स्त्रीमध्ये विश्लेषण क्षमता, चिकित्सक दृष्टी, संशोधनवृत्ती आणि सामाजिक जाणीव विकसित होते. त्यामुळे तिच्या विचारसरणीत व्यापकता आणि प्रगल्भता निर्माण होते. शिक्षणामुळे स्त्रीमध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान आणि निर्णयक्षमता वाढते. ती स्वतःच्या आयुष्याविषयी स्वतंत्र निर्णय घेण्यास सक्षम होते.

मराठी साहित्यामध्ये स्त्रीचे अनुभव, तिचे शिक्षण, तिचे संघर्ष आणि तिचे आत्मभान यांमधून तिच्या व्यक्तिमत्त्व विकासाची प्रक्रिया प्रभावीपणे दाखवलेली दिसते. अनेक कादंबऱ्यांमध्ये शिक्षणामुळे स्त्री पारंपरिक विचारसरणीतून बाहेर पडताना आणि आधुनिक विचार स्वीकारताना दिसते. शिक्षणामुळे स्त्री समाजातील अन्याय, विषमता, अंधश्रद्धा आणि स्त्रीदमन यांविरुद्ध आवाज उठवते. ती स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक होते आणि समाजामध्ये स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे शिक्षण हे स्त्री सक्षमीकरणाचे आणि स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन ठरते.

**स्त्रीसक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तन**

स्त्री सक्षमीकरण ही केवळ वैयक्तिक प्रगतीची प्रक्रिया नसून सामाजिक परिवर्तनाची व्यापक प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे स्त्रीमध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान आणि सामाजिक जाणीव निर्माण होते, त्यामुळे ती समाजातील बदलांची वाहक बनते. शिक्षित स्त्री शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता आणि सांस्कृतिक मूल्ये यांविषयी समाजात जागरूकता निर्माण करते. त्यामुळे स्त्री सक्षमीकरणामुळे संपूर्ण समाजाच्या विचारसरणीत बदल घडून येतो.

मराठी साहित्यामध्ये स्त्री ही समाजपरिवर्तनाची वाहक म्हणून चित्रित केलेली दिसते. अनेक कादंबऱ्यांमध्ये स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःमध्ये बदल घडवून आणते आणि त्याचबरोबर समाजामध्येही परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करते. ती परंपरेचा अंध स्वीकार करत नाही; मात्र परंपरेतील चांगल्या मूल्यांचा स्वीकार करून अन्यायकारक परंपरांना प्रश्न विचारते. त्यामुळे स्त्री सक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तन यांचा घनिष्ठ संबंध दिसून येतो.

**जागतिकीकरण आणि स्त्रियांच्या उच्च शिक्षणाच्या संधी**

जागतिकीकरणामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये मोठे बदल झाले आहेत. शिक्षणाची व्याप्ती स्थानिक पातळीवरून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत वाढली आहे. परदेशी विद्यापीठांशी शैक्षणिक करार, विद्यार्थी विनिमय योजना, ऑनलाइन अभ्यासक्रम, आंतरराष्ट्रीय परिषद, संशोधन प्रकल्प आणि शिष्यवृत्ती यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना, विशेषतः स्त्रियांना उच्च शिक्षणाच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. पूर्वी स्त्रियांना कुटुंब, समाज आणि आर्थिक मर्यादा यांमुळे शिक्षणासाठी दूर जाणे कठीण होते; परंतु आज जागतिकीकरणामुळे शिक्षणाच्या संधी अधिक खुल्या झाल्या आहेत.

मराठी साहित्यामध्येही जागतिकीकरणामुळे बदलणारी स्त्री दिसून येते. आधुनिक मराठी कादंबऱ्यांमध्ये शिक्षणासाठी शहरात किंवा परदेशात जाणारी, करिअर करणारी, स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारी स्त्री व्यक्तिरेखा दिसून येते. ही स्त्री पारंपरिक चौकटीत अडकलेली नसून आधुनिक विचारांची, शिक्षित, स्वावलंबी आणि आत्मविश्वासपूर्ण आहे. त्यामुळे जागतिकीकरणामुळे स्त्रियांच्या उच्च शिक्षणाच्या संधी वाढल्या असून त्यातून स्त्री सक्षमीकरणाची प्रक्रिया अधिक वेगाने घडताना दिसते.

**तंत्रज्ञान आणि डिजिटल शिक्षणाचा स्त्री शिक्षणावर परिणाम**

तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी क्रांती झाली आहे. इंटरनेट, संगणक, स्मार्टफोन, ऑनलाइन शिक्षण, डिजिटल लायब्ररी, ई-बुक्स, वेबिनार, व्हर्च्युअल क्लासरूम, ऑनलाइन परीक्षा या माध्यमांमुळे शिक्षण अधिक सुलभ, स्वस्त आणि सर्वांसाठी उपलब्ध झाले आहे. तंत्रज्ञानामुळे शिक्षणाची पारंपरिक चौकट मोडून शिक्षण अधिक लवचिक आणि सर्वसमावेशक बनले आहे.

तंत्रज्ञानामुळे स्त्रियांमध्ये नवीन कौशल्ये विकसित झाली आहेत. संगणक वापर, इंटरनेट वापर, ऑनलाइन संशोधन, डिजिटल लेखन, ऑनलाइन सादरीकरण या कौशल्यांमुळे स्त्रिया अधिक सक्षम बनत आहेत. समकालीन मराठी साहित्यामध्येही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारी, ऑनलाइन शिक्षण घेणारी आणि आधुनिक जगाशी जुळवून घेणारी स्त्री व्यक्तिरेखा दिसून येते. त्यामुळे तंत्रज्ञान आणि डिजिटल शिक्षण हे स्त्री सक्षमीकरणाचे महत्त्वाचे साधन ठरले आहे.

**उच्च शिक्षण आणि स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन**

उच्च शिक्षणामुळे स्त्रियांना विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शिक्षण घेतलेली स्त्री शिक्षक, प्राध्यापक, अधिकारी, संशोधक, लेखिका, पत्रकार, बँक कर्मचारी, प्रशासकीय अधिकारी, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. त्यामुळे स्त्री केवळ घरापुरती मर्यादित न राहता समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे.

आर्थिक स्वावलंबनामुळे स्त्रीचा कुटुंबातील आणि समाजातील दर्जा उंचावला आहे. पूर्वी स्त्री आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून होती; त्यामुळे तिच्या निर्णयस्वातंत्र्यावर मर्यादा होत्या. परंतु शिक्षण आणि नोकरीमुळे स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम बनली आहे. ती कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होते, स्वतःचे निर्णय स्वतः घेते आणि आत्मविश्वासाने जीवन जगते.

मराठी कादंबऱ्यांमध्येही शिक्षण घेऊन नोकरी करणारी, स्वतःचे आयुष्य स्वतः घडवणारी आणि संकटांना सामोरे जाणारी स्त्री व्यक्तिरेखा मोठ्या प्रमाणात दिसून येते. काही कादंबऱ्यांमध्ये स्त्री कुटुंबाचा आर्थिक आधार बनलेली दिसते. त्यामुळे उच्च शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन यांचा स्त्री सक्षमीकरणाशी घनिष्ठ संबंध आहे असे म्हणता येईल.

**निष्कर्ष**

उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह आणि स्त्री सक्षमीकरण यांचा परस्परसंबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. उच्च शिक्षणामुळे स्त्रीमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन, निर्णयक्षमता, चिकित्सक दृष्टी आणि सामाजिक जाणीव विकसित होते. शिक्षणामुळे स्त्री केवळ ज्ञान प्राप्त करत नाही, तर स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करते. आधुनिक काळात उच्च शिक्षणामुळे स्त्रिया विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असून त्यांनी समाजामध्ये स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

मराठी साहित्यामध्ये शिक्षणामुळे बदलणारी स्त्री, तिचे आत्मभान, तिचे संघर्ष, तिचा स्वाभिमान आणि तिचे कर्तृत्व यांचे प्रभावी चित्रण दिसते. या साहित्यामधील स्त्री केवळ कुटुंबापुरती मर्यादित न राहता समाजपरिवर्तनाची वाहक म्हणून उभी राहते. ती अन्यायकारक परंपरांना प्रश्न विचारते आणि स्वतःच्या हक्कांसाठी संघर्ष करते. त्यामुळे स्त्री सक्षमीकरण ही केवळ वैयक्तिक प्रगतीची प्रक्रिया नसून सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे हे स्पष्ट होते.

एकूणच, उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह स्त्री सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरत असून मराठी साहित्यामध्ये या प्रक्रियेचे वास्तववादी आणि प्रभावी चित्रण दिसून येते. त्यामुळे उच्च शिक्षण, स्त्री सक्षमीकरण आणि मराठी साहित्य यांचा परस्परसंबंध अभ्यासणे आवश्यक आणि महत्त्वपूर्ण ठरते.

**संदर्भसूची**

१) गंगणे, वर्षा – *स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव*, ऋचा प्रकाशन, नागपूर, २०१५
२) पारू मदन नाईक – *मोहिनी*, मेहता प्रकाशन गृह, पुणे, २००७
३) कविता लक्ष्मीकांत हडवळे – *कस्तुरी*, चेतक प्रकाशन, पुणे, २०२५
४) रेखा बैजल – *न संपणारी रेघ*, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०२०
५) मंगला कुलकर्णी – *अजूनही सीता जळते आहे*, नीता बुक एजन्सी, पुणे, २०२५
६) रमेश नारायण – *सुबला*, शारदा प्रकाशन, २०२३
७) श्रुती वडगबाळकर – *घे भरारी आकाशी*, स्वरूपदीप प्रकाशन, सोलापूर, २०२४

# मनुस्मृतीच्या काळातील शिक्षण व्यवस्था आणि आधुनिक शिक्षण व्यवस्था : एक ऐतिहासिक अभ्यास

**Diksha Sanjayrao Gadling**
M.A. History ,IV (Fourth Semester)
मार्गदर्शक
**Sontekke Sir**
Y.D.V.D. Arts, Commerce & Science College, Teosa, Dist. Amravati

**प्रस्तावना:-** शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे आणि सांस्कृतिक विकासाचे महत्त्वाचे साधन मानले जाते. प्राचीन भारतात शिक्षण व्यवस्था धार्मिक व सामाजिक परंपरांशी जोडलेली होती. त्या काळात गुरुकुल पद्धती ही शिक्षणाची मुख्य प्रणाली होती. गुरुकुलामध्ये विद्यार्थी गुरुच्या आश्रमात राहून विविध विषयांचे शिक्षण घेत असत.
मनुस्मृती हा प्राचीन भारतीय धर्मशास्त्रीय ग्रंथ मानला जातो ज्यामध्ये समाजव्यवस्था, धर्म आणि आचारसंहिता यांचे वर्णन केलेले आहे. या ग्रंथामध्ये शिक्षणासंबंधी काही नियम आणि सामाजिक मर्यादा देखील नमूद केल्या आहेत. त्या काळातील शिक्षण व्यवस्था समाजातील विशिष्ट वर्गापुरती मर्यादित होती.
प्राचीन शिक्षण व्यवस्थेमध्येस्त्रियांनाशिक्षणाचीसंधी अत्यंत मर्यादित होती.
त्यामुळे या संशोधनातस्त्रीवादी दृष्टिकोनातून शिक्षण व्यवस्थेचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.
आधुनिक काळात शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झाले आहे. आधुनिक शिक्षण प्रणालीमध्ये समानता, सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशकता यांना विशेष महत्त्व दिले जाते. त्यामुळे प्राचीन शिक्षण पद्धती आणि आधुनिक शिक्षण व्यवस्था यांची तुलना करणे आवश्यक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

- मनुस्मृतीच्या काळातील शिक्षण व्यवस्थेचाअभ्यास–

"मनुस्मृतीच्या काळातील शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करणे" याचा अर्थ असा की प्राचीन भारतीय समाजात मनुस्मृतीच्या काळात अस्तित्वात असलेल्या शिक्षण पद्धती, नियम आणि रचना समजून घेणे. त्या काळातील गुरुकुल शिक्षण पद्धती, शिक्षणाचे उद्दिष्ट, शिक्षक-विद्यार्थी संबंध आणि समाजातील विविध घटकांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या संधी यांचा अभ्यास करणे. तसेच त्या शिक्षण व्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि मर्यादा समजून घेणे हाही या अभ्यासाचा भाग आहे.

- प्राचीन गुरुकुल शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये समजून घेणे-

"प्राचीन गुरुकुल शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये समजून घेणे" याचा अर्थ असा की प्राचीन भारतातील गुरुकुल शिक्षण प्रणालीची रचना आणि महत्त्वपूर्ण गुणधर्मांचा अभ्यास करणे. गुरुकुलामध्ये विद्यार्थी गुरुच्या आश्रमात राहून शिक्षण घेत असत आणि शिक्षक-विद्यार्थी यांच्यात जवळचा व आदरपूर्ण संबंध असायचा. या शिक्षण पद्धतीमध्ये नैतिक मूल्ये, शिस्त, आत्मसंयम आणि जीवन कौशल्यांना विशेष महत्त्व दिले जात असे. तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा गुरुकुल शिक्षणाचा मुख्य उद्देश होता.

- आधुनिक शिक्षण व्यवस्थेमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास-

"आधुनिक शिक्षण व्यवस्थेमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास करणे" याचा अर्थ असा की आधुनिक काळात शिक्षण प्रणालीमध्ये झालेल्या विविध बदलांचे आणि विकासाचे विश्लेषण करणे. पूर्वीच्या पारंपरिक शिक्षण पद्धतीच्या तुलनेत आज शिक्षण अधिक सर्वसमावेशक, तंत्रज्ञानाधारित आणि संशोधनकेंद्रित झाले आहे. आधुनिक शिक्षणामध्ये समान शिक्षण संधी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कौशल्य विकासाला विशेष महत्त्व दिले जाते. तसेच डिजिटल शिक्षण, ऑनलाइन शिक्षण आणि नवीन शैक्षणिक धोरणांमुळे शिक्षण क्षेत्रात मोठे परिवर्तन झाले आहे.

- प्राचीन आणि आधुनिक शिक्षण व्यवस्थेची तुलना-

"प्राचीन आणि आधुनिक शिक्षण व्यवस्थेची तुलना करणे" याचा अर्थ असा की प्राचीन काळातील शिक्षण पद्धती आणि आजच्या आधुनिक शिक्षण प्रणालीमधील फरक आणि साम्य यांचा अभ्यास करणे. प्राचीन काळात गुरुकुल पद्धतीवर आधारित शिक्षण दिले जात असे, ज्यामध्ये नैतिक मूल्ये आणि शिस्त यावर भर दिला जात होता. आधुनिक काळात शिक्षण अधिक वैज्ञानिक, तांत्रिक आणि सर्वसमावेशक झाले आहे. या दोन्ही शिक्षण पद्धतींचे वैशिष्ट्ये, उद्दिष्टे आणि परिणाम यांची तुलना करून शिक्षण व्यवस्थेतील झालेला विकास समजून घेणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे.

**संशोधन पद्धती:**-या संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. या पद्धतीद्वारे प्राचीन काळातील शिक्षण व्यवस्था आणि आधुनिक शिक्षणातील बदल यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. संशोधन करताना विविध ऐतिहासिक ग्रंथ, शैक्षणिक पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके तसेच शैक्षणिक अहवाल यांचा आधार घेण्यात आला आहे. या सर्व दुय्यम स्रोतांमधील माहितीचे विश्लेषण करून प्राचीन आणि आधुनिक शिक्षण व्यवस्थेतील वैशिष्ट्ये व बदल समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**मनुस्मृतीच्या काळातील शिक्षण व्यवस्था:**-प्राचीन भारतात शिक्षण व्यवस्था मुख्यत:गुरुकुल पद्धतीवर आधारित होती. गुरुकुलामध्ये विद्यार्थी गुरुच्या आश्रमात राहून शिक्षण घेत असत. या शिक्षण व्यवस्थेत शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संबंध अत्यंत महत्त्वाचे मानले जात.
गुरुकुल शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना धर्म, तत्त्वज्ञान, व्याकरण, गणित, आयुर्वेद आणि खगोलशास्त्र यांसारख्या विषयांचे ज्ञान दिले जात होते. शिक्षणाचा उद्देश केवळ ज्ञानप्राप्ती नसून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये आणि सामाजिक कर्तव्यांची जाणीव निर्माण करणे हा होता.
तथापि त्या काळातील शिक्षण व्यवस्था समाजातील सर्व घटकांसाठी समान नव्हती. समाजातील काही वर्गांना शिक्षणाची संधी मर्यादित स्वरूपात मिळत होती. त्यामुळे शिक्षणातील समानतेचा अभाव दिसून येतो.
**गुरुकुल शिक्षण पद्धतीचीवैशिष्ट्ये:-**
प्राचीन भारतीय गुरुकुल शिक्षण पद्धतीचीकाही प्रमुख वैशिष्ट्येपुढीलप्रमाणे होती:
1. शिक्षक आणिविद्यार्थ्यांमधील घनिष्ठ संबंध
गुरुकुल शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी गुरुच्याआश्रमातराहून शिक्षण घेतअसत. त्यामुळे गुरु आणि शिष्य यांच्यातजवळचा, आदरपूर्ण आणिविश्वासाचा संबंध निर्माण होतअसे. गुरु केवळ शिक्षक नसूनविद्यार्थ्यांचे मार्गदर्शक आणि संस्कार देणारेव्यक्तिमत्त्वमानले जात.
2. नैतिक व आध्यात्मिक शिक्षणावर भर
गुरुकुल शिक्षणामध्येकेवळ ज्ञान देण्यावर भर नसून नैतिक मूल्ये, सत्य, प्रामाणिकपणा, संयम आणि धर्म यांचे शिक्षण दिले जात असे. विद्यार्थ्यांच्याचारित्र्यविकासाला विशेष महत्त्वदिले जात होते.
3. जीवन कौशल्यांचे शिक्षण
विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारी विविध कौशल्येशिकवली जात. स्वावलंबन, शिस्त, जबाबदारीआणिसमाजातीलकर्तव्येयांचीजाणीवकरून दिली जात असे.
4. नैसर्गिक वातावरणात शिक्षण
गुरुकुल बहुतेकवेळा जंगल किंवा शांत नैसर्गिक परिसरातअसत. त्यामुळेविद्यार्थ्यांना शांत वातावरणात अभ्यास करता येतअसेआणिनिसर्गाशीजवळीकसाधून शिक्षण घेतायेतअसे.

**स्त्रीवादीदृष्टिकोनातून शिक्षण व्यवस्थेचे विश्लेषण :-**
मनुस्मृतीच्याकाळातील शिक्षण व्यवस्था ही स्पष्टपणेपितृसत्ताकस्वरूपाची होती. या व्यवस्थेमध्ये सामाजिक रचना आणिशिक्षणाचीसंधी ही मुख्यतः पुरुषप्रधान होती. स्त्रियांना औपचारिक शिक्षणाचीसंधी अत्यंत मर्यादित स्वरूपात उपलब्ध होती, ज्यामुळेत्याज्ञानप्राप्तीपासून वंचित राहिल्या. शिक्षण हे केवळपुरुषांसाठी केंद्रित असल्यामुळेसमाजातील बौद्धिक, सांस्कृतिक आणि आर्थिक सत्ता प्रामुख्यानेपुरुषांकडेचकेंद्रीत झाली.
मनुस्मृतीमध्येस्त्रियांच्याभूमिकेचे वर्णन प्रामुख्यानेघरगुतीआणिकुटुंबकेंद्रितस्वरूपातकरण्यातआलेआहे. स्त्रियांनी घर सांभाळणे, कुटुंबाची देखभाल करणेआणि सामाजिक नियमांचे पालन करणेहेचत्यांचे मुख्य कर्तव्य मानलेगेले. परिणामी, त्यांना स्वतंत्र विचार, बौद्धिक विकास आणि सामाजिक सहभागयांसाठी आवश्यक असलेल्याशिक्षणापासून दूर ठेवण्यातआले. या प्रक्रियेमुळेसमाजामध्येलिंगभेद (gender inequality) आणि स्त्री-पुरुष असमानता अधिक दृढ झाली.
स्त्रीवादीदृष्टिकोनातूनपाहिल्यास, ही शिक्षण व्यवस्था केवळ ज्ञान वितरणाची प्रणाली नव्हती, तर ती सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणूनही कार्यरत होती. शिक्षणाच्या मर्यादित प्रवेशामुळेस्त्रियांनात्यांच्याहक्कांबद्दल जागरूक होण्याचीसंधीमिळालीनाही. त्यामुळेसमाजातीलसत्ताकेंद्रेआणिनिर्णयप्रक्रिया या पूर्णपणेपुरुषांच्यानियंत्रणाखालीराहिल्या.
याच्या विपरीत, आधुनिक शिक्षण व्यवस्थेमध्ये स्त्री-पुरुष समानतेवर विशेष भर दिला जातो. आजच्याकाळात शिक्षण हे सर्वांसाठी मूलभूत अधिकार मानले जाते. मुलींनाशिक्षणासाठी समान संधी उपलब्ध करूनदेण्यासाठी विविध शासकीय योजना आणि सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. सावित्रीबाईफुलेयांसारख्यासमाजसुधारकांनी स्त्री

शिक्षणाच्याक्षेत्रातकेलेले कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेआहे, ज्यामुळेस्त्रियांनाशिक्षणाच्या मुख्य प्रवाहातआणण्यासमदत झाली.

आधुनिक शिक्षण व्यवस्थेमुळेस्त्रियाकेवळ शिक्षित होतनाहीत, तर त्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्येही सक्रिय सहभागघेतआहेत. त्यामुळेसमाजामध्ये लिंग समानता प्रस्थापित होण्यासमोठीमदतहोतआहे. अशाप्रकारे, स्त्रीवादीदृष्टिकोनातूनपाहता प्राचीन शिक्षण व्यवस्था ही असमानतेवर आधारित होती, तर आधुनिक शिक्षण व्यवस्था ही समता, न्याय आणिसर्वसमावेशकतेच्यातत्त्वांवर आधारित आहे.

## आधुनिक शिक्षण व्यवस्था

आधुनिक काळातील शिक्षण व्यवस्था ही प्राचीन शिक्षण पद्धतीपेक्षा अधिक व्यापक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित आहे. आज शिक्षण सर्व समाजघटकांसाठी खुले झाले आहे. आधुनिक शिक्षण प्रणालीमध्ये समानता, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांना विशेष महत्त्व दिले जाते.

आज शिक्षणामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्र, कला आणि व्यवस्थापन अशा विविध विषयांचा समावेश करण्यात आला आहे. आधुनिक शिक्षणामध्ये संशोधन, नवकल्पना आणि कौशल्य विकास यांना विशेष महत्त्व दिले जाते.

तसेच आधुनिक शिक्षणामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल वर्ग आणि ई-लर्निंग साधनांमुळे शिक्षण अधिक सुलभ आणि व्यापक झाले आहे.

1. लिंग समानता आणि स्त्री शिक्षणाचा विकास

आधुनिक शिक्षण व्यवस्थेमध्ये लिंग समानतेला अत्यंत महत्त्व दिले जाते. प्राचीन काळात स्त्रियांना शिक्षणाची संधी मर्यादित होती, परंतु आज शिक्षण हे प्रत्येकासाठी मूलभूत अधिकार मानले जाते. मुलींना शिक्षणासाठी समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध शासकीय योजना आणि सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. "बेटी बचाओ, बेटी पढाओ" सारख्या उपक्रमांमुळे स्त्री शिक्षणाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली आहे.

सावित्रीबाई फुले यांसारख्या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य आधुनिक शिक्षण व्यवस्थेचा पाया मानला जातो. आज स्त्रिया शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन आणि व्यवसाय अशा विविध क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. त्यामुळे समाजामध्ये लिंग समानता प्रस्थापित होण्यास मोठी मदत होत आहे

2. तंत्रज्ञानाधारित आणि डिजिटल शिक्षण प्रणाली

आधुनिक शिक्षण व्यवस्थेमध्ये तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. डिजिटल शिक्षण, ऑनलाइन वर्ग, ई-लर्निंगप्लॅटफॉर्म आणि स्मार्टक्लासरूमयांमुळे शिक्षण अधिक सुलभ आणि व्यापक झाले आहे. इंटरनेटच्या मदतीने विद्यार्थ्यांना जगभरातील ज्ञान सहज उपलब्ध होत आहे.

कोविड-१९ नंतर ऑनलाइन शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. व्हर्च्युअलक्लासेस, व्हिडिओलेक्चर्स आणि डिजिटल साधनांमुळे शिक्षणाची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली आहे.

3. सर्वसमावेशक आणि कौशल्याधारित शिक्षण प्रणाली

आधुनिक शिक्षण व्यवस्था ही सर्वसमावेशक (inclusive) आणि कौशल्याधारित (skill-based) स्वरूपाची आहे. शिक्षणामध्ये केवळ सैद्धांतिक ज्ञानावर भर न देता व्यावहारिक कौशल्ये, नवकल्पना आणि संशोधन यांना महत्त्व दिले जाते. आज शिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020नुसार, शिक्षणामध्ये लवचिकता, बहुविषयक अभ्यास आणि कौशल्य विकास यांना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थी केवळ परीक्षांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रगती करू शकतात. यामुळे रोजगाराच्या संधी वाढतात आणि समाजाचा आर्थिक विकास साधला जातो.

**निष्कर्ष:-**

मनुस्मृतीच्या काळातील शिक्षण व्यवस्था प्राचीन भारतीय समाजाच्या धार्मिक व सामाजिक परंपरांवर आधारित होती. त्या शिक्षण व्यवस्थेमध्ये गुरुकुल पद्धतीला महत्त्व होते, परंतु समाजातील सर्व घटकांसाठी शिक्षण समान उपलब्ध नव्हते. आधुनिक काळात शिक्षण व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झाले आहे. आज शिक्षण सर्वांसाठी खुले असून समानता, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना विशेष महत्त्व दिले जाते.

प्राचीन आणि आधुनिक शिक्षण व्यवस्थेची तुलना केल्यास शिक्षण क्षेत्रामध्ये झालेली प्रगती स्पष्टपणे दिसून येते. आधुनिक शिक्षण व्यवस्था समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरते.

संदर्भ

1. Altekar, A. S. – Education in Ancient India
2. Sharma, R. S. – Ancient Indian Society
3. Government of India – National Education Policy 2020
4. विविध शैक्षणिक संशोधन लेख व अहवाल

# स्वातंत्र्यानंतरभारताच्या उच्च शिक्षणातील शैक्षणिक सुधारणा आणि धोरणात्मक बदलांचा आढावा.

**राम प्रकाश शेळके**
Email ID: ramshelkepatil@gmail.com ,Mobile No: 7038941373
संशोधक विद्यार्थी महात्मा ज्योतिबा फुले वाणिज्य, विज्ञान व विठ्ठलराव राउत कला महाविद्यालय भातकुली, अमरावती

**सारांश:**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर उच्च शिक्षण क्षेत्रात विविध धोरणांद्वारे महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले गेले, ज्यांचा उद्देश शिक्षणाची उपलब्धता, गुणवत्ता आणि राष्ट्रीय विकासाशी सुसंगतता वाढवणे हा होता. राधाकृष्णन आयोग (1948-49) ने विद्यापीठ शिक्षणाचा पाया रचला, कोठारी आयोग (1964-66) ने गुणवत्तेवर आणि विस्तारावर भर दिला, आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण (1968) ने समानता, प्रादेशिक समन्वय आणि विज्ञान-शिक्षणाला चालना दिली. नंतर, उच्च शिक्षण समिती (2009, प्रा. यश पाल) ने प्रवेशाचे मर्यादित दर आणि प्रणालीतील विखंडन यांसारख्या समस्यांवर लक्ष वेधले.

आजच्या काळात, भारताच्या उच्च शिक्षणात "जागतिक स्पर्धात्मकता" महत्त्वाची ठरली असून, पायाभूत सुविधा सुधारणा, सार्वजनिक खर्च वाढ, आणि संशोधन व नवोपक्रम यांवर भर दिला जात आहे. या सुधारणा भारताला जागतिक स्तरावर सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यास मदत करतात.

**कीवर्ड :** भारतीय उच्च शिक्षण, धोरणे, जागतिक स्पर्धात्मकता.

**प्रस्तावना:**

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, देशाच्या शिक्षण व्यवस्थेला मोठ्या सुधारणा आवश्यक होत्या. तेव्हा फक्त १७ विद्यापीठे आणि ६३६ महाविद्यालयांमध्ये २.३८ लाख विद्यार्थी शिकत होते, साक्षरता फक्त १४% होती आणि शिक्षणावर खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०.५% पेक्षा कमी होता. डॉ. राधाकृष्णन आणि इतर तज्ज्ञांच्या दृष्टीने, शिक्षणाची विस्तारसह गुणवत्ता सुधारून भारताचा सांस्कृतिक वारसा जतन करणारी आणि जागतिक मागण्यांसोबत सुसंगत अशी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक होते.

स्वातंत्र्यानंतर भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्राला आकार देण्यासाठी स्थापन झालेल्या प्रमुख आयोगांनी आणि धोरणांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९४८-४९ मध्ये 'विद्यापीठ शिक्षण आयोग' आणि १९६४-६६ मध्ये 'कोठारी आयोग' यांनी गुणवत्ता, सुलभता आणि प्रासंगिकता सुधारण्यावर लक्ष दिले, ज्यातून १९६८ मध्ये 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' तयार झाले. यामध्ये राष्ट्रीय एकात्मता, समान शैक्षणिक संधी आणि विज्ञान-शोधनावर भर देण्यात आला.आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या काळात भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडले. १९८६ आणि २००५ मधील धोरणांनी गुणवत्ता, सुलभता आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढवण्यावर भर दिला, तर २०२० चे NEP उच्च शिक्षण अधिक लवचिक, सर्वसमावेशक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्याचे उद्दिष्ट ठेवते.

एकूणच, या अभ्यासात भारताच्या उच्च शिक्षण धोरणांची उत्क्रांती, आव्हाने आणि "ज्ञान-अर्थव्यवस्था"साठी जागतिक स्पर्धात्मकता वाढवण्याच्या दिशेने आवश्यक सुधारणा अधोरेखित केल्या आहेत.

**संशोधन अभ्यासाचा उद्देश:**

- १९४७ पासून भारतातील उच्च शिक्षणाच्या विकासाचे परीक्षण करणे.
- उच्च शिक्षणावर परिणाम करणाऱ्या प्रमुख शैक्षणिक धोरणांचा आणि सुधारणांचा आढावा घेणे.
- विद्यापीठांचा विस्तार आणि विद्यार्थ्यांच्या प्रवेशसंख्येचे विश्लेषण करणे.
- उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रमुख यश आणि आव्हाने ओळखणे.

**साहित्याचा आढावा:**

स्वातंत्र्यानंतर भारताच्या उच्च शिक्षणात महत्त्वपूर्ण बदल झाले. प्रारंभी, कोठारी आयोग ने संतुलित शिक्षण व्यवस्था, संशोधन व तंत्रज्ञानावर भर दिला, परंतु अपुरा निधी आणि कालबाह्य पद्धतींमुळे जागतिक स्तरावर स्पर्धा मर्यादित राहिली. **राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८** ने उपेक्षित समुदायांसाठी उपलब्धता वाढवली, पण गुणवत्ता आणि संशोधन सुधारण्यात मर्यादित यश मिळाले.

उदारीकरणानंतर, **राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६** ने उच्च शिक्षणाचे आधुनिकीकरण केले आणि खाजगी संस्थांचा सहभाग वाढला; मात्र सामाजिक-आर्थिक विषमता निर्माण झाली. २००५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय ज्ञान आयोग ने

संशोधन, प्राध्यापक विकास आणि जागतिक सहकार्य यावर लक्ष दिले, तरीही निधी आणि आराखड्याच्या मर्यादांमुळे पूर्ण परिणाम मिळाले नाही. त्या नंतर आधुनिक काळात, **राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०** बहुविद्याशाखीय, समावेशक आणि डिजिटल शिक्षणावर भर देत, संशोधन, नाविन्य व जागतिक भागीदारी सुधारण्याचे उद्दिष्ट ठेवते. तरीही, प्रादेशिक विषमता, संशोधन निष्पत्ती आणि प्राध्यापक गुणवत्तेत सुधारणा आवश्यक आहे.**Sengupta (2015)**यांनी अधोरेखित केले की या धोरणामुळे उच्च शिक्षणाचा विस्तार होण्यास मदत झाली असली तरी, गुणवत्ता आणि संशोधनाच्या संरचनात्मक समस्यांचे निराकरण करण्यात ते अपयशी ठरले, ज्यामुळे भारतातील विद्यापीठांना जागतिक विद्यापीठांशी स्पर्धा करण्यास अडथळा निर्माण झाला.**Chakrabarti (2021)**यांच्या मते, जागतिक स्तरावर आपली स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी भारतीय संस्थांनी संशोधन निधीत वाढ करणे, अध्यापन पद्धतींमध्ये सुधारणा करणे आणि जागतिक सहयोगांना चालना देणे या बाबींवर लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक आहे. शिवाय, **Rathore (2019)**असे सुचवतात की, भारतीय संस्था जागतिक शैक्षणिक प्रवाहांच्या बरोबरीने वाटचाल करू शकतील याची खात्री करण्यासाठी, प्राध्यापक विकास आणि आंतरविद्याशाखीय संशोधनामध्ये अधिक गुंतवणूक करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

थोडक्यात, भारताने प्रवेश विस्तारला आणि काही सुधारणा केल्या, परंतु जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उच्च शिक्षणासाठी संशोधन, प्राध्यापक विकास आणि जागतिक सहकार्य या क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा आवश्यक आहेत.

**संशोधन पध्दती**:

हे संशोधन भारताच्या उच्च शिक्षण धोरणांच्या उत्क्रांती, बदल आणि जागतिक स्पर्धात्मकतेवरील परिणामाचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम डेटावर आधारित गुणात्मक पद्धत वापरते. कोठारी आयोग, राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८, राष्ट्रीय ज्ञान आयोग आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० या धोरणांचा विश्लेषण करण्यात आला आहे.

गुणात्मक व तुलनात्मक विश्लेषणाद्वारे धोरणांची तरतूद, अंमलबजावणीतील आव्हाने, संशोधन उत्पादन, प्राध्यापक विकास आणि तांत्रिक एकात्मतेतील अंतर यांचा आढावा घेतला गेला आहे.मर्यादांमध्ये दुय्यम डेटावर अवलंबित्व आणि प्राथमिक माहितीचा अभाव यांचा समावेश आहे. निष्कर्षांमध्ये संशोधन निधी, प्राध्यापक गुणवत्ता, जागतिक सहकार्य आणि शिक्षणाची सर्वसमावेशक उपलब्धता सुधारण्यासाठी शिफारसी दिल्या आहेत.

**१. स्वातंत्र्योत्तर काळातील पायाभूत टप्पा (1947-1985)**

स्वातंत्र्यानंतर, भारताने आपली उच्च शिक्षण व्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न केला. याचा उद्देश वसाहतवादी वारशापासून फारकत घेणे आणि देशाच्या विविध व सतत बदलणाऱ्या गरजा पूर्ण करणारी एक व्यवस्था निर्माण करणे हा होता. सुरुवातीचे प्रयत्न शिक्षणाची उपलब्धता वाढवणे, शिक्षणाचा दर्जा सुधारणे आणि राष्ट्रीय एकात्मतेला चालना देणे यावर केंद्रित होते.

**१.१ विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-४९)**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेला 'विद्यापीठ शिक्षण आयोग' (१९४८-४९) ही स्वातंत्र्योत्तर शिक्षण व्यवस्थेतील पहिली महत्त्वपूर्ण सुधारणा होती. या आयोगाने भारतातील विद्यापीठ शिक्षणाचा दर्जा आणि उपलब्धता सुधारण्यासाठी अनेक शिफारसी मांडल्या.

**प्रमुख शिफारसींमध्ये खालील बाबींचा समावेश होता:**

- विद्यापीठांचे केवळ 'संलग्नता देणाऱ्या संस्थां'मधून (affiliating bodies) 'प्रत्यक्ष अध्यापन करणाऱ्या संस्थां'मध्ये रूपांतर करणे.
- कृषी आणि उद्योगावर लक्ष केंद्रित करणारी 'ग्रामीण विद्यापीठे' स्थापन करणे.
- शिक्षणात इंग्रजीसोबतच प्रादेशिक भाषांच्या वापराला प्रोत्साहन देणे.
- वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि कायदा यांसारख्या क्षेत्रांमधील संशोधन आणि व्यावसायिक शिक्षणाचा दर्जा उंचावणे.
- विद्यापीठांमधील प्राध्यापक विकास (faculty development) आणि स्वायत्तता बळकट करणे.

१९५६ मध्ये 'विद्यापीठ अनुदान आयोगाची' (UGC) स्थापना होणे हा या आयोगाच्या शिफारसींचाच थेट परिणाम होता; उच्च शिक्षणाचे समन्वय साधणे आणि त्यासाठी निधी पुरवणे हे या आयोगाचे उद्दिष्ट होते.

**१.२ शिक्षण आयोग (१९६४-६६)**

स्वातंत्र्यानंतर भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात मोठे बदल झाले असून, डॉ. दौलत सिंग कोठारी यांच्या अध्यक्षतेखालील शिक्षण आयोग (1964–66) महत्त्वपूर्ण ठरला. या आयोगाने सर्वसमावेशक, समतावादी आणि विकासाभिमुख शिक्षणव्यवस्थेवर भर दिला, तसेच विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्रांचा समन्वय व संशोधनवृत्ती विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले.

तथापि, आजही जागतिक स्पर्धा, तांत्रिक बदल, गुणवत्तेतील तफावत, पायाभूत सुविधांची कमतरता आणि प्रादेशिक असमानता यांसारखी आव्हाने कायम आहेत. यावर उपाय म्हणून लवचिक आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम, संशोधनातील गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय सहकार्य, उद्योग-शिक्षण दुवे मजबूत करणे आणि पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आवश्यक आहे.

**१.३ राष्ट्रीय शिक्षण धोरण, १९६८**

राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ हे भारताच्या शिक्षण विकासातील महत्त्वाचे पाऊल होते. या धोरणाने शिक्षणाची उपलब्धता वाढवणे, दर्जा सुधारणे, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक न्याय यांना प्रोत्साहन देणे यावर भर दिला. तसेच, व्यावसायिक शिक्षण, नवीन विद्यापीठांची स्थापना आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मदत यांवर लक्ष केंद्रित केले गेले .

मात्र, संशोधन, नाविन्य, आंतरराष्ट्रीयीकरण आणि तांत्रिक कौशल्यांच्या बाबतीत मर्यादा राहिल्या. प्रादेशिक असमानता, कालबाह्य अभ्यासक्रम आणि उद्योग-शिक्षण दुव्यांचा अभावही दिसून आला.या उणिवा दूर करण्यासाठी लवचिक अभ्यासक्रम, संशोधन गुंतवणूक, तंत्रज्ञानाचा वापर, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि पायाभूत सुविधांचा विकास आवश्यक आहे

**२. आर्थिक उदारीकरण आणि विस्ताराचा टप्पा (१९८६-२००५)**

१९८६–२००५ या काळात, विशेषतः भारताचे आर्थिक उदारीकरण १९९१ नंतर, भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात मोठे बदल झाले. उच्च शिक्षणाचा विस्तार, खाजगी क्षेत्राचा वाढता सहभाग आणि IT, व्यवस्थापन व अभियांत्रिकीसारख्या अभ्यासक्रमांची वाढ झाली. Indian Institutes of Management आणि Indian Institutes of Technology यांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. परंतु, संशोधनाची कमतरता, कालबाह्य अभ्यासक्रम, पायाभूत सुविधांची मर्यादा आणि प्रादेशिक व सामाजिक विषमता या समस्या कायम राहिल्या. खाजगीकरणामुळे शिक्षण महाग झाले आणि सर्वांना समान संधी मिळाली नाही.

या उणिवा दूर करण्यासाठी संशोधनात गुंतवणूक, आंतरविद्याशाखीय व कौशल्याधारित अभ्यासक्रम, तंत्रज्ञानाचा वापर, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सर्वांसाठी परवडणारे शिक्षण आवश्यक आहे.

**२.१ राष्ट्रीय शिक्षण धोरण,. १९८६**

राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ हे भारताच्या शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे पाऊल होते. यामध्ये शिक्षणाचा दर्जा, उपलब्धता आणि प्रासंगिकता सुधारण्यावर भर देण्यात आला. अभ्यासक्रम आधुनिकीकरण, शिक्षक प्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा वापर यांना प्रोत्साहन देण्यात आले, तसेच शिक्षणाला सामाजिक व आर्थिक विकासाशी जोडले गेले.परंतु, जागतिक स्तरावर कमी संशोधन, कालबाह्य अभ्यासक्रम आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याचा अभाव दिसून आला. स्थानिक पातळीवर प्रादेशिक विषमता, वाढता खर्च आणि सर्वसमावेशकतेच्या अंमलबजावणीत अडचणी होत्या.म्हणून संशोधन गुंतवणूक, अद्ययावत व कौशल्याधारित अभ्यासक्रम, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सर्वांसाठी समावेशक व परवडणारे शिक्षण आवश्यक होते.

**३. जागतिकीकरण आणि सुधारणांचा टप्पा (२००५-२०१९)**

२००५–२०१९ या काळात भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जागतिकीकरणामुळे मोठे बदल झाले. National Knowledge Commission, Higher Education Funding Agency, RashtriyaUchchatarShikshaAbhiyanआणि National Institutional Ranking Framework यांसारख्या उपक्रमांद्वारे गुणवत्ता, पायाभूत सुविधा आणि स्पर्धात्मकता सुधारण्याचा प्रयत्न झाला. खाजगी क्षेत्राचा सहभाग आणि आंतरराष्ट्रीयीकरणही वाढले.परंतु, संशोधनाची कमतरता, जागतिक क्रमवारीतील मागे राहणे, गुणवत्तेतील असमानता आणि प्रादेशिक विषमता या समस्या कायम राहिल्या. खाजगीकरणामुळे शिक्षण महाग झाले आणि सर्वांना समान संधी मिळाल्या नाहीत.म्हणून संशोधनात गुंतवणूक, आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम, आंतरराष्ट्रीय सहकार्य, गुणवत्ता नियंत्रण, डिजिटल शिक्षण आणि समावेशक धोरणे आवश्यक होते.

**३.१ राष्ट्रीय ज्ञान आयोग (२००५)**

National Knowledge Commission (२००५), सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन, याचे उद्दिष्ट भारताला ज्ञान-आधारित समाज बनवणे आणि उच्च शिक्षणाची जागतिक स्पर्धात्मकता वाढवणे होते. आयोगाने गुणवत्तावाढ, संशोधन गुंतवणूक, नाविन्य, स्वायत्तता, आणि जागतिक दर्जाच्या संस्थांची निर्मिती यावर भर दिला.तथापि, संशोधनाची कमतरता, आंतरराष्ट्रीय सहकार्याचा अभाव, प्रादेशिक विषमता आणि वाढते खाजगीकरण यांसारख्या समस्या कायम राहिल्या.

उपाय म्हणून संशोधन निधी वाढवणे, आंतरराष्ट्रीय सहकार्य, आंतरविद्याशाखीय शिक्षण, मजबूत नियमन आणि सर्वांसाठी सुलभ व परवडणारे शिक्षण आवश्यक होते.

**३.२ उच्च शिक्षण समिती (२००९)**

यश पाल यांच्या अध्यक्षतेखालील उच्च शिक्षण समिती (२००९) ने भारताच्या शिक्षण प्रणालीत लवचिक, आंतरविद्याशाखीय आणि विद्यार्थी-केंद्रित बदलांची गरज अधोरेखित केली. स्वायत्तता, सर्जनशीलता आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देण्यात आला.मात्र, संशोधनाची कमतरता, जागतिक सहकार्याचा अभाव, जुने अभ्यासक्रम आणि प्रादेशिक विषमता या समस्या कायम राहिल्या; तसेच अंमलबजावणीत प्रशासकीय अडथळेही होते.

उपाय म्हणून संशोधन निधी वाढवणे, तंत्रज्ञान व आंतरविद्याशाखीय शिक्षण, आंतरराष्ट्रीय सहकार्य, प्राध्यापक विकास आणि सर्वांसाठी सुलभ व समावेशक शिक्षण आवश्यक आहे.

**४. समकालीन परिवर्तन टप्पा (२०२० - वर्तमान)**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत (२०२०–आजपर्यंत) भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात डिजिटलीकरण, बहुविद्याशाखीय शिक्षण, संशोधन व नाविन्य यावर भर देण्यात आला. डिजिटल शिक्षण, कौशल्य विकास आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न झाला.तथापि, संशोधन निधी कमी, जागतिक क्रमवारीतील मागे राहणे, डिजिटल गुणवत्तेतील तफावत आणि प्रादेशिक व सामाजिक असमानता या समस्या कायम आहेत. खाजगीकरणामुळे खर्च व विषमता वाढण्याची शक्यता आहे.

उपाय म्हणून संशोधन गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय भागीदारी, गुणवत्तापूर्ण डिजिटल शिक्षण, प्राध्यापक प्रशिक्षण आणि सर्वांसाठी परवडणारे व समावेशक शिक्षण आवश्यक आहे.

**४.१ राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२०**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चे उद्दिष्ट उच्च शिक्षण अधिक सुलभ, समावेशक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणे आहे. यात बहुविद्याशाखीय शिक्षण, संशोधन, नाविन्य आणि तंत्रज्ञानावर भर देण्यात आला आहे.'5+3+3+4' रचनेद्वारे शिक्षणात लवचिकता आणली आहे, तसेच गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रत्यायन, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि जागतिक दर्जाच्या संस्थांवर लक्ष केंद्रित केले आहे. डिजिटल शिक्षण, कौशल्य विकास आणि आजीवन शिक्षणालाही प्रोत्साहन देण्यात आले आहे

NEP 2020 चा दृष्टिकोन प्रगत असला तरी अंमलबजावणीत अनेक त्रुटी दिसून येतात. जागतिक स्तरावर, भारताचे उच्च शिक्षण संशोधन, नाविन्य आणि आंतरराष्ट्रीय भागीदारीत मागे आहे; प्राध्यापकांची संख्या आणि दर्जाही कमी आहे. स्थानिक पातळीवर, ग्रामीण भागांत पायाभूत सुविधा अपुरी आहेत, आर्थिक व सामाजिक विषमता कायम आहे, आणि डिजिटल शिक्षणामुळे 'डिजिटल दरी' उघडकीस आली आहे, ज्यामुळे काही विद्यार्थ्यांना संधी मर्यादित राहतात.

**५. भारतातील मुक्त आणि दूरस्थ शिक्षण (ODL) धोरणांचा विकास**

भारताच्या मुक्त आणि दूरस्थ शिक्षणाचा (ODL) विकास उच्च शिक्षणाची व्याप्ती वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो. १९८५ मध्ये स्थापन झालेल्या इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने (IGNOU) ODL चा पाया रचला, ज्यामुळे भौगोलिक, आर्थिक किंवा सामाजिक अडथळ्यांमुळे पारंपारिक शिक्षण घेऊ शकणाऱ्यांना शिक्षणाची संधी मिळाली. NPE 1986 (१९९२ सुधारित) नेही ODL ला उच्च शिक्षणाची उपलब्धता वाढवण्याचे साधन म्हणून मान्यता दिली.

२१ व्या शतकात तांत्रिक प्रगतीमुळे ODL चे आधुनिकीकरण झाले. NAAC आणि UGC दूरस्थ शिक्षण कार्यक्रमांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण आहेत. २०१७ मध्ये सुरू केलेल्या SWAYAM उपक्रमाद्वारे MOOCs आणि ऑनलाइन पदव्या उपलब्ध करून ODL डिजिटलीकरण अधिक बळकट झाले. NEP 2020 ने ODL ला भारताच्या शैक्षणिक विकासाचा प्रमुख घटक मानले, ज्याद्वारे उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षणाचा विस्तार, आजीवन शिक्षण आणि विविध सामाजिक घटकांच्या गरजा पूर्ण करण्यावर भर दिला जातो.
भारतीय उच्च शिक्षणातील शैक्षणिक सुधारणा आणि धोरणात्मक बदलाचे वैशिष्टे, परिणाम आणि आव्हाने.

**वैशिष्ट्ये:**

- प्रवेश आणि समानतेच्या विस्तारावर लक्ष केंद्रित केलेगेले.
- शैक्षणिक विस्तार आणि सुलभतेवर सातत्यपूर्ण लक्ष केंद्रित करण्यात आले; तसेच प्रमाणीकरण आणि सुधारणांवर भर देण्यात आला.

- ज्ञान-आधारित विकास, संशोधन क्षमता वृद्धी आणि प्राध्यापकांच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करणे.
- गुणवत्ता सुधारणा, आंतरविद्याशाखीय अध्ययन, डिजिटल साक्षरता आणि जागतिक सहयोगांवर भर देते.

**परिणाम/प्रभाव:**

- सर्वसमावेशक उच्च शिक्षण व्यवस्थेचा पाया रचला गेला.
- शिक्षणाचा विस्तार केला, प्रादेशिक समानतेला चालना दिली गेली.
- संशोधन क्षमता आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य उभारण्याचे प्रयत्न सुरू केले.
- उच्च शिक्षण आणि जागतिक स्पर्धात्मकता सुधारण्यासाठीचा एक कृती आराखडा मांडतो.

**आव्हाने आणि मर्यादा:**

- गुणवत्ता आणि संशोधन निष्पत्तीवर भर नसणे.
- जागतिक मानकांचे एकत्रीकरण करण्यात अपयश; संशोधन आणि तांत्रिक विकासाकडे दुर्लक्ष.
- अनेक शिफारशींची पूर्णपणे अंमलबजावणी झाली नाही, ज्यामुळे जागतिक उच्च शिक्षण क्षेत्रात क्रमवारी सातत्याने खालच्या पातळीवरच राहिली.
- अंमलबजावणीला प्रादेशिक विषमता, मर्यादित निधी आणि पारंपरिक संस्थांकडून होणारा विरोध यांसारख्या आव्हानांचा सामना करावा लागतो.

**निष्कर्ष:**

स्वातंत्र्यानंतर भारताच्या उच्च शिक्षणात प्रवेशवाढ, गुणवत्ता सुधारणा आणि जागतिक एकात्मता साधण्याचे प्रयत्न झाले. कोठारी आयोग पासून ते राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० पर्यंत विविध धोरणांनी शिक्षण प्रणाली विकसित केली; तरीही गुणवत्ता, संशोधन, प्राध्यापक विकास आणि आंतरराष्ट्रीय क्रमवारीत कमी स्थान ही मोठी आव्हाने कायम आहेत.NEP 2020 आंतरविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि आंतरराष्ट्रीयीकरणावर भर देत सुधारणा सुचवते. यासोबतच डिजिटल पायाभूत सुविधा, संशोधन गुंतवणूक, प्राध्यापक गुणवत्ता, आणि जागतिक सहकार्य वाढवणे आवश्यक आहे.

एकूणच, भारताने केवळ प्रवेश वाढवण्यापेक्षा उच्च दर्जाचे, नवोपक्रमक्षम आणि जागतिक स्पर्धात्मक शिक्षण प्रणाली विकसित करण्यावर भर दिल्यास, तो "ज्ञान-अर्थव्यवस्था"त जागतिक नेतृत्व मिळवू शकतो.

**संदर्भ सूची:**

1. Sengupta, S. (2015). National Policy on Education 1968 Analysis and implications for India's higher education systers. Journal of Education and Policy, 73), 76-85..
2. Rathore, V. (2019).The impact of economic liberalization on higher education in India. Opportunities and challenges. Journal of Indian Education, 23(2), 58-73.
3. Chakrabarti, R. (2021).Digital transformation in Indian higher education: Challenges and opportunities Journal of Educational Technology & Development, 24(2), 98-112.
4. Ministry of Education (2020). National Education Policy 2020, Government of India.
5. National Education Palicy (NEP) 2020, Ministry of Education, Government of India.
6. Yash Pal Committee (2009),Report of the Committee on Higher Education Ministry of Human Resource Development, Government of India.
7. University Grants Commission Reports.
8. Studies on Higher Education Growth in India.
9. National Knowledge Commission (2006), Report to the Nation Government of India.
10. Government of India (2017). National Institutional Ranking.
11. https://www.education.gov.in

# १९४७ नंतर भारतातील उच्च शिक्षणातील बदलांचा आढावा-एक अध्ययन

(Review of Changes in Higher Education in India Since 1947)

**कु. वृषाली वसंतराव जगताप**
संशोधक विद्यार्थी यादव देशमुख कला महाविद्यालय,तिवसा

**सारांश (Abstract)**

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि बौद्धिक विकासासाठी शिक्षणव्यवस्थेचे पुनर्रचना करणे काळानुसार अत्यावश्यक झाले. विशेषतः उच्च शिक्षण हे राष्ट्रीय विकास, वैज्ञानिक प्रगती, लोकशाही मूल्यांचे संवर्धन आणि मानव संसाधन विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन मानले गेले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात व्यापक बदल घडून आले. विद्यापीठांची संख्या, विद्यार्थ्यांची नोंदणी, अभ्यासक्रमांचे विविधीकरण, संशोधनाला प्रोत्साहन, तंत्रज्ञानाचा वापर आणि खासगी क्षेत्राचा वाढता सहभाग ही या बदलांची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली.

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये १९४७ नंतर भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेतील बदलांचा ऐतिहासिक, संरचनात्मक आणि धोरणात्मक आढावा घेण्यात आला आहे. विविध शैक्षणिक आयोग, शैक्षणिक धोरणे, विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका, जागतिकीकरणाचा प्रभाव, खासगीकरण आणि डिजिटल शिक्षण यांचा अभ्यास करून उच्च शिक्षणातील परिवर्तनाची प्रक्रियेचा समावेश केला आहे. प्रस्तुत संशोधनातून असे आढळून येते की, उच्च शिक्षणाच्या विस्ताराबरोबर गुणवत्तेचा प्रश्न, असमानता, व्यापारीकरण आणि रोजगारक्षमतेचा अभाव यांसारख्या आव्हानांनाही भारताला सामोरे जावे लागत आहे.एकंदरीत उच्च शिक्षणातील सुधारणा केवळ संख्यात्मक विस्तारापुरती मर्यादित न राहता गुणवत्तावर्धन, संशोधनाभिमुखता, समावेशकता आणि जागतिक दर्जा प्राप्त करण्याच्या दिशेने असणे आवश्यक आहे.

**कळीचे मुद्दे (Keywords):**उच्च शिक्षण, विद्यापीठ प्रणाली, शैक्षणिक धोरण, जागतिकीकरण, संशोधन

**प्रस्तावना (Introduction) :**

शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचे मूलभूत साधन मानले जाते. विशेषतः उच्च शिक्षण हे ज्ञाननिर्मिती, वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान विकास आणि सामाजिक परिवर्तन यासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या आणि लोकसंख्येच्या दृष्टीने विशाल देशासाठी उच्च शिक्षण व्यवस्थेचा विकास हा राष्ट्रीय प्रगतीचा एक महत्त्वपूर्ण घटक ठरतो.

१९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतासमोर अनेक आव्हाने उभी होती. सामाजिक विषमता, आर्थिक मागासलेपण, औद्योगिक विकासाचा अभाव आणि शिक्षणाचा कमी प्रसार ही त्या काळातील प्रमुख समस्या होती. या परिस्थितीत राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षणव्यवस्थेचे पुनर्रचना करणे आवश्यक होते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारत सरकारने उच्च शिक्षण क्षेत्रात अनेक सुधारणा आणि धोरणात्मक बदल केले.

स्वातंत्र्याच्या वेळी भारतात केवळ सुमारे २० विद्यापीठे आणि सुमारे ५०० महाविद्यालये होती. आज मात्र भारत जगातील सर्वात मोठ्या उच्च शिक्षण व्यवस्थांपैकी एक आहे. विद्यापीठे, तांत्रिक संस्था, संशोधन केंद्रे आणि खासगी शिक्षणसंस्था यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश १९४७ नंतर भारतातील उच्च शिक्षणातील बदलांचा सखोल आढावा घेणे हा आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study) :**

1.१९४७ नंतर भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेच्या विकासाचा ऐतिहासिक आढावा घेणे.
2.विविध शैक्षणिक आयोग आणि धोरणांचा उच्च शिक्षणावर झालेला प्रभाव अभ्यासणे.
3.उच्च शिक्षण क्षेत्रातील विस्तार, खासगीकरण आणि जागतिकीकरणाचे विश्लेषण करणे.
4.उच्च शिक्षण व्यवस्थेसमोरील प्रमुख आव्हानाचा शोध घेणे.

स्वातंत्र्यानंतर भारताने उच्च शिक्षणाच्या पुनर्रचनेला राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व दिले. १९४७ ते १९६० या कालखंडात उच्च शिक्षण व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी अनेक शैक्षणिक आयोगांची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये Sarvepalli Radhakrishnan यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेला राधाकृष्णन आयोग (१९४८–४९) विशेष महत्त्वाचा मानला जातो. या आयोगाने भारतीय विद्यापीठांच्या उद्दिष्टांची पुनर्रचना करण्यावर भर दिला. विद्यापीठांची स्वायत्तता वाढविणे, संशोधनाला प्रोत्साहन देणे, शिक्षकांचे प्रशिक्षण सुधारणे आणि अभ्यासक्रमांचे आधुनिकीकरण करणे अशा महत्त्वपूर्ण शिफारसी आयोगाने केल्या.

या काळातील आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणजे University Grants Commission (UGC) ची १९५६ मध्ये स्थापना होय. विद्यापीठांना आर्थिक सहाय्य पुरविणे, उच्च शिक्षणाची गुणवत्ता राखणे, संशोधनाला चालना देणे आणि विद्यापीठ व्यवस्थेचे नियमन करणे ही UGC ची प्रमुख उद्दिष्टे ठरविण्यात आली. त्यामुळे भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेला संस्थात्मक आणि धोरणात्मक आधार मिळाला.

१९६० ते १९९० या कालखंडात भारतातील उच्च शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. या काळात Daulat Singh Kothari यांच्या अध्यक्षतेखाली कोठारी आयोग (१९६४–६६) ने शिक्षणाला राष्ट्रीय विकासाचे प्रभावी साधन मानले. शिक्षणावर सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या (GDP) किमान ६ टक्के खर्च करणे, सर्वांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे आणि विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षणावर विशेष भर देणे अशा महत्त्वपूर्ण शिफारसी या आयोगाने केल्या. यानंतर National Education Policy 1968 द्वारे शिक्षणातील समानता, राष्ट्रीय एकात्मता आणि गुणवत्तावृद्धी यांवर भर देण्यात आला.

१९९१ नंतरच्या उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे उच्च शिक्षणातही मोठे बदल झाले. खासगी विद्यापीठांची वाढ, व्यावसायिक अभ्यासक्रमांचा विस्तार, तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा वापर आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्य वाढू लागले. या काळात Indian Institutes of Technology, Indian Institutes of Management आणि National Institutes of Technology यांसारख्या संस्थांची प्रतिष्ठा जागतिक स्तरावर वाढली आणि भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेला नवे आयाम प्राप्त झाले.

**२१ व्या शतकातील उच्च शिक्षणातील बदल -**

२१ व्या शतकात भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेत तांत्रिक, संरचनात्मक आणि धोरणात्मक पातळीवर मोठे परिवर्तन घडून आले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे शिक्षणाचे स्वरूप अधिक लवचिक, विद्यार्थी-केंद्रित आणि ज्ञानाधारित झाले आहे. डिजिटल साधनांचा वाढता वापर, संशोधन व नवोन्मेषावर दिला जाणारा भर आणि नवीन शैक्षणिक धोरणांमुळे उच्च शिक्षण क्षेत्र अधिक गतिमान बनले आहे. जागतिकीकरणामुळे भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक बनण्याची संधी मिळाली असून विविध शैक्षणिक संस्थांमध्ये आधुनिक अभ्यासक्रम, संशोधन केंद्रे आणि नवोन्मेष प्रयोगशाळा विकसित होऊ लागल्या आहेत.

**अ)डिजिटल शिक्षण -**

२१ व्या शतकातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे डिजिटल शिक्षणाचा व्यापक प्रसार होय. इंटरनेट, संगणक आणि स्मार्ट उपकरणांच्या उपलब्धतेमुळे शिक्षणाची पारंपरिक चौकट बदलू लागली. ऑनलाइन शिक्षण, ई-लर्निंग आणि आभासी वर्गांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कुठेही आणि कधीही शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली. विशेषतः SWAYAM, MOOCs यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे उच्च शिक्षण अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे विविध विद्यापीठांचे अभ्यासक्रम, व्याख्याने आणि अभ्याससाहित्य विद्यार्थ्यांना ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध होत आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात डिजिटल शिक्षणाने शिक्षणव्यवस्था सुरू ठेवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे भविष्यातही डिजिटल आणि पारंपरिक शिक्षण यांचा समन्वय असलेली संमिश्र (Blended) शिक्षणपद्धती अधिक प्रभावी ठरत आहे.

**ब )संशोधन आणि नवोन्मेष–**

२१ व्या शतकात उच्च शिक्षणात संशोधन आणि नवोन्मेषाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ज्ञानाधारित अर्थव्यवस्था उभारण्यासाठी संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि नवोन्मेष आवश्यक मानले जातात. त्यामुळे विद्यापीठे आणि उद्योग यांच्यातील सहकार्य वाढले असून विविध संशोधन प्रकल्पांना प्रोत्साहन दिले जात आहे. अनेक उच्च शिक्षण संस्थांमध्ये इनोव्हेशन सेल, स्टार्टअप इनक्युबेशन केंद्रे आणि संशोधन प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची भावना विकसित करण्यासाठी स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन दिले जात आहे. या प्रक्रियेमुळे शिक्षण केवळ ज्ञान प्राप्तीपुरते मर्यादित न राहता आर्थिक आणि तांत्रिक विकासाचे साधन बनत आहे.

**क )राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020**

२१ व्या शतकातील उच्च शिक्षणातील सुधारणा अधिक प्रभावी करण्यासाठी National Education Policy 2020 हे धोरण महत्त्वपूर्ण मानले जाते. या धोरणाने उच्च शिक्षणात व्यापक आणि संरचनात्मक बदल सुचविले आहेत. बहुविषयक शिक्षणाला प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांना विविध विषयांचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि संशोधनाभिमुख शिक्षणाला चालना देणे ही या धोरणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. तसेच Academic Bank of Credit या संकल्पनेद्वारे विद्यार्थ्यांना विविध संस्थांमधून घेतलेल्या अभ्यासक्रमांचे गुण जमा करण्याची सुविधा देण्यात आली आहे. याशिवाय राष्ट्रीय स्तरावर संशोधनाला चालना देण्यासाठी National Research Foundation स्थापन करण्याची

कल्पना मांडण्यात आली आहे. या सर्व सुधारणा भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेला अधिक लवचिक, गुणवत्तापूर्ण आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल मानल्या जातात.

**उच्च शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने -**

भारतामध्ये गेल्या काही दशकांत उच्च शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. Ministry of Education च्या All India Survey on Higher Education (AISHE) २०२१-२०२२ अहवालानुसार भारतात सुमारे ११०० पेक्षा अधिक विद्यापीठे, ४३,००० पेक्षा अधिक महाविद्यालये आणि ११,००० हून अधिक स्वायत्त संस्था कार्यरत आहेत. तसेच उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी (Gross Enrolment Ratio) सुमारे २८.४% पर्यंत पोहोचली आहे. मात्र या संख्यात्मक विस्तारासोबत अनेक गंभीर आव्हानेही कायम आहेत.

१)शिक्षणाची गुणवत्ता हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. अनेक विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये पायाभूत सुविधा, अद्ययावत प्रयोगशाळा, डिजिटल साधने आणि प्रशिक्षित प्राध्यापकांची कमतरता आढळते. AISHE च्या आकडेवारीनुसार भारतातील महाविद्यालयांपैकी मोठा भाग ग्रामीण आणि अर्धशहरी भागात असून त्यापैकी अनेक ठिकाणी संशोधनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी University Grants Commission आणि National Assessment and Accreditation Council या संस्थांद्वारे मानांकन आणि मूल्यमापन प्रक्रिया राबविण्यात येते; तथापि, अजूनही सर्व संस्थांचे गुणवत्तामूल्यांकन पूर्ण झालेले नाही.

२) संशोधनाचा अभाव ही गंभीर समस्या आहे. भारताचा संशोधन व विकासावरील (R&D) खर्च GDP च्या सुमारे ०.७% इतकाच आहे, तर अमेरिका, जपान आणि दक्षिण कोरिया यांसारख्या देशांमध्ये हा खर्च २% ते ४% दरम्यान आहे. परिणामी जागतिक स्तरावरील संशोधनात भारतीय विद्यापीठांचे योगदान तुलनेने मर्यादित राहते.

३) बेरोजगारी आणि रोजगारक्षमता. विविध सर्वेक्षणांनुसार भारतातील पदवीधर विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४० ते ५०% विद्यार्थी रोजगारासाठी पूर्णपणे सक्षम नसतात, कारण शिक्षण आणि उद्योगक्षेत्राच्या गरजा यांच्यात तफावत आढळते. त्यामुळे कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षणावर भर देण्याची गरज वाढत आहे.याशिवाय ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक असमानता हीही मोठी समस्या आहे. AISHE च्या माहितीनुसार भारतातील सुमारे ६०% महाविद्यालये ग्रामीण भागात असली तरी उच्च दर्जाच्या संशोधन सुविधा प्रामुख्याने शहरी विद्यापीठांमध्येच केंद्रित आहेत.

४ ) तसेच अलीकडील काळात उच्च शिक्षण क्षेत्रात व्यापारीकरणाची प्रवृत्ती वाढताना दिसते. भारतातील सुमारे ६५% पेक्षा जास्त महाविद्यालये खासगी व्यवस्थापनाखाली चालतात. त्यामुळे शिक्षणाचा खर्च वाढत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी उच्च शिक्षण मिळविणे अधिक कठीण होत आहे. परिणामी उच्च शिक्षण व्यवस्थेत गुणवत्ता, समावेशकता आणि सामाजिक न्याय यांचा समतोल राखणे हे आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान ठरत आहे.

**चर्चा (Discussion)**

भारताची उच्च शिक्षण व्यवस्था आज जगातील सर्वात मोठ्या शिक्षण व्यवस्थांपैकी एक मानली जाते. All India Survey on Higher Education (AISHE) च्या अहवालानुसार देशात ११०० पेक्षा अधिक विद्यापीठे आणि सुमारे ४३,००० महाविद्यालये कार्यरत आहेत. या संख्यात्मक विस्तारामुळे लाखो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. तथापि, गुणवत्तेच्या दृष्टीने अजूनही अनेक आव्हाने कायम आहेत. जागतिक विद्यापीठ क्रमवारीत भारतीय विद्यापीठांची संख्या तुलनेने कमी आहे.उदा. QS World University Rankings किंवा Times Higher Education यांसारख्या जागतिक क्रमवारीत मर्यादित भारतीय विद्यापीठांचा समावेश होतो. यामागील प्रमुख कारणांमध्ये संशोधनासाठी अपुरा निधी, अत्याधुनिक प्रयोगशाळांचा अभाव, गुणवत्तापूर्ण प्राध्यापकांची कमतरता आणि पायाभूत सुविधांची मर्यादा यांचा समावेश होतो. त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात संख्यात्मक वाढीसोबत गुणवत्तावर्धनावर विशेष भर देणे अत्यावश्यक ठरते.

**निष्कर्ष (Conclusion)**

१९४७ नंतर भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेत व्यापक आणि महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत. स्वातंत्र्याच्या वेळी मर्यादित असलेली विद्यापीठे आणि महाविद्यालये आज मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत. विविध शैक्षणिक आयोग, धोरणे आणि संस्थांनी या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विशेषतः University Grants Commission, National Education Policy-1968 आणि National Education Policy-2020 यांसारख्या धोरणात्मक उपक्रमांमुळे उच्च शिक्षण व्यवस्थेच्या विस्ताराला चालना मिळाली आहे. तथापि, संख्यात्मक विस्तारासोबत गुणवत्तेची हमी देणे

अत्यंत आवश्यक आहे. संशोधन, नवोन्मेष, तंत्रज्ञानाचा वापर आणि जागतिक दर्जाचे शिक्षण यांवर अधिक भर देणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण-शहरी दरी कमी करून सर्व घटकांसाठी समावेशक आणि परवडणारी शिक्षण व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. भविष्यात ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था उभारण्यासाठी मजबूत आणि गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण व्यवस्था ही भारताच्या विकासाची किल्ली ठरेल.

**संदर्भ (References)**

1. Agarwal, P. (2009). Indian Higher Education: Envisioning the Future. Sage Publications.
2. Altbach, P. G. (2015). Global Perspectives on Higher Education. Johns Hopkins University Press.
3. Government of India (1966). Report of the Kothari Commission. Ministry of Education.
4. Government of India (2020). National Education Policy 2020. Ministry of Education.
5. Tilak, J. B. G. (2017). Higher Education in India: In Search of Equality, Quality and Quantity. Orient Blackswan.
6. UGC (2022). Annual Report. University Grants Commission.
7. AISHE (2023). All India Survey on Higher Education Report.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# भारताची शिक्षणप्रणाली,प्रवाह ,धोरणे आणी परिणाम.

गौरव ज बऱ्हानकुळे
संशोधक – (एम.ए इतिहास) सेट

**1) प्रस्तावना**

भारताची शिक्षण प्रणाली ही देशाच्या सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक विकासाचा पाया मानली जाते. प्राचीन काळातील गुरुकुल पद्धती पासून सुरू झालेली ही व्यवस्था आज जागतिक स्तरावर स्पर्धा करणारे तंत्रज्ञानाधारित आणि आधुनिक स्वरूप धारण करत आहे. शिक्षण हे केवळ ज्ञान प्राप्तीचे साधन नसून व्यक्तिमत्व विकास सामाजिक जाणीव आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठीही अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.भारतामध्ये शिक्षण क्षेत्रात विविध कालखंडामध्ये अनेक बदल घडून आले. औपनिवेशिक काळात पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा प्रभाव वाढला, तर स्वातंत्र्यानंतर भारत सरकार यांनी शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करण्यासाठी विविध योजना आणि सुधारणा राबवल्या यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले, आणि शिक्षणाचा विस्तार झाला. आजच्या युगात शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक पद्धती पासून दूर जाऊन शिक्षण अधिक विद्यार्थी केंद्रित कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख बनत आहे. डिजिटल तंत्रज्ञान ऑनलाइन शिक्षण आणि नव्या अभ्यासक्रमामुळे शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारीक बदल होत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे धोरण अत्यंत महत्त्वाचे ठरते. या धोरणामध्ये शिक्षक अधिक समावेशक लवचिक आणि गुणवत्ता पूर्ण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.म्हणूनच भारताचे शिक्षण प्रणाली तिचे बदलते प्रवाह आणि विविध शैक्षणिक धोरणे याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. या विषयाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील बदल आणि भविष्यातील दिशा यांचा सखोल अभ्यास करता येतो.भारताचे शिक्षण प्रणाली ही प्राचीन काळापासून शब्द परंपरा आणि आधुनिक बदलांचा संगम आहे. भारत सरकार यांच्या विविध धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात सातत्याने सुधारणा होत गेले आहे. गुरुकुल पद्धती पासून सुरू झालेली ही प्रणाली आज डिजिटल शिक्षण कौशल्याधारित शिक्षण आणि जागतिक स्पर्धात्मकतेकडे वाटचाल करत आहे. आजच्या काळात शिक्षणाचा प्रवाह हात मोठे बदल दिसून येतात पारंपरिक पाठांतरावर आधारित शिक्षणाऐवजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे.शिक्षण ही कोणत्याही समाजाच्या प्रगतीची आणि विकासाची मूलभूत गरज आहे. शिक्षणप्रणाली म्हणजे शिक्षण देण्याची रचना, पद्धती आणि संस्था यांचा एकत्रित संच होय. काळानुसार समाजाच्या गरजा, तंत्रज्ञानातील बदल आणि जागतिकीकरण यामुळे शिक्षणाच्या प्रवाहात (Trends) आणि धोरणांमध्ये (Policies) सातत्याने बदल होत आहेत.पूर्वी शिक्षणप्रणाली प्रामुख्याने पाठांतरावर आधारित होती, परंतु आजच्या आधुनिक युगात कौशल्याधारित, तंत्रज्ञानाधारित आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जात आहे. यासाठी शासन विविध शैक्षणिक धोरणे तयार करते (उदा. राष्ट्रीय शिक्षण धोरण – NEP 2020), ज्याचा उद्देश शिक्षण अधिक प्रभावी, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण बनवणे हा आहे.या सर्व बदलांचा परिणाम केवळ शिक्षणक्षेत्रापुरता मर्यादित नसून तो सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक स्तरावरही दिसून येतो. त्यामुळे शिक्षणप्रणाली, प्रवाह आणि धोरणे यांचे परिणाम समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**2) पार्श्वभूमी**

**1) भारताच्याशिक्षणप्रणालीचा इतिहास-**1947 मध्ये देशाला स्वतंत्र मिळाल्यापासून भारत सरकारने ग्रामीण आणि शहरी भारतातील निरीक्षकतेचा समस्येच्या निराकरण करण्यासाठी विविध कार्यक्रमांना प्रायोजित केले. भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी संपूर्ण देशात शिक्षणावर मजबूत केंद्र सरकारचे नियंत्रण आणि एकसमान शिक्षण प्रणालीची कल्पना केली होती. भारताच्या शिक्षण प्रणालीचे आधुनिकीकरण करण्यासाठी प्रस्ताविक्षित करण्याकरता केंद्र सरकारने विद्यापीठ शिक्षण आयोग (1948-49) माध्यमिक शिक्षण आयोग (1952-53) विद्यापीठ अनुदान आयोग आणि कोठारी आयोग (1964-66) यांची स्थापना केली. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारने वैज्ञानिक धोरणावरील ठराव स्वीकारला नेहरू सरकारने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सारख्या उच्च गुणवत्ता वैज्ञानिक शिक्षण संस्थांच्या विकासाला प्रायोजित केले.1961 मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT) ही एक स्वायत्त संस्था म्हणून स्थापना केली. जी केंद्र आणि राज्य सरकारांना शिक्षण धोरणे तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत सल्ला देईल.

**2) आधीची परिस्थिती-** प्राचीन काळातील शिक्षण प्रणाली गुरुकुल पद्धतीवर आधारित होते. विद्यार्थी गुरुच्या आश्रमात राहून शिक्षण घेत असत यात केवळ पुस्तकी ज्ञान नसून नैतिक मूल्य शिस्त जीवन कौशल्य आणि संस्कार यावर भर दिला जात होता.मध्ये पण काळातील शिक्षण हे प्रामुख्याने धार्मिक संस्थाची जोडलेले होते. शिक्षणाचा प्रसार मर्यादित होता.

ब्रिटिश राजवटीत शिक्षणात मोठे बदल झाले. पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा प्रभाव वाढला. इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जाऊ लागले.स्वातंत्र्यपूर्व काळात मर्यादा होता. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध होते. साक्षरतेचे प्रमाण खूप कमी होते. ग्रामीण भागात शिक्षणाची सोय अत्यल्प होती. पारंपारिक शिक्षणात पाठांतरावर जास्त भर होता कौशल्य विकास अभाव होता. तंत्रज्ञानाचा अभाव होता.

**3) शिक्षणाचे महत्त्व**-देशाच्या विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी सामाजिक परिवर्तन आणि समानता आनंदाच्या दृष्टिकोनातून व बदलत्या काळानुसार शिक्षणाची प्रवाह समजण्यासाठी देशातील रोजगार आणि कौशल्य विकास समता वाढवण्यासाठी शिक्षण प्रणालीचे अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. शिक्षण अधिक लवचिक समावेशक आणि गुणोत्तापूर्ण बनवण्यासाठी महत्त्वाचे आहे. याद्वारे राष्ट्रीय ओळख आणि संस्कृती जपण्यासाठी मदत होते. देशाची जागतिक पातळीवर स्पर्धेत टिकण्यासाठी अत्यंत आवश्यक प्रणाली म्हणजे शिक्षण प्रणाली होय. त्यामुळे देशाची प्रगती व विकास होऊ शकतो. शिक्षणाद्वारे समस्या आणि आव्हाने उडवण्यासाठी मदत होते. भारताचे सर्वांगी विकासासाठी शिक्षणाचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षण प्रणालीतील बदल आणि धोरणे समजून घेणे, ही अत्यंत महत्त्वाचे दिसून येते. या बदलत्या प्रवाहाचा अभ्यास केल्यास भविष्यातील शिक्षणाच्या गरजा समजतात.शिक्षणप्रणाली, बदलते प्रवाह आणि शैक्षणिक धोरणे यांचे परिणाम (Effects) हे समाज, अर्थव्यवस्था आणि व्यक्तीच्या सर्वांगीण विकासावर मोठ्या प्रमाणात दिसून येतात. खाली याचे सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे.

**3) परिणाम**

**1.व्यक्तीगतस्तरावरपरिणाम**-1) कौशल्य विकास (Skill Development)नवीन शिक्षणप्रणालीमध्ये केवळ पाठांतरावर भर न देता कौशल्याधारित शिक्षण (Skill-based learning) दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सर्जनशीलता वाढते.2) व्यक्तिमत्त्व विकासनवीन प्रवाहांमुळे (जसे की Activity-based learning, Digital learning) विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, संवाद कौशल्य आणि नेतृत्वगुण वाढतात.3) रोजगारक्षमता (Employability)शैक्षणिक धोरणांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम (Vocational courses) समाविष्ट केल्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरी मिळवणे सोपे होते.

**2. सामाजिकस्तरावरपरिणाम**-1) सामाजिक समानता (Social Equality)शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध केल्यामुळे (Right to Education, NEP 2020) समाजातील विषमता कमी होते. 2) जागरूकता आणि प्रगतीशिक्षणामुळे लोकांमध्ये सामाजिक, राजकीय आणि आरोग्यविषयक जागरूकता वाढते.3) स्त्री शिक्षणाला चालनाधोरणांमुळे मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले, ज्यामुळे महिला सशक्तीकरण वाढले.

.**3. आर्थिकस्तरावरपरिणाम**-1) आर्थिक विकास (Economic Growth)शिक्षित मनुष्यबळामुळे देशाची उत्पादकता वाढते आणि अर्थव्यवस्था मजबूत होते.2) उद्योजकता (Entrepreneurship)नवीन शिक्षणप्रवाहांमुळे विद्यार्थी नोकरी मागणारे न राहता नोकरी निर्माण करणारे (Entrepreneurs) बनतात.3) तंत्रज्ञानाचा वापर:- Digital education मुळे IT क्षेत्राचा विकास होतो आणि नवीन रोजगार संधी निर्माण होतात.

**4. शैक्षणिकस्तरावरपरिणाम**-1) अभ्यासक्रमात बदलनवीन धोरणांमुळे (उदा. NEP 2020) अभ्यासक्रम अधिक लवचिक, बहुविषयक (Multidisciplinary) झाला आहे.2) मूल्यांकन पद्धतीत बदलफक्त परीक्षांवर भर न देता Continuous Assessment (सतत मूल्यमापन) सुरू झाले आहे.3) शिक्षकांची भूमिका बदललीशिक्षक आता फक्त ज्ञान देणारे नसून मार्गदर्शक (Facilitator) झाले आहेत.

**5.तांत्रिक (Technological) परिणाम**-1) डिजिटल शिक्षणाचा विस्तारOnline classes, e-learning platforms यामुळे शिक्षण अधिक सुलभ झाले.2) शिक्षणात नवकल्पना (Innovation)AI, स्मार्ट क्लासरूम, व्हर्च्युअल लॅब्स यामुळे शिक्षण अधिक प्रभावी झाले आहेत .

**6. नकारात्मकपरिणाम (Negative Effects)**-1) डिजिटल दरी (Digital Divide)सर्व विद्यार्थ्यांना इंटरनेट आणि साधने उपलब्ध नसल्यामुळे असमानता वाढते.2) शिक्षणाचे व्यापारीकरणखाजगी शिक्षण संस्थांमुळे शिक्षण महाग झाले आहे.3) तणाव आणि स्पर्धाअत्याधिक स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताण वाढतो.

**4)भारतातील शिक्षण प्रणाली**

भारतात (1970) पर्यंत भारतीय संविधानाचा प्रत्येक राज्य आपल्या खात्यातील येणाऱ्या शाळांसाठी जबाबदार होते, राज्यं कडे पूर्ण अधिकार होते (जोपर्यंत केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या संघर्ष होत नाही ) शिक्षण धोरणे तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे यावर राज्य सरकारचे अधिकार क्षेत्र होते. 1976 मध्ये भारतीय संविधानाची 42 वी घटनादुरुस्ती मंजूर झाल्यानंतर शिक्षण समवर्ती सूची मध्ये आले. ज्यामुळे संपर्क सरकारला (ज्याला केंद्र सरकार म्हणून ओळखले जाते.) शिक्षण धोरणे आणि कार्यक्रमाचे शिफारस करण्याची परवानगी मिळाली, जरी राज्य सरकारांनी या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी व्यापक स्वायत्तता वापरणे सुरू ठेवने. भारतासारख्या मोठ्या

देशात 28 राज्य आणि आठ केंद्रशासित प्रदेश असल्यामुळे शालेय शिक्षणाचे संबंधित राज्याची धोरणे योजना कार्यक्रम आणि उपक्रमांमध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. राज्यांना राज्यस्तरीय कार्यक्रमाने धोरणे तयार करण्यासाठी मार्गदर्शक करण्याकरता वेळोवेळी राष्ट्रीय धोरणे आराखडे तयार केले जातात राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था बहुसंख्य प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांची व्यवस्थापन करतो आणि सरकारी व्यवस्थापना खाली प्राथमिक शाळांची संख्या वाढत आहे त्याचबरोबर खाजगी संस्था द्वारे व्यवस्थापित शाळांची संख्या आणि प्रमाण वाढत आहे.

2011 च्या जनगणनेनुसार सुमारे 73 टक्के लोकसंख्या साक्षर असल्याची नोंदवले गेले. ज्या पुरुषांचे प्रमाण 81 टक्के आणि महिलांचे प्रमाण 65 टक्के होते. 1991 मध्ये हे दर 18% आणि 27% आणि 9% होते. जानेवारी 2019 मध्ये भारतात 900 पेक्षा जास्त विद्यापीठे आणि 40,000 महाविद्यालये होती. भारताच्या उच्च शिक्षण प्रणालीमध्ये ऐतिहासिक दृष्ट्या वंचित असलेल्या अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयासाठी सकारात्मकृती दोनदा अंतर्गत लक्षणीय संख्येने जागा राखीव ठेवल्या जातात. केंद्र सरकारची संलग्न असलेल्या विद्यापीठ महाविद्यालय आणि तसं संस्थांमध्ये या वंचित गटासाठी जास्तीत जास्त 50 टक्के आरक्षण लागू आहे. राज्यस्तरावर ते वेगळे असू शकते 2014 मध्ये महाराष्ट्रात 73% आरक्षण होते. जी भारतातील आरक्षणाची सर्वाधिक टक्केवारी आहे.भारतातील शिक्षण प्रामुख्याने राज्य संचालित सार्वजनिक शिक्षण प्रणाली द्वारे व्यवस्थापित केली जाते. राज्य आणि स्थानिक अशा तीन स्तरावर सरकारच्या अखात्यातील येते.

**5) शिक्षणावरील राष्ट्रीय धोरणे**

**1) राष्ट्रीय धोरण 1968-**कोठारी आयोगाच्या शिफारशीवर आधारित पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे नेतृत्वाखाली सरकारने 1968 मध्ये पहिले राष्ट्रीय धोरण जाहीर केले ज्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि अधिक सांस्कृतिक व आर्थिक विकास साधण्यासाठी मूलभूत पुनर्रचना करण्याची मागणी करण्यात आली. या धोरणात भारताच्या संविधानानुसार 14 वर्षापर्यंतच्या सर्व मुलांसाठी सत्तेचे शिक्षण आणि शिक्षकांचे विशेष प्रशिक्षण व पात्रता पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. या धोरणा प्रादेशिक भाषांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याची मागणी करण्यात आली. माध्यमिक शिक्षणात लागू करण्यासाठी त्रिभाषा सूत्र आखण्यात आले.1968 च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणांने (NEP) शिक्षण खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या 6% पर्यंत वाढवण्याचे आवाहन केले.

**2)राष्ट्रीय धोरण 1986-**1980 मध्ये राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण सादर केले. या धोरणात विषमता दूर करण्यावर आणि शैक्षणिक संधी समान करण्यावर विशेष भर देण्याचे आवाहन करण्यात आले. विशेषत भारतीय महिला अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती समुदायांसाठी असे सामाजिक विकास साध्य करण्यासाठी या धोरणास शिष्यवृत्तीचा विस्तार पौडशिक्षण अनुसूचित जाती मधून अधिक शिक्षकाची गरीब कुटुंबांना त्यांची मुले. शाळेत पाठवण्यासाठी प्रोत्साहन करण्यात आले.

**3) राष्ट्रीय धोरण 1992-**1986 चे राष्ट्रीय धोरण 1992 मध्ये पी व्ही नरसिंहराव सरकारने सुधारित केले. 2005 मध्ये माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी त्यांच्या संयुक्त पुरोगामी आघाडी (UPA) सरकारच्या सामान्य किमान कार्यक्रमावर आधारित नवीन धोरण स्वीकारले. 1992 मध्ये देशातील व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अखिल भारतीय स्तरावर एक सामान्य प्रवेश परीक्षा आयोजित करण्याची कल्पना होती. राष्ट्रीय स्तरावर JEE आणि AIEEE या परीक्षेचा निश्चित केली आहे.

**4) राष्ट्रीय धोरण 2020 -** 2019 मध्ये तत्कालीन शिक्षण मंत्रालयाने नवीन शैक्षणिक धोरण 2019 चा मसुदा प्रसिद्ध केला यानंतर अनेक सार्वजनिक चर्चासत्रे झाली यामध्ये आवश्यक शिक्षण चिकित्सक विचार आणि अधिक समग्र अनुभवात्मक चर्चा आधारित आणि विश्लेषण आधारित शिक्षणावर चरणा देण्यासाठी अभ्यासक्रमातील सामग्री कमी करण्यावर चर्चा केली गेली. यामध्ये मुलांच्या सज्ञात्मक विकासावर आधारित विद्यार्थ्यांसाठी शिक्षण आणि प्रभावी करण्याचा प्रयत्न आणि अध्यापन शास्त्रीय रचनेत 10+2 वरून 5+3+3+4 प्रणाली आराखडा सुधारणा करण्याबद्दल सांगितले आहे. पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात संशोधन पद्धती समाविष्ट करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सोडून त्यानुसार प्रमाणपत्र/ पदवी मिळवण्याचा पर्याय केला आहे.

**6) निष्कर्ष-** भारताचे शिक्षण प्रणाली ही सतत बदलणारी आणि विकसित होणारी प्रक्रिया आहे. प्राचीन गुरुकुल परंपरेपासून ते आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणापर्यंतचा प्रवास हा परिवर्तनशील आणि प्रगतिशील राहिला आहे आजच्या काळात शिक्षण केवळ ज्ञानाप्राप्तीपुरतेच मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास व्यक्तिमत्व विकास आणि रोजगार क्षमतेवर भर देणारे बनले.शिक्षणातील बदलते प्रवाह लक्षात घेतले तर डिजिटल शिक्षण ऑनलाइन प्लॅटफॉर्म कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि भाऊ विषयक शिक्षण यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक लवचिक आणि विविध पर्याय उपलब्ध होत आहे विशेषत कोविड-19 नंतर शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा

वापर मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसतो.राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे धोरण शिक्षण व्यवस्थेला अधिक समावेशक गुणवत्ता पूर्ण आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे या धोरणाद्वारे 5334 ही नवीन रचना मातृभाषेत शिक्षण कौशल्य विकास अह भर आणि संशोधनाचा प्रोत्साहन यासारखे अनेक सकारात्मक बदल सुचविले गेले आहे.तथापि भारताच्या शिक्षण प्रणाली समोर अजून काही महत्त्वाचे आव्हाने आहेत जसे की ग्रामीण आणि शहरी भागातील असमानता शिक्षणाची गुणवत्ता शिक्षकाची कमतरता आणि डिजिटल दरी या समस्यावर प्रभावी उपाययोजना केल्यास शिक्षण अधिक सर्व समावेशक आणि सर्वांसाठी उपलब्ध होऊ शकते.अखेर भारताचे शिक्षण प्रणाली अधिक सक्षम लवचिक आणि भविष्याभिमुख करण्यासाठी योग्य धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सतत सुधारणा आणि सर्व घटकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे यामुळेच देशाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल आणि भारत जागतिक स्तरावर ज्ञान समृद्ध राष्ट्र म्हणून उद्यास येईल.

**संदर्भ**

1)राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020,दे टाइम्स ऑफ इंडिया 2 जुलै 2021रोजी मूळ आवृत्ती संग्रहित ( https://web.archive.org/web20210702065430/https://time of India
2)राष्ट्रीय माहितीशास्त्र केंद्र web/20090731002808/https:www.education.
3)प्राचीन,मध्यायुगीन भारताचा इतिहास (लेखक:-तांबोळी )
4)नवीन शिक्षण धोरण 2020, मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा ठळक बातम्या व मुद्दे,
5)राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986,gov.in/national-policy-education-1986-modified-1992

# रोजगाराभिमुख शिक्षणात गृह अर्थशास्त्राची भूमिका: एक चिकित्सक अभ्यास :-

**Dr Vijaya Devidasrao Bhond**
Home- Economics Department Y.D.V.D Arts, Commerce and Science Collage, Tiosa
MO. No- 9421825289 drvijayatayade@gmail.com

**सारांश -**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात शिक्षण केवळ सैद्धांतिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता रोजगाराभिमुख असणे अत्यावश्यक झाले आहे. विद्यार्थ्यांना कौशल्याधारित, व्यावहारिक आणि जीवनोपयोगी शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर गृह अर्थशास्त्र हा विषय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. गृह अर्थशास्त्र केवळ घरगुती व्यवस्थापनापुरता मर्यादित नसून त्यात पोषणशास्त्र, वस्त्रनिर्मिती, बालसंगोपन, संसाधन व्यवस्थापन, लघुउद्योग कौशल्ये इत्यादींचा समावेश होतो.

गृह अर्थशास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वावलंबन, उद्योजकता, आर्थिक व्यवस्थापन आणि कौशल्य विकासाची संधी मिळते. विशेषतः महिलांसाठी हा विषय रोजगार निर्मितीचे एक प्रभावी साधन ठरतो. शिवाय, हा विषय ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये समान उपयुक्त ठरतो. गृह अर्थशास्त्राच्या शिक्षणामुळे लघुउद्योग, स्वयंपाक व्यवसाय, फॅशन डिझाइनिंग, डे-केअर सेवा इत्यादी क्षेत्रांत रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतात.

तथापि, या विषयाकडे अजूनही कमी लेखले जाते, आणि त्याचा योग्य वापर रोजगार निर्मितीसाठी होत नाही. अभ्यासक्रमात व्यावहारिक प्रशिक्षणाचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाशी कमी संपर्क, आणि समाजातील पारंपरिक मानसिकता हे अडथळे आहेत. त्यामुळे गृह अर्थशास्त्राच्या शिक्षणाला नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची आवश्यकता आहे.

या अभ्यासात गृह अर्थशास्त्राची रोजगाराभिमुख शिक्षणातील भूमिका, त्याचे महत्त्व, आव्हाने आणि सुधारणा उपायांचा चिकित्सक आढावा घेतला आहे.

**प्रस्तावना–**

शिक्षण हे मानवी विकासाचे प्रमुख साधन असून ते व्यक्तीच्या बौद्धिक, सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी अत्यंत आवश्यक आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानप्रधान युगात शिक्षणाच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. केवळ सैद्धांतिक ज्ञान देणारे शिक्षण आता पुरेसे राहिलेले नाही, तर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनात उपयुक्त ठरणारी कौशल्ये देणारे रोजगाराभिमुख शिक्षण आवश्यक ठरले आहे. रोजगाराभिमुख शिक्षण विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनवते आणि त्यांना रोजगाराच्या विविध संधींसाठी सक्षम करते.

भारतासारख्या विकसनशील देशात बेरोजगारी ही एक गंभीर समस्या आहे. शिक्षण घेतलेल्या तरुणांमध्येही बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षण आणि रोजगाराच्या गरजांमधील तफावत. त्यामुळे शिक्षण प्रणालीमध्ये कौशल्याधारित आणि व्यावहारिक घटकांचा समावेश करणे गरजेचे झाले आहे. अशा परिस्थितीत गृह अर्थशास्त्र हा विषय रोजगाराभिमुख शिक्षणासाठी एक प्रभावी माध्यम ठरतो.

गृह अर्थशास्त्र हा विषय केवळ घरगुती कामांपुरता मर्यादित नसून त्याची व्याप्ती अत्यंत व्यापक आहे. यामध्ये अन्न व पोषण, वस्त्र व परिधान, गृह व्यवस्थापन, बाल विकास, कुटुंब संसाधन व्यवस्थापन आणि ग्राहक शिक्षण यांसारख्या विविध घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांचा संबंध दैनंदिन जीवनाशी असल्यामुळे हा विषय जीवनोपयोगी ठरतो. तसेच, या विषयातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक कौशल्ये प्राप्त होतात जी त्यांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात मदत करतात.

विशेषतः महिलांच्या सक्षमीकरणासाठी गृह अर्थशास्त्राचे महत्त्व अधिक आहे. या विषयाच्या माध्यमातून महिलांना घरातूनच लघुउद्योग सुरू करण्याच्या संधी उपलब्ध होतात. तसेच ग्रामीण भागातही या विषयाच्या ज्ञानाचा उपयोग करून रोजगारनिर्मिती करता येते. यामुळे आर्थिक स्वावलंबन वाढते आणि सामाजिक विकासाला चालना मिळते.

तथापि, गृह अर्थशास्त्राच्या शिक्षणाला अजूनही समाजात अपेक्षित महत्त्व मिळालेले नाही. या विषयाबद्दल अनेक गैरसमज आहेत. त्यामुळे या विषयाच्या रोजगारनिर्मितीतील क्षमतेचा पूर्ण उपयोग होत नाही. म्हणूनच गृह अर्थशास्त्राच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास करणे आणि त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाय सुचवणे आवश्यक आहे.

**कळीचे शब्द -** रोजगाराभिमुख शिक्षण, गृह अर्थशास्त्र, कौशल्य विकास, स्वावलंबन

**उद्दिष्टे -**

**1. गृह अर्थशास्त्राची संकल्पना स्पष्ट करणे -**

गृह अर्थशास्त्र हा केवळ घरगुती कामांपुरता मर्यादित विषय नसून त्यामध्ये आर्थिक, सामाजिक आणि कौशल्यात्मक घटकांचा समावेश होतो. या उद्दिष्टांतर्गत विद्यार्थ्यांना गृह अर्थशास्त्राची व्यापक व्याप्ती समजावून सांगणे अपेक्षित आहे. यामुळे या विषयाबद्दल असलेले गैरसमज दूर होतील. तसेच, त्याचा व्यावसायिक दृष्टिकोन विकसित होईल. हा विषय जीवनोपयोगी असल्यामुळे त्याचे महत्त्व अधोरेखित करणे आवश्यक आहे.

**2. रोजगारनिर्मितीत गृह अर्थशास्त्राची भूमिका अभ्यासणे -**

गृह अर्थशास्त्राच्या माध्यमातून विविध रोजगाराच्या संधी निर्माण होतात. जसे की केटरिंग, फॅशन डिझाइनिंग, बालसंगोपन केंद्रे इत्यादी. या उद्दिष्टाद्वारे या सर्व क्षेत्रांचा अभ्यास करून त्यांचा रोजगारनिर्मितीतील वाटा स्पष्ट केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना स्वतःचे व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रेरणा मिळते.

**3. कौशल्य विकासात योगदान विश्लेषण करणे -**

गृह अर्थशास्त्र विद्यार्थ्यांना व्यावहारिक कौशल्ये शिकवतो. जसे की शिवणकाम, स्वयंपाक, व्यवस्थापन इत्यादी. या कौशल्यांमुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमतेत वाढ होते. तसेच, त्यांचा आत्मविश्वासही वाढतो. या उद्दिष्टाद्वारे या कौशल्यांच्या प्रभावाचे विश्लेषण केले जाते.

**4. गृह अर्थशास्त्रातील अडचणी ओळखणे -**

या विषयाच्या प्रभावी अंमलबजावणीत काही अडथळे आहेत. जसे की कमी सुविधा, अपुरी प्रशिक्षण व्यवस्था, समाजातील चुकीची धारणा इत्यादी. या उद्दिष्टांतर्गत या अडचणींचा अभ्यास करून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला जातो.

**मुख्य मांडणी -**

रोजगाराभिमुख शिक्षणाच्या संदर्भात गृह अर्थशास्त्र हा अत्यंत उपयुक्त आणि परिणामकारक विषय मानला जातो. हा विषय व्यक्तीच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असल्यामुळे त्यामध्ये सैद्धांतिक ज्ञानासोबतच व्यावहारिक कौशल्यांचा समतोल साधला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांच्या रोजगारक्षमतेतही लक्षणीय वाढ होते.

गृह अर्थशास्त्राच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना अन्न व पोषण या क्षेत्रात आवश्यक ज्ञान प्राप्त होते. संतुलित आहाराचे महत्त्व, अन्नपदार्थांची निवड, स्वच्छता, अन्नसुरक्षा आणि अन्नप्रक्रिया यांसारख्या बाबींचे शिक्षण दिले जाते. या ज्ञानाचा उपयोग करून विविध प्रकारचे व्यवसाय सुरू करता येतात. केटरिंग सेवा, बेकरी, टिफिन सेवा, घरगुती अन्नउद्योग अशा अनेक क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. सध्याच्या शहरी जीवनशैलीत घरगुती आणि पौष्टिक अन्नाची मागणी वाढत असल्यामुळे या क्षेत्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

वस्त्र व परिधान या घटकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिवणकाम, डिझाइनिंग, कपड्यांचे प्रकार, फॅशनचे बदलते प्रवाह यांचे ज्ञान दिले जाते. या कौशल्यांच्या आधारे विद्यार्थी बुटीक, टेलरिंग व्यवसाय, फॅशन डिझाइनिंग, वस्त्रनिर्मिती उद्योग यांसारख्या क्षेत्रांत कार्य करू शकतात. फॅशन क्षेत्रातील वाढती मागणी लक्षात घेता या कौशल्यांचा उपयोग करून स्वतःचा व्यवसाय उभारणे शक्य होते.

गृह व्यवस्थापन आणि संसाधन व्यवस्थापन या भागामध्ये आर्थिक नियोजन, वेळेचे नियोजन, उपलब्ध साधनांचा योग्य वापर, बचत आणि खर्च नियंत्रण यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबी शिकवल्या जातात. या कौशल्यांचा उपयोग केवळ घरगुती जीवनापुरता मर्यादित राहत नाही, तर कोणत्याही व्यवसायात यशस्वी होण्यासाठी ते अत्यंत आवश्यक ठरतात. व्यवस्थापन कौशल्य विकसित झाल्यामुळे विद्यार्थी अधिक शिस्तबद्ध आणि कार्यक्षम बनतात.

बाल विकास आणि संगोपन या घटकामुळे विद्यार्थ्यांना मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासाबद्दल सखोल माहिती मिळते. या ज्ञानाचा उपयोग करून प्ले-स्कूल, डे-केअर सेंटर, बालसंवर्धन केंद्र यांसारख्या सेवांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होतात. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत काम करणाऱ्या पालकांची संख्या वाढत असल्यामुळे अशा सेवांची गरजही वाढत आहे.

गृह अर्थशास्त्राचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे उद्योजकता विकास. या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबनाची भावना निर्माण होते. लघुउद्योग, घरगुती उद्योग, स्वयंरोजगार यांसारख्या संधींचा लाभ घेऊन विद्यार्थी स्वतःचे उत्पन्न निर्माण करू शकतात. कमी भांडवलात व्यवसाय सुरू करण्याची क्षमता हा या विषयाचा एक मोठा फायदा आहे.

महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने गृह अर्थशास्त्राचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या विषयामुळे महिलांना विविध कौशल्ये प्राप्त होतात ज्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनतात. घरातूनच व्यवसाय करण्याच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे त्यांना कुटुंबीय जबाबदाऱ्यांसोबत व्यवसाय सांभाळणे शक्य होते. यामुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ होते आणि त्यांचा सामाजिक दर्जा उंचावतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षणावरील तत्त्वज्ञान हे केवळ शैक्षणिक विचार नसून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग आहे. त्यांनी शिक्षणाला समानता, न्याय आणि स्वातंत्र्य यांचा पाया मानले.

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित समाजात त्यांच्या विचारांचे महत्त्व अधिक वाढले आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करून सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी आंबेडकरांचे तत्त्वज्ञान मार्गदर्शक ठरते.त्यामुळे शिक्षण क्षेत्रात धोरणे तयार करताना आणि अंमलात आणताना त्यांच्या विचारांचा विचार करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची (References) :**

1.आंबेडकरडॉ. बाबासाहेब,"जातिभेदाचा उच्छेद" 1936 समता प्रकाशन, मुंबई,
मराठी आवृत्ती 2014,
2.कीर धनंजय, "डॉ. आंबेडकर : जीवन आणि ध्येय",पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,सुधारित आवृत्ती: 1962,
3.झेलिऑटएलेनॉर,"अस्पृश्यतेतून दलितपर्यंत" डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
मराठी आवृत्ती: 2001
4.जॅफ्रेलोक्रिस्तोफ,"डॉ. आंबेडकर आणि अस्पृश्यता" 2005,ओरिएंट ब्लॅकस्वान, नवी दिल्ली, मराठी आवृत्ती: 2010
5.भारत सरकार –डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे (Collected Works). 1979 पासून विविध खंड, शिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली.
6.गेल ऑम्वेट, "आंबेडकर : प्रबुद्ध भारताकडे वाटचाल" 2004,डायमंड पब्लिकेशन्स, पुणेमराठी आवृत्ती:2011
7.थोरात सुखदेव, "शिक्षण आणि सामाजिक न्याय" 2008,सेज पब्लिकेशन्स इंडिया, नवी दिल्ली, मराठी आवृत्ती: 2015,
8.कुमार कृष्ण,"शिक्षणाचे तत्त्वज्ञान" 2000,विद्या प्रकाशन, पुणे, मराठी आवृत्ती: 2012,

# राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगार निर्मिती : एक विश्लेषणात्मक अभ्यास

**कुलदीप नारायणराव गावंडे**
संशोधक अभ्यासक, अर्थशास्त्र विभाग या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
तिवासा जि. अमरावती

**सारांश -**

भारतासारख्या विकसनशील देशात शिक्षण आणि रोजगार यांच्यातील संबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. पारंपरिक शिक्षण पद्धती प्रामुख्याने सैद्धांतिक ज्ञानावर आधारित असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्यांची कमतरता आढळते. परिणामी, शिक्षित बेरोजगारीची समस्या वाढताना दिसते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये कौशल्याधारित शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे.

या संशोधनाचा उद्देश कौशल्याधारित शिक्षणाचा रोजगार निर्मितीवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. या अभ्यासात कौशल्य शिक्षणाची संकल्पना, NEP 2020 मधील धोरणात्मक उपाय आणि रोजगार बाजारातील बदलांचा अभ्यास करण्यात आला आहे. विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करून विविध अहवाल आणि संशोधन साहित्याचा आधार घेण्यात आला आहे.

अभ्यासातून असे दिसून येते की कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढते, उद्योग क्षेत्राशी त्यांचा संबंध दृढ होतो आणि उद्योजकतेला चालना मिळते. तथापि, प्रशिक्षणाची गुणवत्ता, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण भागातील अंमलबजावणी या बाबी अजूनही आव्हानात्मक आहेत. योग्य नियोजन आणि अंमलबजावणीद्वारेकौशल्याधारित शिक्षण भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

**Keywords** -कौशल्याधारित शिक्षण, रोजगार, मानवी भांडवल, कौशल्य विकास

**प्रस्तावना –**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात शिक्षणाची भूमिका केवळ ज्ञानप्राप्तीपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती आर्थिक विकास आणि रोजगार निर्मितीशी थेट जोडली गेली आहे. आधुनिक अर्थव्यवस्थेत कौशल्ये (skills) ही सर्वात महत्त्वाची संपत्ती मानली जाते. त्यामुळे केवळ शैक्षणिक पदवी मिळवणे पुरेसे नसून त्या सोबत रोजगारासाठी आवश्यक व्यावहारिक कौशल्ये असणे आवश्यक आहे.

भारतातील पारंपरिक शिक्षण पद्धती ही दीर्घकाळ सैद्धांतिक ज्ञानावर आधारित राहिली आहे. या पद्धतीत विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक कौशल्यांचा अभाव जाणवतो. परिणामी, देशात शिक्षित बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे. उद्योग क्षेत्राच्या गरजा आणि शिक्षण प्रणाली यामध्ये मोठी दरी दिसून येते. अनेक विद्यार्थी पदवीधर होऊनही रोजगारासाठी योग्य ठरत नाहीत.या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते. या धोरणात कौशल्याधारित शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच विविध कौशल्यांची ओळख करून देणे, इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देणे आणि उद्योगाशी संबंधित शिक्षण देणे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

.या संशोधनात कौशल्याधारित शिक्षणाची संकल्पना, NEP 2020 मधील धोरणात्मक उपाय आणि रोजगारावर होणारा त्याचा परिणाम यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासातून शिक्षण आणि अर्थव्यवस्था यांमधीलपरस्परसंबंध स्पष्ट होतो.

**उद्दिष्टे -**

**1. कौशल्याधारित शिक्षणाची संकल्पना समजून घेणे -**

कौशल्याधारित शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता त्यांना प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणारी कौशल्ये शिकवणे होय. या शिक्षणामध्ये तांत्रिक कौशल्ये, संवाद कौशल्ये, समस्या सोडवण्याची क्षमता आणि नवोन्मेष यावर भर दिला जातो. आधुनिक उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेल्या कौशल्यांची पूर्तता करण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरते. या उद्दिष्टांतर्गतकौशल्याधारित शिक्षणाची व्याख्या, स्वरूप आणि वैशिष्ट्ये समजून घेतली जातात. तसेच पारंपरिक शिक्षण आणि कौशल्याधारित शिक्षण यामधील फरक स्पष्ट केला जातो. यामुळे शिक्षणाच्या बदलत्या गरजा समजून घेण्यास मदत होते.

**2. NEP 2020 मधील कौशल्य विकास धोरणांचा अभ्यास करणे -**

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये कौशल्य विकासाला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे. या धोरणात विद्यार्थ्यांना 6वीपासून व्यावसायिक शिक्षणाची ओळख करून देण्याची तरतूद आहे. इंटर्नशिप, प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि उद्योगाशी जोडलेले अभ्यासक्रम यावर भर दिला आहे. या उद्दिष्टांतर्गतNEP 2020 मधील प्रमुख तरतुदींचा अभ्यास करण्यात येतो. यामुळे धोरणात्मक बदल आणि त्यांचा शिक्षणावर होणारा परिणाम स्पष्ट होतो.

**3. कौशल्याधारित शिक्षणाचा रोजगारावर परिणाम विश्लेषित करणे -**

कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढते. उद्योगाच्या गरजेनुसार प्रशिक्षण मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरी मिळवणे सोपे जाते. या उद्दिष्टांतर्गत कौशल्य शिक्षण आणि रोजगार यामधील संबंधांचा अभ्यास केला जातो. तसेच रोजगार बाजारातील बदलांचा विचार केला जातो. यामुळे शिक्षण प्रणाली अधिक रोजगाराभिमुख बनवण्याची गरज स्पष्ट होते.

**4. शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील संबंध स्पष्ट करणे -**

शिक्षण आणि उद्योग यामधील समन्वय हा रोजगार निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कौशल्याधारित शिक्षणामुळे हा समन्वय मजबूत होतो. या उद्दिष्टांतर्गत उद्योगाच्या गरजा आणि शिक्षण प्रणाली यामधील संबंधांचा अभ्यास केला जातो. तसेच इंटर्नशिप, प्रशिक्षण आणि उद्योग सहकार्य यांचे महत्त्व स्पष्ट केले जाते.

**5. कौशल्याधारित शिक्षणातील अडचणी ओळखणे -**

कौशल्याधारित शिक्षणाच्या अंमलबजावणीत अनेक अडचणी येतात. प्रशिक्षणाची गुणवत्ता, पायाभूत सुविधा आणि शिक्षकांची कमतरता या प्रमुख समस्या आहेत. या उद्दिष्टांतर्गत या अडचणींचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचवले जातात. यामुळे धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीस मदत होते.

**गृहितकृत्ये -**

1. कौशल्याधारित शिक्षणामुळे रोजगारक्षमतेत वाढ होते.
2. NEP 2020 मुळे कौशल्य विकासाला चालना मिळते.

**मुख्य मांडणी -**

कौशल्याधारित शिक्षण ही आधुनिक काळातील एक महत्त्वपूर्ण आणि आवश्यक शिक्षण पद्धती मानली जाते. या शिक्षण पद्धतीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान देणे नसून त्यांना प्रत्यक्ष जीवनात आणि कामाच्या ठिकाणी उपयुक्त ठरणारी कौशल्ये विकसित करून देणे हा आहे. पारंपरिक शिक्षण प्रणालीमध्ये मुख्यतः पाठांतरावर आणि परीक्षांवर भर दिला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना विषयाचे सैद्धांतिक ज्ञान मिळते, परंतु ते प्रत्यक्ष परिस्थितीत त्याचा वापर करण्यात अनेकदा अपयशी ठरतात. अशा परिस्थितीत कौशल्याधारित शिक्षणाची गरज प्रकर्षाने जाणवते.कौशल्याधारित शिक्षणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. यामध्ये केवळ शैक्षणिक ज्ञान नव्हे, तर तांत्रिक कौशल्ये, संवाद कौशल्ये, समस्या सोडवण्याची क्षमता, सर्जनशीलता, नवोन्मेष आणि नेतृत्वगुण यांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांना केवळ "काय शिकायचे" हेच नव्हे, तर "कसे शिकायचे" आणि "कसे वापरायचे" हे शिकवले जाते. त्यामुळे शिक्षण अधिक परिणामकारक आणि व्यवहार्य बनते.

या शिक्षण पद्धतीत प्रात्यक्षिक प्रशिक्षणाला विशेष महत्त्व दिले जाते. कार्यशाळा, प्रयोगशाळा, इंटर्नशिप, उद्योगभेटी आणि प्रोजेक्ट-आधारित शिक्षण यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो. हा अनुभव त्यांच्या ज्ञानाला अधिक सखोल आणि उपयोगी बनवतो. उदाहरणार्थ, केवळ सिद्धांत शिकण्याऐवजी एखादा विद्यार्थी प्रत्यक्ष उद्योगात काम करून उत्पादन प्रक्रिया समजून घेतो, तेव्हा त्याला त्या विषयाचे खरे आकलन होते. कौशल्याधारित शिक्षणाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हे शिक्षण उद्योगाच्या गरजांशी सुसंगत असते. आजच्या स्पर्धात्मक युगात कंपन्यांना केवळ पदवीधारक कर्मचारी नको असतात, तर त्यांना काम करण्यासाठी तत्पर आणि कुशल कर्मचारी हवे असतात. या गरजांचा विचार करून अभ्यासक्रम तयार केले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार मिळवणे अधिक सुलभ होते.

याशिवाय, कौशल्याधारित शिक्षण उद्योजकतेला चालना देते. विद्यार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि आत्मविश्वास प्राप्त होतो. लघुउद्योग, स्टार्टअप्स आणि स्वयंरोजगार यांसारख्या क्षेत्रांत नवीन संधी निर्माण होतात. त्यामुळे रोजगारनिर्मितीला गती मिळते आणि आर्थिक विकासाला चालना मिळते. कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची भावना निर्माण होते. ते स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून नवीन संधी शोधू लागतात. त्यांना अपयशाला सामोरे जाण्याची आणि त्यातून शिकण्याची क्षमता विकसित होते. हीच क्षमता त्यांना जीवनात यशस्वी बनवते.

या शिक्षण पद्धतीच्या अंमलबजावणीत काही अडचणी देखील आहेत. सर्व शैक्षणिक संस्थांकडे आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता जाणवते. अनेक वेळा उद्योग आणि शिक्षण यामधील

समन्वय पुरेसा प्रभावी नसतो. या अडचणी दूर केल्यास कौशल्याधारित शिक्षण अधिक प्रभावी ठरू शकते. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत एक क्रांतिकारी बदल घडवून आणणारे धोरण आहे. या धोरणात शिक्षण अधिक समावेशक, लवचिक आणि कौशल्याधारित करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. पारंपरिक शिक्षण प्रणालीतील त्रुटी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना अधिक व्यवहार्य आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्याचा प्रयत्न या धोरणातून केला गेला आहे. या धोरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना लहान वयातच कौशल्यांची ओळख करून देणे. सहावी इयत्तेपासून व्यावसायिक शिक्षणाची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि क्षमतांनुसार विविध क्षेत्रांमध्ये अनुभव घेण्याची संधी मिळते. अशा प्रकारे शिक्षण अधिक प्रयोगशील आणि अनुभवाधारित बनते.

इंटर्नशिप आणि प्रशिक्षणाला या धोरणात विशेष महत्त्व दिले गेले आहे. विद्यार्थ्यांना उद्योग, कारखाने, सेवा क्षेत्र यामध्ये प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली जाते. यामुळे त्यांना वास्तव जीवनातील समस्यांचा सामना करण्याचा अनुभव मिळतो. तसेच त्यांच्या कौशल्यांचा विकास अधिक प्रभावीपणे होतो.बहुविषयक शिक्षण हा NEP 2020 चा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. विद्यार्थ्यांना एकाच वेळी विविध विषयांचा अभ्यास करण्याची संधी दिली जाते. उदाहरणार्थ, विज्ञान शाखेतील विद्यार्थी कला किंवा व्यवस्थापन विषयांचा अभ्यास करू शकतो. यामुळे त्यांचे ज्ञान व्यापक होते आणि त्यांची कौशल्ये विविधांगी बनतात.

डिजिटल शिक्षणावरही या धोरणात विशेष भर दिला आहे. ऑनलाइन शिक्षण, ई-लर्निंगप्लॅटफॉर्म, डिजिटल साधने यांचा वापर वाढवून शिक्षण अधिक सुलभ आणि प्रभावी बनवले जात आहे. विशेषतः कोविड-19 नंतर डिजिटल शिक्षणाचे महत्त्व अधिक वाढले आहे. या धोरणामुळे शिक्षण आणि उद्योग यामधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. उद्योग क्षेत्राशी सहकार्य वाढवून अभ्यासक्रम अधिक व्यावहारिक आणि रोजगाराभिमुख बनवले जात आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण केल्यानंतर लगेचच रोजगार मिळण्याची शक्यता वाढते.

या धोरणाच्या अंमलबजावणीत काही आव्हाने आहेत. ग्रामीण भागात डिजिटल सुविधा कमी आहेत. शिक्षकांना नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच सर्व स्तरांवर या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे ही एक मोठी जबाबदारी आहे.कौशल्याधारित शिक्षणाचा रोजगारावर अत्यंत सकारात्मक आणि दूरगामी परिणाम दिसून येतो. या शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना उद्योगाच्या गरजेनुसार प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे ते रोजगारासाठी अधिक तयार आणि सक्षम बनतात. पारंपरिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत कौशल्याधारित शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळवणे अधिक सोपे होते.रोजगारक्षमतेत वाढ हा या शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा परिणाम आहे. विद्यार्थ्यांकडे आवश्यक तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्ये असल्यामुळे कंपन्यांना त्यांची निवड करणे सोपे जाते. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

उद्योजकतेला चालना मिळणे हा देखील एक महत्त्वाचा परिणाम आहे. अनेक विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहित होतात. स्टार्टअप्स, लघुउद्योग आणि स्वयंरोजगार यांसारख्या क्षेत्रांत नवीन संधी निर्माण होतात. यामुळे केवळ स्वतःचा रोजगारच निर्माण होत नाही, तर इतरांसाठीही रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. कामगारांची उत्पादकता वाढणे हा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. कौशल्यपूर्ण कामगार अधिक कार्यक्षमतेने काम करतात. त्यामुळे उत्पादन वाढते आणि उद्योगांची कार्यक्षमता सुधारते. याचा थेट परिणाम देशाच्या आर्थिक विकासावर होतो.काही मर्यादा आणि अडचणी देखील दिसून येतात. ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची कमतरता असल्यामुळे कौशल्याधारित शिक्षणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता ही देखील एक मोठी समस्या आहे. अनेक वेळा अभ्यासक्रम आणि उद्योगाच्या गरजा यामध्ये तफावत आढळते.

तसेच, काही विद्यार्थी अजूनही पारंपरिक शिक्षण पद्धतीकडे अधिक आकर्षित होतात. त्यामुळे कौशल्याधारित शिक्षणाचा पूर्ण लाभ सर्वांपर्यंत पोहोचत नाही. या अडचणी दूर करण्यासाठी सरकार, शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांचा समन्वय आवश्यक आहे. एकूणच, कौशल्याधारित शिक्षणामुळे रोजगारनिर्मिती वाढते, बेरोजगारी कमी होते आणि आर्थिक विकासाला चालना मिळते. योग्य नियोजन आणि अंमलबजावणी केल्यास ही शिक्षण पद्धती देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

**निष्कर्ष –**

कौशल्याधारित शिक्षण हे आधुनिक अर्थव्यवस्थेच्या गरजांनुसार अत्यंत महत्त्वाचे ठरते. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात रोजगार निर्मिती ही एक मोठी समस्या आहे. पारंपरिक शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्यांचा अभाव राहतो, ज्यामुळे शिक्षित बेरोजगारी वाढते.राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 या समस्येवर प्रभावी उपाय म्हणून कौशल्याधारित शिक्षणाला प्राधान्य देते. या धोरणामुळे विद्यार्थ्यांना लहान वयातच विविध कौशल्यांची ओळख करून दिली जाते आणि त्यांना उद्योगाशी जोडले जाते.

कौशल्याधारित शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी वाढतात, उद्योजकतेला चालना मिळते आणि आर्थिक विकासाला गती मिळते. तथापि, या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पायाभूत सुविधा, प्रशिक्षित शिक्षक आणि उद्योग-शिक्षण समन्वय यावर अधिक भर देणे आवश्यक आहे.कौशल्याधारित शिक्षण हे भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी आणि रोजगार निर्मितीसाठी एक महत्त्वपूर्ण साधन आहे.

**संदर्भ सूची –**

1. भारत सरकार राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली, 2020
2. जे. सी. अग्रवाल, Development and Planning of Modern Education शिप्रा पब्लिकेशन्स, नवी दिल्ली,2010
3. आर. के. शर्मा – Indian Society – अटलांटिक पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्यूटर्स – नवी दिल्ली, 2015
4. विश्व बँक Education and Skill Development Report – वर्ल्ड बँक पब्लिकेशन्स, 2019
5. UNESCO Global Education Monitoring Report – UNESCO पब्लिशिंग, 2020
6. भारत सरकार Skill India Mission Report – कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली 2015
7. NSDC – Skill Development Report – NSDC प्रकाशन विभाग 2020
8. ILO – World Employment Report – ILO पब्लिकेशन्स,2018
9. अमर्त्य सेन – Development as Freedom – ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस न्यूयॉर्क,1999
10. जीन द्रेज – An Uncertain Glory – प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेसप्रिन्स्टन,2013

ISSN : 2278-9308
February 2026

# उच्च शिक्षणाचे मूलभूत तत्त्वे आणि त्यांचा व्यावहारिक प्रभाव

**गणेश रमेशराव टाके**
संशोधक विद्यार्थी अर्थशास्त्र विभाग श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती

**सारांश (Abstract)**

उच्च शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे माध्यम नसून व्यक्तिमत्व विकास, सामाजिक प्रगती आणि राष्ट्रीय विकासाचा पाया आहे. या संशोधनपर लेखात उच्च शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांचा अभ्यास करून त्यांच्या व्यावहारिक प्रभावाचे विश्लेषण करण्यात आले आहे. गुणवत्ता, समता, स्वायत्तता, संशोधनाभिमुखता आणि कौशल्यविकास ही तत्त्वे विद्यार्थ्यांच्या जीवनावर आणि समाजावर कसा परिणाम करतात यावर चर्चा केली आहे.

**प्रस्तावना (Introduction)**

शिक्षण ही मानवी प्रगतीची गुरुकिल्ली आहे, आणि 'उच्च शिक्षण' हे त्या प्रगतीचे सर्वोच्च शिखर आहे. केवळ पदवी मिळवणे म्हणजे उच्च शिक्षण नव्हे, तर बौद्धिक प्रगल्भता, नैतिक अधिष्ठान आणि समाजोपयोगी कौशल्ये आत्मसात करणे म्हणजे खरे शिक्षण होय. जागतिकीकरणाच्या युगात उच्च शिक्षणाची तत्त्वे बदलत असली, तरी त्यांची मूळ चौकट आजही तितकीच प्रसंगोचितआहे.आजच्या जागतिकीकरणाच्या युगात उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली आहे. उच्च शिक्षण संस्था केवळ पदवी प्रदान करणाऱ्या संस्था नसून त्या ज्ञाननिर्मिती, नवकल्पना आणि सामाजिक परिवर्तनाचे केंद्र आहेत. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांचे आकलन आवश्यक आहे.

**उच्च शिक्षणाची मूलभूत तत्त्वे (Fundamental Principles of Higher Education)**

- **गुणवत्ता (Quality Education) :** उच्च शिक्षणात गुणवत्ता ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, संशोधन आणि मूल्यांकन यामध्ये उत्कृष्टता राखणे आवश्यक आहे.
- **समता आणि सर्वसमावेशकता (Equity and Inclusiveness) :** प्रत्येक विद्यार्थ्याला, त्याच्या सामाजिक, आर्थिक किंवा भौगोलिक पार्श्वभूमीची पर्वा न करता, उच्च शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे.
- **स्वायत्तता (Autonomy) :** शैक्षणिक संस्थांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची मुभा दिल्यास नवकल्पना आणि गुणवत्तावाढ साध्य होते.
- **संशोधन व नवोपक्रम (Research and Innovation) :** ज्ञाननिर्मिती ही उच्च शिक्षणाची मुख्य भूमिका आहे. संशोधनामुळे नवीन तंत्रज्ञान, उपाय आणि कल्पना विकसित होतात.
- **कौशल्याधारित शिक्षण (Skill-Based Education) :** विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी केवळ सैद्धांतिक नव्हे तर व्यावहारिक कौशल्ये देणे आवश्यक आहे.
- **वैचारिक स्वातंत्र्य (Academic Freedom) :** उच्च शिक्षणाचे सर्वात पहिले तत्त्व म्हणजे मुक्त विचार करण्याची संधी. संशोधक आणि विद्यार्थ्यांना कोणत्याही दबावाशिवाय नवीन विचार मांडण्याचे स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे.
- **सत्याचा शोध (Search for Truth) :** शिक्षणाचे मुख्य ध्येय तथ्यांची पडताळणी करणे आणि सत्यापर्यंत पोहोचणे हे आहे. हे विज्ञानापासून समाजशास्त्रापर्यंत सर्वच क्षेत्रांत लागू होते.
- **सर्वांगीण विकास (Holistic Development) :** विद्यार्थ्याचा केवळ बौद्धिक विकास न होता त्याचा मानसिक, शारीरिक आणि नैतिक विकास होणे हे उच्च शिक्षणाचे ध्येय आहे.
- **सामाजिक उत्तरदायित्व (Social Responsibility) :** मिळवलेले ज्ञान समाजाच्या कल्याणासाठी वापरणे हे उच्च शिक्षणाचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे.

**व्यावहारिक प्रभाव (Practical Impact of These Principles)**

- **विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर प्रभाव :** गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, विचारशक्ती आणि निर्णयक्षमता वाढते.
- **रोजगाराच्या संधी वाढवणे :** कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थी उद्योग क्षेत्रासाठी तयार होतात आणि रोजगाराच्या संधी वाढतात.
- **सामाजिक समता प्रस्थापित करणे :** समावेशक शिक्षण धोरणामुळे समाजातील दुर्बल घटकांना प्रगतीची संधी मिळते.
- **आर्थिक विकासाला चालना :** संशोधन व नवोपक्रमामुळे उद्योग, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्था मजबूत होते.
- **जागतिक स्पर्धात्मकता वाढवणे :** उच्च दर्जाचे शिक्षण देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक बनवते.

- **आर्थिक प्रभाव आणि रोजगारक्षमता :** उच्च शिक्षण व्यक्तीच्या उत्पन्नाची क्षमता वाढवते. विशेषतः तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी विस्तारतात. आधुनिक अर्थव्यवस्थेत 'Knowledge Economy' ला महत्त्व असल्याने उच्च शिक्षित मनुष्यबळ देशाचा GDP वाढवण्यास मदत करते.

**आर्थिक प्रभाव आणि सांख्यिकी विश्लेषण**

उच्च शिक्षणाचा आर्थिक विकासाशी थेट संबंध आहे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार, उच्च शिक्षणाचे एक अतिरिक्त वर्ष व्यक्तीच्या सरासरी उत्पन्नात**१०% ते १५%**वाढ करू शकते.

**शिक्षण आणि उत्पन्न:**भारतात पदवीधरांचे सरासरी उत्पन्न हे केवळ माध्यमिक शिक्षण घेतलेल्या व्यक्तींपेक्षा**२.४ पट**अधिक असल्याचे दिसून येते.

**संशोधन आणि विकास (R&D) गुंतवणूक:**विकसित देश त्यांच्या GDP च्या**२.५% ते ३%**हिस्सा संशोधनावर खर्च करतात (उदा. अमेरिका, इस्रायल), तर भारताचा हा खर्च सध्या साधारण**०.७% ते ०.८%**दरम्यान आहे. हा खर्च वाढवल्यास उच्च शिक्षणातून मिळणारा आर्थिक परतावा अधिक वाढतो.

- **नाविन्यपूर्ण संशोधन आणि तंत्रज्ञान (R&D) :** विद्यापीठांमध्ये होणारे संशोधन व्यावहारिक जगात क्रांती घडवून आणते. उदाहरणार्थ, आरोग्य क्षेत्रातील नवीन औषधे किंवा माहिती तंत्रज्ञानातील प्रगती ही उच्च शिक्षणाच्या मूलभूत संशोधनाचाच परिणाम आहे.
- **लोकशाही मूल्यांचे संवर्धन :** उच्च शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये 'चिकित्सक विचार' (Critical Thinking) करण्याची क्षमता निर्माण होते. नागरिक जेव्हा सुशिक्षित असतात, तेव्हा ते राजकीय प्रक्रियेत अधिक चांगल्या प्रकारे सहभाग घेतात, ज्यामुळे लोकशाही अधिक बळकट होते.
- **सामाजिक परिवर्तन आणि समता :** शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. उपेक्षित घटकांना उच्च शिक्षणाची संधी मिळाल्यास सामाजिक दरी कमी होण्यास मदत होते. हे 'Social Mobility' साठी अत्यंत आवश्यक आहे.

**सद्यस्थितीतील आव्हाने**

जरी उच्च शिक्षणाचे अनेक फायदे असले, तरी आजच्या काळात काही आव्हाने समोर उभी आहेत:

- **व्यापारीकरण:**शिक्षणाचे बाजारीकरण झाल्यामुळे गुणवत्तेवर परिणाम होत आहे.
- **कौशल्यांची कमतरता (Skill Gap):**पदवी असूनही उद्योगांना हवे असलेले कौशल्य विद्यार्थ्यांकडे नसते.
- **डिजिटल दरी:**ग्रामीण आणि शहरी भागातील संसाधनांची उपलब्धता असमान आहे.
- शिक्षणातील असमानता
- निधीची कमतरता
- अभ्यासक्रम आणि उद्योग यामधील अंतर
- संशोधनासाठी अपुरी साधने

**बेरोजगारीचा दर (Unemployment Statistics) :**'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' (CMIE) आणि 'इंडिया स्किल्सरिपोर्ट' नुसारखालीलनिरीक्षणे नोंदवली गेली आहेत:

- **रोजगारक्षमता (Employability):**भारतातील एकूण पदवीधरांपैकी केवळ**४५% ते ५०%**विद्यार्थी प्रत्यक्ष नोकरीसाठी पात्र (Employable) असतात.
- **शाखानिहायबेरोजगारी:**विशेषतः कला आणि वाणिज्य शाखेतील पदवीधरांमध्येबेरोजगारीचा दर तांत्रिक शाखांच्या तुलनेत अधिक आहे. इंजिनिअरिंगपदवीधरांमध्येही केवळ**४८%**विद्यार्थी उद्योगांच्या गरजा पूर्ण करू शकतात.
- **शैक्षणिक गुणवत्तेचे सर्वेक्षण :** ASHE (All India Survey on Higher Education): या सर्वेक्षणानुसार, शिक्षकांचे प्रमाण (Student-Teacher Ratio) आणि संशोधनाची कमतरता हे गुणवत्तेसमोरील मोठे अडथळे आहेत.
- **NITI Aayogअहवाल:**उच्च शिक्षणात 'Critical Thinking' ऐवजी 'Rote Learning' (गोखलेगिरी) वर भर दिला जात असल्याने व्यावहारिक कौशल्ये विकसित होत नाहीत.

**नवीन शैक्षणिक धोरण (NEP 2020) आणि उच्च शिक्षण**

भारताच्या संदर्भात, नवीन शैक्षणिक धोरण उच्च शिक्षणाच्या तत्त्वांना व्यावहारिकतेशी जोडण्याचा प्रयत्न करत आहे. यात 'Multidisciplinary' (बहुविद्याशाखीय) शिक्षणावर भर देण्यात आला आहे, जेणेकरून विद्यार्थी केवळ एकाच विषयात न अडकता सर्वांगीण विकास करू शकेल.

- **नवीन शैक्षणिक धोरण (NEP 2020) आणि व्यावहारिक बदल: NEP 2020 मुळे उच्च शिक्षणाची चौकट मुळापासून बदलली आहे. याचे प्रमुख व्यावहारिक पैलू खालीलप्रमाणे आहेत:**
- **अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स (ABC)**

हे उच्च शिक्षणातील सर्वात क्रांतिकारी पाऊल आहे.

- **कार्यपद्धती:**विद्यार्थी ज्या विषयांचे शिक्षण घेतील, त्यांचे 'क्रेडिट्स' एका डिजिटल लॉकरमध्ये (ABC) जमा होतील.
- **व्यावहारिक फायदा:**समजा एखाद्या विद्यार्थ्याला कौटुंबिक कारणामुळे दुसऱ्या वर्षी शिक्षण सोडावे लागले, तर त्याचे क्रेडिट्स सुरक्षित राहतील. तो काही वर्षांनी पुन्हा तिसऱ्या वर्षात प्रवेश घेऊ शकतो. यामुळे शिक्षणातील**'गळती' (Dropout)**कमी होण्यास मदत होईल.
- **मल्टिपलएन्ट्री आणि एक्झिट (Multiple Entry & Exit)**
- **१ वर्ष पूर्ण:**सर्टिफिकेट (Certificate)
- **२ वर्षे पूर्ण:**डिप्लोमा (Diploma)
- **३/४ वर्षे पूर्ण:**पदवी (Degree/Honors) यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात नाही आणि त्यांना त्यांच्या गरजेनुसार कौशल्ये आत्मसात करता येतात.
- **व्यावसायिक शिक्षण (Vocational Integration)**

उच्च शिक्षणात आता इंटर्नशिप अनिवार्य करण्यात आली आहे. पदवीच्या शेवटच्या वर्षात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगांमध्ये काम करण्याचा अनुभव घ्यावा लागेल, ज्यामुळे**'Skill Gap'**कमी होण्यास मदत होईल.

**उपाययोजना (Recommendations)**

- शिक्षणात तंत्रज्ञानाचा अधिक वापर
- उद्योग-शिक्षण संस्थांमध्ये सहकार्य वाढवणे
- संशोधनासाठी आर्थिक सहाय्य वाढवणे
- ग्रामीण आणि दुर्बल भागात शिक्षण सुविधा सुधारणे

**निष्कर्ष (Conclusion)**

उच्च शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांचे योग्य अंमलबजावणी केल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो आणि समाज तसेच राष्ट्राची प्रगती साध्य होते. त्यामुळे गुणवत्ता, समता, स्वायत्तता आणि संशोधन यांना प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ (References)**

1. उच्च शिक्षण धोरण अहवाल
2. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP)
3. विविध संशोधन लेख आणि शैक्षणिक जर्नल्स
4. भारत सरकार, "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०".
5. युनेस्को (UNESCO) अहवाल - "Higher Education in the 21st Century".
6. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आयोग अहवाल (१९४८-४९).
7. आधुनिक शिक्षणशास्त्रातील विविध शोधनिबंध आणि जर्नल्स.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# उच्च प्राथमिक शाळांमधील आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपारिक अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणूकीवर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास

**श्री. सुरेश उकंडा शिंगणे**
संशोधक विद्यार्थी :-, Ph.D Scholar, शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा, 443001. भ्रमणध्वनी 9637066404 ईमेल sshingne88@gmail.com
**प्रा. डॉ. अनिल देवराव वरघट**
संशोधक मार्गदर्शक :-, शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा, 443001. भ्रमणध्वनी 9890092249 ईमेल awarghat98@gmail.com

**सारांश :-**

सध्याच्या माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन होत आहे. पारंपरिक अध्यापन पद्धतीसोबतच आभासी अध्ययन (Virtual Learning) पद्धतीचा वापर वाढत आहे. विशेषतः कोविड-19 महामारीच्या काळात शाळा बंद असतानाही शिक्षण प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी ऑनलाइन व आभासी शिक्षण प्रणालीचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला. या पार्श्वभूमीवर “उच्च प्राथमिक शाळांमधील आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपारिक अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीवर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास” हे संशोधन करण्यात आले. या संशोधनामध्ये प्रायोगिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे उच्च प्राथमिक शाळांमधील पारंपरिक अध्ययन पद्धती आणि आभासी अध्ययन पद्धतीचे स्वरूप समजून घेणे, आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार करणे, आभासी व पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीचा अभ्यास करणे आणि या दोन्ही पद्धतींच्या परिणामांची तुलनात्मक तपासणी करणे ही होती. संशोधनासाठी प्रायोगिक गट आणि नियंत्रित गट असे दोन गट निवडण्यात आले. देऊळगाव राजा तालुक्यातील 20 शाळांमधील इयत्ता आठवीचे 40 विद्यार्थी प्रायोगिक गट म्हणून निवडण्यात आले, तर सिंदखेड राजा तालुक्यातील 20 शाळांमधील इयत्ता आठवीचे 40 विद्यार्थी नियंत्रित गट म्हणून निवडण्यात आले. संशोधनासाठी निरीक्षण सूची, प्रश्नावली, पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी ही साधने वापरण्यात आली.

संशोधनाच्या पहिल्या टप्प्यात दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांची 20 गुणांची पूर्व चाचणी घेऊन त्यांच्या पूर्वज्ञानाची पातळी निश्चित करण्यात आली. पूर्व चाचणीच्या निकालांवरून दोन्ही गटांच्या ज्ञानपातळीत विशेष फरक नसल्याचे स्पष्ट झाले. संशोधनाच्या दुसऱ्या टप्प्यात प्रायोगिक गटासाठी संशोधकाने आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार केले. या प्रतिमानामध्ये इयत्ता आठवीसाठी असलेल्या एन.एम.एम.एस. परीक्षेतील मानसिक क्षमता चाचणीतील चार घटकांचा समावेश करण्यात आला. या घटकांमध्ये लयबद्ध मांडणी, त्रिकोणांची संख्या मोजणे, सांकेतिक भाषा आणि रांगेतील स्थान यांचा समावेश होता. प्रायोगिक गटासाठी या घटकांचे अध्यापन इंटरनेट व Zoom मोबाईल □प्लिकेशनच्या माध्यमातून आभासी वर्गखोलीच्या स्वरूपात करण्यात आले. अध्यापन प्रक्रियेत दृक-श्राव्य साधने, सादरीकरणे, प्रश्नोत्तर पद्धती व संवादात्मक उपक्रमांचा वापर करण्यात आला. त्याच दिवशी नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांना याच घटकांचे अध्यापन पारंपरिक पद्धतीने वर्गखोलीत प्रत्यक्षरित्या अध्यापन करण्यात आले. संशोधनाच्या तिसऱ्या टप्प्यात अध्यापन पूर्ण झाल्यानंतर दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांची 20 गुणांची उत्तर चाचणी घेण्यात आली. उत्तर चाचणीमध्ये प्रायोगिक गटाचे शेकडा प्रमाण नियंत्रित गटांतील शेकडा प्रमाणापेक्षा 21.25 ने जास्त आढळून आले. तसेच सरासरी गुणांमध्येही प्रायोगिक गटाची सरासरी नियंत्रित गटाच्या सरासरीपेक्षा 4.30 ने जास्त असल्याचे दिसून आले. या निष्कर्षांवरून आभासी अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीवर सकारात्मक व लक्षणीय परिणाम झाल्याचे स्पष्ट झाले. म्हणजेच आभासी अध्ययन पद्धती विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीस अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे भविष्यात शिक्षण अधिक परिणामकारक करण्यासाठी पारंपरिक अध्यापन पद्धतीसोबत आभासी अध्ययन पद्धतीचा समन्वय साधणे आवश्यक आहे.

**संशोधनाचे शीर्षक :-**

“उच्च प्राथमिक शाळांमधील आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपारिक अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणूकीवर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास”

**संशोधन पद्धती :-** प्रायोगिक संशोधन पद्धती

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. उच्च प्राथमिक शाळांमधील पारंपरिक अध्ययन पद्धती आणि आभासी अध्ययन पद्धतीचे स्वरूप समजून घेणे.
2. उच्च प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार करणे.
3. आभासी अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीचा शोध घेणे.
4. पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीचा शोध घेणे.
5. आभासी अध्ययन पद्धती व पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान- संपादणुकीवर होणाऱ्या परिणामांची तुलना करणे

**संशोधन नमुना :-**

**प्रायोगिक गट-** देऊळगाव राजा तालुक्यातील 20 शाळांमधील इयत्ता आठवीचे 40 विद्यार्थी

**नियंत्रित गट-** सिंदखेड राजा तालुक्यातील 20 शाळांमधील इयत्ता आठवीचे 40 विद्यार्थी

**संशोधनाची साधने :-** निरीक्षण सूची, प्रश्नावली, पूर्व चाचणी, उत्तर चाचणी.

**संशोधनाची गृहीतके :-**

1. आभासी अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत वाढ होण्याची शक्यता आहे.
2. आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत फरक आढळून येण्याची शक्यता आहे.

**संशोधनाची परिकल्पना :-**

आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत कोणताही लक्षणीय फरक आढळूत नाही.

**पारंपरिक अध्ययन :-**

पारंपरिक अध्ययन म्हणजे शिक्षणाची अशी पद्धती ज्यामध्ये शिक्षक हा अध्यापन प्रक्रियेचा केंद्रबिंदू असतो आणि विद्यार्थी प्रामुख्याने शिक्षकांकडून दिलेले ज्ञान ऐकून, वाचून व लिहून आत्मसात करतात. या पद्धतीत अध्यापन मुख्यतः वर्गखोलीत प्रत्यक्ष (face-to-face) पद्धतीने केले जाते. शिक्षक फळा, खडू, पाठ्यपुस्तक, वही इत्यादी साधनांचा वापर करून विषय समजावून सांगतात.

या पद्धतीमध्ये शिक्षक व्याख्यान देतात, उदाहरणे स्पष्ट करतात आणि विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांच्या समजुतीची पडताळणी करतात. विद्यार्थ्यांचे ज्ञान प्रामुख्याने पाठांतर, सराव, गृहपाठ आणि लेखी परीक्षांद्वारे तपासले जाते. पारंपरिक अध्ययन पद्धतीमुळे वर्गात शिस्तबद्ध वातावरण राहते आणि विद्यार्थ्यांना मूलभूत संकल्पना स्पष्टपणे समजण्यास मदत होते.

**आभासी अध्ययन :-**

आभासी अध्ययन ही संगणक व नेटवर्क प्रणालीवर आधारित विद्यार्थी व शिक्षक यांच्यात संवाद साधण्यासाठी वास्तवभासी वर्गखोलीसारखे वातावरण निर्माण करणारी एक शिक्षण प्रक्रिया आहे. या वर्ग खोलीत ई-लर्निंग तंत्राच्या सहाय्याने विद्यार्थ्यांसाठी अध्यापन केले जाते. इंटरनेट व zoom मोबाईल अप्लिकेशन च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिक्षण अध्ययन घडवून आणण्यासाठी राबवलेली ही एक व्यवस्था आहे.

आभासी अध्ययनाचे अनेक फायदे आहेत. सर्वप्रथम, विद्यार्थी घरबसल्या सुरक्षित आणि सोयीस्कर वातावरणात शिक्षण घेऊ शकतात. ग्रामीण किंवा दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळू शकते. दुसरे म्हणजे, विद्यार्थ्यांना आपल्या गतीने शिकण्याची संधी मिळते. अवघड विषयाचे व्हिडिओ पुन्हा-पुन्हा पाहता येतात, नोट्स डाउनलोड करता येतात आणि शंका ऑनलाइन विचारता येतात. तसेच, डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संगणक साक्षरता, तांत्रिक कौशल्ये आणि स्वयंअध्ययनाची सवय विकसित होते.

कोविड-19 महामारीच्या काळात आभासी अध्ययनाचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवले. शाळा व महाविद्यालये बंद असतानाही ऑनलाइन वर्गांच्या माध्यमातून शिक्षण सुरू ठेवणे शक्य झाले. त्यामुळे शिक्षणाची प्रक्रिया पूर्णपणे थांबली नाही. शिक्षकांनीही डिजिटल साधनांचा वापर करून नवे अध्यापन तंत्र आत्मसात केले.

तथापि, आभासी अध्ययनाला काही मर्यादाही आहेत. सर्व विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन, संगणक किंवा इंटरनेटची सुविधा नसते. दीर्घकाळ स्क्रीनसमोर बसल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो आणि आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. प्रत्यक्ष वर्गातील सामाजिक संवाद, खेळ, समूहकार्य आणि शारीरिक हालचाली यांचा अभाव जाणवतो. तसेच, काही विद्यार्थ्यांना स्वतःहून अभ्यास करण्याची शिस्त राखणे कठीण जाते.

या अडचणी असूनही, आभासी अध्ययन हे भविष्यकालीन शिक्षणाचे महत्त्वाचे अंग ठरणार आहे. पारंपरिक शिक्षण आणि आभासी शिक्षण यांचा समन्वय साधल्यास अधिक प्रभावी शिक्षणप्रणाली तयार होऊ शकते. शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांनी मिळून डिजिटल शिक्षणाचा योग्य वापर केल्यास ज्ञानप्राप्ती अधिक सुलभ, आकर्षक आणि व्यापक होईल.

**आभासी अध्ययनासाठी विद्यार्थ्यांकडे आवश्यक साहित्य :-**

1. मोबाईल फोन, किंवा टॅबलेट.
2. इंटरनेट कनेक्शन.
3. हेडफोन / माईक – आवाज स्पष्ट ऐकविण्यासाठी
4. पॉवर बॅकअप ( पॉवर बँक ) – वीज खंडित झाल्यास.

**विद्यार्थ्यांच्या अडचणी :-**

1. मोबाईल / टॅबलेटची अनुपलब्धता
2. नेटवर्क व इंटरनेटची समस्या
3. अनियमित वीजपुरवठा
4. अभ्यासासाठी योग्य वातावरणाचा अभाव
5. पालकांची शैक्षणिक व तांत्रिक मदत नसणे
6. आर्थिक अडचणीमुळे डिजिटल साधने व डेटा रिचार्ज न परवडणे

विद्यार्थ्यांच्या वरील समस्या असल्या तरी पालकांशी संवाद करून सदर विद्यार्थ्यांना संशोधन कार्य सुरु असेपर्यंत मोबाईल उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

**संशोधनाची कार्यवाही :-**

पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानाची पातळी तपासण्यासाठी प्रायोगिक आणि नियंत्रित गटाची 20 गुणांची पूर्व चाचणी घेण्यात आली. या चाचणीद्वारे विद्यार्थ्यांच्या विषयासंबंधीच्या विद्यमान ज्ञान-संपादणूकीचा स्तर निश्चित करण्यात आला.

दुसऱ्या टप्प्यात प्रायोगिक गटासाठी संशोधकाने आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार केले. इयत्ता आठवीसाठी असलेल्या एन. एम. एम. एस. परीक्षेतील मानसिक क्षमता चाचणी अध्यापनासाठी एकूण चार घटकावर अध्ययन प्रतिमान तयार केले.

घटक 1 . लयबद्ध मांडणी.
घटक 2 . त्रिकोणांची संख्या मोजणे.
घटक 3 . सांकेतिक भाषा.
घटक 4 . रांगेतील स्थान.

या प्रतिमानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना इंटरनेट व Zoom मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून अध्यापन करण्यात आले. वास्तवभासी वर्गखोलीसारखे वातावरण निर्माण करून ई-लर्निंग तंत्राचा वापर करण्यात आला. अध्यापनादरम्यान प्रश्नोत्तर, दृश्य-श्राव्य साधने, सादरीकरणे व संवादात्मक कृती यांचा समावेश करण्यात आला. या कालावधीत विद्यार्थ्यांचे निरीक्षण करण्यासाठी निरीक्षण सूची वापरण्यात आली. सोबतच नियंत्रित गटासाठी वरील चार घटकांवर पारंपारिक पद्धतीने अध्यापन करण्यात आले.

तिसऱ्या टप्प्यात आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपारिक अध्ययन पद्धतीचा वापर पूर्ण झाल्यानंतर दोन्ही गटातील विद्यार्थ्यांची उपरोक्त चार घटकावर 20 गुणांची उत्तर चाचणी घेण्यात आली. दोन्ही गटातील विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील गुणांची तुलना करून आभासी अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणूकीवर झालेला परिणाम अभ्यासण्यात आला. प्राप्त माहितीचे विश्लेषण करून आभासी अध्ययन पद्धती व पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान- संपादणुकीवर होणाऱ्या परिणामांची तुलना करण्यात आली. यासाठी आवश्यक सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांचे मत व अनुभव जाणून घेण्यासाठी प्रश्नावली वापरण्यात आली. प्राप्त माहितीचे संकलन, वर्गीकरण व विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

**माहितीचे अर्थनिर्वचन :-**

| विवरण | पूर्व चाचणी प्रायोगिक गट (गुण 20) | पूर्व चाचणी नियंत्रित गट (गुण 20) | पूर्व चाचणी फरक | उत्तर चाचणी प्रायोगिक गट (गुण 20) | उत्तर चाचणी नियंत्रित गट (गुण 20) | उत्तर चाचणी फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | 40 | 40 | 00 | 40 | 40 | 00 |
| एकूण गुण | 306 | 312 | - 6 | 596 | 424 | + 172 |
| शेकडा प्रमाण | 38.25 | 39.00 | - 0.75 | 74.50 | 53.00 | +21.25 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सरासरी | 7.65 | 7.80 | - 0.15 | 14.90 | 10.60 | + 4.30 |

प्रायोगिक गट आणि नियंत्रित गटाच्या घेतलेल्या पूर्व चाचणीतील शेकडा प्रमाण आणि सरसरी निकालात फारसा फरक आढळला नाही. परंतु उत्तर चाचणीत प्रायोगिक गट आणि नियंत्रित गटाचा शेकडा प्रमाणातील फरक हा 21.25 आहे आणि सरासरीतील फरक हा 4.30 आहे. या फरकावरून असे लक्षात येते की आभासी अध्ययन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणूकीत सकारात्मक परिणाम दिसून आला.

म्हणून संशोधकाने "आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत कोणताही लक्षणीय फरक आढळूत नाही " ही परिकल्पना फेटाळली आहे.

**निष्कर्ष :-**

1. उच्च प्राथमिक शाळांमधील पारंपरिक अध्ययन पद्धतीमध्ये शिक्षक हा अध्यापन प्रक्रियेचा केंद्रबिंदू असतो आणि अध्यापन मुख्यतः वर्गखोलीत प्रत्यक्ष पद्धतीने फळा, खडू व पाठ्यपुस्तकांच्या सहाय्याने केले जाते, हे या अभ्यासातून स्पष्ट झाले.
2. आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार करून Zoom आणि इंटरनेटच्या सहाय्याने अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांचा सहभाग, समज आणि शिकण्याची गती वाढण्यास मदत होते, असे आढळून आले.
3. आभासी अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत लक्षणीय वाढ झालेली दिसून आली. प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणीत सरासरी 14.90 गुण मिळाले, जे पूर्व चाचणीपेक्षा लक्षणीय जास्त आहेत.
4. आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपरिक अध्ययन पद्धती यांची तुलना करता, आभासी अध्ययन पद्धती अधिक प्रभावी ठरली. उत्तर चाचणीत प्रायोगिक गट व नियंत्रित गटाच्या शेकडा प्रमाणात 21.25 इतका फरक आढळला, त्यामुळे आभासी अध्ययन पद्धती विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीस अधिक परिणामकारक असल्याचे निष्पन्न झाले.

**शिफारशी:-**

1. उच्च प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत वाढ करण्यासाठी पारंपरिक अध्ययन पद्धतीसोबत आभासी अध्ययन पद्धतीचा समन्वयाने वापर करावा. त्यामुळे विद्यार्थ्यांना दृश्य-श्राव्य साधनांच्या माध्यमातून विषय अधिक सोप्या व आकर्षक पद्धतीने समजण्यास मदत होईल.
2. आभासी अध्ययन प्रभावीपणे राबवण्यासाठी शाळांमध्ये इंटरनेट सुविधा, डिजिटल साधने (मोबाईल/टॅबलेट) आणि शिक्षकांना तांत्रिक प्रशिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, ज्यामुळे डिजिटल शिक्षण अधिक परिणामकारकपणे अमलात आणता येईल.

**संदर्भसूची:-**

1. आंबेडकर, एस. बी. (2018). शैक्षणिक तंत्रज्ञान व अध्ययन प्रक्रिया. औरंगाबाद: विद्या प्रकाशन.
2. अँडरसन, टी. (2008). ऑनलाइन शिक्षणाचे सिद्धांत आणि व्यवहार (The Theory and Practice of Online Learning). एडमंटन : अँथाबास्का युनिव्हर्सिटी प्रेस.
3. कुमार, आर., &वर्मा, ए. (2021). आभासी शिक्षणाच्या प्रभावीतेचा आढावा. शिक्षण संशोधन जर्नल, 15(3), 78–92.
4. कुलकर्णी, एस. पी. (2020). शिक्षणातील तंत्रज्ञानाचा वापर: एक सैद्धांतिक दृष्टिकोन. नाशिक: शिक्षण प्रकाशन.
5. जोशी, एम. एस., &देशमुख, आर. के. (2021). आभासी शिक्षण आणि विद्यार्थी सहभाग: एक अभ्यास. भारतीय शिक्षण संशोधन जर्नल, 12(2), 45–58.
6. डॉ. पाटील, ए. एन. (2019). उच्च प्राथमिक शिक्षणातील डिजिटल साधनांचा वापर: संधी व आव्हाने. पुणे: शैक्षणिक संशोधन प्रकाशन.
7. देशपांडे, एस., &कुलकर्णी, आर. (2023). डिजिटल साधनांचा वापर करून शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे. शिक्षण तंत्रज्ञान जर्नल, 8(2), 101–115.
8. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT). (2021). ऑनलाइन व डिजिटल शिक्षण मार्गदर्शक. पुणे : MSCERT.
9. मिश्रा, एस., आणि पांडा, एस. (2020). आभासी अध्ययन आणि ऑनलाइन शिक्षण (Virtual Learning and Online Education). नवी दिल्ली : कॉमनवेल्थ एज्युकेशनल मीडिया सेंटर फॉर एशिया.
10. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT). (2021). शिक्षणामध्ये माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT in Education). नवी दिल्ली : NCERT.

# भारतातील उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाचा अभ्यास

**सुताडे माधव गोविंद**
संशोधन विध्यार्थी :- BSW.,MSW.,SET. जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय,नांदेड.

**सारांश (abstract)**

उच्च शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा कणा असते गेल्या काही दशकात उच्च शिक्षण क्षेत्रात खाजगीकरणाची प्रक्रिया वेगाने वाढली आहे स्वातंत्र्य नंतर भारतात उच्चशिक्षणाची जबाबदारी मुख्यत सरकारने उचलली होती मात्र 1991 च्या आर्थिक धोरणानंतर LPG ( LIBERALIZATION PRIVATATIZATION GLOBALISATION ) शिक्षण क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणावर वाव मिळाला खाजगीकरण म्हणजे शैक्षणिक संस्थाचे व्यवस्थापन मालकी आणि वित्त पुरवठा सरकारी यंत्रणे कडून खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरित करणे होय या संशोधन पत्रिकेत खाजगीकरणाची संकल्पना आणि त्यामागील कारणे फायदे तोटे आणि भारतातील परिस्थिती यांचा अभ्यास करण्यात आला आहे खाजगीकरणामुळे शिक्षणाची गुणवत्ता सुधारली असली तरी सामाजिक विषमता आणि व्यापारीकरण वाढल्याचे दिसून येते त्यामुळे संतुलित धोरणाची गरज अधोरेखित होते

**KEY WORDS:-** उच्च शिक्षण, खाजगीकरण, गुणवत्ता, सामाजिक विषमता, जागतिकीकरण,आणि सरकारी धोरण

**प्रस्तावना :-** उच्च शिक्षण हे आर्थिक विकास सामाजिक परिवर्तन आणि मानवी संसाधनाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे GATS ( GENERAL AGREEMENT ON THE TRADE IN SERVICE ) जागतिक व्यापार संघटनेच्या या करारानुसार शिक्षणाचा समावेश सेवा क्षेत्रात झाला आहे यामुळे परदेशी विद्यापीठांना भारतात गुंतवणूक करणे सोपे झाले आहे 1991 च्या नंतरच्या उदारीकरण खाजगीकरण आणि जागतिकीकरण LPG धोरणामुळे भारतातील शिक्षण क्षेत्रात मोठे बदल झाले यामुळे खाजगी संस्थांचा सहभाग वाढला.

**खाजगीकरणांची संकल्पना**

खाजगीकरण म्हणजे शिक्षण क्षेत्रातील व्यवस्थापन नियंत्रण आणि आर्थिक जबाबदारी खाजगी संस्थांकडे हस्तांतरण हस्तांतरित करणे होय या प्रक्रियेत खाजगी महाविद्यालय विद्यापीठे आणि तांत्रिक संस्था मोठ्या प्रमाणात कार्यरत असतात.

**खाजगीकरणाची कारणे**

1.सरकारी निधीची कमतरता
2.शिक्षणाची वाढती मागणी
3.जागतिक स्पर्धा
4.व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाची गरज
5.उदारीकरण धोरण

**खाजगीकरणाचे फायदे**

1.आधुनिक तंत्रज्ञान आणि सुविधा
2.गुणवत्तापूर्ण शिक्षण
3.अभ्यासक्रमात लवचिकता
4.रोजगारभिमुख
5.शिक्षण
6.स्पर्धेमुळे कार्यक्षमता वाढ

**खाजगीकरणाचे तोटे**

1.आरक्षणाचा अभाव
2.शिक्षणाचा वाढता खर्च
3.सामाजिक विषमता
4.व्यापारीकरण
5.कल्याणकारी राज्य या संकल्पनेला तडा
6.गरीब विद्यार्थ्यांना मर्यादित संधी
7.गुणवत्तेवर नियंत्रणाचा अभाव

8.प्राध्यापकांचे शोषण

**भारतातील उच्च शिक्षणाचे खाजगीकरण :-**

1990 च्या दशकातील आर्थिक सुधारणा नंतर उदारीकरण खाजगीकरण जागतिकीकरण या प्रक्रियेला वेग आला सध्या सुमारे 65 % पेक्षा जास्त महाविद्यालय खाजगी व्यवस्थापनाद्वारे चालवली जातात 90 च्या दशकातील उदारीकरणानंतर तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणात खाजगी गुंतवणूक वाढली ज्यामुळे शिक्षण महाग झाले आहे खाजगीकरण गुणवत्ता सुधारण्यास मदत करत असली तरी सामाजिक विषमता व आर्थिक असमानता वाढण्याचे आव्हाने निर्माण करत आहे यूजीसी UGC 2019 -2020 च्या माहितीनुसार 1043 विद्यापीठापैकी सुमारे 408 खाजगी विद्यापीठे आहेत महाराष्ट्राचा अनेक राज्यात खाजगी व विनाअनुदानित महाविद्यालय संख्या सर्वाधिक आहे थोडक्यात भारतातील उच्च शिक्षण शिक्षणाच्या विस्तार केला असला तरी शिक्षणाचे समतोल वितरण आणि गुणवत्ता ठिकवणे मोठे आव्हान आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (New education policy 2020 ) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत खाजगी क्षेत्राला अधिक वाव देण्यात आला आहे विदेशी विद्यापीठांना भारतात विद्यापीठे उन्हाळ्याची परवानगी देणे हा याच प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग आहे भारतातील एकूण उच्च शिक्षण संस्थापक सुमारे 70 टक्के जास्त खाजगी संस्था व्यवस्थापन अंतर्गत आहेत व महाराष्ट्र राज्यात भारतातील सर्वात जास्त खाजगी विद्यापीठे 2020 या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत स्थापन करण्यात येत आहेत अनेक विद्यापीठाने महाराष्ट्र राज्यात अनेक ठिकाणी आपली कॅम्पस उघडण्यास सुरुवात केलेली आहे.

सद्यपरिस्थितीत भारतीय उच्च शिक्षणासमोर अनेक आव्हाने आहेत. सर्व शैक्षणिक पातळ्यांवरील असमानता, गुणवत्ता ही त्यातील काही आव्हाने होत. सुरुवातीला उच्च शिक्षणाच्या लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेत खाजगी क्षेत्र योगदान देईल, या विश्वासावर खाजगी क्षेत्राच्या वाढीस प्रोत्साहन देण्यात आले; परंतु आज खाजगी क्षेत्रामुळे आणखी असमानता वाढताना दिसून येत आहे. आज शिक्षणाचा अत्यंत सुमार दर्जा, अपुऱ्या पायाभूत सुविधा, शिक्षकांची अनुपस्थिती, पदभरतीवरील बंदी, भ्रष्टाचार, मोठ्या प्रमाणात शुल्क वाढ दिसून येते. तरीसुद्धा खासगी संस्थांची संख्या अभूतपूर्व वाढत आहे. उच्च शिक्षण मानवी मूल्यनिर्मितीचे साधन न बनता सांस्कृतिक व्यापार बनले आहे. सर्वसामान्य लोक शिक्षणाकडे भौतिक स्वप्नपूर्तीचे साधन म्हणून पाहत आहेत. आजच्या भांडवली व्यवस्थेत या शिक्षणाला चालना दिली जात आहे. यातूनच भारतात उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाची प्रकिया अधिक गतिशील बनत आहे.

**परिणाम ( impact analysis)**

(1) शिक्षणाची उपलब्धता वाढली
(2) नवीन अभ्यासक्रमाची निर्मिती
(3) कौशल्य विकासाला चालना

**नकारात्मक परिणाम**

(1) शिक्षणाचे व्यापारीकरण
(2) सामाजिक न्यायावर परिणाम
(3) गुणवतेतील असमानता

**संशोधनाची उद्दिष्टे ( objectives of the study )**

(1) उच्च शिक्षणातील खाजगीकरणाची संकल्पना समजून घेणे
(2) खाजगीकरणांची कारणे शोधणे
(3) त्यांच्या सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम विश्लेषित करणे
(4) त्यांचे सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे
(5) सुधारणा उपाय सुचवणे

**गृहीतके ( hypothesis )**

(1) खाजगीकरणामुळे उच्च शिक्षण अत्यंत महाग झाले असून त्यामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर मर्यादा आल्या
(2) सरकारी नियंत्रण कमी असल्यामुळे काही खाजगी संस्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्तेपेक्षा नफा कमवण्याला अधिक प्राधान्य दिले जात आहे

(3) उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शैक्षणिक पायाभूत सुविधा आणि तांत्रिक साधनांच्या दर्जात लक्षणीय सुधारणा झाली आहे.

**संशोधन पद्धती ( research methodology)**

प्रस्तुत संशोधन वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीवर आधारित आहे तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे यामध्ये संदर्भग्रंथ,विविध,शासकीय अहवाल,पुस्तके,संशोधन पत्रिका,व विविध संकेतस्थळाचा वापर करण्यात आला आहे

**निष्कर्ष व सूचना**

शिक्षणाचे खाजगीकरण ही काळाची गरज असली तरी त्यावर सरकारची योग्य नियमन (Regulation) असणे अत्यंत आवश्यक आहे

(1) फी नियंत्रण खाजगी संस्थांच्या शुल्लकावर मर्यादा घालण्यासाठी एक पारदर्शक यंत्रणा असावी
(2) शिष्यवृत्ती योजना गरीब हुशार विद्यार्थ्यांसाठी खाजगी संस्थांमध्ये विशेष शिष्यवृत्ती
(3) गुणवत्ता तपासणी NAAC सारख्या संस्थांकडून खाजगी विद्यापीठाची नियमित तपासणी
(4) सरकारने कडक नियमन करावे
(5) आरक्षण संबंधी नियम अमलात आणावेत
(6) ग्रामीण व दुर्बल भागात विद्यापीठे स्थापन करण्यात चालना द्यावी.

उच्च शिक्षणाचे खाजगीकरण हे आधुनिक काळातील अपरिहार्य वास्तव आहे शिक्षणाच्या विस्तारासाठी वरदान ठरू शकेल मात्र त्याचे रूपांतर केवळ नफा करीत होणार नाही याची काळजी घेणे ही शासन आणि समाज या दोघांची जबाबदारी आहे.

**संदर्भसूची**

1.पानसे, र. (n.d.). *आजचे शिक्षण: उद्याचे जीवन*. डायमंड पब्लिकेशन्स.
2.वाघमारे, ज. (n.d.). *बदलते शिक्षण: स्वरूप आणि समस्या*. पद्मगंधा प्रकाशन.
3.धनागरे, द. ना. (2010). *उच्च शिक्षण: ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे*. मुंबई.
4.Gupta, A., Levy, D., & Power, K. B. (2008). *Private higher education: Global trends and Indian perspectives*. Delhi.
5.Shah, M., & Nair, C. (संपा.). (2016). *A global perspective on private higher education*. Kidlington.
6.भारत सरकार, शिक्षण मंत्रालय. (2018). *Higher education: All India and state profile 2017–18*.
7.राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषद (NAAC). (2022). *NAAC report 2022*.
8.महाराष्ट्र शासन. (n.d.). *Higher education report: State of Maharashtra*. पुणे.
9.The Hindu. (2026, जून 18). *Massification of higher education system has triggered*.
10. भारत सरकार. (2020). *National Education Policy 2020*.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# अर्थव्यवस्थेतील उदयोन्मुख क्षेत्र आणि उच्च शिक्षण

आकाश संपतराव ढोमणे
विद्यार्थी ,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

---

**प्रस्तावना**

उदयोन्मुख क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र की जे उद्योग किंवा क्षेत्र नव्याने निर्माण होत आहे किंवा प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे आणि येणाऱ्या भविष्यातील त्या-त्या क्षेत्रांमध्ये वेगाने विकासाची गती आणि मोठ्या संधी निर्माण करणारी क्षेत्र होय. कोणत्याही अर्थव्यवस्थेतील किंवा देशाच्या अंतर्गत असणारे उद्योग सुरुवातीच्या टप्प्यात असून येत्या काही वर्षात वेगाने रोजगाराच्या संधी आणि प्रगती करणाऱ्या क्षेत्रांचा देशाच्या विकासाला आणि विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका असते .

**साधारणतः उदयोन्मुख क्षेत्र ठरवण्याचे काही निकष**

1) ते असे क्षेत्र असावे की जो उद्योग स्थापन केलेला आहे परंतु ते सध्या फार मोठे झाले नाही .
2) सध्या नव्याने स्थापलेले असलेले तरी जवळच्या काळात अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे क्षेत्र बनण्याची अपेक्षा असणारे आहे .

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतर आर्थिक अहवालानुसार अशाही जगातील सर्वात वेगाने वाढणारे बाजारपेठ आणि आर्थिक विकासाचे केंद्र बनत आहे. चीन आणि भारत हे दोन देश मिळून जगाच्या जीडीपी वाढीमध्ये साधारणता 44% योगदान देतील असा अंदाज आयएमएफने दर्शविला आहे. एप्रिल 2015 मध्ये प्रसिद्ध केलेल्या वर्ल्ड इकॉनोमी आउटलूक अहवालात भारत 2025 मध्ये 4.19 ट्रिलियन अमेरिकन डॉलरच्या जीडीपी सह जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनलेली आहे आणि खरेदी क्षमता म्हणजेच परचेसिंग पावर पॅरिटीनुसार भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. भारताच्या वाढत्या विकासदर आणि उद्योन्मुख क्षेत्रासाठी शासनाचे धोरण यांचा परिणाम म्हणून भारतात नवीन बाजारपेठ नव्या गुंतवणुकीच्या संधी त्यासोबत नवीन उपक्रम शोधणाऱ्या विकसित अर्थव्यवस्थेचे भारत हे आर्थिक केंद्रबिंदू बनत आहे. ज्यामुळे इतर क्षेत्रांच्या तुलनेत उदयोन्मुखी क्षेत्राकडे बदललेला कल दिसून येतो .

**जसे अंटक (UNCTAD ) जून 2025** मध्ये जाहीर केलेल्या जागतिक गुंतवणूक अहवाल 2025 नुसार परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणजेच एफ.डी.आय प्राप्त देशांमध्ये भारत 15 व्या स्थानी तर एफ.डी.आय बाहेर प्रवाहामध्ये भारत 18 व्या स्थानी आहे .

स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्था ही सुरुवातीच्या काळात लोकशाही समाजातील आधारित विचार प्रणालीवर आधारित असूनही वेळी मिश्र अर्थव्यवस्थेचे स्वरूप असल्याचे दिसून येते, परंतु 24 जुलै 1991 च्या नवीन आर्थिक धोरणाचा सकारात्मक परिणाम होऊन अर्थव्यवस्थेचा वाढणारा विकासदर त्यासोबतच बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रवाह त्यामुळे त्यासोबत येणारा नाविन्यपूर्ण कौशल्य, शोध, गुंतवणूक, आधुनिक पद्धतीचे तंत्रज्ञान आणि कौशल्यावर आधारित विभिन्न उत्पादन कंपन्या यामुळे उदयोन्मुख क्षेत्राला पोषक असे वातावरण निर्माण झाले. भारतीय अर्थव्यवस्था ही आदेशात्मक अर्थव्यवस्थेपासून ही सुचकात्मक म्हणजेच भांडवलशाहीकडे कल झुकलेली आपल्याला दिसून येते. ज्यामध्ये एलपीजी मॉडेलच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेत ऊर्जा, पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, उत्पादन, अन्नप्रक्रिया आणि अलीकडच्या काळात माहिती तंत्रज्ञान, पर्यटन, शिक्षण या उदयोन्मुख क्षेत्रांचा विकास होताना दिसून येत आहे .

**रोस्टो मॉडेल** ज्यामध्ये अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचे पाच टप्पे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार आज जर पाहीले तर आपल्याला साधारणता तिसरा टप्प्यामध्ये (टेकऑफ) म्हणजेच उद्योग क्षेत्र आणि चौथ्या (ड्राईव्ह मॅच्युरिटी) म्हणजेच सेवा क्षेत्राकडे कल असल्याचे आपल्याला दिसून येते. ज्यानुसार अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी भारताला उत्पादनाचे केंद्र बनवण्याच्या उद्देशाने उदयोन्मुख क्षेत्राकडे लक्ष आणि धोरण निर्मिती करणे हे गरजेचे आहे आणि त्याला अनुसरून सरकार वेगवेगळे धोरणे आणि योजना आखताना दिसून येते, उदाहरणार्थ स्टार्ट अप इंडिया, मेक इन इंडिया , स्टँड अप इंडिया .

भारतीय अर्थव्यवस्थेत आज उद्योन्मुख क्षेत्र म्हणून अन्नप्रक्रिया उद्योग, उत्पादन क्षेत्र, आरोग्य क्षेत्र, शिक्षण, पर्यटन, ज्ञान प्रक्रिया इत्यादी उद्योगाची क्षमता लवचिक असल्याने त्यांचा विकासातील वाटा, प्रगती आणि लक्षणीय

बदल हे अर्थव्यवस्थेत दिसू शकते. परंतु कोणत्याही क्षेत्राला त्याच्या आजच्या परिस्थितीवरून आपण उदयोन्मुख क्षेत्र आहे असे म्हणू शकत, कारण अर्थव्यवस्था ही सतत बदलणारी असून ही दिवसागणिक अजुन गुंतागुंतीची होत आहे, त्यामुळे निश्चित असे कोणतेही क्षेत्र ओळखता येऊ शकत नाही, तरी काही त्यांच्या बदलांच्या क्षमता आणि लवचिकता या आधारावर उदयोन्मुख क्षेत्र खालील असल्याचे दिसून येते .

**कृषी व अन्नप्रक्रिया -**

भारतातील कृषी व अन्न प्रक्रिया उदयोन्मुख उद्योग हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवे आयाम व नवी दिशा देणाऱ्या महत्त्वाचे क्षेत्र बनत आहे. आधुनिक पद्धतीने शेतीतील उत्पादनात प्रक्रिया करून त्याला जागतिक बाजार पेठेपर्यंत पोहोचवण्याचा मुख्य हेतू हा अन्नप्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून होत असल्याचा दिसून येते. शेती आणि उद्योग यामधील दुवा म्हणूनही काम करताना आपल्याला दिसून येतो, तसेच चीन नंतर भारत हा जगातील सर्वात मोठा अन्न उत्पादक देश आहे .

**राष्ट्रीय उत्पादन धोरण 2017** नुसार प्रत्येक शेतकऱ्यांचे दरडोई धरण उत्पादन हे 2022 पर्यंत दुप्पट करण्याचे लक्ष ठेवले होते. त्या अनुषंगाने या क्षेत्राला पूरक असे वातावरण, संशोधन, प्रक्रिया आणि उत्पादनाचे जागतिकीकरणाची संधी आणि शेती उत्पादन वाढवण्यास चालना मिळाली आहे .

भारतातील अन्नप्रक्रिया क्षेत्राने गेल्या दशकामध्ये विशेषता परकीय थेट गुंतवणुकीत एप्रिल 2019 डिसेंबर 2024 पर्यंत यामध्ये एकूण 13.01 अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक मिळाली त्यातही विशेष म्हणजे 2014 ते 2024 या कालावधीत सुमारे सात अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक अन्नप्रक्रिया उद्योगांमध्ये झालेले आहे आणि सध्या एकूण अन्न बाजारपेठेत त्याचा वाटा 32% आहे यावरून लक्षात येते की आगामी काळात उत्पादन वापर निर्यात आणि अपेक्षित वाढते साठी हे क्षेत्र भविष्यात मोठ्या प्रमाणात विकसित होताना दिसेल .

**आरोग्य सेवा आणि औषध निर्माण क्षेत्र**

आरोग्य सेवा क्षेत्रातील आणि औषध निर्माण करण्यात दिवसेंदिवस वाढत जाणारे गुंतवणुकीमुळे हे क्षेत्र वेगाने वाढत आहेत सोबतच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून मानवी आरोग्याची जैवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून देखरेख ठेवले जात आहे. मानव विकास निर्देशांक अहवाल 2025 नुसार भारताचा 130 वा क्रमांक तसेच भारताचे सरासरी आयुर्मान 72 वर्ष हे सुधारलेले स्थान निर्देशित करतात की आरोग्य सेवा तसेच औषध निर्माण क्षेत्रामध्ये होत जाणारे मूलभूत असे बदल त्यासोबतच सरकारच्या वेगवेगळ्या सर्व समावेशी योजनेच्या माध्यमातून उदाहरणार्थ आयुष्यमान भारत योजना यासारख्या योजनाची अंमलबजावणी मुळे आरोग्य सेवेला चालना मिळत आहे .

**पर्यटन**

पर्यटन हे उदयोन्मुख क्षेत्र असून ते बहुआयामी आहे. असा भारतीय अर्थव्यवस्थेतील संधी रोजगार आणि कौशल्य आधारित व्यवसाय मूलभूत अशा प्रकारचा आधार देणारे क्षेत्र म्हणून ओळखल्या जाते. ज्यात विविध निवासी, सेवाभावी धार्मिक स्थळे, पर्यावरण व कृषी पर्यटन त्यासोबतच आज वेगाने वाढत जाणारे वैद्यकीय पर्यटन इत्यादी प्रकारच्या पर्यटनाचा यामध्ये मोलाचा वाटा आहे .

2023 मध्ये भारताच्या जीडीपी मध्ये सुमारे 7.6% वाटा हा पर्यटनाचा होता. ज्यामध्ये अतुल्य भारत "अतिथी देवो भव" यास लोकांचा परकीय पर्यटकांना या क्षेत्रात अधिकाधिक आकर्षित केलेल्या आहेत. तसेच भारतातील विविध पर्यटन स्थळांना भेटी देण्यामध्ये एकूणच 6.43 मिलियन इतक्या वाटा असून परकीय पर्यटकांची संख्या अधिकच वाढत आहे, 2023 या वर्षात 17.611 बिलियन डॉलर्स इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

**शिक्षण**

भारतीय शिक्षण प्रणाली ही आजच्या बदलत्या परिस्थितीनुसार आणि जागतिक करणाच्या युगात भारताला लोकसंख्या लाभांशाचा फायदा मिळवून देणे उच्च शिक्षण प्रणाली ही महत्त्वाची भूमिका बजावते ज्याच्या माध्यमातून धोरणात्मक निर्णय नाविन्यपूर्ण धोरणे (उदाहरणार्थ NEP - 2020) , उपक्रम (उदाहरणार्थ - स्टार्टअप इंडिया) आणि सहकार्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक आणि दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करू शकतो .

**एन ए पी 2020** हे धोरण शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्या सोबतच कौशल्य आधारित शिक्षणाला चालना देऊन विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता , नेतृत्व , कौशल्य निर्माण करण्याचे ही मदत करते .

आज शिक्षण क्षेत्रातील उदयोन्मुख क्षेत्र म्हणून आधुनिक तंत्रज्ञान आणि त्याला अनुसरून असे विविध प्रकारचे शिक्षण उदा. दूर शिक्षण प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कौशल्य आधारित विविध उपक्रम हे उच्च शिक्षणामध्ये राबवले जात आहे . भारतीय एडटेक बाजारपेठ ही 2030 पर्यंत 29 - 30 अब्ज अमेरिकन डॉलर पर्यंत पोहोचवण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. ज्यामध्ये या क्षेत्राच्या वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ताद्वारे शिक्षण संशोधन आणि व्यावसायिक बुद्धिमत्तेत वाढ तसेच प्रादेशिक शिक्षणासोबतच डिजिटल पद्धतीने वेगवेगळे शैक्षणिक साधनसामग्री यांचा समावेश यामध्ये होतो .

भारतीय शिक्षण मंत्रालयद्वारे शेती, आरोग्य सेवा आणि शाश्वत शहरांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी एआय सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करणे आणि त्या माध्यमातून विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने उच्च शिक्षणातील उदयोन्मुख क्षेत्रातील उद्योगांचा आणि स्टार्टअप च्या सहकार्याने हे उच्च शिक्षण संस्थांकडून ही केंद्रे चालवली जातील असे म्हटले आहे . शिक्षण क्षेत्रातील काही उदयोन्मुख क्षेत्रे खालील प्रमाणे

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उच्च शिक्षण**

एआय च्या माध्यमातून शिक्षणात गुणवत्तापूर्ण आणि शैक्षणिक साधनसामग्री तयार करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जात आहे त्यासोबतच या क्षेत्रात मध्ये सहभागात्मक आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी आज AI चा वापर हा उच्च शिक्षणातील संशोधन , माहिती स्त्रोत , ज्ञान प्रणाली म्हणूनही केला जात आहे . अमेरिकेनंतर भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा ई लर्निंग बाजार बनलेला आहे

**कौशल्य विकास आधारित शिक्षण**

21 व्या शतकात जागतिकीकरणाच्या स्पर्धेत स्पर्धात्मकता आणि नाविन्यपूर्ण कौशल्यांचा विकास विद्यार्थ्यांचा होण्यासाठी एन. इ. पी. 2020 च्या शैक्षणिक धोरणातील बदल हे त्या अनुषंगाने केलेले दिसते ज्या मधून विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा विकास होऊन अर्थव्यवस्थेला एक नवीन आयाम प्राप्त होऊन 2047 पर्यंतचा विकसित भारत श्रेष्ठ भारत ही संकल्पना साकार करण्यास मदत होईल .

**निष्कर्ष**

नव्या उदयोन्मुख क्षेत्र जे एकूणच अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक घटकातील मूलभूत असे बदल आणि बदलत्या परिस्थितीला अनुरूप अशी प्रणाली जी जुन्या तंत्रज्ञानाच्या जागी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून सामाजिक - आर्थिक समानता, दर्जा व समाजात समतामुलक वितरण करून लोक कल्याणकारी राज्य स्थापन करण्यास मदत करते. तसेच देशाच्या जलद, शाश्वत आणि सर्वसमावेशी विकासाला आणि अर्थव्यवस्थेला जागतिक आर्थिक केंद्र बनवण्याची क्षमताही उदयोन्मुख क्षेत्रात असल्याचेही दिसून येते.

**संदर्भ**

1 ) भारतीय अर्थव्यवस्था - रमेश सिंह (Mc graw Hills Publication )
2) स्पर्धा परीक्षेचे अर्थशात्र भाग -१- किरण देसले, द्वीपस्तंभ प्रकाशन, जळगाव
3 ) www.ibef.org
4) www . apeda.gov.in
5 ) www . tourism . gov . in ( ministry of tourism )
6 ) www. wikipidia . org . com
7) www . Imf org .
8) www . indiabudget . gov . in

# विदर्भातील इको-टुरिझम : विकासाच्या संधी, आव्हाने आणि धोरणात्मक दिशा

**संशोधक**
**कु. स्वाती लक्ष्मीकांत महल्ले**
संशोधक विद्यार्थीनी, अर्थशास्त्र विभाग
जगदंब महाविद्यालय अचलपूर, शहर
swatilaxmikant28@gmail.co
8087182378

**मार्गदर्शक**
**प्रा.डॉ. मुकुंद रामदासजी दातीर**
अर्थशास्त्र विभाग
जगदंब महाविद्यालय अचलपूर, शहर
9623739904

**सारांश (Abstract)**
*विदर्भ हा महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांचा समृद्ध नैसर्गिक प्रदेश असून येथे राज्यातील एकूण वनक्षेत्राच्या ६० टक्के वनसंपदा आहे. पाच व्याघ्र प्रकल्प, सहा अभयारण्ये आणि विविध जैवविविधतेने नटलेला हा प्रदेश इको-टुरिझमसाठी अत्यंत अनुकूल आहे. तथापि, या अफाट क्षमतेसह विदर्भ महाराष्ट्राच्या एकूण पर्यटन महसुलात केवळ १५ टक्के योगदान देतो. हा संशोधन लेख विदर्भातील इको-टुरिझमच्या संधी, आव्हाने आणि धोरणात्मक उपायांचे विश्लेषण करतो.*

**मुख्य शब्द(Keywords):**इको-टुरिझम, विदर्भ, व्याघ्र प्रकल्प, शाश्वत पर्यटन, स्थानिक रोजगार, जैवविविधता

## १. प्रस्तावना (Introduction)

आज संपूर्ण जगात पर्यटन उद्योग हा सर्वात वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक मानला जातो. त्यातहीइको-टुरिझमम्हणजे निसर्ग पर्यटन हे एक असे माध्यम आहे जे एकाच वेळी पर्यावरण संवर्धन, स्थानिक रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकास या तिन्ही उद्दिष्टांची पूर्तता करते. जागतिक पर्यटन संघटनेच्या (UNWTO) व्याख्येनुसार, इको-टुरिझम म्हणजे नैसर्गिक परिसरात जाऊन, तेथील पर्यावरणाचे संवर्धन करत, स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग घेऊन केलेले शाश्वत पर्यटन होय.

विदर्भ हा महाराष्ट्राचा पूर्व विभाग असून अमरावती आणि नागपूर या दोन महसूल विभागांतील एकूण ११ जिल्ह्यांचा मिळून बनलेला प्रदेश आहे. या प्रदेशाततताडोबा-अंधारी, पेंच, मेळघाट, नवेगाव-नागझिरा, टिपेश्वर आणि बोरअसे सहा प्रमुख व्याघ्र प्रकल्प आहेत. राज्याच्या एकूण वनक्षेत्राच्या ६० टक्केहून अधिक वनसंपदा विदर्भात केंद्रित आहे. येथे वाघ, बिबट्या, अस्वल, रानकुत्रे, हरीण आणि शेकडो प्रकारचे पक्षी आढळतात. सातपुडा पर्वतरांगा, वैनगंगा व पैनगंगा नद्यांची खोरी, घनदाट सागवान वने आणि प्राचीन आदिवासी संस्कृती हे विदर्भाची वेगळी ओळख आहे.परंतु इतक्या भरपूर नैसर्गिक संपदेसह विदर्भ महाराष्ट्राच्या एकूण पर्यटन महसुलात केवळ १५ टक्के योगदान देतो. याचे मुख्य कारण म्हणजे येथील पायाभूत सुविधांची कमतरता, प्रचार-प्रसाराचा अभाव, स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष आणि एकात्मिक धोरणाची उणीव.विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलने (VED) असे सांगितले आहे की योग्य विकास झाल्यास विदर्भात वार्षिक ₹१,००० कोटींहून अधिक पर्यटन महसूल मिळू शकतो.या सर्व पार्श्वभूमीवर विदर्भातील इको-टुरिझमच्या संधींचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. सध्या महाराष्ट्र इको-टुरिझम विकास मंडळाने (MEDB) विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये ३२ इको-टुरिझम स्थळे विकसित करण्यासाठी निश्चित केली आहेत. तसेच महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४ मध्ये शाश्वत व जबाबदार पर्यटनाला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. या सर्व घडामोडी विदर्भाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत आणि सध्याचा काळ हा विदर्भाचा इको-टुरिझम विकासाचा सुवर्णकाळ ठरू शकतो.

## २. संशोधन उद्दिष्टये (Research Objectives)

प्रस्तुत संशोधन लेखासाठी खालील प्रमुख उद्दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत:

१) विदर्भातील नैसर्गिक व जैवविविधता संसाधनांचा आढावा घेणे
२) विदर्भातील इको-टुरिझमच्या उपलब्ध संधी शोधणे
३) स्थानिक समुदाय व रोजगार निर्मितीवरील परिणाम अभ्यासणे
४) सरकारी धोरणे व योजनांचे मूल्यांकन करणे

५) इको-टुरिझम विकासातील अडथळे व आव्हाने ओळखणे
६) विदर्भातील इको-टुरिझम विकासासाठी धोरणात्मक शिफारशी करणे

**३. संशोधन पद्धती (Research Methodology)**

प्रस्तुत संशोधन हेवर्णनात्मक व विश्लेषणात्मक (Descriptive and Analytical) स्वरूपाचे असून यात विदर्भातील इको-टुरिझमची सद्यस्थिती, उपलब्ध संधी, आव्हाने व धोरणात्मक शक्यता यांचे सखोल मूल्यमापन करण्यात आले आहे — म्हणजेच हे संशोधन केवळ 'काय आहे?' इतकेच न सांगता 'का आहे?' आणि 'काय असायला हवे?' या प्रश्नांचीही उत्तरे शोधते. माहिती संकलनासाठी द्वितीयक स्रोत वापरण्यात आले; प्रा द्वितीयक माहितीसाठी MEDB अहवाल, महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४, MTDC वार्षिक अहवाल, Times of India, Nagpur Today, Esakalयांसारख्या वृत्तपत्रांतील अहवाल, Zenodoव IJRESM यांसारख्या शैक्षणिक जर्नलतसेच भारत सरकारच्या पर्यटन व वन मंत्रालयाचे अधिकृत अहवालयांचा आधार घेण्यात आला. विश्लेषणासाठी SWOT विश्लेषण, तुलनात्मक विश्लेषण, सामग्री विश्लेषण (Content Analysis) आणि ऐतिहासिक तुलना (Historical Comparison) या चार साधनांचा उपयोग करण्यात आला. संशोधन क्षेत्र म्हणून विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, अमरावती, यवतमाळ व वर्धा या आठ प्रमुख जिल्ह्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून कालावधी२०१४ ते २०२५असा आहे, ज्यात कोव्हिड-पूर्व (२०१४–२०२०), कोव्हिड काळ (२०२०–२०२१) आणि कोव्हिड-पश्चात पुनरुज्जीवन (२०२१–२०२५) असे तीन टप्पे अभ्यासले गेले. या संशोधनाच्या मर्यादांबाबत सांगायचे झाल्यास दुर्गम अभयारण्यांतील अचूक पर्यटक संख्येची शासकीय नोंद पूर्णपणे उपलब्ध नाही, आदिवासी समुदायाच्या उत्पन्नाचे नोंदणीकृत आकडे मर्यादित आहेत आणि खाजगी रिसोर्ट व होमस्टे यांची आर्थिक माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध नसल्याने एकूण महसुलाचे संपूर्ण चित्र मांडणे काहीसे अवघड ठरते; तथापि उपलब्ध स्रोतांच्या आधारे हे संशोधन विदर्भातील इको-टुरिझमचे एक विश्वासार्ह व सर्वंकष विश्लेषण प्रदान करते.

**४. विदर्भातील इको-टुरिझमची क्षमता**

१) **वन्यजीव व जैवविविधता :** विदर्भाची नैसर्गिक संपदा इको-टुरिझमसाठी एक भक्कम आधार आहे. महाराष्ट्र इको-टुरिझम विकास मंडळाने (MEDB) या प्रदेशात विकासासाठी एकूण३२ स्थळेनिश्चित केली असून ती सर्व नैसर्गिक विविधतेने समृद्ध आहेत. विदर्भातील सर्वात प्रसिद्ध ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात २०२४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात तब्बल९५ प्रौढ वाघआढळले, जी या प्रकल्पाच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वाधिक संख्या आहे. येथील व्याघ्र घनता प्रति १०० चौ.कि.मी.७.१८इतकी आहे, जी संपूर्ण देशात सर्वोच्च मानली जाते. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पातही २०२४ च्या गणनेनुसार७२ प्रौढ वाघ व ३३ बछडेअसल्याची नोंद झाली आहे. वाघांसोबतच विदर्भात बिबट्या, अस्वल, रानकुत्रे, हरीण, रानडुक्कर यांसारखे अनेक वन्यप्राणी आणि शेकडो प्रकारचे पक्षी आढळतात, ज्यामुळे हा प्रदेश देशी व परदेशी पर्यटकांसाठी एक आकर्षणाचे केंद्र बनला आहे.

२) **पर्यटक संख्या व महसूल :**विदर्भातील व्याघ्र प्रकल्पांना दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात आणि त्यातून मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होतो. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला दरवर्षी सरासरी२ लाखांहून अधिकपर्यटक भेट देतात आणि गेल्या ३.२ वर्षांत (२०२०–२०२३) एकूण ₹२९.७९ कोटीमहसूल मिळाला आहे. पेंच व्याघ्र प्रकल्पाने कोव्हिड-पश्चात काळात (२०२१–२०२४) तब्बल३.४६ लाखपर्यटकांचे स्वागत केले, जे कोव्हिडपूर्व संख्येच्या दुप्पट आहे. खालील सारणीत विदर्भातील सहा प्रमुख व्याघ्र प्रकल्पांची तुलनात्मक माहिती दिली आहे.

**सारणी क्र. १**

**विदर्भातील व्याघ्र प्रकल्प — वैशिष्ट्ये व पर्यटन आकडेवारी**

| व्याघ्र प्रकल्प | ठळक वैशिष्ट्य | पर्यटन आकडेवारी |
|---|---|---|
| ताडोबा-अंधारी (चंद्रपूर) | ९५ वाघ, ७.१८/१०० चौ.कि.मी. घनता | दरवर्षी सरासरी २ लाख पर्यटक |
| पेंच (नागपूर) | ८ प्रवेशद्वारे | २०२१–२४ दरम्यान ३.४६ लाख पर्यटक |

| | | |
|---|---|---|
| मेळघाट (अमरावती) | सातपुडा पर्वतरांगा, घनदाट सागवान वने | ७२ वाघ (२०२४) |
| नवेगाव-नागझिरा (भंडारा/गोंदिया) | समृद्ध पक्षी जीवन | वर्षभर पर्यटक |
| टिपेश्वर (यवतमाळ) | सहस्त्रकुंड धबधबा, पैनगंगा नदी | विकास प्रतीक्षेत |
| बोर (वर्धा) | लघु परंतु महत्त्वाचे अभयारण्य | पर्यटन वाढत आहे |

**स्त्रोत** : Nagpur Today (2024). *Tiger craze: PTR hosts 3.46 lakh tourists post pandemic, doubling 2016–2020 count.* Available at: https://www.nagpurtoday.in/tiger-craze-ptr-hosts-3-46-lakh-tourists-post-pandemic-doubling-2016-2020-count/12041711

**५. सरकारी धोरणे व उपक्रम**

विदर्भातील इको-टुरिझम विकासासाठी केंद्र व राज्य सरकार दोन्ही पातळ्यांवर ठोस पावले उचलली जात आहेत.महाराष्ट्र शासनाने २०२४-२५या आर्थिक वर्षात विदर्भातील पर्यटन विकासासाठी भरीव निधी मंजूर केला आहे. वर्धा जिल्ह्यात ६५ तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ₹१६.४५ कोटी, सालोड येथे नवीन इको-टुरिझम पार्कसाठी ₹४ कोटी, सिरोंचा-वर्धम येथील देशातील एकमेव जीवाश्म उद्यान (Fossil Park) विकसित करण्यासाठी ₹३५० कोटीआणि विसापूर बोटॅनिकल गार्डनसाठी ₹१५० कोटीखर्च करण्याची योजना आखली आहे. या उपक्रमांमुळे विदर्भातील पर्यटनाला एक नवीन दिशा मिळणार आहे.महाराष्ट्र इको-टुरिझम विकास मंडळाने (MEDB) विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये सध्या५,३४,०००पर्यटकांना सामावून घेण्याची क्षमता असल्याचे नमूद केले असून, योग्य पायाभूत सुविधा निर्माण झाल्यास ही क्षमता१०,२०,०००पर्यंत वाढवता येऊ शकते. याचाच अर्थ असा की सध्या विदर्भाची केवळ निम्मी क्षमता वापरली जात आहे आणि उर्वरित क्षमता विकसित करण्याची मोठी संधी अजूनही शिल्लक आहे.

केंद्र सरकारनेही विदर्भासाठी अनेक महत्त्वाच्या योजना राबवल्या आहेत.स्वदेश दर्शन योजनेअंतर्गतविदर्भातील वन्यजीव व निसर्ग पर्यटन सर्किटचा विकास केला जात असून यातून एकाच दौऱ्यात अनेक ठिकाणे पाहण्याची सुविधा पर्यटकांना मिळत आहे.प्रसाद योजनेमुळेविदर्भातील सेवाग्राम, शिर्डी, पवनार यांसारख्या धार्मिक पर्यटन स्थळांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होत आहे. 'देखो अपना देश' या योजनेमुळे विदर्भातील ग्रामीण व आदिवासी सांस्कृतिक पर्यटनाला चालना मिळत असून देशांतर्गत पर्यटकांमध्ये विदर्भाबाबत जागृती वाढत आहे. Green India Mission अंतर्गत वनीकरण व परिसंस्था पुनरुज्जीवन कार्यक्रमामुळे विदर्भातील जैवविविधता अधिक समृद्ध होत असून त्याचा दीर्घकालीन फायदा इको-टुरिझमला होणार आहे. थोडक्यात, सरकारी धोरणे व योजनांचा एकत्रित परिणाम म्हणजे विदर्भ येत्या काही वर्षांत महाराष्ट्राचे प्रमुख इको-टुरिझम केंद्र म्हणून उदयास येऊ शकतो.

**६. स्थानिक समुदाय व रोजगार निर्मिती**

इको-टुरिझम हे केवळ निसर्ग पाहण्यापुरते मर्यादित नसून ते स्थानिक समुदायाच्या आर्थिक उन्नतीचेही एक प्रभावी साधन आहे. जेव्हा पर्यटक एखाद्या अभयारण्याला भेट देतो, तेव्हा त्याला जीप चालक, निसर्ग मार्गदर्शक, हॉटेल कर्मचारी, स्थानिक खाद्यपदार्थ विक्रेते अशा अनेक स्थानिक लोकांची गरज भासते — आणि हेच इको-टुरिझमचे खरे सामाजिक योगदान आहे.ताडोबा व पेंचपरिसरात स्थानिक आदिवासी तरुण-तरुणींना पर्यटन मार्गदर्शक, निसर्गतज्ञ, जीप चालक आणि हॉस्पिटॅलिटी स्टाफ म्हणून विशेष प्रशिक्षण दिले जात आहे, ज्यामुळे त्यांना गावातच चांगले उत्पन्न मिळत आहे. यामुळे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत होत आहे, जी एक अत्यंत महत्त्वाची सामाजिक उपलब्धी आहे.मेळघाट व्याघ्र प्रकल्पपरिसरात महिला बचत गटांना हस्तकला, वनोत्पाद विक्री आणि पारंपरिक अन्नपदार्थ विक्रीद्वारे उत्पन्न मिळवण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. WWF India आणि TRACT यांसारख्या स्वयंसेवी संस्था या कामात सक्रियपणे सहभागी असून त्या महिलांना व्यवसाय व्यवस्थापन, पर्यटकांशी संवाद आणि उत्पादन विपणन (Marketing) याबाबत प्रशिक्षण देत आहेत. याच मेळघाटमध्ये ग्रामीण महिलांनी स्वतः चालवलेला 'इको-

टुरिझम होस्ट' हा पथदर्शी प्रकल्प अत्यंत यशस्वी ठरला असून पर्यटकांनाही या अनुभवाचे विशेष आकर्षण आहे. या प्रकल्पात महिला पर्यटकांना राहण्याची, जेवणाची व परिसर फिरवण्याची सुविधा देतात आणि त्यातून थेट उत्पन्न मिळवतात. हा प्रयोग इतका प्रभावी ठरला आहे की तो आता विदर्भातील इतर व्याघ्र प्रकल्पांच्या प्रवेशद्वारांवरही राबवण्याची शासनाची योजना आहे. थोडक्यात, इको-टुरिझम हे विदर्भातील ग्रामीण महिला सक्षमीकरण व आदिवासी रोजगार निर्मितीचे एक नवीन व शाश्वत माध्यम बनत आहे.

**७. प्रमुख इको-टुरिझम संधी**

विदर्भातील नैसर्गिक, सांस्कृतिक व औद्योगिक वैविध्यामुळे येथे इको-टुरिझमच्या अनेक अनोख्या संधी उपलब्ध आहेत. या संधींचा योग्य विकास केल्यास विदर्भ देशाच्या पर्यटन नकाशावर एक महत्त्वाचे स्थान मिळवू शकतो.

१) **वाइल्डलाइफ सफारी व नाईट सफारी** : ताडोबा व पेंच हे विदर्भातील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळे आहेत. येथे आता केवळ सकाळ-संध्याकाळच्या सफारींपुरते न थांबतामॉन्सून सफारीवनाईट सफारीअसे नवीन उपक्रम सुरू केले जात आहेत. पावसाळ्यात हिरव्यागार जंगलात वाघ व इतर वन्यप्राणी पाहण्याचा अनुभव पर्यटकांना खूपच आकर्षक वाटतो. यामुळे हंगामी पर्यटनाची मर्यादा कमी होऊन वर्षभर पर्यटक येण्याची शक्यता वाढते, जे स्थानिक रोजगारासाठीही फायदेशीर आहे.

२) **बर्ड वॉचिंग सेंटर** : नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प (भंडारा/गोंदिया) परिसरातील नैसर्गिक जलाशये व दलदलीचे प्रदेश पक्षी निरीक्षणासाठी (Bird Watching) अत्यंत आदर्श आहेत. येथे स्थलांतरित पक्ष्यांसह दुर्मीळ व स्थानिक पक्ष्यांच्या शेकडो प्रजाती आढळतात.बर्ड वॉचिंग टॉवर, निसर्ग मार्ग (Nature Trail) आणि पक्षी निरीक्षण शिबिरे (Bird Watching Camps) विकसित केल्यास देशी-विदेशी पक्षीप्रेमी पर्यटकांना आकर्षित करता येईल.

३) **ॲग्रोटुरिझम पार्क** : विदर्भ हा कापूस, संत्री, सोयाबीन यांसारख्या पिकांसाठी प्रसिद्ध आहे. या कृषी वैविध्याचा उपयोग करूनॲग्रोटुरिझम पार्कविकसित करण्याची संकल्पना शाश्वत ग्रामीण विकासात मोठे योगदान देऊ शकते. शेतीची कामे प्रत्यक्ष अनुभवणे, शेतमालावर प्रक्रिया पाहणे, सेंद्रिय शेती समजून घेणे आणि ग्रामीण जीवनशैली अनुभवणे या गोष्टी शहरी पर्यटकांसाठी अत्यंत आकर्षक ठरतात. यामुळे शेतकऱ्यांना शेतीसोबतच अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होतो.

४) **मायनिंग टुरिझम** : विदर्भातील यवतमाळ व चंद्रपूर जिल्ह्यांत कोळसा खाणींचे मोठे जाळे आहे. वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड (WCL) आणि MTDC यांच्या संयुक्त सहकार्यानेभूमिगत कोळसा खाण पर्यटनसुरू करण्याचा प्रयोग देशातील पहिलाच असा अनोखा उपक्रम आहे. खाणीत प्रत्यक्ष उतरून तेथील कार्यपद्धती, यंत्रसामग्री व इतिहास जाणून घेण्याचा हा अनुभव विद्यार्थी, संशोधक व साहस-प्रिय पर्यटकांसाठी अत्यंत आकर्षक ठरू शकतो. हा उपक्रम विदर्भाला एक वेगळी व अनोखी पर्यटन ओळख देऊ शकतो.

५) **फॉसिल पार्क पर्यटन** : गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा-वर्धम परिसरात देशातील एकमेवजीवाश्म उद्यान (Fossil Park) आहे, जेथे कोट्यवधी वर्षे जुने जीवाश्म (Fossils) आढळतात. या ठिकाणच्या विकासासाठी शासनाने ₹३५० कोटींची योजना आखली असून ते एकदा विकसित झाल्यानंतर भूगर्भशास्त्र, जीवशास्त्र व पुराजीवशास्त्र (Palaeontology) यांच्या अभ्यासकांसाठी तसेच सामान्य पर्यटकांसाठी एक अत्यंत दुर्मीळ व अद्वितीय पर्यटन अनुभव ठरेल. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हे एक शैक्षणिक पर्यटन केंद्र (Educational Tourism Centre) म्हणूनही विकसित होऊ शकते.

६) **होमस्टे व ग्रामीण पर्यटन** : केंद्र सरकारच्या 'देखो अपना देश' योजनेअंतर्गत विदर्भ हा एक महत्त्वाचा सांस्कृतिक व ग्रामीण पर्यटन केंद्र म्हणून उदयास येत आहे. आदिवासी गावांमध्ये होमस्टे सुविधा, पारंपरिक गोंड व वऱ्हाडी खाद्यपदार्थांचा अनुभव, लोककला व हस्तकला प्रदर्शन आणि पारंपरिक उत्सवांमध्ये सहभाग या गोष्टी पर्यटकांना विदर्भाच्या मातीशी जोडतात. होमस्टे पर्यटनामुळे स्थानिक कुटुंबांना थेट आर्थिक लाभ होतो आणि मध्यस्थ टाळता येतात, जे ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे.

### ८. आव्हाने :

विदर्भातील इको-टुरिझमची क्षमता मोठी असली तरी या विकासाच्या मार्गात अनेक महत्त्वाची आव्हाने आहेत, जी वेळीच सोडवली नाहीत तर या प्रदेशाच्या पर्यटन विकासावर दीर्घकालीन विपरीत परिणाम होऊ शकतो.

१) **निधीची कमतरता** : विदर्भातील अनेक इको-टुरिझम प्रकल्प केवळ निधीअभावी वर्षानुवर्षे रखडलेले आहेत. टिपेश्वर, बोर व नवेगाव-नागझिरा यांसारख्या अभयारण्यांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक निधी वेळेत उपलब्ध होत नाही. राज्य शासनाने निधी मंजूर केला तरी तो प्रत्यक्षात खर्च होण्यास बराच विलंब होतो, ज्यामुळे विकासाची गती मंदावते.

२) **पायाभूत सुविधांची अपुरीता** : विदर्भातील अनेक महत्त्वाची अभयारण्ये व पर्यटन स्थळे रेल्वे व चांगल्या रस्त्यांपासून अद्याप दुर्गम आहेत. गडचिरोली, भामरागड व चंद्रपूरच्या आतील भागांत पोहोचणे पर्यटकांसाठी अवघड आहे. त्याचबरोबर अनेक ठिकाणी दर्जेदार राहण्याची सोय, स्वच्छतागृहे, वाहनतळ आणि विश्वसनीय मोबाईल नेटवर्क यांचाही अभाव आहे, जे आधुनिक पर्यटकांच्या दृष्टिकोनातून मोठी अडचण ठरते.

३) **मानव-वन्यजीव संघर्ष** : व्याघ्र प्रकल्पांच्या Eco-Sensitive Zone (ESZ) च्या विस्तारामुळे अनेक आदिवासी गावांतील लोकांच्या शेती, वनोत्पाद संकलन व पशुपालन या पारंपरिक उपजीविकेवर मर्यादा येत आहेत. एकीकडे वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी निर्बंध घातले जातात, तर दुसरीकडे त्याचा थेट फटका स्थानिक आदिवासी समुदायाला बसतो. हा मानव-वन्यजीव संघर्ष इको-टुरिझमच्या शाश्वत विकासासाठी एक मोठे सामाजिक आव्हान आहे.

४) **हंगामी पर्यटन** : विदर्भातील बहुतांश पर्यटन हेनोव्हेंबर ते मार्चया थंडीच्या हंगामापुरतेच मर्यादित राहते. उन्हाळ्यात अतिउष्णतेमुळे व पावसाळ्यात जंगल बंद असल्यामुळे पर्यटक येत नाहीत. यामुळे स्थानिक गाईड, जीप चालक, हॉटेल कर्मचारी व होमस्टे चालकांना वर्षातील केवळ चार-पाच महिनेच काम मिळते. हंगामी रोजगाराची ही समस्या स्थानिक कुटुंबांच्या वार्षिक उत्पन्नावर मर्यादा आणते.

५) **जनजागृतीचा अभाव** : इको-टुरिझम म्हणजे काय, त्याचे नियम काय आहेत आणि पर्यावरणपूरक पद्धतीने पर्यटन कसे करावे, याबाबत स्थानिक विद्यार्थी, ग्रामस्थ आणि अगदी पर्यटकांमध्येही पुरेशी जनजागृती नाही. अनेक पर्यटक अभयारण्यात प्लास्टिक टाकणे, मोठ्याने आवाज करणे, वन्यप्राण्यांना खाद्य देणे अशा चुकीच्या गोष्टी करतात. तसेच स्थानिक तरुणांना इको-टुरिझममध्ये करिअर करता येऊ शकते हे माहीत नसल्याने ते या क्षेत्राकडे वळत नाहीत.

६) **स्वतंत्र महामंडळाची मागणी** : विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलने (VED) विदर्भात ₹१,००० कोटींहून अधिक पर्यटन क्षमता असल्याचे नमूद करून स्वतंत्रविदर्भ पर्यटन विकास महामंडळाचीमागणी केली आहे. सध्या विदर्भातील पर्यटन विकासाचे नियंत्रण पुण्यातील MTDC मुख्यालयाकडून होत असल्याने स्थानिक गरजांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही, असा स्थानिक लोकप्रतिनिधी व उद्योजकांचा आक्षेप आहे. स्वतंत्र महामंडळ झाल्यास विदर्भाच्या विशिष्ट गरजांनुसार योजना आखणे व निधी वापरणे अधिक प्रभावीपणे शक्य होईल.

### ९. निष्कर्ष व शिफारशी

विदर्भातील इको-टुरिझमची क्षमता खरोखरच अफाट आहे. येथे घनदाट जंगले, वाघांची सर्वाधिक घनता, अनोखी जैवविविधता, समृद्ध आदिवासी संस्कृती आणि ऐतिहासिक वारसा एकत्रितपणे आढळतो — जे इतर कोणत्याही प्रदेशात क्वचितच पाहायला मिळते. MEDB च्या अहवालानुसार सध्या विदर्भाची केवळ निम्मी पर्यटन क्षमता वापरली जात असून योग्य धोरणात्मक हस्तक्षेप केल्यास हा प्रदेश महाराष्ट्राचे प्रमुख इको-टुरिझम केंद्र बनू शकतो. यासाठी खालील सहा महत्त्वाच्या शिफारशी प्रस्तावित आहेत.

१) **स्वतंत्र विदर्भ पर्यटन विकास महामंडळाची स्थापना** : विदर्भाच्या पर्यटन विकासाचे विकेंद्रीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या पुण्यातून होणाऱ्या MTDC च्या केंद्रीय नियंत्रणामुळे विदर्भाच्या स्थानिक गरजा दुर्लक्षित राहतात. स्वतंत्र महामंडळ स्थापन झाल्यास विदर्भाच्या विशिष्ट भौगोलिक, सांस्कृतिक व आर्थिक

गरजांनुसार योजना आखणे, निधी वितरण करणे आणि जलद निर्णय घेणे शक्य होईल. VED ने नमूद केलेली ₹१,००० कोटींची पर्यटन क्षमता प्रत्यक्षात आणण्यासाठी हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे आहे.

२) **समुदाय-आधारित इको-टुरिझम मॉडेल** : इको-टुरिझमचा खरा फायदा तेव्हाच होतो जेव्हा स्थानिक आदिवासी व महिला समुदाय त्याच्या केंद्रस्थानी असतो. त्यामुळे व्याघ्र प्रकल्पांच्या बफर झोनमधील गावांमध्ये Community Based Eco-Tourism मॉडेल राबवणे आवश्यक आहे. यात स्थानिक कुटुंबांना होमस्टे, जेवण, मार्गदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम यांचे थेट व्यवस्थापन देणे, महिला बचत गटांना वनोत्पाद प्रक्रिया उद्योग उभारण्यास मदत करणे आणि आदिवासी तरुणांना इको-गाईड म्हणून प्रस्थापित करणे या गोष्टींचा समावेश असावा.

३) **बहु-पर्यटन सर्किट विकास** : एकट्या एका व्याघ्र प्रकल्पावर अवलंबून न राहताबहु-पर्यटन सर्किट (Multi-Tourism Circuit) विकसित करणे गरजेचे आहे. हेमलकसा-भामरागड (गडचिरोली), सोमनूर (चंद्रपूर), शेकरू कॉन्झर्वेशन रिझर्व्ह (अमरावती) यांसारख्या कमी प्रसिद्ध परंतु अत्यंत नैसर्गिक दृष्ट्या समृद्ध ठिकाणांना मुख्य व्याघ्र प्रकल्पांशी जोडल्यास पर्यटक अधिक दिवस विदर्भात राहतील आणि त्यातून अधिक महसूल मिळेल.

४) **डिजिटल प्रमोशन** : आजच्या डिजिटल युगात पर्यटन प्रमोशन सोशल मीडियाशिवाय अपूर्ण आहे. विदर्भातील इको-टुरिझमसाठीस्वतंत्र वेबसाइट, YouTube चॅनेल, Instagram व Facebook पेजेसतयार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबरऑनलाइन बुकिंग प्रणालीसुलभ करणे, QR Code आधारित माहिती फलक अभयारण्यांमध्ये लावणे आणि Travel Influencers व Vloggers यांना विदर्भ दौऱ्यासाठी आमंत्रित करणे हे उपाय विदर्भाची आंतरराष्ट्रीय ओळख वाढवण्यास उपयुक्त ठरतील.

५) **वर्षभर पर्यटन उपक्रम** : हंगामी पर्यटनाची मर्यादा दूर करण्यासाठी वर्षाच्या बारही महिने वेगवेगळे उपक्रम राबवणे आवश्यक आहे. यासाठीमॉन्सून सफारी (जुलै-ऑगस्ट), बर्ड फेस्टिव्हल (नोव्हेंबर-जानेवारी), आदिवासी सांस्कृतिक उत्सव (दिवाळी-होळी काळात), वाइल्डलाइफ फोटोग्राफी वर्कशॉपआणिशालेय निसर्ग शिबिरे (उन्हाळी सुट्टी) यांसारखे उपक्रम नियमितपणे आयोजित केले पाहिजेत. यामुळे स्थानिकांना वर्षभर रोजगार मिळेल.

६) **प्रशिक्षण व कौशल्य विकास** : इको-टुरिझमच्या शाश्वत विकासासाठीमनुष्यबळ विकासहा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. विदर्भातील प्रत्येक व्याघ्र प्रकल्पाजवळनिसर्ग मार्गदर्शक प्रशिक्षण केंद्र (Nature Guide Training Centre) स्थापन करावे, जेथे स्थानिक आदिवासी तरुण-तरुणींना वन्यजीव ज्ञान, इंग्रजी संवाद, प्रथमोपचार, पर्यावरण शिक्षण व पर्यटक व्यवस्थापन याचे प्रशिक्षण दिले जावे. प्रशिक्षित मार्गदर्शकांमुळे पर्यटकांना दर्जेदार अनुभव मिळेल आणि विदर्भाची आंतरराष्ट्रीय स्तरावर सकारात्मक प्रतिमा निर्माण होईल.

थोडक्यात, विदर्भ हा महाराष्ट्राचा एक असा प्रदेश आहे जेथे निसर्ग, संस्कृती व इतिहास यांचा अनोखा संगम आहे. गरज आहे ती फक्त एकात्मिक दृष्टिकोनाची, राजकीय इच्छाशक्तीची आणि स्थानिक समुदायाच्या सहभागाची आणि तेव्हाच विदर्भ भारताच्या इको-टुरिझम नकाशावर एक अग्रणी स्थान मिळवेल.

**संदर्भसूची:**

1. Maharashtra Ecotourism Development Board (MEDB). *Eco-tourism Potential of Vidarbha*, Nagpur Summit 2022
2. Tadoba Andhari Tiger Reserve — 2024 Predator & Prey Analysis. *Tiger Safari India*
3. Times of India (2023). *Tadoba cash registers back to pre-pandemic level*
4. Nagpur Today (2024). *Pench Tiger Reserve hosts 3.46 lakh tourists post-pandemic*
5. Times of India (2026). *Melghat Tiger Reserve completes 52 years*
6. The News Dirt (2025). *Vidarbha's Rural Tourism — India's next cultural hotspot*

7. The News Dirt (2025). *Tiger buffer zones expanded in Vidarbha*
8. Esakal (2026). *विदर्भात पर्यटनाला वाव, पण विकासाची वाट*
9. Eco-Business (2014). *Four new eco-tourism circuits in Maharashtra*
10. Maharashtra Tourism Policy 2024. *Government of Maharashtra*
11. Zenodo (2026). *Tourism Opportunities in East Vidarbha*
12. IJFANS Journal. *Post-pandemic Sustainability of Eco-tourism in Maharashtra*
13. Nagpur Today (2016). *VED demands separate Vidarbha Tourism Development Corporation*
14. IJRESM. *Design of Agrotourism Park in Vidarbha Region*

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DLXXV) 575 Vol-C
ISSN : 2278-9308
February 2026

# उच्च प्राथमिक शाळांमधील आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपारिक अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणूकीवर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास

श्री. सुरेश उकंडा शिंगणे,
**संशोधक विद्यार्थी :-**
शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा, 443001. भ्रमणध्वनी 9637066404 ईमेल
sshingne88@gmail.com
प्रा. डॉ. अनिल देवराव वरघट,
**संशोधक मार्गदर्शक :-**
शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा, 443001. भ्रमणध्वनी 9890092249 ईमेल
awarghat98@gmail.com

---

**सारांश :-**

सध्याच्या माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन होत आहे. पारंपरिक अध्यापन पद्धतीसोबतच आभासी अध्ययन (Virtual Learning) पद्धतीचा वापर वाढत आहे. विशेषतः कोविड-19 महामारीच्या काळात शाळा बंद असतानाही शिक्षण प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी ऑनलाइन व आभासी शिक्षण प्रणालीचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला. या पार्श्वभूमीवर “उच्च प्राथमिक शाळांमधील आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपारिक अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीवर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास” हे संशोधन करण्यात आले. या संशोधनामध्ये प्रायोगिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे उच्च प्राथमिक शाळांमधील पारंपरिक अध्ययन पद्धती आणि आभासी अध्ययन पद्धतीचे स्वरूप समजून घेणे, आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार करणे, आभासी व पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीचा अभ्यास करणे आणि या दोन्ही पद्धतींच्या परिणामांची तुलनात्मक तपासणी करणे ही होती. संशोधनासाठी प्रायोगिक गट आणि नियंत्रित गट असे दोन गट निवडण्यात आले. देऊळगाव राजा तालुक्यातील 20 शाळांमधील इयत्ता आठवीचे 40 विद्यार्थी प्रायोगिक गट म्हणून निवडण्यात आले, तर सिंदखेड राजा तालुक्यातील 20 शाळांमधील इयत्ता आठवीचे 40 विद्यार्थी नियंत्रित गट म्हणून निवडण्यात आले. संशोधनासाठी निरीक्षण सूची, प्रश्नावली, पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी ही साधने वापरण्यात आली.

संशोधनाच्या पहिल्या टप्प्यात दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांची 20 गुणांची पूर्व चाचणी घेऊन त्यांच्या पूर्वज्ञानाची पातळी निश्चित करण्यात आली. पूर्व चाचणीच्या निकालांवरून दोन्ही गटांच्या ज्ञानपातळीत विशेष फरक नसल्याचे स्पष्ट झाले. संशोधनाच्या दुसऱ्या टप्प्यात प्रायोगिक गटासाठी संशोधकाने आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार केले. या प्रतिमानामध्ये इयत्ता आठवीसाठी असलेल्या एन.एम.एम.एस. परीक्षेतील मानसिक क्षमता चाचणीतील चार घटकांचा समावेश करण्यात आला. या घटकांमध्ये लयबद्ध मांडणी, त्रिकोणांची संख्या मोजणे, सांकेतिक भाषा आणि रांगेतील स्थान यांचा समावेश होता. प्रायोगिक गटासाठी या घटकांचे अध्यापन इंटरनेट व Zoom मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून आभासी वर्गखोलीच्या स्वरूपात करण्यात आले. अध्यापन प्रक्रियेत दृक-श्राव्य साधने, सादरीकरणे, प्रश्नोत्तर पद्धती व संवादात्मक उपक्रमांचा वापर करण्यात आला. त्याच दिवशी नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांना याच घटकांचे अध्यापन पारंपरिक पद्धतीने वर्गखोलीत प्रत्यक्षरित्या अध्यापन करण्यात आले. संशोधनाच्या तिसऱ्या टप्प्यात अध्यापन पूर्ण झाल्यानंतर दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांची 20 गुणांची उत्तर चाचणी घेण्यात आली. उत्तर चाचणीमध्ये प्रायोगिक गटाचे शेकडा प्रमाण नियंत्रित गटांतील शेकडा प्रमाणापेक्षा 21.25 ने जास्त आढळून आले. तसेच सरासरी गुणांमध्येही प्रायोगिक गटाची सरासरी नियंत्रित गटाच्या सरासरीपेक्षा 4.30 ने जास्त असल्याचे दिसून आले. या निष्कर्षांवरून आभासी अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीवर

सकारात्मक व लक्षणीय परिणाम झाल्याचे स्पष्ट झाले. म्हणजेच आभासी अध्ययन पद्धती विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीस अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे भविष्यात शिक्षण अधिक परिणामकारक करण्यासाठी पारंपरिक अध्यापन पद्धतीसोबत आभासी अध्ययन पद्धतीचा समन्वय साधणे आवश्यक आहे.

**संशोधनाचे शीर्षक :-**

"उच्च प्राथमिक शाळांमधील आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपारिक अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणूकीवर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास"

**संशोधन पद्धती :-** प्रायोगिक संशोधन पद्धती

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. उच्च प्राथमिक शाळांमधील पारंपरिक अध्ययन पद्धती आणि आभासी अध्ययन पद्धतीचे स्वरूप समजून घेणे.
2. उच्च प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार करणे.
3. आभासी अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीचा शोध घेणे.
4. पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीचा शोध घेणे.
5. आभासी अध्ययन पद्धती व पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान- संपादणुकीवर होणाऱ्या परिणामांची तुलना करणे

**संशोधन नमुना :-**

**प्रायोगिक गट-** देऊळगाव राजा तालुक्यातील 20 शाळांमधील इयत्ता आठवीचे 40 विद्यार्थी
**नियंत्रित गट-** सिंदखेड राजा तालुक्यातील 20 शाळांमधील इयत्ता आठवीचे 40 विद्यार्थी

**संशोधनाची साधने :-** निरीक्षण सूची, प्रश्नावली, पूर्व चाचणी, उत्तर चाचणी.

**संशोधनाची गृहीतके :-**

1. आभासी अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत वाढ होण्याची शक्यता आहे.
2. आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत फरक आढळून येण्याची शक्यता आहे.

**संशोधनाची परिकल्पना :-**

आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत कोणताही लक्षणीय फरक आढळूत नाही.

**पारंपरिक अध्ययन :-**

पारंपरिक अध्ययन म्हणजे शिक्षणाची अशी पद्धती ज्यामध्ये शिक्षक हा अध्यापन प्रक्रियेचा केंद्रबिंदू असतो आणि विद्यार्थी प्रामुख्याने शिक्षकांकडून दिलेले ज्ञान ऐकून, वाचून व लिहून आत्मसात करतात. या पद्धतीत अध्यापन मुख्यतः वर्गखोलीत प्रत्यक्ष (face-to-face) पद्धतीने केले जाते. शिक्षक फळा, खडू, पाठ्यपुस्तक, वही इत्यादी साधनांचा वापर करून विषय समजावून सांगतात.

या पद्धतीमध्ये शिक्षक व्याख्यान देतात, उदाहरणे स्पष्ट करतात आणि विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांच्या समजुतीची पडताळणी करतात. विद्यार्थ्यांचे ज्ञान प्रामुख्याने पाठांतर, सराव, गृहपाठ आणि लेखी परीक्षांद्वारे तपासले जाते. पारंपरिक अध्ययन पद्धतीमुळे वर्गात शिस्तबद्ध वातावरण राहते आणि विद्यार्थ्यांना मूलभूत संकल्पना स्पष्टपणे समजण्यास मदत होते.

**आभासी अध्ययन :-**

आभासी अध्ययन ही संगणक व नेटवर्क प्रणालीवर आधारित विद्यार्थी व शिक्षक यांच्यात संवाद साधण्यासाठी वास्तवभासी वर्गखोलीसारखे वातावरण निर्माण करणारी एक शिक्षण प्रक्रिया आहे. या वर्ग खोलीत ई-लर्निंग तंत्राच्या सहाय्याने विद्यार्थ्यांसाठी अध्यापन केले जाते. इंटरनेट व zoom मोबाईल अप्लिकेशन च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिक्षण अध्ययन घडवून आणण्यासाठी राबवलेली ही एक व्यवस्था आहे.

आभासी अध्ययनाचे अनेक फायदे आहेत. सर्वप्रथम, विद्यार्थी घरबसल्या सुरक्षित आणि सोयीस्कर वातावरणात शिक्षण घेऊ शकतात. ग्रामीण किंवा दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळू शकते. दुसरे म्हणजे, विद्यार्थ्यांना आपल्या गतीने शिकण्याची संधी मिळते. अवघड विषयाचे व्हिडिओ पुन्हा-पुन्हा पाहता

येतात, नोट्स डाउनलोड करता येतात आणि शंका ऑनलाइन विचारता येतात. तसेच, डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संगणक साक्षरता, तांत्रिक कौशल्ये आणि स्वयंअध्ययनाची सवय विकसित होते.

कोविड-19 महामारीच्या काळात आभासी अध्ययनाचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवले. शाळा व महाविद्यालये बंद असतानाही ऑनलाइन वर्गांच्या माध्यमातून शिक्षण सुरू ठेवणे शक्य झाले. त्यामुळे शिक्षणाची प्रक्रिया पूर्णपणे थांबली नाही. शिक्षकांनीही डिजिटल साधनांचा वापर करून नवे अध्यापन तंत्र आत्मसात केले.

तथापि, आभासी अध्ययनाला काही मर्यादाही आहेत. सर्व विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन, संगणक किंवा इंटरनेटची सुविधा नसते. दीर्घकाळ स्क्रीनसमोर बसल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो आणि आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. प्रत्यक्ष वर्गातील सामाजिक संवाद, खेळ, समूहकार्य आणि शारीरिक हालचाली यांचा अभाव जाणवतो. तसेच, काही विद्यार्थ्यांना स्वतःहून अभ्यास करण्याची शिस्त राखणे कठीण जाते.

या अडचणी असूनही, आभासी अध्ययन हे भविष्यकालीन शिक्षणाचे महत्त्वाचे अंग ठरणार आहे. पारंपरिक शिक्षण आणि आभासी शिक्षण यांचा समन्वय साधल्यास अधिक प्रभावी शिक्षणप्रणाली तयार होऊ शकते. शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांनी मिळून डिजिटल शिक्षणाचा योग्य वापर केल्यास ज्ञानप्राप्ती अधिक सुलभ, आकर्षक आणि व्यापक होईल.

**आभासी अध्ययनासाठी विद्यार्थ्यांकडे आवश्यक साहित्य :-**

1. मोबाईल फोन, किंवा टॅबलेट.
2. इंटरनेट कनेक्शन.
3. हेडफोन / माईक – आवाज स्पष्ट ऐकविण्यासाठी
4. पॉवर बॅकअप ( पॉवर बँक ) – वीज खंडित झाल्यास.

**विद्यार्थ्यांच्या अडचणी :-**

1. मोबाईल / टॅबलेटची अनुपलब्धता
2. नेटवर्क व इंटरनेटची समस्या
3. अनियमित वीजपुरवठा
4. अभ्यासासाठी योग्य वातावरणाचा अभाव
5. पालकांची शैक्षणिक व तांत्रिक मदत नसणे
6. आर्थिक अडचणीमुळे डिजिटल साधने व डेटा रिचार्ज न परवडणे

विद्यार्थ्यांच्या वरील समस्या असल्या तरी पालकांशी संवाद करून सदर विद्यार्थ्यांना संशोधन कार्य सुरु असेपर्यंत मोबाईल उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

**संशोधनाची कार्यवाही :-**

पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानाची पातळी तपासण्यासाठी प्रायोगिक आणि नियंत्रित गटाची 20 गुणांची पूर्व चाचणी घेण्यात आली. या चाचणीद्वारे विद्यार्थ्यांच्या विषयासंबंधीच्या विद्यमान ज्ञान-संपादणूकीचा स्तर निश्चित करण्यात आला.

दुसऱ्या टप्प्यात प्रायोगिक गटासाठी संशोधकाने आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार केले. इयत्ता आठवीसाठी असलेल्या एन. एम. एम. एस. परीक्षेतील मानसिक क्षमता चाचणी अध्यापनासाठी एकूण चार घटकावर अध्ययन प्रतिमान तयार केले.

घटक 1 . लयबद्ध मांडणी.
घटक 2 . त्रिकोणांची संख्या मोजणे.
घटक 3 . सांकेतिक भाषा.
घटक 4 . रांगेतील स्थान.

या प्रतिमानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना इंटरनेट व Zoom मोबाईल □प्लिकेशनच्या माध्यमातून अध्यापन करण्यात आले. वास्तवभासी वर्गखोलीसारखे वातावरण निर्माण करून ई-लर्निंग तंत्राचा वापर करण्यात आला. अध्यापनादरम्यान प्रश्नोत्तर, दृश्य-श्राव्य साधने, सादरीकरणे व संवादात्मक कृती यांचा समावेश करण्यात आला. या कालावधीत विद्यार्थ्यांचे निरीक्षण करण्यासाठी निरीक्षण सूची वापरण्यात आली. सोबतच नियंत्रित गटासाठी वरील चार घटकांवर पारंपारिक पद्धतीने अध्यापन करण्यात आले.

तिसऱ्या टप्प्यात आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपारिक अध्ययन पद्धतीचा वापर पूर्ण झाल्यानंतर दोन्ही गटातील विद्यार्थ्यांची उपरोक्त चार घटकावर 20 गुणांची उत्तर चाचणी घेण्यात आली. दोन्ही गटातील विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील गुणांची तुलना करून आभासी अध्ययन पद्धतीचा विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणूकीवर झालेला परिणाम अभ्यासण्यात आला. प्राप्त माहितीचे विश्लेषण करून आभासी अध्ययन पद्धती व पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान- संपादणुकीवर होणाऱ्या परिणामांची तुलना करण्यात आली. यासाठी आवश्यक सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांचे मत व अनुभव जाणून घेण्यासाठी प्रश्नावली वापरण्यात आली. प्राप्त माहितीचे संकलन, वर्गीकरण व विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

**माहितीचे अर्थनिर्वचन :-**

| विवरण | पूर्व चाचणी प्रायोगिक गट (गुण 20) | पूर्व चाचणी नियंत्रित गट (गुण 20) | पूर्व चाचणी फरक | उत्तर चाचणी प्रायोगिक गट (गुण 20) | उत्तर चाचणी नियंत्रित गट (गुण 20) | उत्तर चाचणी फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | 40 | 40 | 00 | 40 | 40 | 00 |
| एकूण गुण | 306 | 312 | - 6 | 596 | 424 | + 172 |
| शेकडा प्रमाण | 38.25 | 39.00 | - 0.75 | 74.50 | 53.00 | +21.25 |
| सरासरी | 7.65 | 7.80 | - 0.15 | 14.90 | 10.60 | + 4.30 |

प्रायोगिक गट आणि नियंत्रित गटाच्या घेतलेल्या पूर्व चाचणीतील शेकडा प्रमाण आणि सरसरी निकालात फारसा फरक आढळला नाही. परंतु उत्तर चाचणीत प्रायोगिक गट आणि नियंत्रित गटाचा शेकडा प्रमाणातील फरक हा 21.25 आहे आणि सरासरीतील फरक हा 4.30 आहे. या फरकावरून असे लक्षात येते की आभासी अध्ययन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणूकीत सकारात्मक परिणाम दिसून आला.

म्हणून संशोधकाने "आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपरिक अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत कोणताही लक्षणीय फरक आढळूत नाही " ही परिकल्पना फेटाळली आहे.

**निष्कर्ष :-**

1. उच्च प्राथमिक शाळांमधील पारंपरिक अध्ययन पद्धतीमध्ये शिक्षक हा अध्यापन प्रक्रियेचा केंद्रबिंदू असतो आणि अध्यापन मुख्यतः वर्गखोलीत प्रत्यक्ष पद्धतीने फळा, खडू व पाठ्यपुस्तकांच्या सहाय्याने केले जाते, हे या अभ्यासातून स्पष्ट झाले.

2. आभासी अध्ययन पद्धतीवर आधारित अध्ययन प्रतिमान तयार करून Zoom आणि इंटरनेटच्या सहाय्याने अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांचा सहभाग, समज आणि शिकण्याची गती वाढण्यास मदत होते, असे आढळून आले.

3. आभासी अध्ययन पद्धतीद्वारे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत लक्षणीय वाढ झालेली दिसून आली. प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणीत सरासरी 14.90 गुण मिळाले, जे पूर्व चाचणीपेक्षा लक्षणीय जास्त आहेत.

4. आभासी अध्ययन पद्धती आणि पारंपरिक अध्ययन पद्धती यांची तुलना करता, आभासी अध्ययन पद्धती अधिक प्रभावी ठरली. उत्तर चाचणीत प्रायोगिक गट व नियंत्रित गटाच्या शेकडा प्रमाणात 21.25 इतका फरक आढळला, त्यामुळे आभासी अध्ययन पद्धती विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीस अधिक परिणामकारक असल्याचे निष्पन्न झाले.

**शिफारशी:-**

1. उच्च प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या ज्ञान-संपादणुकीत वाढ करण्यासाठी पारंपरिक अध्ययन पद्धतीसोबत आभासी अध्ययन पद्धतीचा समन्वयाने वापर करावा. त्यामुळे विद्यार्थ्यांना दृश्य-श्राव्य साधनांच्या माध्यमातून विषय अधिक सोप्या व आकर्षक पद्धतीने समजण्यास मदत होईल.

2. आभासी अध्ययन प्रभावीपणे राबवण्यासाठी शाळांमध्ये इंटरनेट सुविधा, डिजिटल साधने (मोबाईल/टॅबलेट) आणि शिक्षकांना तांत्रिक प्रशिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, ज्यामुळे डिजिटल शिक्षण अधिक परिणामकारकपणे अमलात आणता येईल.

**संदर्भसूची:-**

1. आंबेडकर, एस. बी. (2018). शैक्षणिक तंत्रज्ञान व अध्ययन प्रक्रिया. औरंगाबाद: विद्या प्रकाशन.

2. अँडरसन, टी. (2008). ऑनलाइन शिक्षणाचे सिद्धांत आणि व्यवहार (The Theory and Practice of Online Learning). एडमंटन : अँथाबास्का युनिव्हर्सिटी प्रेस.

3. कुमार, आर., &वर्मा, ए. (2021). आभासी शिक्षणाच्या प्रभावीतेचा आढावा. शिक्षण संशोधन जर्नल, 15(3), 78–92.

4. कुलकर्णी, एस. पी. (2020). शिक्षणातील तंत्रज्ञानाचा वापर: एक सैद्धांतिक दृष्टिकोन. नाशिक: शिक्षण प्रकाशन.

5. जोशी, एम. एस., &देशमुख, आर. के. (2021). आभासी शिक्षण आणि विद्यार्थी सहभाग: एक अभ्यास. भारतीय शिक्षण संशोधन जर्नल, 12(2), 45–58.

6. डॉ. पाटील, ए. एन. (2019). उच्च प्राथमिक शिक्षणातील डिजिटल साधनांचा वापर: संधी व आव्हाने. पुणे: शैक्षणिक संशोधन प्रकाशन.

7. देशपांडे, एस., &कुलकर्णी, आर. (2023). डिजिटल साधनांचा वापर करून शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे. शिक्षण तंत्रज्ञान जर्नल, 8(2), 101–115.

8. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT). (2021). ऑनलाइन व डिजिटल शिक्षण मार्गदर्शक. पुणे : MSCERT.

9. मिश्रा, एस., आणि पांडा, एस. (2020). आभासी अध्ययन आणि ऑनलाइन शिक्षण (Virtual Learning and Online Education). नवी दिल्ली : कॉमनवेल्थ एज्युकेशनल मीडिया सेंटर फॉर एशिया.

10. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT). (2021). शिक्षणामध्ये माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT in Education). नवी दिल्ली : NCERT.